
# पूर्व-अपूर्व

द्वारकानाथ संझगिरी

609




REFBK-0028772
REFBK-0028772

# पूर्व-अपूर्व

द्वारकानाथ संझगिरी

REFBK-0028772
REFBK-0028772

ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा. लि.



नाव : द्वारकानाथ संझगिरी

शिक्षण : बी. ई. (सिविल)

लेखनाची सुरुवात : १९७९ साली 'एकच षटकार' पाक्षिकाचे कार्यकारी संपादक.

: लोकसत्ता, सांज-लोकसत्ता, सामना, आज दिनांक, बेळगाव तरुण भारत वगैरे दैनिके, सांज दैनिकांतून स्तंभलेखन.

भ्रमंती : युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान, श्रीलंका, अमेरिका, हाँगकाँग, बँकॉक, सिंगापूर

प्रकाशित पुस्तके :
१) 'मुलुखगिरी' हा परदेश प्रवासावर आधारित लेखांचा संग्रह
२) 'क्रिकेट-गाथा' हे गेल्या दशकात क्रिकेटमध्ये घडलेल्या ठळक घटनांचे 'आँखो देखा हाल' असलेलं पुस्तक.

भू-प्रवास ८०९
२८८०८२
२५।३।९८

संदर्भ
भूप्रवास
८०९
२८८०८२
२५।३।९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

30 APR 1997
21 MAY 1997
28 MAY 1997
4 JUN 1997
14 JUN 1997
8 JUN 1997
16 JUL 1997
23 JUL 1997
2 AUG 1997
9 AUG 1997
20 AUG 1997
23 AUG 1997
10 SEP 1997
13 SEP 1997
४ ऑक्टो १९९८
१५/१०/९८
१५।११।९८
१०।११।९८
१८।१२।९८
३४।९
४।२
4 MAR 1998

(कृ.मा.पहा.)
१६०००/११-९५

**प्रकाशक**
नंदप्रसाद बर्वे
ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा. लि.
४१ बुधवार पेठ, जोगेश्वरी लेन
पुणे ४११ ००२

**मुद्रक**
वैभव बर्वे
श्री वेदविद्या मुद्रणालय प्रा. लि.
४१ बुधवार पेठ, जोगेश्वरी लेन
पुणे ४११ ००२

©
प्रकाशकाधीन

**मुखपृष्ठ**
रविमुकुल

**प्रकाशन**
फेब्रुवारी १९९७

**रेखाचित्रे**
प्रभाशंकर कवडी

**मूल्य : शंभर रुपये मात्र**

जयंत-चारु थोबाणी यांस, प्रेमपूर्वक.

माझ्या हातावर
परदेशगमनाची रेषा उमटवायला
परमेश्वर विसरला होता,
ते काम जयंत थोबाणीने केलं.

## मनोगत

अक्षरांच्या दुनियेतलं, 'पूर्व-अपूर्व' हे माझं तिसरं अपत्य. आणि ह्या बाबतीत कुटुंब-नियोजन वगैरे करायचा माझा बिलकूल विचार नाही.

'पूर्व-अपूर्व' हा दै. सामनामधल्या माझ्या प्रवासवर्णनात्मक लेखांचा संग्रह आहे. हे रूढ अर्थाने प्रवासवर्णन नाही. क्रिकेटच्या निमित्ताने केलेल्या प्रवासात भेटलेली माणसं, पाहिलेली स्थळं, आलेला अनुभव मी तुमच्यापुढे ठेवलाय. तो पूर्णपणे व्यक्तिगत आहे.

हा अनुभव दै. सामनातून मांडताना दै. सामनाचे तडफदार संपादक आणि माझा जवळचा मित्र संजय राऊत ह्याची मोलाची मदत झाली. एक गोष्ट मला आवर्जून सांगावीशी वाटते. मी लिहिलेले अनुभव, माझी विचारसरणी आणि दै. सामनाची वैचारिक बैठक ह्यांत दोन ध्रुवांएवढं अंतर असायचं. पण संजय राऊतने एक शब्दही इथला तिथे केला नाही.

हे पुस्तक लंडनमध्ये स्थायिक झालेला माझा मित्र जयंत थोबाणीला मी अर्पण करतोय. जन्मतःच माझ्या हातावर परदेशगमनाची रेषा होती की नाही मला ठाऊक नाही. असली तरी त्याची ग्वाही कुठल्याही ज्योतिष्याने मला कधी दिलेली नाही. ती रेषा माझ्या हातावर जयंत थोबाणीने उमटवली, ह्याबद्दल माझ्या मनात संदेह नाही. एकोणीसशे त्र्याऐंशी साली त्याने मला इंग्लंडला अक्षरशः ढकललं. तिथे त्याच्या बहिणीकडे माझी राहायची सोय केली. त्यानंतर मी फिरत राहिलो. आजही जयंतचं लंडनचं घर मला माझं घर वाटतं. आणि मुंबईच्या खालोखाल मला लंडन प्रिय वाटतं.

ह्या मुशाफिरीत असंच एक घर मला दुबईत सापडलं. दिलीप खेडेकर अशी घरमालकाच्या नावाची पाटी त्या घरावर लटकते. काही वेळा आम्ही दोघांनी मिळून मुशाफिरी केली. अरबस्थानातलं वाळवंट तर मी त्याचं बोट धरून फिरलोय.

*बघता बघता मला जगभर एवढे मित्र मिळाले की देश ऑस्ट्रेलिया असो, अमेरिका किंवा कॅनडा, 'मी येऊ का?' असं मला माझ्या मित्रांना विचारावं लागत नाही. 'मी येतोय' एवढा निरोप पुरा होतो. मी ह्या मित्रांचे आभार मानून त्यांच्या मैत्रीचा अपमान करू शकत नाही. पण एवढंच सांगतो की त्यांच्या प्रेमाशिवाय मी एवढं जग फिरू शकलो नसतो.*

*ह्या नव्या अपत्याचं नाव काय ठेवावं हा प्रश्न मला बरेच दिवस ग्रासत होता. माझं पहिलं अपत्य 'मुलुखगिरी' नावाने बाजारात आलं तेव्हा माझा मित्र नामदेव ढसाळ मला म्हणाला, "कसली बामणी नावं ठेवतोस रे पुस्तकाला! एवढं जग फिरतोस पण तुझ्यावरचे बामणी संस्कार काही जात नाहीत. थांब, मी तुला एक नाव सुचवतो. 'माझी बाहेरख्याली' असं नाव ठेव !" खरं सांगू? पुस्तकाला तेच नाव ठेवावंसं वाटलं. पण शिंची मध्यमवर्गीय भीड काही चेपत नाही अजून.*

*सॉरी नामदेव ! 'बाहेरख्याली' पणा अजून बराच करायचाय, तोपर्यंत भीडही चेपेल असं वाटतंय.*

*असो. ह्या अपत्याचं बाळंतपण बर्वेबंधूंच्या ज्ञानदा पब्लिकेशन्स ह्या मॅटर्निटी होममध्ये सुखरूप पार पडलं. कै. प्रभाशंकर कवडींची 'सामन्या'तली रेखाचित्रं वापरायची परवानगी श्रीमती इंदिराताई कवडी यांनी आम्हाला दिली. पुस्तकाचं मुखपृष्ठ आकर्षक करण्यात चित्रकार रविमुकुल ह्यांनी हातभार लावला. त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार.*

**द्वारकानाथ संझगिरी**

१०, डी हेंद्रे कॅसल,
बाबरेकर मार्ग, गोखले रोड
दादर (प.), मुंबई ४०० ०२८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. प्रवास 609
अ. क्र. 26002
29/3/99
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## □ जेव्हा मला राष्ट्रप्रेम सापडलं

एखाद्या परदेश दौऱ्यावरून परतल्यावर एक प्रश्न मला खास विचारला जातो, "त्यांच्यात आणि आपल्यात किती फरक आहे?" 'आपण म्हणजे

अर्थातच श्रीलंका-पाकिस्तान, थायलंड वगैरे! 'ते' म्हणजे प्रगत देश. इंग्लंड, युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड वगैरे!

आणि माझं नेहमीच उत्तर असतं, "फरक? साधारण नऊवारी साडी आणि मिनी स्कर्ट यात आहे तेवढा!"

एकदा एक मित्र चपापून म्हणाला, "मी 'त्या' बाबतीत म्हणत नाही रे, ते आपल्या किती पुढे आहेत?"

मी त्याला म्हटलं, "मीसुद्धा तुला त्या बाबतीत सांगत नाही. फक्त काळाची तुलना करतोय - बरं, तुला समजेल अशा भाषेत सांगायचं तर आपण 'ॲम्बॅसॅडर गाडीच्या वेगाने चाललोय. त्यांचा वेग 'फेरारी' किंवा पोर्शेचा आहे. त्यांना गाठणं कठीणच नाही, अशक्य आहे."

तेवढ्याने त्या मित्राचं प्रश्नाचं षटक काही संपलं नाही. पुढचा 'चेंडू' दत्त म्हणून हजर होता.

"असं का?"

मी त्याला म्हटलं, "काही प्रश्नांची उत्तरं फार मोठी असतात. तुझ्या प्रश्नाचं उत्तर हा ग्रंथाचा विषय आहे. पण तरीही त्या ग्रंथाचं एक पान मी तुझ्यापुढे ठेवतो. कारण ती एक अशी गोष्ट आहे की त्याचं आपण सहज अनुकरण करू शकतो. ती आहे 'मूलभूत सचोटी'-'बेसिक ऑनेस्टी.'

तिथे काही देवमाणसं नाहीत. तिथे चोऱ्या होतात. बलात्कार होतात, घरफोडी होते, पण सर्वसाधारण माणूस तिथे सचोटीने वागताना दिसतो. नेहमीच्या व्यवहारात तिथे भ्रष्टाचार किंवा फसवणूक दिसत नाही."

एक साधं उदाहरण सांगतो, काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मी पुण्याला गेलो होतो. एका विशिष्ट हॉटेलात मित्र भेटणार म्हणून त्या हॉटेलात उतरायचं ठरवलं. पुणे स्टेशनवर उतरल्यावर त्या हॉटेलचं नाव आणि पत्ता मी रिक्षावाल्याला दिला. मी रिक्षात बसलो. पंधरा-वीस मिनिटांनी मी त्या हॉटेलपाशी पोहोचलो. मीटरही पंधरा-वीस रुपये मिरवत होतं. रात्र झाली होती त्यामुळे सरळ हॉटेलमध्ये जाऊन झोपलो. दुसऱ्या दिवशी परतीचं तिकीट बुक करायचा विचार केला. त्यामुळे पुणे स्टेशनला जायचं होतं. पुण्याची हवा अशी आहे की तिथे गेल्यावर पुणेरी माणसांचे गुण चटकन आपल्यात शिरतात. मी ठरवलं,

पुन्हा कशाला रिक्षासाठी पंधरा-वीस करायचे ? रुपये खर्च 'पी. एम. टी.' च्या सेवेचा लाभ घ्यावा. मी त्या हॉटेलच्या मॅनेजरला विचारलं, "इथून पुणे स्टेशनवर कुठली बस जाईल ?" त्याने माझ्याकडे विचित्र नजरेनं पाहिलं आणि म्हणाला, "बस कशाला हवी ? या गल्लीतून बाहेर पडून डाव्या हाताला मिनिटभर चाललात तर पुणे स्टेशन दिसेल." रिक्षावाल्याने मला किती मूर्ख बनवलंय याची कल्पना आली.

हा माझा अनुभव अपवादात्मक वगैरे नाही. बऱ्याचदा मला आलाय. तुम्हालाही कुठेतरी आलाच असेल.

आता तुम्हाला मी परवाचा माझा न्यूझीलंडमधल्या खाईस्टचर्च शहरातला अनुभव सांगतो. मला माझ्या विमानाच्या तिकिटात काही बदल करण्यासाठी 'क्वांटास' या विमान कंपनीच्या ऑफिसात जायचं होतं. मी टॅक्सी केली. टॅक्सी चालवणारी एक महिला होती. तिने एका चौकात गाडी उभी केली आणि म्हणाली, "समोरच्या इमारतीत ते ऑफिस असावं." पण मी उतरून बिल द्यायच्या आत तिच्या लक्षात आलं की ते ऑफिस तिथून हलवलं गेलंय. तिने चौकशी केली आणि म्हणाली, "ऑफिस मागेच राहिलं," तिने गाडी वळवली. मुंबईच्या रस्त्यांचा आधार घेऊन सांगायचं तर थोडक्यात असं झालं की, ऑफिस सेना भवनाजवळ होतं आणि आम्ही पोर्तुगीज चर्चजवळ पोहोचलो होतो. तिने नंतर अर्थात योग्य जागी सोडलं. मिटरवर साडेआठ डॉलर चमकत होते. मी तिला साडेआठ डॉलर दिले. तिने त्यातले दोन डॉलर मला परत केले. तिच्या औदार्याचा मला उलगडा होईना. इतक्यात तिने सस्पेन्स संपवला. ती म्हणाली, "मी तुला चुकीच्या जागी नेले. आपण इथे सरळ आलो असतो तर तुला साडेसहा डॉलर्सच पडले असते."

ही सचोटी एकदा तरी आपल्या देशात अनुभवायला मिळावी अशी माझी इच्छा आहे.

आणखीन एक उदाहरण देतो. उदाहरण इंग्लंडमधलं आहे. हा अनुभव, सचोटी आणि राष्ट्रप्रेमाचा आहे. आपल्याकडे राष्ट्रप्रेम विविध राजकीय पक्षांच्या स्टेजवर मिरवताना दिसतं. विविध पक्षांच्या नेत्यांच्या जिभेवर तर ते मालकी हक्क असल्यासारखं राहात असतं. पण आपल्यालाही हे ठाऊक आहे की ते बेगडी असतं. पण आपलं राष्ट्रप्रेम तरी बावनकशी असतं ? त्या दिवशी इंग्लंडमध्ये हा प्रश्न मी स्वत:ला विचारून पाहिला.

मी आणि माझा इंग्लंडमध्ये राहणारा भारतीय मित्र, आम्ही किलबर्नहून हॉन्सलो या लंडनच्या उपनगरात रात्री ट्रेनने येत होतो. तिथे काही वेळा रात्री तिकिटाच्या खिडक्या लवकर बंद होतात. मग तुम्ही ज्या स्टेशनवर उतरता तिथल्या टीसीला सांगायचं, 'अमुक तमुक स्टेशनवरून आलोय.' मग तो तुम्हाला पैसे सांगतो, ते त्याला द्यायचे. ते रेल्वेच्या खिशात जातात.

आमच्याबरोबर काही गोरी मंडळी त्या गाडीत चढली. हॉन्सलो स्टेशन आल्यावर



आम्ही उरतलो. किलबर्नला बरोबर चढलेला एक गोराही आमच्या बरोबर उतरला. तो पुढे होता, त्याच्यामागे मी आणि माझ्यापाठी माझा इंग्लंडमध्ये स्थायिक झालेला तो मित्र. त्या गोऱ्याने टीसीला सांगितले, "मी किलबर्नहून आलोय." लगेच टीसीने त्याच्याकडून दीड पौंड घेतले. मी खिशातून तीन पौंड काढत असताना माझा मित्र माझ्या पुढे सरकला आणि म्हणाला, "Two Tickets From osterley" टी.सी. म्हणाला, "थर्टी पेन्स इच." माझ्या मित्राने साठ पेन्स त्याच्या हातात टेकवले आणि मला खेचत बाहेर नेलं. मी त्याला म्हटलं, "तू त्या टीसीला ऑस्टरलीवरून आलो असं का सांगितलंस?" ऑस्टरली हे हॉन्सलोच्या आधीचं स्टेशन होतं. तो म्हणाला, "बघ, त्यामुळे आपले केवढे पैसे वाचले!"

खरं सांगू, त्याक्षणी मला माझ्या मित्राचा राग आला. पण त्यापेक्षा जास्त घृणा वाटली आणि त्या सामान्य गोऱ्या माणसाबद्दल विलक्षण आदर वाटला. आपण भारतीय जगात कुठेही राहिलो तरी बदलत नाही हे जाणवलं. तो गोरा, आपण ऑस्टरलीवरून आलोय असं सांगू शकला नसता? पण ते त्याच्या रक्तातच नाही. म्हणून तर तो चिमूटभर देश जगावर राज्य करून गेला. आम्ही अजूनही सुधारण्यासाठी धडपडतोय.

मी त्या माझ्या मित्राला म्हटलं, "फेरारी किंवा पोर्शे स्टिअरिंग उगाच हातात येत नाही. ते स्टिअरिंग तुम्हांला प्रगतीच्या वाटेने संपन्न, समृद्ध आयुष्याकडे नेतं. पण त्यासाठी सचोटी लागते. ती या पहिल्या जगातल्या देशात ठायी ठायी सापडते. आपल्या देशात ही सर्वात महान दुर्मिळ गोष्ट आहे म्हणून तर आपण गरीब आणि मागासलेले आहोत."

■

(१७ एप्रिल १९९४)

## □ टेलिफोन नावाचा दोस्त

ही गोष्ट इंग्लंडची आहे. भारतीय क्रिकेट संघाचा तिथे दौरा होता म्हणून मी गेलो होतो. त्यावेळी लालचंद राजपूत हा माजी क्रिकेटपटू तिथे स्कॉटलंडमध्ये खेळत होता. त्याने एके दिवशी हट्ट केला. म्हणाला, 'किमान दोन दिवस तरी स्कॉटलंडला ये.'

मी त्याला "एका शनिवारी-रविवारी तिथे येईन" असं वचन दिलं. 'येण्यापूर्वी क्लबवर फोन कर' असं त्याने मला वारंवार सांगितलं. टेलिफोन नंबरही दिला.

दौऱ्यावरच्या गडबडीत त्याच्याकडे जाणं राहून गेलं. मी मुंबईला परतलो. त्यानंतर तोही आला. आल्यावर मी त्याच्याकडे का गेलो नाही हा जाब विचारायला त्याने मला फोन केला आणि मी आपला कारण देऊन मोकळा झालो. म्हटलं, "अरे, तुला किती फोन करायचा प्रयत्न केला.' पण सारखे 'रॉंगनंबर' लागायचे. शेवटी कंटाळलो."

तो माझं कारण ऐकून जोरजोरात हसायला लागला. मला कळेना. मी त्याला विचारलं, "हसतोयस का असा जोरजोरात?" मग म्हणाला, "मित्रा, एवढ्या दिवसात थाप मारण्यासाठी चांगलं कारण तरी शोधायचंस. असे इंग्लंडला किती वेळा गेलायस?" मी म्हटलं, अनेकदा. पण का? मग तो स्वत:चं हसू दाबत म्हणाला, "तिथून कुठेही फोन करताना कधी रॉंगनंबर तुला लागलाय? ते काय 'एम. टी. एन. एल.' आहे?"

आणि मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला. इंग्लंडमध्ये किंवा कुठल्याही पहिल्या जगातल्या देशात अशी थाप मारायला टेलिफोन आपल्या मदतीला येत नाही. इथे ती थाप चालते. इथे मॅटर्निटी हॉस्पिटलला फोन केल्यावर समोरून 'दयाराम दामोदर' असा आवाज ऐकू येऊ शकतो.

त्यांचे फोन एवढे बिनचूक कसे चालतात याचं मला नेहमीच कौतुक वाटलंय. कधीकधी रागही आलाय. क्रॉस कनेक्शनची गंमतसुद्धा ऐकायला मिळत नाही. आपण एखाद्या मित्राशी बोलत असताना मध्येच एखाद्या सुझनस्टीव्हचे रोमँटिक संवाद ऐकायला मिळतायत् किंवा एखादी मिसेस लॅंगले, प्रियकराला फोन करून नवऱ्याला कसं कटवायचं याचं खलबत करतेय' वगैरे गंमत ऐकायला मिळत नाही. तिथला फोन संघाच्या एखाद्या स्वयंसेवकाप्रमाणे आपला आदेश मानतो. मात्र तिथला फोन हा आपल्या जवळच्या मित्रासारखा वागतो. एक म्हणजे, तो कुठेही

चटकन भेटतो. जवळजवळ प्रत्येकाच्या घरात. काही सुखवस्तू मंडळी तो बॅगेत किंवा स्वत:च्या गाडीत घेऊन फिरतात. टॅक्सीत तर हटकून असतो. फुटपाथवर, शॉपिंग सेंटरमध्ये तो जागोजागी दिसतो. इंग्लंड असो, युरोप असो, अमेरिका असो. फुटपाथवर उभं राहून जगात कुठेही फोन करता येतो. त्यासाठी खिशात सुटी नाणी असतील तर उत्तम. हल्ली तर सर्वत्र कार्ड फोनस्चा सुळसुळाट आहे आणि खिशात त्यामुळे छदाम नाही पण मुंबईत बायकोशी बोलायचंय तर तेसुद्धा शक्य आहे.

मुख्य म्हणजे इंग्लिश वाचता आलं की पब्लिक फोन कसा करावा हे कुणाला विचारायची गरज नसते. सूचना व्यवस्थित लिहिलेल्या असतात. नाण्यांची कटकट मिटवली आहे. पौंड, दहा पौंड वगैरेची कार्ड मिळतात. ते कार्ड कुठे सरकवायचं ते तिथे लिहिलेलं असते. फोन झाल्यावर पाच पौंडातले किती पैसे वापरले, किती उरले याचा हिशेबही टेलिफोनच्या छोट्या स्क्रीनवर येतो. त्यामुळे कुणाच्याही दुकानात शिरून 'जरा फोन करू काऽ' असं विचारायची पाळी येत नाही.

खिशात पैसे नसतील तरी सोय आहे. तिथे 'कलेक्ट कॉल' नावाचा प्रकार आहे. समजा तुम्हाला लंडनहून मुंबईला फोन करायचाय तर मुंबईला जिथे फोन करायचाय त्यांची फोनचे पैसे भरायची तयारी असेल तर अक्षरश: तीन मिनिटांत तुम्ही मुंबईत कुणाशीही बोलू शकता आणि यासाठी तुम्हाला फार काही करावं लागत नाही. एक नंबर फिरवायचा. मग ऑपरेटर तुम्हाला मुंबईतला कुठला नंबर हवाय ते विचारते. मुंबईच्या टेलिफोन एक्स्चेंजने वेळ घेतला नाही आणि ज्याला फोन करायचाय त्याने बिलाच्या भीतीने नकार दिला नाही, तर शेजाऱ्याशी बोलावे इतक्या सहजतेने मुंबईत कुणाशीही बोलता येतं.

हायवेवरसुद्धा प्रत्येक मैलावर तिथं फोन असतो. त्यामुळे गाडी बिघडली किंवा एखादा अपघात झाला तर अक्षरश: दहा मिनिटांच्या आत मदत मिळू शकते.

त्या जगात फोनवरून अमुक एक गोष्ट करता येत नाही असं नाही. न्यूझीलंडमध्ये मी एकदोन नवीन अनुभव घेतले. तिथे विमानतळावर उतरल्यावर टुरिस्ट ऑफिस असतंच. पण अख्ख्या टुरिस्ट ऑफिसचं काम एक फोनही करू शकतो. तिथे निऑन ट्यूब्ज वापरून वेगवेगळ्या हॉटेल्स्, मोटेल्सचे पत्ते आणि फोन नंबर काचेवर लिहिलेले असतात. काही ठिकाणी तर हॉटेल-मोटेल मधल्या सुखसोई, त्यांचे दर, त्यांच्या खोल्यांचे, फर्निचर व फोटो वगैरे सगळं दाखवलेलं असायचं. त्यातून तुमच्या खिशाला परवडेल असं हॉटेल किंवा मोटेल तुम्ही शोधायचं. त्या फोनवरून त्या हॉटेल-मोटेलच्या मालकाशी बोलायचं. सौदा पटला, जागा असली तर तो तुम्हाला तिथं कसं यायचं हे समजावणार. नाहीतर दुसरं हॉटेल.

मोटेलमधेही एक चांगला प्रकार पाहिला. हवामानापासून नाईटक्लबपर्यंत कसलीही




माहिती मिळण्यासाठी फोनची सोय होती. तीसुद्धा फुकटात. प्रत्येक गोष्टीला एक विशिष्ट नंबर दिला होता. उदा. हवामान एक्केचाळीस, भारतीय रेस्टॉरंट बावन्न, किंवा नाईटक्लब त्रेसष्ट वगैरे. त्यांनी दिलेला एक नंबर फिरवायचा आणि मग हा वर सांगितलेला नंबर ! समजा बावन्न नंबर फिरवला तर त्या शहरात जेवढी भारतीय रेस्टॉरंटस् होती त्यांचे पत्ते आणि टेलिफोन क्रमांकाची टेप सुरू व्हायची. 'तो' मूड असेल तर त्रेसष्ट नंबर फिरवायचा, लगेच नाईट क्लबचे फोन नंबर आणि पत्ते हाती लागायचे.

फोनचा मित्रासारखा उपयोग करताना ते आणखीन एक काळजी घेतात. फोनवरून बाहेर पडणारा आवाज मंजुळच असेल याकडे जातीने लक्ष पुरवले जाते. 'हॅलो' म्हणायची सुद्धाही एक गोड पद्धत आहे. आपल्याकडे 'हॅलो'च्या उच्चार 'हलाव'पासून 'हॅह्लू'पर्यंत कसाही होतो. काही वेळा समोरचा माणूस "कोण आहे?" असं इतक्या त्रासिकपणे म्हणतो, की घरात कुणाचा फोन येणे ही वस्तीला पाहुणा येण्याइतकी त्रासदायक गोष्ट वाटावी. आपल्या टेलिफोन ऑपरेटर्सना तर 'मंजुळ आवाजात अदबीने बोललात तर पगार कापला जाईल', असा सज्जड दम त्यांचे अधिकारी देत असावेत असा मला संशय येतो. ट्रंककॉलसाठी किंवा चौकशीसाठी नंबर फिरवा. एकतर 'यह एक्सचेंज कोड मौजुद नहीं' अशी तरी टेप वाजेल किंवा ऑपरेटर फोनवर आलीच, तर "मटार वीस रुपये किलो" सांगणाऱ्या भाजीवालीच्या टोनमध्ये आणि तिच्या टोनमध्ये काही फरक नसतो. तिथे टेलिफोन ऑपरेटर 'मे आय हेल्प यू' अशा आवाजात बोलते की आपली खात्री पटते की ती समोर असती तर प्रेमाने तिने आपल्या गळ्यात हात टाकले असते. कदाचित एखादं चुंबनही दिलं असतं.

अर्थात आपण त्यांच्याप्रमाणे 'हॅलो' बोललंच पाहिजे असं नाही. पाकिस्तानात कुठे बोलतात? तिथं फोन केल्यावर प्रथम 'सलाम आलेकूम'च कानावर पडतं. पण तेही अदबीने. जुलमाचा सलाम नसतो तो. हिंदीचा उपयोग करून अशी एखादी स्वागत करण्याची पद्धत आपल्याला स्वीकारता येईल. फक्त अपेक्षा एवढीच आहे की कानावर पडणारे शब्द गोड वाटावेत.

टेलिफोनने अशीच दोस्ती आपल्या देशात मिळवावी अशी इच्छा आहे. 'एम टी एन एल वाल्यानो, शक्य करून दाखवाल हे?'

■

(२४ एप्रिल १९९४)

## □ किसोग्रॅम गर्ल

तों डात बोटं घालायला लावणाऱ्या गोष्टी पहिल्या जगातल्या देशात अगदी मुबलकपणे मिळतात. साधी मेणबत्ती घ्या. मेणबत्ती हे त्यांचं निरांजन. देवापुढे ते मेणबत्त्याच ठेवतात. अक्षरश: शेकडो आकाराच्या मेणबत्त्या तिथे मिळतात. पण मध्यंतरी ऑकलंडच्या शॉपिंग सेंटरमध्ये मी एक मेणबत्ती पाहिली. तशी छोटी. वीतभरसुद्धा नव्हती. तिला एक छोटा स्टॅण्ड होता. मी किंमत पाहिली. चक्क सात डॉलर होती. डॉलर अर्थात न्यूझीलंडचे. पण तिची आपल्या रुपयात किंमत होते तब्बल एकशेवीस रुपये.

त्या दुकानातल्या एका सेल्सगर्लला मी विचारलं, " एवढी महाग का ? " ती हसली आणि एक छोटी कळ दाबली. त्यातून स्वर उमटले. अगदी परिचित स्वर. स्वर होते, "हॅपी बर्थ डे टू यू." या गाण्याचे! तिने जणू मला समजावलं. म्हणाली, "ही मेणबत्ती बर्थ डे केकवर ठेवून पेटवायची. ती पेटली की स्वर लगेच सुरू होतात. एका मेणबत्तीत घरातले तीन-चार 'बर्थ डे' आरामात साजरे होतात."

मुलांना खूष करण्यासाठी मी मेणबत्ती विकत घेतली. कारण हल्ली आपणही मुलांचा वाढदिवस साजरा करताना मेणबत्त्या पेटवतो, केक कापतो. शुभं करोति आपल्या मुलांना म्हणता येत नसलं, तरी 'हॅपी बर्थ डे टू यू' आपल्या मुलांना पाठ असतं. मला आठवतंय, लहानपणी वाढदिवसाच्या दिवशी आई मला देवळात घेऊन जायची. मग घरी ओवाळणी व्हायची. घरात गोडधोड असायचं. आता केक मॉन्जीनीजचा आणायचा की, ताजमधून यावर वाद असतात. थोडक्यात आपण पाश्चिमात्य संस्कृती सरळसरळ स्वीकारली. फक्त वाढदिवसाच्याच बाबतीत नाही, इतर बाबतीतही ती आपण स्वीकारलीय.

उदाहरण देतो. भेटकार्ड नावाचा प्रकार माझ्या लहानपणी मी फक्त दिवाळीला आणि क्वचितप्रसंगी संक्रांतीला पाहिलाय. हल्ली भेटकार्डांना ऊत आलाय. घरात नवीन कुत्रा आणला तरी भेटकार्डाने अभिनंदन करायची सोय आहे. पूर्वी आवडलेल्या मुलीला आपलं मन कळवण्यासाठी लांबलचक पत्र लिहावं लागे. हल्ली भेटकार्ड काम फत्ते करतं. 'व्हॅलन्टाईन डे' म्हणजे काय हे मला परवा परवा कळलं. तेही मैत्रिणीला कार्ड पाठवायला धाकट्या चिरंजीवाने पैसे मागितले तेव्हा! माणूस मेल्यावर सांत्वन करायचं कार्ड आहे की




नाही तेवढं मला ठाऊक नाही.

माझ्या लहानपणी गोड किंवा मृत्यूची बातमी घरात तारेने यायची. पोस्टमनने रात्री-अपरात्री "टेलीग्राम" म्हटलं की छातीत धस्स व्हायचं. डोळ्यासमोर बाहेरगावचे सर्व नातेवाईक यायचे. "विकेट कुणाची पडली?" असाच भाव प्रत्येकाच्या चेहऱ्यावर असायचा. एकदा असाच भाव चेहऱ्यावर घेऊन मी थरथरत्या हाताने तार उघडली तर त्यात मजकूर वेगळाच होता. विकेट पडली नव्हती. पण नवा फलंदाज या जगात फलंदाजी करायला देवाने पाठवला होता. माझ्या एका मामेबहिणीला पुत्ररत्न झालं होतं.

पण या तारेच्या आणि भेटकार्डाच्या किती तरी पुढे पाऊल टाकणारा प्रकार मी एकदा इंग्लंडमध्ये पाहिला होता. आपल्याकडे तो प्रकार येईलही आज ना उद्या! आपल्या संस्कृतीच्या भिंती जरा जास्तच चिवट दिसतायत. एम टीव्ही आणि स्टार टीव्ही एवढी मुसंडी मारून घुसल्यावर इतर गोष्टी घुसायला काय वेळ लागणार?

हो, पण ही गंमत ऐका. एकोणीसशे नव्वदच्या लॉर्डस्वरच्या कसोटी सामन्याची गोष्ट आहे. आदल्याच दिवशी एमसीसीचं मानद सदस्यत्व सुनील गावसकरने नाकारलं होतं. त्याला दरवानाने अडवलं, त्याचा अपमान केला वगैरे प्रकरण झाल्यामुळे त्याने सदस्यत्व नाकारलं होतं. त्या प्रकरणाची गरमागरम चर्चा सुरू होती. इतक्यात एक अर्धनग्न मुलगी दरवानाचा डोळा चुकवून प्रेस बॉक्सच्या बाजूला असलेल्या बीबीसी बॉक्समध्ये घुसली. तिथल्या एका टेक्निशियनला तिनं बॉक्समधून बाहेर आणलं आणि टेलेक्स रूममधल्या एका खुर्चीवर त्याच्या मांडीवर जाऊन बसली आणि मग ज्यागोष्टी

सभ्य माणसं दिवा विझवून आपल्या बेडरूममध्ये करतात, त्या गोष्टी ती तिथे दिवसाढवळ्या सर्वांसमोर करत होती. मी ते सर्व डोळ्याने पाहिलं. त्यांची संस्कृती मला तोंडपाठ असूनही मी अवाक् झालो. मला वाटलं. पिकॅडलीतला 'लाईव्ह शो' लॉर्डस्वर वाट चुकला असावा. (लाईव्ह शो म्हणजे नग्न स्त्री-पुरुष प्रेमाचे चाळे स्टेजवर करून दाखवतात.)

बरं, तो प्रकार एन्जॉय करणारेही बरेच होते. प्रत्येक कृतीबरोबर वन्समोअरचे नारे लावले जात होते. मी तिथे फार काळ थबकलो नाही. उगाच सभ्यतेचा आव मी आणत नाही. पण त्यादिवशी अझरुद्दीन इतका अप्रतिम खेळत होता की साक्षात मॅडोना जरी आपलं मादक सौंदर्य उधळत आली असती तरी माझे डोळे अझरच्या फलंदाजीकडेच वळले असते. मी निघालो तेव्हा तिच्या अंगावर फक्त 'ब्रा' आणि वीतभर चड्डी होती.

नंतर मी चौकशी केली. ती कोण? का आली? वगैरे... आणि ऐकून गार झालो. त्या दिवशी त्या टेक्निशियनचा वाढदिवस होता. तो साजरा करण्यासाठी ती आली होती. सॉरी! पाठवली गेली होती. ती त्याची मैत्रीण वगैरे नव्हती. त्याच्या मित्राने तिला पाठवलं होतं. तिथे वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठवण्याची एक अभिनव पद्धत आहे. पूर्वी आपण टेलीग्राम पाठवायचो, आता ग्रीटिंग कार्ड पाठवतो. तशा तिथे 'किसोग्रॅम' गर्ल्स पाठवतात. त्यांनी जायचं आणि ज्याच्याकडे पाठवलंय त्याचा वाढदिवस साजरा करायचा.

मी माझ्या इंग्लंडमधल्या दोस्ताला माझा वाढदिवस कधी आहे ते सांगितलंय. तुम्हाला तुमचा वाढदिवस कळवायचाय?

■

(१ मे १९९४)

# मी आणि माझं वर्तमानपत्र

"टाइम्स पढके हो गया? जरा यहाँ भेज दो"

आमच्या समोरचा काकाजी तो मरेपर्यंत सकाळी हे फर्मान मला सोडायचा. त्याचं फर्मान कानावर पडेपर्यंत माझा फक्त पहिला चहा घशाखाली उतरलेला असायचा आणि टाइम्सचं पहिलं पान वाचून झालेलं असायचं.

आमचा काकाजी गर्भश्रीमंत. त्याची वाचनाची आवडही दांडगी. पण तो फक्त एक कुठलंस् गुजराती वर्तमानपत्र विकत घ्यायचा. 'टाइम्स'साठी तो संझगिरींच्या फुकट वाचनालयाचा स्वयंघोषित सभासद होता. 'इंडियन एक्सप्रेस' वरच्या जोशींकडून त्याच्या घरात यायचा. शेजारच्या शहांचा 'प्रॉफिट' तो त्यांच्याआधी वाचायचा आणि शहांना शेअर्सबद्दल सल्ला द्यायचा.

बसमधून जाताजाता सायं दैनिकातलं कोडं तुम्ही सोडवत असाल, तर बाजूचा प्रवासी जन्मसिद्ध हक्क असल्याप्रमाणे उरलेला पेपर तुमच्याकडून मागून घेतो.

थोडक्यात वर्तमानपत्र हे सत्यनारायणाच्या प्रसादासारखं प्रत्येकानं थोडं थोडं वाटून घ्यावं ही आपली संस्कृती आहे. मीही ह्याच संस्कृतीत वाढलेला. पण ही संस्कृती घेऊन मी जेव्हा दहा-अकरा वर्षांपूर्वी प्रथम इंग्लंडला गेलो तेव्हा माझी पंचाईत झाली.

ही गोष्ट इंग्लंडमधल्या वर्ल्डकपच्या वेळची आहे. तिथे पाय ठेवून मला फक्त तीन-चार दिवस झाले होते. तिथल्या रीतीरिवाजांची मला सवय नव्हती. एकदा ट्यूब रेल्वेने फिरता फिरता शेजारी बसलेल्या माणसाच्या हातातल्या 'टेलिग्राफ'वर माझी नजर पडली. त्यातल्या डेनिस कॉम्पटनच्या एका लेखाकडे माझं लक्ष गेलं. मला राहवेना. मुंबईतल्या आपल्या सवयीनुसार मी त्याच्या पेपरात माझं डोकं मान तिरपी करून घुसवलं. दोन आगंतुक डोळ्यांचा प्रवेश त्या सुटाबुटातल्या गोऱ्याला आवडला नाही. त्याच्या डोळ्यांत मला नाराजी दिसली.

'दुसऱ्याची नाराजी ही दुर्लक्षण्यासाठी असते.' हा आपला मुंबईचा खाक्या. त्यामुळे त्याच्या पेपरात डोकं खुपसून जेवढं वाचता येईल तेवढं मी वाचतच राहिलो.

त्याचं वाचन संपल्यावर पेपर दुमडून तो माझ्यापासून सहा इंच दूर सरकला. त्याचं दूर सरकणं मला जाणवेल ह्याची त्याने खात्री करून घेतली. त्याच्या नाराजीची नोंद घ्यावी ही त्याची अपेक्षा

असावी. इतकं हळवं असून चालत नाही हे मुंबईनेच मला शिकवलेलं. नोंद घेणं जाऊ देत, पण डेनिस कॉम्प्टनचा मी वाचत असलेला लेख अर्धवट राहिल्यामुळे उलट बेचैन झालो होतो. मुंबईच्या संस्कृतीला स्मरून मी त्या गोऱ्याकडे तो पेपर वाचायला मागितला. त्याच्या दृष्टीने 'बॅड मॅनर्स'चा कडेलोट झाला असावा. त्याने तो पेपर माझ्याकडे भिरकावला आणि मग 'किप द चेंज' या थाटात 'किप द पेपर' म्हणत त्याच्या स्टेशनवर तो उतरून गेला. तो पेपर अधाशीपणे वाचून संपल्यावर मी त्या गोऱ्याच्या दातृत्वाला दाद देत बसलो होतो.

त्यानंतर मला जाणवलं की समोरची दोन माणसंही हातातले पेपर्स गाडीत टाकून निघून गेली आहेत. आपली चैन आहे म्हणून मी खूष झालो.

पण फक्त त्या दिवशीच. नंतर मीसुद्धा तेच करायला लागलो. कारण जेवढे फुकट मिळालेले पेपर्स मी घरी घेऊन यायचो, तेवढ्या मित्रांच्या कपाळावरच्या आठ्या वाढायच्या. शेजारच्या पेंडशांसारखा रद्दी पाहून तो मित्र खूष व्हायचा नाही. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, घरातली रद्दी हा आपल्याला आधार वाटतो. पण तिथे, प्रगत देशात रद्दी ह्या प्रकाराला किंमत नाही. उलट रद्दीची वासलात लावायला पैसे मोजावे लागतात. त्यामुळे माणसं घरी वर्तमानपत्रं घेऊन जायच्या भानगडीत पडत नाहीत.

इंग्रजांच्या वर्तमानपत्र वाचण्यासंबंधी खास सवयी आहेत. तिथं वर्तमानपत्रं घरी टाकली जातात. पण बरीच मंडळी सकाळी ऑफिसला जाताना न्यूज एजंटच्या दुकानातून विकत घेणं पसंत करतात. घरात प्रत्येकाचं वर्तमानपत्र वेगळं असतं. नवऱ्याला 'गार्डियन' आवडत असेल आणि बायकोला 'सन', तर घरात दोन्ही वर्तमानपत्रं येतात.

तिथल्या माझ्या एका मित्राचं न्यूज एजन्सीचं दुकान आहे. त्या दुकानात बसल्या बसल्या मी बऱ्याच गोष्टींचं निरीक्षण करू शकलोय. एक भाऊ आणि बहीण एकाच घरात राहायचे. पण दोघेही त्या मित्राच्या दुकानात येऊन 'द सन' विकत घ्यायचे. मी एकदा त्या मुलीला विचारलं, 'तुझा भाऊ 'सन' विकत घेतो. पण एकाच घरात राहून तूही तोच पेपर का विकत घेतेस? तू 'स्टार' किंवा 'डेली मेल' वगैरे का विकत घेत नाहीस? तुम्हाला दोन्ही वाचता येतील.'' ''काय मॅडचॅप आहे लेकाचा.'' असा भाव असलेल्या चेहऱ्याने तिने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाली, ''आम्हाला प्रत्येकाला स्वत:चा पेपर घेणं आवडतं. आम्ही दुसऱ्याच्या पेपराला हात लावत नाही.'' तिथे काही मंडळी सकाळचं वर्तमानपत्र संध्याकाळी वाचतात. पण 'उष्ट्या' वर्तमानपत्राला सहसा हात लावत नाहीत.

पण ह्यामागे मूलभूत जडण-घडणीचाही भाग आहे. स्वत:चं काही दुसऱ्याला द्यायचं नाही, अशी गोऱ्यांची पद्धत आहे. चार मित्र जर बसमध्ये चढले तर प्रत्येकजण स्वत:चं तिकीट स्वत: काढील. आपल्याकडे चार मित्र एकाच बसमध्ये चढले तर...?



प्रत्येकाचा हात खिशात जाईल. (फक्त एकाचाच हात चटकन बाहेर येईल.) मग दुसऱ्याकडे सुद्दे पैसे नसतील. तिसऱ्याच्या लक्षात येईल की तो घरून पाकीट घेऊन निघायला विसरलाय वगैरे. पण लज्जेस्तव का असेना, आपण तिकीट काढतोय हे दाखवायचा प्रयत्न त्यांचा असेल. तिथे हा प्रकार नाही. तुम्ही एखाद्यासाठी 'ड्रिंक' घेतलंत तर गोरा स्वत:चे पैसे ताबडतोब देईल. आणि तुम्ही घेतले नाहीत तर पुढच्या राऊंडला तो तुमचे उपकार फेडून टाकील. ह्या वृत्तीतून असेल, गोरे स्वत:च्या वस्तूबद्दल पझेसिव्ह असतात. मी असंही उदाहरण पाहिलंय की नवरा-बायको एकाच ब्रँडची सिगरेट ओढत असतानाही दोघं एकाच दुकानातून वेगवेगळी पाकिटं विकत घेतात. घरी डिनरनंतर बायको नवऱ्याला बिल देते का, तेवढं मात्र मी पाहिलेलं नाही. आणि डिनरनंतरचे अडचणीचे प्रश्न तुम्हीही विचारू नका.

आणि हो, तुम्हाला फुकट वाचायची सवय असेलच तर इंग्लंडमध्ये त्याचीही सोय आहे. तिथे कित्येक मासिकं आणि वर्तमानपत्रं फुकट वाटली जातात. एखाद्या स्टेशनजवळ किंवा हमरस्त्यावर ती गठ्ठा करून ठेवलेली असतात. त्यांचं प्रिंटिंग चांगलं असतं. एखाद-दोन लेखही चांगले असतात. पण ती वर्तमानपत्रं जाहिरातीसाठी असल्याने त्यात जाहिराती खच्चून भरलेल्या असतात. त्यामुळे ती फुकट वाटणं परवडतं.

पश्चिम युरोपात साक्षरतेचं प्रमाण पंच्याण्णव टक्क्यांच्या वर आहे. त्यामुळे न्यूज एजंट्सची चांगली चलती असते. लंडनमध्ये जवळजवळ बाराशे लोकांमागे एक न्यूज एजंट आहे आणि त्यातले ऐंशी टक्के भारतीय आहेत.

एकंदरीत इंग्लंडची ज्ञानपोयी शेवटी भारतीयांच्या हातात आहे.

■

(८ मे १९९४)

# □ इंग्लंडची ज्ञानपोई

महिना - दीड महिना लंडनमध्ये जाऊन राहायला मला कधीही आवडतं. अर्थात जून-जुलैमधेच! नंतर लंडन थंडीने गारठल्यावर नक्कीच नाही.

जुन-जुलैमध्ये सूर्याचा प्रकाश मस्तपैकी रात्री नऊ-दहापर्यंत लंडनमध्ये रेंगाळत असतो. सूर्यालाही परतावंसं वाटत नाही. तो इतका अधीर असतो की पुन्हा सकाळी चारला लंडनमध्ये येऊन हजर होतो. थंडीत तोही लंडनचं दिवसदिवस तोंड पाहत नाही.

त्यावेळी तिथे क्रिकेट असतं. विम्बल्डन असतं. प्रत्येकाचा मूड मस्त असतो. 'Make hay when sun shines.' ही म्हण ते अक्षरशः जगत असतात. तिथे जाण्यामागे माझ्यासाठी आणखीन एक आकर्षण असतं. तिथली वर्तमानपत्रं आणि मासिकं. ज्या मित्राकडे जाऊन मी आता राहतो तो न्यूज एजंट आहे. त्यामुळे वर्तमानपत्र आणि मासिकाला तिथे तोटा नाही. लुसलुशीत सोफ्यावर बसून कधी बीयर, कधी वाईनचा घोट घेत मस्तपैकी वाचत पडावं.

तिथे 'ब्रॉडशिट' आणि 'टॅबलॉईड' असे वर्तमानपत्राचे दोन प्रकार आहेत. केवळ आकार हा तेवढाच फरक नाही. माधुरी आणि ममता एवढा त्यात फरक आहे. एक गंभीर तर दुसरा अवखळ, सनसनाटी, गंभीर वाचनाची टीका-टिपणीची ज्यांना आवड आहे. ते टाइम्स - गार्डीयनचे भोक्ते असतात. ज्यांना धमाल लफडी वगैरे वाचण्याचा शौक आहे ते 'सन', 'स्टार', 'मेल' वगैरेंच्या प्रेमात असतात. दोघांचाही खप चांगला. कारण तिथे साक्षरता जवळजवळ पंच्याण्णव टक्के आहे.

टाइम्स किंवा 'गार्डीयन' ला कुठलाही विषय वर्ज्य नसतो, पण गंभीरता पानोपानी जाणवणारी. सखोल अभ्यास हे त्यातल्या लेखांचं वैशिष्ट्य. तर 'सन' म्हणजे धुडगूस. ते तिथलं सर्वाधिक खपाचं दैनिक. त्यात अक्षरशः काही म्हणजे काहीही असू शकतं. एखाद्या मजूर पक्षाच्या नेत्याचा वेश्येबरोबरचा फोटो आणि त्यावर बितंबातमी असू शकते. स्कर्ट उडालेल्या पोझमधली डायना तर त्यांची फेवरिट. किंबहुना राजघराण्यातल्या कुणाचेही झाकलेले भाग दिसणं जिथून शक्य आहे, तिथे त्यांचा कॅमेरा असतो. पूर्वी इयान बॉथमही ह्या टॅबलॉईडवाल्यांना भरपूर खाद्य द्यायचा.

हे असलं खाद्य काही वेळा इतकं असतं की, ते रसिकतेने वाचणाऱ्यालाही

अपचन होतं. बरं, त्यांना विषय कुठलाही निषिद्ध नाही.

मॅडोनाचा पाठलाग करणाऱ्या चाहत्याची चविष्ट मुलाखत ते छापतात.

सिलव्हेस्टर स्टॅलनच्या मदनिकांबरोबरच्या मादक आठवणी त्यांना वर्ज्य नसतात.

एखादा विद्याचरण शुक्ला किंवा रामराव आदिकांसारखा रंगेल रसिक त्यांना सापडला असता तर त्यांनी विशेष पुरवण्या काढल्या असत्या.

बरं, त्याचबरोबर जादूच्या गोळ्यात पाहून वाचकांच्या प्रश्नांना उत्तरही ते हक्काने देतात. बकिंगहॅम पॅलेसमधली भुतंही त्यांना भेटतात. (भुते भेटण्याचा मक्ता फक्त आपल्याच संपादकांकडे नाही.) आणि मग ते तितक्याच हक्काने थॅचर, क्लिंटन किंवा येलस्तीनला सल्ला देतात. मागे एकदा मी आखाती युद्धाच्या वेळी इंग्लंडमध्ये होतो. त्यावेळी सद्दाम हुसेन हा त्यांच्या टिंगलीचा आवडता विषय होता.

बातम्या मिळवण्यासाठी ती मंडळी सरळ सरळ मादक तरुणींचा वापर करतात. बड्यांच्या बेडरूममध्ये शिरायचं आणि दुसऱ्या दिवशी त्याबद्दल मुलाखत द्यायची. हासुद्धा तिथल्या पत्रकारितेचा भाग आहे. हा प्रकार किती गळ्याशी येऊ शकतो हे इंग्लंडचा कर्णधार माईक गॅटिंग सांगू शकेल.

पण 'द सन' ची खासियत आहे, ते त्याचं तिसरं पान. पुरुष 'सन' हातात घेतल्यावर पहिलं उघडतो पान क्रमांक तीन. कारण त्या पानावर रोज एका अर्धनग्न तरुणीचा फोटो असतो. पूर्वी मला प्रश्न पडायचा की त्यांना एवढ्या गोऱ्या ममता 'खोळ' कर्णी मिळतात कुठून? पण एकोणीसशे शहाऐंशी साली लॉर्डस्वर क्रिकेटमॅच कव्हर करत असताना हा प्रश्न सुटला. तिथे लक्षात आलं. गोऱ्या ममता कुलकर्णीच 'सन' वर उड्या मारत असतात. कारण त्या मॅचमध्ये एक ॲशले सॅमर्स नावाची मुलगी चक्क अर्धनग्न अवस्थेत विकेटवर गेली. खरंतर अर्धनग्न हा शब्दसुद्धा लाजेल अशी तिची अवस्था होती. तिच्या कमरेभोवती फक्त एक छोटी चड्डी होती. बाकी सर्व अंग उघडं होतं. खांद्यावर 'ब्रिंग बॅक बॉथम' हा बोर्ड होता. कारण त्यावेळी बोथमला इंग्लिश निवडसमितीने वगळलं होतं. तिने विकेटवर जाऊन छोटासा कॅब्रे केला. तिला हटवायला पोलीस गेले. पोलिसांनी पकडल्यावर तिने प्रेक्षकांकडे पाहून काय घोषणा दिल्या असतील?

ब्रिंग बॅक बॉथम! छे, तिला बॉथमशी काही देणंघेणं नव्हतं. ती आपल्या नैसर्गिक देणगीची सुबत्ता किती आहे ते ओरडून सांगत होती. ती सुबत्ता जगाने मान्य केलेल्या मापात ३४-२४-३४ अशी होती. तिला 'सन' या तिथल्या सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्राच्या त्या तिसऱ्या पानावर चमकायचं होतं. झालं! त्यानंतर तिसऱ्या दिवशी ती ॲशले सॅमर्स डौलात 'सन' च्या तिसऱ्या पानावर चमकत होती.

तिथे मासिकं, पाक्षिकं, साप्ताहिकं ही एवढी प्रचंड आहेत की आपण कल्पनाही




करू शकत नाही. मुलांसाठी, तरुणांसाठी, तरुणींसाठी, बायकांसाठी, पुरुषांसाठी, म्हाताऱ्याकोताऱ्यांसाठी अगदी सर्वांसाठी तिथं मासिकं आहेत. तुम्ही 'विकृत' असाल तर तुमच्या विकृतीचे चोचले पुरवणारी मासिकंसुद्धा आहेत.

कुठल्या विषयाची मासिकं हवी आहेत तुम्हाला? शेतीविषयक? रगड आहेत. गार्डनिंगसंबंधीसुद्धा आहेत. तुम्ही कुत्रे पाळता? कसे पाळावेत यासंबंधी मासिक आहे. निव्वळ मोटरकार या विषयावर तिथे किमान शंभर वेगवेगळी नियतकालिके आहेत.

बायकांच्या मासिकात फॅशन्स, रेसिपीज, बालसंगोपन, ब्युटी ट्रीटमेंट, हेअरस्टाईल, पेट केअर वगैरे वेगवेगळ्या विषयावर मासिकं आहेत. "केसातला गुंता कसा काढावा?" किंवा "उवा कशा टाळाव्यात" या विषयावरही मासिकं असावीत. फक्त ती मला सापडली नसतील. तिथल्या तरुणी मासिकं विकत घेतात आणि त्यातली एखादी फॅशन आवडली की ते मासिक घेऊन ब्युटी पार्लरमध्ये शिरतात.

या मासिकांचं एक वैशिष्ट्य आहे. विषय कुठलाही असो, माहिती अगदी बारीकसारीकसुद्धा असते. उदा. रेसिपीज् दिल्या की आपलं काम संपलं असं ते मानत नाहीत, तर त्याला लागणारं साहित्य, त्यांच्या तयारीला लागणारा वेळ, त्यात असणाऱ्या कॅलरीज, ते साहित्य घेऊन तो पदार्थ कितीजणांना पुरेल याचा अंदाज वगैरे गोष्टी दिलेल्या असतात. प्रत्येक मासिकाबरोबर त्या विषयाशी संबंधित भेटही असते. या भेटीची किंमत मासिकापेक्षा जास्त असते. पण त्यांना ते परवडतं, कारण त्यांना जाहिरातीचा मलिदा चांगला मिळतो.

तिथे काही कोर्सेस मासिकांद्वारा शिकता येतात. तुम्हाला कार कशी दुरुस्त करावी

हे शिकायचं असेल तर त्यासंबंधीची माहिती देणारी मासिकं दर महिन्याला निघतात.

तिथे मासिकं स्टँडवर ठेवायचीही विशिष्ट पद्धत आहे. वेगवेगळ्या विषयांप्रमाणे ती एकत्र करून ठेवलेली असतात पण जी फक्त प्रौढांकरिता असतात किंवा विशिष्ट विकृतीला वाहिलेली असतात, ती फक्त वरच्या रॅकवर ठेवायची परवानगी असते. लहान मुलांना ती दिसणार नाहीत याची खबरदारी घ्यावी लागते. एखाद्या न्यूज एजंटनं चूक केली तर त्याच्यावर लगेच कारवाई होते.

माझ्या बेशिस्त हातांनाही त्यामुळे मासिकं जागच्या जागी ठेवायची सवय झाली होती.

■

(१५ मे १९९४)

## □ मुलं हवीत, इमिग्रंट नकोत

तसं पाहिलं तर लोकसंख्या कमी असणं हे बऱ्याच वेळा वरदान असतं, त्याचे मुबलक फायदे आहेत. ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्ये एकेकाची घरं पाहिली की डोळे विस्फारतात. घरात गिझर असणं ही अगदी कालपरवापर्यंत आपल्या मध्यमवर्गीयांना एक चैन वाटायची. तिथे मध्यमवर्गीयांच्या घरात स्विमिंगपूल असणं किंवा जॅक्यूझी स्पा असणं (हा प्रकार आपल्याकडे फक्त हेल्थ क्लबमध्ये असतो.) ही सामान्य गोष्ट आहे. प्रचंड घरं आणि घरात माणसं दोन किंवा तीन. कारण अठरा वर्षांची झाली की मुलं चिमण्यासारखी दूर उडून जातात आणि आपापली घरटी बनवतात.

मध्यंतरी मी न्यूझीलंडला गेलो होतो. त्या देशाची किती लोकसंख्या असेल? फक्त पंचवीस लाख! एकट्या धारावी, माहीम, वांद्र्यात पंचवीस लाख माणसं असतील. माणसं कमी झाली की सुविधा भरपूर. दरडोई उत्पन्नही वाढतं.

पण त्यांचा तोटाही असतो. तो तोटा युरोप आणि ऑस्ट्रेलिया - न्यूझीलंडलाही सतावतो. त्यांना नोकरदार माणसं तिसऱ्या जगातून मागवावी लागतात. आणि ही गोष्ट आज गोऱ्या माणसांच्या अंगावर काटा आणते. ह्या बाहेरून आलेल्या उपऱ्यांना इमिग्रंटस् म्हणतात. युरोपात ही मंडळी रग्गड आहेत. इंग्लंडमध्ये पंचवीस लाख भारतीय-पाकिस्तानी आहेत. फ्रान्समध्ये पंचेचाळीस लाख अल्जेरियन्स आहेत. जर्मनीत अठरा लाख तुर्की आहेत. त्यांच्याबद्दलचा द्वेष गोऱ्या माणसाच्या चेहऱ्यावर दिसतो.

मुळात गोऱ्या माणसाला काळी कातडी आवडत नाही. जगातली सर्व गोरी राष्ट्रं कायद्याच्या पुस्तकात उदारमतवाद आणि वर्णभेदाचं गुणगान करतात. पण त्यांच्या मनात दडलेला वर्णद्वेष अधूनमधून उफाळून वर येत असतो. इमिग्रंटस्ना पाहिल्यावर तो जास्त उफाळून येतो. उपऱ्यांमुळे त्यांच्या पोटावर पाय येतो ही त्यांची भावना असते.

युरोपात हे उपरे पूर्वी वेगवेगळ्या कारणांमुळे गेले. गोऱ्या माणसाला काही नोकऱ्या कमीपणाच्या वाटतात. झाडू मारणे, साफसफाई ही आपली कामं नाहीत, ही त्यांची समजूत होती. पूर्वी त्यासाठी काळे गुलाम मागवले जायचे. ही गुलामपद्धती संपुष्टात आल्यावर आशिया - आफ्रिका खंडातून माणसं मागवली जाऊ लागली. कारण तिथे लोकसंख्या भरपूर आणि अन्न कमी! त्या मंडळींची पोट भरण्यासाठी

कुठेही जाण्याची तयारी असायची. ते मग तिथे गेले. त्यांना झाडू हातात धरणं कमीपणाचं वाटत नाही.

बरं, उपरे घरदार सोडून आलेले असतात. ते कुठल्याही पगारात काम करायला तयार असतात आणि मेहनतीला ते कधीही तयार असतात. त्यामुळे जे हुशार आणि मेहनती होते त्यांनी तिथं स्थिरावल्यावर झाडू टाकला आणि छोट्या धंद्यात शिरले. तिथे बस्तान बसवून पैसा कमावला. त्यात गोऱ्यांप्रमाणे आशियायी देशांत कुटुंबसंस्थेचे बारा वाजलेले नाहीत. त्यामुळे तिथे स्थिरावल्यावर त्यांच्या नातेवाईकांना त्यांनी बोलावून घेतलं. आज नुसत्या इंग्लंडचा विचार केला तर तिथे 'स्मिथ' पेक्षा 'शहा' जास्त आहेत. एकेकाळी लंडनमधल्या 'सोहो' मध्ये वेश्या, पीप शो, टॉपलेस बारचा सुळसुळाट होता. तिथे त्याचं उच्चाटन होऊन 'चायना टाऊन' वसलंय. युरोपियन राष्ट्रांनी त्यामुळे इमिग्रेशनचे नियम अगदी कडक करून टाकले. पण बऱ्याच वेळा ते नियम धाब्यावर बसवूनही काही मंडळी तिथं राहतात. त्यामुळे तिथल्या राष्ट्रांनी देशांतराचे नियम एवढे कडक केले आहेत की तिसऱ्या जगातल्या प्रवाशांना 'व्हिजिटर व्हिसा' साठीही (देशात शिरण्याचा परवाना) रडवलं जातं.

अर्थात फक्त हलकीच कामं करायला आशियायी देशातली मंडळी जातात असं नाही. अलीकडे डॉक्टर्स-इंजिनीअर्सना ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडसारख्या देशात इमिग्रंटस् म्हणून बोलावलं जातं. त्यालाही कारण आहे. (ह्या पहिल्या जगात, उच्च शिक्षण महाग आहे आणि फार मंडळी ते घेऊ शकतात असं नाही. आणि मुख्य म्हणजे आशियायी देशातून मागवलेले डॉक्टर्स, इंजिनीयर्स कमी पैशात कामं करायला तयार असतात.) बरं, गोऱ्यांची वृत्ती असते की रोज सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत काम. पण शनिवार-रविवार काही झालं तरी सुट्टी हवी आणि त्या दोन दिवसांत ते आयुष्य खऱ्या अर्थानं जगतात. आपली मंडळी तिथे शनिवार-रविवारही काम करायला तयार असतात. कारण ते बाहेरून आलेले. त्यांना असुरक्षितता जाणवत असते. हिंदुस्थानातून ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्ये स्थायिक झालेल्या काही डॉक्टरांकडे मी गेलोय. वीस-बावीस वर्षे तिथे राहिलेली काही मंडळी आहेत. त्यांनी तिथे राजवाडे उभारलेले आहेत. सिडनीपासून शंभर मैलांवर गॉसफोर्ड नावाच्या एका नितांत सुंदर गावात डॉ. प्रधान राहतात. त्यांची बायकोसुद्धा डॉक्टर आहे. ते म्हणाले, "पहिली दहा वर्षे आम्ही वेड्यासारखं काम केलं. काही वेळा दिवस-रात्र हॉस्पिटलात काढली आहेत." आज त्या माणसाचं समुद्रकाठावर दुमजली घर आहे. स्वत:ची जेट्टी आहे. लॉंचेस आहेत. भाड्याबिड्याने द्यायला नाहीत हं! फक्त स्वत:ला फिरण्यासाठी. एरवी रस्त्यावरून फिरायला दोन होंडा, एक मर्सिडीज वगैरे आहेतच.

ही श्रीमंती पाहिली की गोऱ्यांचा पोटशूळ उठतो. बरं, त्यांना असं जाणवायला लागलंय की या आशियायी व्यावसायिकांची मुलंही घरच्या संस्कारामुळे अभ्यासात पुढे




असतात. तिथेही मेडिकलला प्रवेश मिळवायचा तर ९७ आणि ९८ टक्के मार्क लागतात आणि मेरीटच्या यादीत भारतीय-चिनी मुलांचा भरणा जास्त असतो. पुढची पिढीही आपल्यावर कुरघोडी करणार ही भावना तिथल्या मंडळींची माथी आणखीनच गरम करते.

ऑस्ट्रेलियात हळूहळू इमिग्रंटसाठी दरवाजे बंद व्हायला लागले आहेत. पण युरोपमध्ये आणखीन वीस वर्षांनी एक वेगळंच चित्र दिसायची शक्यता आहे. त्यांची लोकसंख्या जर कमी होत राहिली तर तिसऱ्या जगातल्या नोकरदारांना बोलावून त्यांच्याकडून कामं करवून घेण्यापलीकडे त्यांना पर्याय उरणार नाही असं तज्ज्ञांचं मत आहे. फ्रान्सचा ह्या विषयातला तज्ज्ञ त्काडल चेनॉय म्हणतो, ''मला ठाऊक आहे की युरोपियन नागरिकांना ह्यापुढे एकही इमिग्रंट नको. पण लोकसंख्या कमी होत राहिली, तर त्याला पर्याय उरणार नाही, अविकसित राष्ट्रांत माणसं आहेत आणि तुमच्याकडे नोकऱ्या आहेत. त्यांचा ओघ इथे वळणारच. तरुणांची संख्या कमी झाल्यामुळे वय वाढलेल्या नोकरदारांची संख्या वाढणार आणि त्यामुळे कामावर परिणाम होणार आणि मग अशा वेळी उद्योगपतींपुढे एकच मार्ग उरतो. स्वस्त नोकरदार माणसं तिसऱ्या जगातून मागवायची. दाम कमी आणि कामही जास्त!''

त्यामुळे यापुढे हा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांची एकच गर्जना असणार आहे.

''आम्हाला मुलं हवीत. गोरी मुलं! युरोपियन रक्ताची, फ्रेंच, इटालियन, जर्मन कुणीही, पण गोरीच.'' ■

(२९ मे १९९४)

## □ इंग्लंडचं गुजरातशायर

इंग्लंडमधल्या लेस्टर रेल्वेस्टेशनवर तुम्ही उतरलात की तुम्हाला इंग्लंडपेक्षा वेगळ्या, पण ओळखीच्या वातावरणात आल्याची चाहूल लागायला लागते. आपलं लक्ष समोरच्या स्टेशनच्या पाटीकडे जातं आणि डोळे चमकतात. 'लेस्टर शायर' असं इंग्रजीबरोबर गुजरातीतही लिहिलेलं असतं. त्या स्टेशनवर उतरणारी बहुतेक माणसं आपल्यासारखीच सावळी असतात. तिकीट दाखवल्यावर अदबीने थँक्यू म्हणणारा टी.सी. ही आपल्यासारखाच दिसतो.


टॅक्सीतून लेस्टर सिटी सेंटरला वळसा घालून तुम्ही मेल्टन रोडकडे सरकलात की तुमचा आणि गोऱ्या इंग्लंडचा संबंध तुटतो. स्वच्छ होऊन भुलेश्वर तुमच्यासमोर उभं ठाकल्यासारखं वाटतं. दुकानांतून ढोकळा-सामोशाचा वास येतो. पॅण्ट-कोटातला, पण फरसाण चघळणारा मगनचाचा कोपऱ्यावर भेटतो. साड्यांच्या दुकानाबाहेर साड्यांचं प्रदर्शन लागलेलं दिसतं. चर्चच्या घंटेऐवजी अंबामातेच्या आरत्या ऐकायला येतात. बोलण्याची भाषा गुजराती असते. फक्त गुडमॉर्निंग, गुडनाईट, बाय-बाय थॅक्यूपुरती इंग्लिश संस्कृती उसनी घेतली जाते. फरक एवढाच असतो की दुकानात भुलेश्वरप्रमाणे धोतर-लेंग्यातले हरीशभाई नसतात. शर्ट पॅण्ट, कोट घातलेले हरीशभाई, रमेशभाई असतात आणि दुकानात त्यांच्या मदतीला आरतीबेन, ताराबेनसुद्धा असतात.

हेच दृश्य तुम्हाला लंडनमध्ये विम्बलीला दिसेल. (किंबहुना इंग्लंडचा उत्तरेचा भाग सोडला तर प्रत्येक शहरात कुठला ना कुठला भाग गुजरातमय झालेला सापडेल.) इंग्लंडमध्ये गुजराती समाजाचं अस्तित्व सर्वत्र जाणवत राहतं. केवळ ते तिथे संख्येने जास्त आहेत म्हणून नव्हे. पण दुकानदारीच्या धंद्यात असल्यामुळे त्यांचा तुमच्याशी संबंध सतत येत राहतो. इंग्लंडमध्ये गल्लोगल्ली ग्रोसरी शॉप्स आहेत. आपल्या भाषेत सांगायचं तर वाण्याची दुकानं. पण आपल्या इथल्याप्रमाणे ते दुकान कळकट नसतं आणि वाणीसुद्धा कळकट नसतो. त्या दुकानात वर्तमानपत्रापासून कोल्ड ड्रिंक्सपर्यंत आणि सिगरेट-चॉकलेटपासून ग्रीटिंग-कार्डपर्यंत काहीही मिळतं. तुमचा विश्वास बसणार नाही. पण अशी ऐंशी टक्के दुकानं भारतीय पाकिस्तान्यांची आहेत. आणि भारतीयांमध्ये ऐंशी टक्के गुजरात्यांची आहेत. मुंबईत गरीब पारशी जेवढा दुर्मिळ तेवढाच इंग्लंडमध्ये गरीब गुजराती सापडणं दुर्मिळ.

ही गुजराती मंडळी काही तेथे तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आली नाहीत. नव्या पिढीच्या तोंडात कदाचित आज सोन्याचा चमचा असेल. पण त्याचे जन्मदाते जेव्हा तिथे गेले तेव्हा त्यांच्या तोंडात घास होता तोही इंग्रज सरकारने नाइलाज म्हणून फेकलेला. मुळात तेथे गुजराती मोठ्या संख्येने आले, एकोणीसशे बहात्तर साली इदी अमिनने युगांडातून त्यांना हाकलल्यावर. त्यावेळी त्यांच्यापुढे दोन पर्याय होते. ब्रिटिश पासपोर्टच्या आधारावर इंग्लंडला जायचं, नाहीतर भारतात. अनेकांनी इंग्लंडचा आधार स्विकारला. हयातभर कमावलेली दौलत युगांडात सोडून पूर्णपणे निष्कांचन होऊन देशांतर करायचं होतं. इंग्लंडमधली गुजराती मंडळी युगांडातल्या अत्याचारांच्या हृदयद्रावक कहाण्या सांगतात. त्या ऐकताना आजही आपल्या अंगावर शहारे येतात. तेथे सुंदर स्त्री आणि संपत्ती असलेलं घर निर्दयपणे लुटलं जायचं. ते इंग्लंडमध्ये आले तेव्हा नुसते लुटले गेलेले नव्हते. मानसिकदृष्ट्याही खंगलेले होते. आपण दरिद्री होऊन दुसऱ्याच्या दारात पडलोय ही भावनाच माणसाला उध्वस्त करायला पुरेशी असते. आणि मागचं आयुष्य जर पैशात लोळण्यात गेलं असेल तर नव्या खडतर अशा निर्वासिताच्या आयुष्याशी जुळवून घेणं फार कठीण जातं. ज्या काही हुशार मंडळींनी आधीच इंग्लंडमध्ये पैसे पाठवले होते ते फारसे होरपळले नाहीत. पण जे कफल्लक होऊन आले होते, त्यांना बेकारीच्या खाईतून स्वत:ला काढायचं होतंच पण नव्या परिस्थितीशी मानसिकदृष्ट्याही लढायचं होतं. ब्रिटिश सरकारने त्यांना छोटी का होईनात, घरं दिली, बेकारभत्ता दिला. पण तरीही नव्या परिस्थितीशी जुळवून घेणं सोपं नसतं.

पण त्यांच्यात जिगर होती. धंदा त्यांच्या रक्तात होता. काहींनी आधी चाकरी स्विकारली, मग धंदा उभारला. आज त्यांच्यातले अनेकजण त्यांच्या युगांडातल्या आर्थिक स्तरावर पोहोचले आहेत. पण परक्या मुलखातला वर चढायचा मार्ग तसा खडतरच होता. गोऱ्या माणसाला मुळात काळ्या कातडीची ॲलर्जी असते, त्यात निर्वासितांच्या झुंडीच्या झुंडी पाहून त्याचं पित्त खवळलं. पूर्वी इंग्लंडमध्ये काळीसावळी माणसं यायची. त्यांचे गुलाम बनायची. सर्व हलकी कामं पोटाकडे पाहत करायची. तोपर्यंत ठीक होतं. या झुंडी हक्काने इंग्लंडमध्ये आल्यावर साहेबांचंही धाबं दणाणलं. द्वेष वाढला. त्यामुळे सरकारी मदत सोडली तर सामान्य जनतेकडून या युगांडातून आलेल्या निर्वासितांना चटकन मदत मिळाली नाही. दोन वर्षांचं भाडं आगाऊ दिलं तरी गोरा मालक दुकान भाड्यानं देत नव्हता. बँकाही त्यांना मदत करायला फारशा उत्सुक नव्हत्या. आज परिस्थिती केवढी पालटली आहे. तिथल्या नॅटवेस्ट बँकेला गंमतीनं पटेल बँक म्हटलं जातं.

निव्वळ जिगर, कठोर मेहनत सामान्यातल्या सामान्य माणसाला कुठल्या कुठे घेऊन जाते, ते मी इंग्लंडमध्ये अनेकदा पाहिलंय. मी १९८३ साली पहिल्यांदा इंग्लंडमधल्या माझ्या गुजराती मित्राकडे गेलो होता. तेव्हा तो हिथ्रो विमानतळावर कामगारांवर नजर ठेवणारा मुकादम होता. युगांडातलं त्याचं वैभव भूतकाळात जमा झालं होतं आणि वर्तमानकाळ




कठोर परिश्रमाच्या बदल्यात त्याला महिन्याला तिनशे वीस पौंड द्यायचा. पण मोठ्या आशेने तो भविष्यकाळाकडे बघायचा. त्यावेळी तो मला म्हणाला होता, "तू पुन्हा इंग्लंडला येशील तेव्हा माझी सांपत्तिक स्थिती तुला सुधारलेली दिसेल." १९८६ साली मी पुन्हा इंग्लंडला गेलो तेव्हा त्याच्याकडे स्वत:चं घर होतं, दुकान होतं आणि स्वत:ची गाडीही होती. स्वत:वर तो बेहद्द खूश होता. मध्यंतरी गेलो तेव्हा गाड्या एकाच्या दोन झाल्या होत्या. पॉश वस्तीत आणखीन एक घर होतं. दुकान मोठं केलं होतं आणि आणखीन वर उडी मारायची जिद्द होती. बरं, या माणसाकडे युगांडा युनिव्हर्सिटीचीही डिग्री नव्हती. इंग्रजी बोलताना भाषेला व्याकरण नावाची गोष्ट असते, हे सुद्धा त्याच्या गावी नाही. पण समोरचा डेव्हिड आणि सुझान काय मागतात हे त्याला कळतं आणि हा काय बोलतो याचा त्यांना अर्थबोध होतो. पण तो जी मेहनत घेतो ती नुसती पाहिली तरी आपल्याला घेरी येते. तो रोज सकाळी सहाला दुकान उघडतो आणि रात्री दहाला बंद करतो. असं वर्षाचे तिनशे पासष्ट दिवस करायचं. अपवाद फक्त ख्रिसमसचा. तेव्हा दुकान दुपारी बंद ठेवायचं. 'चैन', तो उपभोगतो.

हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. इंग्लंडमधला गोरा सहाच्या ठोक्याला दुकान बंद करतो. मग तुम्ही शंभर पौंडाचा माल खरेदी केला असलात तरी दिलगिरी व्यक्त करीत तुम्हाला, "कृपया उद्या या', असं सांगण्यात येतं. पण शटर खाली करताना दारात १० पेन्सच्या चॉकलेटचं गिऱ्हाईक जरी दिसलं तरी गुजराती दुकानदार शटर वर करतो आणि म्हणूनच तो चटकन वर येतो. ■

(५ जून १९९४)

## □ गुजरातशायर संपणार ?

शून्यातून जग निर्माण केल्याच्या कथा इंग्लंडमध्ये बऱ्याच ऐकायला मिळतात. लंडनमधल्या पबमध्ये मला एक पटेल चाचा भेटायचा. त्याने साठी ओलांडलेली होती, पण जवानीचा हँगओव्हर शिल्लक होता. तो माणूस दोन बुकंसुद्धा शिकलेला नव्हता. पण त्याच्या रक्तात धंद्याच्याच पेशी होत्या. तो आयुष्यात शून्यातून दोनदा उभा राहिला.

लहानपणी सहा रुपये कनवटीला बांधून तो युगांडाला जायला बोटीत बसला. मजुरी करायला लागणारं धडधाकट शरीर सोडून तो भारतातून काहीही घेऊन गेला नव्हता. पण तो युगांडात एवढा मोठा झाला की तिथल्या शे-दोनशे मजुरांची पोटं त्याने दिलेल्या पैशावर भरायची. इदी अमीनने त्याला एक दिवसात निष्कांचन केलं. पण इंग्रजी भाषेचा फारसा गंध नसलेला हा माणूस पुन्हा इंग्लंडमध्ये उभा राहिला. दोन-तीन दुकानं, दोन-तीन पेट्रोल पंपचा मालक झाला होता. मला भेटला तेव्हा त्याची पोरं धंदा सांभाळत होती. त्याचा उद्योग एकच, संध्याकाळी पबमध्ये स्कॉच प्यायची आणि आठवड्यातून एकदा गोऱ्या पोरीबरोबर शय्यासोबत करायची.

मी त्याला म्हटलं, ''तुला तुझ्या वासना शमवायला गोरी मुलगीच का लागते ?''

त्यानं त्याचं तत्त्वज्ञान ऐकवलं. म्हणाला, ''हे गोरे आम्हाला हलके समजतात. म्हणून वासना शमवताना गोऱ्यांबद्दलचा रागही शमवण्याचा माझा प्रयत्न असतो. पैसे फेकले की आम्ही त्यांच्यावर स्वार होऊ शकतो, हे दाखवताना मला आसुरी आनंद होतो.''

सुरवातीला भोगलेल्या हालअपेष्टांचा हिशेब चुकवायची ही पटेलचाचाची अजब पद्धत होती. पण प्रत्येकाच्या मनात हा सल आहे. बरेच जण हा सल घेऊन तिथेच जगतात. भारतात येत नाहीत किंवा इतरत्र जात नाहीत. गोऱ्यांच्या वर्णद्वेषी नजरा झेलत जगायची त्यांना सवय झालीय.

पण काही अपवाद असतात. असाच एक अपवाद मला न्यूझीलंडमध्ये भेटला. त्याचं नाव होतं अश्विन लाडवा. त्याचे आईवडील पूर्व आफ्रिकेतून इंग्लंडमध्ये आले. तो वाढला, शिकला इंग्लंडमध्ये. शाळेपासूनच तो वेगळा आहे याची जाणीव त्याला आसपासच्या गोऱ्या विद्यार्थ्यांनी दिली. शिकल्यावर आणि मोटर मेकॅनिक झाल्यावर त्याच्या लक्षात आलं की, गोऱ्यांच्या मोटारी त्याच्याकडे येत नाहीत गोरी माणसं अनादर दाखवतात.

त्याने ठरवलं की इंग्लंड सोडायचं.

प्रश्न होता जायचं कुठे? भारतात मुळं असली तरी जो माणूस इंग्लंडमध्ये जन्मलाय आणि वाढलाय, त्याला इथे येऊन राहणं कठीण. कारण नाही म्हटलं तरी विकसित देशाच्या काही सुखांना तो चटावलेला असतो. इथली अस्वच्छता, इथल्या लाल फिती, इथला भ्रष्टाचार यातून मार्ग शोधून जगणं तेवढं सोपं नसतं. त्यामुळे तो ऑस्ट्रेलियात गेला. सिडनीत दीड-दोन महिने राहिला. सिडनी ही कॉस्मॉपोलिटन. तिथेही अठरापगड संस्कृतीचे लोक आहेत. पण वर्णद्वेषाची झळ त्याला तिथेही पोचली. आपल्या कातडीच्या रंगाला तिथं सन्मान नाही हे त्याला उमगलं. तो न्यूझीलंडला गेला. तिथे अजून वर्णद्वेषाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उभा राहिलेला नाही. कारण लोकसंख्या कमी आहे. अर्थात फिजीत क्रांती झाल्यानंतर काही भारतीय फिजीतून पळून न्यूझीलंडला गेले आणि या फिजीतून आलेल्या निर्वासितांबद्दल त्यांना फारसं प्रेम नाही. पण तरीही अश्विनला इंग्लंडएवढा वर्णद्वेष तिथे आढळला नाही. स्वत:चं गॅरेज टाकून तो तिथे स्थिरावलाय.

पण लेस्टर सोडणारा तसा अश्विन एखाददुसराच.

मला नेहमी एक प्रश्न पडतो, अजून वीस वर्षांनी मी पुन्हा लेस्टरला गेलो तर लेस्टरचं स्वरूप असंच भुलेश्वरी असेल का? आज तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेली पिढी आणि त्याच्या पुढची पिढी या संस्कृतीच्या धाग्यात स्वत:ला बांधून घेईल का? कारण ते वेगवेगळ्या वातावरणात वाढले आहेत. त्यांना स्वत:ला कष्ट उपसावे लागलेले नाहीत. त्यांच्यावर ब्रिटिश संस्कृतीचा परिणाम व्हायला लागलाय. मोठ्या व्यापाऱ्यांची मुले अमेरिकेत शिक्षण घेऊन वडिलांच्या धंद्यात पडतात. पण ते प्रत्येकाला शक्य नाही. दुकानदाराचा तरुण मुलगा बापाप्रमाणे सकाळी दहा ते रात्री दहापर्यंत दुकानात बसू शकेल का?

तिथल्या गोऱ्यांचा आयुष्याकडे बघायचा दृष्टिकोन वेगळा असतो. तिथला सामान्य माणूस विलासी जीवन जगतो. शुक्रवारी मिळणारा आठवड्याचा पगार त्याने मंगळवारपर्यंत संपवलेला असतो. लंडनच्या लेस्टर स्क्वेअरला तुम्ही शुक्रवारी रात्री गेलात तर गोरे तरुण-तरुणी बेहोष होऊन नाचताना दिसतील. जवानीचा आनंद लुटताना दिसतील. ते वातावरण तारुण्यात हवहवंसं वाटणारं असतं.

तिथला भारतीय तरुण हे आकर्षण किती काळ टाळू शकतो? भारतीय मुलांचं शिक्षण इंग्लंडमध्ये झाल्यामुळे त्यांना भारतीय इतिहास, त्यांची संस्कृती ठाऊक नसते. त्यांना लोकमान्य टिळक माहित नसतात. महात्मा गांधी, गांधी चित्रपटामुळे किंचित कळलेले असतात. मातृभाषेचा संबंध फक्त बोलण्यापुरता असतो. हिंदी चित्रपटामुळे थोडीफार हिंदीशी तोंडओळख होते. त्यामुळे घरच्या वातावरणातून जेवढी संस्कृती झिरपते तेवढीच त्यांच्या वाट्याला येते आणि हे असंच चाललं तर प्रत्येक पिढीबरोबर हे संस्कृतीचं




झिरपणं कमी होत जाणार.

आणि तसं झालं तर लेस्टरशायर आजच्यासारखं गुजरातशायर वाटेल. पण ते आंग्लाळलेलं असेल. त्याचं गुजरातीपण संपलेलं असेल.

(१२ जून १९९४)

'ताटात पडलेलं नवऱ्याने निमूटपणे जेवणं आणि वर "वा! काय स्वैपाक झाला होता" म्हणून स्तुती करणं हे कुठल्याही सौभाग्यवतीच्या सुखी संसारातलं एक चित्र असतं.

माझ्या सौभाग्यवतीच्या सुखी संसारात हे चित्र न चुक़ता रोज दिसतं. तिला एक वरदानही मिळालंय. न्याहारीला असो नाही तर डिनरला असो, ताटात इडली सांबार किंवा मसाला डोशाच्या जातकुळीतला कुठलाही पदार्थ असला की तिचा नवरा आनंदाने खातो. त्यामुळे फरसबी, कारली, गवार, दुध्री वगैरे खमंग भाज्या करून कंटाळा आल्यावर आता काय करायचे हा प्रश्न पडला तर तिला इडली-डोसा करून तो चुटकीसारखा सोडवता येतो.

होय, मला इडली-डोसा भयंकर आवडतो.

माझं सुदैव आहे की इडली-डोसा हे 'मऱ्हाठी' पदार्थ नाहीत. तसं असतं तर ते फक्त कुलकर्णी, तांबे वगैरेंच्या 'उपाहारगृहात' मिळाले असते आणि ही उपाहारगृहे दादर-गिरगावच्या बाहेर नाहीत.

या इडली-डोशाने मी जगात जिथेजिथे गेलो तिथेतिथे साथ दिली आहे. मध्यंतरी क्रिकेटमॅचच्या निमित्ताने मी अमृतसर-जालंदरला गेलो होतो. 'सरसोंदी साग' आणि 'मकईदा रोटी'ची ती शहरं. तिथे जाऊन मी इडली-डोसा खाल्ला तेव्हा सरसोदा सागलाही इडली-डोशाचा हेवा वाटला असेल.

## □ जगभरची इडली-डोसा संस्कृती

मला भारतातल्या तीन जमातींच्या मंडळींचं अत्यंत कौतुक आहे. एक गुजराती, दुसरे सरदारजी आणि तिसरे दाक्षिणात्य! त्यात उडप्यापासून केरळच्या मेननपर्यंत सर्व आले. त्यांना स्वत:च्या छोट्या घरट्यात रमायची अजिबात सवय नसते. जरा पंख फुटले की ते कुठेही उडायला तयार असतात. प्रदेश नवखा असला तरी ते तिथे जातात, मेहनत करतात. जाताना आपली संस्कृती, आपला व्यापार घेऊन जातात आणि अमेरिकेपासून पापुआन्यूगिनीपर्यंत कुठेही यशस्वी होतात. गुजराती आपलं दुकान टाकतो किंवा मोटेल चालवतो. सरदारजी पडेल ते काम करतो आणि उडपी मद्रासी हॉटेल टाकतो.

आणि या उडप्यानेच परदेशात जाऊन काय खायचं हा तुमचा आमचा प्रश्न सोडवलाय. सिंगापूरला तो सरंगून रोडवर तुमची वाट पाहत उभा असतो. तुम्ही दिवसभर ऑर्चिडमध्ये फिरता,

जुरॉंग बर्ड पार्कमध्ये पक्ष्यांचे विलक्षण खेळ पाहता. सकाळी सिंगापुरी जेवणाची तुम्ही चव घेतलेली असते. ते वेगळं वाटतं, आवडतं, पण तरीही डाळभाताचा विसर पडत नसतो अशा वेळी थेट सरंगून रोड गाठावा. आपले लुंगीतले भाईबंद तुम्हाला अस्सल दाक्षिणात्य जेवण घालायला उत्सुक असतात. अगदी केळीच्या पानावर ते रसम-भात वाढतात.

उडप्यानं माझा खरा प्रश्न सोडवला होता श्रीलंकेत. तिथे प्रत्येक पदार्थ, एकतर प्राण्याच्या चरबीत नाहीतर खोबरेल तेलात तळला जातो. चायनीज जेवायला गेलात, तरी वास खोबरेल तेलाचा. तिथे पहिल्या दिवशी, घास पोटात उतरला नाही. मग कुणीतरी म्हटलं, ''अमुक ठिकाणी तामीळ माणसाचं हॉटेल आहे. जात का नाहीस?'' कोलंबस ज्या उत्साहात भारत शोधायला निघाला त्या उत्साहात मी ते हॉटेल शोधलं. त्याचा अवतार असा होता की मुंबईत ते हॉटेल असतं तर मी तिथं शिरण्याचासुद्धा विचार केला नसता. पण करणार काय? 'आलिया भुकेसी असावे सादर' विचार करून आत शिरलो. घाबरत इडली मागवली. जिभेपेक्षा जठराग्नीचा आदेश मानायचा ठरवल्यामुळे इडलीचा फडशा पाडला. समोर एक सज्जन मसाला डोसा खात होते नाही, चुकलं माझं. तो डोसा ओरपत होता. ओरपणं सोप व्हावं म्हणून त्याने डोसा आल्यावर त्यात सांबार ओतलं आणि 'चवी'साठी त्यावर चटणीचं भांड आडवं केलं. ते दृश्य पाहिल्यावर माझ्या हातातले काटे-चमचे माझ्याकडे पाहून हसतायत असं मला वाटायला लागलं. मग माझ्या लक्षात आलं की तिथे काटे-चमचे कुणीच वापरत नाही. मी 'फॉरेनर' म्हणून त्याने काटे चमचे दिले. खाऊन हात धुतल्यावर त्या सर्वांनी वेटरनें दिलेल्या वर्तमानपत्राच्या कागदाने हात पुसले. माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखून त्या हॉटेल मालकाने मोडक्यातोडक्या इंग्रजीत मला सांगितलं, ''थोडं पुढे गेल्यावर 'शांतीविहार' म्हणून हॉटेल आहे. तुमच्यासारख्यांना ते चांगलं.'' दुसऱ्या दिवशी मी शांतिविहार शोधलं आणि लंकेचा दौरा संपेपर्यंत तिथे 'वार' लावला. कोलंबोतलं ते 'मणिज लंच होम' होतं.

इंग्लंडमध्येही उडपी आहेत आणि रोजच्या सॅण्डविचना कंटाळलेल्या गोऱ्यांना, मी इडली-डोशाचा फडशा पाडताना पाहिलंय. तिथे इडली-डोसा परवडणं आपल्याला कठीण जातं. कारण तीन आणि चार पौंड (दीडशे आणि दोनशे रुपये) द्यावे लागतात. त्यांच्या चलनाच्या दृष्टीने तो दर बरोबर आहे. पण मसाला डोसा दोनशे रुपयांचा आहे हे लक्षात आल्यावर तो आपल्या घशाखाली उतरत नाही.

न्यूझीलंडमध्ये वेलिंग्टनला, एका भारतीय रेस्टॉरंटमध्ये मी इडली पाहून उडालो होतो. सहज मालकाला विचारलं, ''तुम्ही कुठचे?'' त्याने सांगितलं, ''आम्ही फिजीहून आलो.'' पण तो आणखीन इतिहासात शिरल्याबरोबर समुद्र पार करून तो मला तामीळनाडूत घेऊन गेला. त्यामुळे न्यूझीलंडमध्ये इडली कुठून आली हे कळणं जड गेलं नाही.

पण मला सर्वात मोठा धक्का पाकिस्तानात कराचीमध्ये बसला होता. आमच्या




क्रीडापत्रकारांत एक बंगाली पत्रकार आहे. जगाच्या कुठल्याही प्रेसबॉक्समध्ये दिलेलं अन्न त्याला पसंत नसतं. त्याची काहीतरी कुरकूर सुरू असते. एकदा कराचीत तो लंचच्या वेळी शांत चित्ताने मला खाताना दिसला. तो शांत दिसणे, ही शिल्पा शिरोडकरला अंगभर कपड्यात पाहण्यापेक्षा कठीण गोष्ट आहे. मी त्याच्या टेबलाजवळ गेलो तर तोच चक्क मसाला डोसा खात होता. महिनाभर पाकिस्तानात मी जंगजंग पछाडूनही मला मसाला डोसा दिसला नव्हता. एकवेळ तांब्यांच्या उपाहारगृहात कुणी खिमा-पाव खाताना दिसला असता, तरी मी डोळ्यांवर विश्वास ठेवला असता. पण त्या बंगाली पत्रकाराच्या पुढ्यात मसाला डोसा पाहून मी अंगाला चिमटा काढला. आपण जागे आहोत, याची खात्री पटल्यावर मी त्याला विचारलं, '' कुठून आणलास ? '' तोंडात मसाला डोशाचा तोबरा भरलेल्या अवस्थेत त्यानं बोटाने ती इमारत दाखवली. मी सुसाट पळालो. तर खरंच उडीपी दिसला. 'मेनुकार्ड' चाळलं आणि थक्क झालो. इडली-मसाला डोसा वगैरे प्रकार होताच. पण डोशाचं त्याने 'इस्लामीकरण' करून तो खिमा डोसा, चिकन डोसा वगैरे प्रकार कराचीतल्या त्याच्या मुस्लिम बांधवांना खिलवत होता.

मालक मंगलोरी मुसलमान निघाला. विभाजनाच्या वेळी तो कराचीत गेला आणि सरळ उडप्याचं हॉटेल टाकलं. पाकिस्तानातला तो एकमेव उडीपी.

त्या दिवशी पटलं. उडीपी चंद्रावर गेला तरी तो हॉटेलच काढणार!

(१९ जून १९९४)

## □ सागरा प्राण तळमळला...

थोरामोठ्यांची पावलं जिथे उमटली आहेत. तिथे जाणं मला भयंकर आवडतं.

तो थोर मग सावळा, काळा की गोरा हा भेदाभेद मी मानत नाही.

शेक्सपीअरचं घर पाहायला स्ट्रॅडफोर्ड अपॉन एव्हनला मी गेलोय.

शिवाजी महाराजांचे गड मी ज्या प्रेमाने पाहिले, त्याच प्रेमाने ' अशक्य ' शब्द माहीत नसलेल्या नेपोलियनचा ज्या वॉटरलूला पराभव झाला तिथे मी जाऊन आलो.

लंडनमधलं क्रांतिकारकांचं ' माहेरघर ' - इंडिया हाऊस पाहिलं.

आणि मध्यंतरी खूप वर्षं मनात ठेवलेली आणखीन एक इच्छा मी पूर्ण केली. ब्रायटनचा समुद्रकिनारा पाहिला.

" ब्रायटन ? पण ब्रायटनचा इतिहासाशी संबंध काय ? " हा कदाचित तुमच्याही मनात आलेला प्रश्न माझ्या लंडनमधल्या गुजराती मित्राने विचारला होता. वर म्हणाला, " तुला ब्रायटनला जायचंय ? पण कशाला ? अरे समुद्रासारखा समुद्र. तुमच्या मुंबईत आहे तसा. (' आपली मुंबई ' तोपर्यंत ' तुमची ' झाली होती.) फक्त चौपाटीपेक्षा स्वच्छ आहे आणि तिथे भेळपुरीऐवजी सॅण्डविचेस् मिळतात. बाकी काही फरक नाही. "

पण माझा हट्ट कायम होता.

मी हट्ट सोडत नाही म्हटल्यावर त्याने हळूच विचारलं, " तुला तिथला न्यूडीस्ट कॅम्प वगैरे पाहायचाय का ? तसं असेल तर उगाच तिथे जाऊ नकोस. तिथले गोरे, अंगावर कपडे घालून तुला जवळपाससुद्धा फिरायला देणार नाहीत. त्यापेक्षा घरी बसून 'पेंट हाऊस' चाळ. 'ती' इच्छा तृप्त करणारी आणखीन काही मासिकंही खाली रॅकवर आहेत. ती व्हाईट वाईनची बाटली उघड आणि मस्तपैकी वाचत पड. "

त्याचा अनाहुत सल्ला धुडकावून मी म्हटलं, " ब्रायटनला जाण्यामागे माझा एक हेतू आहे. आमच्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एक अजरामर कविता लिहिलीय. त्यांना ती ब्रायटनच्या किनाऱ्यावर सुचली होती. "

आमचं संभाषण त्या मित्राचा १३-१४ वर्षांचा पुतण्या ऐकत होता. त्याने कुतूहलाने विचारलं, " अंकल, हू इस धिस सा-वार-कार ? " त्याचा काय दोष. इंग्रज सरकार त्यांना थोडंच सावरकर म्हणजे कोण ते सांगणार ? गांधी त्यांना बेन किंग्जलेमुळे कळला. माझ्या मित्राला सावरकर अजून आठवत होते, हे सावरकराचं सुदैव होतं. "

माझं इतिहास आणि सावरकरांवरचं प्रेम बघून तो म्हणाला, "जा जा, तू ब्रायटनला जा. पण आपण कारने जाऊ या असा हट्ट धरू नकोस. तिथे ट्रॅफिक प्रचंड असतो. कारनं तिथे पोहोचायला दोन तास लागतील. इथून ट्रेनने जा. अर्ध्या तासात पोहोचशील. बरोबर स्वेटर ठेव. हवा बदलली तर कुडकुडशील."

माझा मित्र त्याच्या दुकानात पौंड कमवत बसला आणि मी बायकोसह ब्रायटनला गेलो.

अख्खं ब्रायटन हॉलिडे मूडमध्ये होतं, मी मात्र वेगळ्याच मूडमध्ये होतो. आजूबाजूची गडबड माझ्या कानात शिरत नव्हती. ती शिरण्यासाठी कानात जागा कुठे होती? 'सागरा प्राण तळमळला' हे शब्द सतत कानांत घुमत होते.

बायकोनं थोडंसं भानावर आणल्यावर मी तिथल्या रेल्वेस्टेशनवर समुद्राकडे जायचा रस्ता विचारला. तो गोरा तिकीटचेकरही हॉलिडे मूडमध्ये होता. म्हणाला, "हॉलिडेसाठी आलायत? या रस्त्याने सरळ जा, थेट समुद्रात शिराल." पाहिलं तर समोर दूरवर समुद्र दिसत होता.

'ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला' अशी साद याच समुद्राला सावरकरांनी घातली होती. तो समुद्र दूरवर दिसत होता. नुसत्या त्या विचारांनी मी शहारलो. ब्रायटन हे छोटंसं जुनं शहर आहे. तिथल्या जुन्या इमारतींवर एक भारदस्तपणाची छटा आहे. 'प्रासाद इथं भव्य परी मज भारी । आईची झोपडी प्यारी' असं सावरकरांनी त्या कवितेत म्हटलं होतं. मनात विचार आला, या प्रासादतुल्य इमारतींक पाहूनच सावरकरांना ही ओळ सुचली होती का? एकेकाळी या कवितेतली ही ओळ हृदय कापत जायची. आज वाटतं ती भावना सावरकरांच्या पिढीबरोबरच संपली. मी इंग्लंड- युरोप - ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्ये जे पाहिलं, त्याचा या भावनेशी पुसटसासुद्धा संबंध नव्हता. प्रासादांच्या आकर्षणाने तर आज कितीतरी मंडळी आईची झोपडी सोडून जातात. शिक्षण आईच्या झोपडीत घेतात आणि आईचे पांग फेडायची वेळ आली की पाश्चात्त्य जगातले प्रासाद त्यांना खुणावतात. कोण इंजिनीअर असतो, कोण डॉक्टर असतो; पण शेवटी आईच्या सेवेला कुणी नसतो. त्यांना आईच्या झोपडीची अधूनमधून आठवण येते, पण तिथे परतायचं नसतं.

सावरकरांनी या ब्रायटनच्या समुद्राला काकुळतीला येऊन सांगितलं होतं, 'तिजवीण नको राज्य, मज प्रियसाचा! वनवास तिच्या जरी वनीचा!' आज आम्हाला परदेशात वनवास चालतो. तिथल्या हॉटेलात गोऱ्यांची खरकटी काढणं परवडतं, पण भारतात परतायची इच्छा नसते. ॲमस्टरडॅमला एका हॉटेलातल्या भारतीय वेटरने भीक मागावी तशी टीप मागितल्यावर मी त्याला विचारलं होतं, "इथे हा उद्योग करण्यापेक्षा तू भारतात परतून उद्योगधंदा का करत नाहीस?" तो तरुण चक्क आर्किटेक्ट होता. पण हा वनवास संपेल आणि कधी तरी या समृद्ध देशात आपल्याला पाय रोवायला मिळतील या आशेवर तो त्या रेस्टॉरंटमध्ये टेबल साफ करीत होता. असे कित्येक भारतीय जगभर आहेत. त्यांच्याकडे




पाहिल्यावर त्यांची कीव येते, राग येत नाही.

बदलत चाललेल्या भोवतालच्या भारतीयांना दूषणं देत मी समुद्रावर पोहोचलो. एखाद्या शांतपणे वामकुक्षी घेत पडलेल्या अवाढव्य माणसासारखा तो दिसत होता. स्वा. सावरकरांना तो निर्दयी वाटला होता. 'या फेन-मिषे हससि निर्दया कैसा' असं सावरकरांनी त्याला विचारलं होतं आणि बधत नाही म्हटल्यावर 'तरी आंग्लभूमी भयभीता रे! अबला न माझिही माता रे! कथिल अगस्तीस आता रे! तो आचमनी एक क्षणी तुज प्याला' अशी धमकी त्यांनी त्या सागराला दिली होती.

त्या दिवशी त्या निर्दयी हसण्याचा मागमूससुद्धा नव्हता. छोटीछोटी मुलंही न भीता त्याच्या कुशीत शिरत होती.

मी क्षणात भानावर आलो. तो मला निर्दयी कसा वाटणार?

'शुक पंजरी वा हरिण शिरावा पाशी ही फसगत झाली तैशी' अशी माझी अवस्था थोडीच होती! मस्तपैकी मी इंग्लंडला फिरायला आलो होतो आणि तिथे डेरा टाकायची माझी इच्छा असती तरी ब्रिटिश सरकार मला थोडंच ठेवून घेणार होतं? व्हिसाची मुदत संपली की लाथ बसणार होतीच.

मग मीसुद्धा भावनेच्या भरात इतरांना दूषणे देण्याचा मूर्खपणा का करत होतो? माझी इंग्लंडमध्ये स्थायिक व्हायची इच्छा नसेल, पण संधी मिळाली की उद्या भारत इंग्लंडला जात होतो. मीही शेवटी दुकानात पौंड मोजत बसलेल्या माझ्या मित्राच्या पिढीचा प्रतिनिधी होतो.

भरकटलेल्या भावनात्मक जगातून मी व्यवहारी जगात व्यवस्थितपणे पाय ठेवला. पुन्हा मन भरकटू नये म्हणून मनाला समजावलं, "महापुरुषाच्या बुटावर आदराने डोकं ठेवायचं असतं. इतरांच्या पायाला तो कसा बसतो, हे पाहायचं नसतं. नकळत आपलाच पाय आत जातो आणि तो मुंगीसारखा वाटायला लागतो."

मी लगेच हॉलिडे मूडमध्ये शिरलो.

(२६ जून १९९४)

## □ गोऱ्यांचं मित्रप्रेम

सूर्याला आपण भारतीय 'मित्र' म्हणतो. सूर्याच्या अनेक नावांपैकी ते एक नाव.

पण तो नेहमीच काही मित्रासारखा वागतो असं नाही. मे महिन्यात मुंबईकराला सूर्याला 'मित्र' म्हणणं हे आजच्या घडीला शरदरावांनी दाऊदभाईला मित्र म्हणण्यापेक्षा कठीण जावं.

आपल्याला तसं सूर्याचं आकर्षण नाही. पण सूर्य म्हटला की युरोपातला गोरा वेडा होतो. त्याला हिवाळ्यात सूर्याचं दर्शन झालेलं नसतं. प्रदीर्घ हिवाळ्यानंतर तिथल्या झाडांना पालवी फुटते तशी त्या तिथल्या माणसांच्या मनालाही फुटते. ती टवटवीत होतात. स्वेटर्स कपाटात भिरकावले जातात आणि गोरी अंगं सूर्यकिरणांच्या स्वाधीन होतात.

मग ते बागाबागांतून सनबाथ घेत लोळतात आणि सुट्टी मिळाली की समुद्राच्या कुशीत शिरतात. सूर्याएवढंच त्यांचं पाण्यावर प्रेम आहे. पाणी ते सहसा पीत नाहीत. तिथे हॉटेलात तुम्ही पाणी मागितलंत तर प्रकाश दुग्धालयात बीयर मागितल्यावर जे भाव वेटरच्या चेहऱ्यावर उमटतील ते तिथल्या वेटरच्या चेहऱ्यावर उमटलेले असतात. ते प्रेमाने पितात बीयर किंवा कोक. पण त्यांना डुंबायला आवडतं पाण्यात. घरी झोपून किंवा टी.व्ही. पाहत सुट्टी घालवणं त्यांच्या रक्तात नाही. सुट्टी मिळाली की घराबाहेर पडणं हा त्यांचा खाक्या.

ऑस्ट्रेलिया - न्यूझीलंडमध्ये समृद्धी आहे. तिथे कारप्रमाणे स्वत:ची छोटी नाव बाळगणं ही फार मोठी गोष्ट नाही. त्यांना समुद्रकिनाराही फार सुंदर लाभलाय. ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेनच्या जवळ एक 'गोल्ड कोस्ट सिटी' आहे. त्यात 'सर्फर्स पॅरेडाईज' म्हणून किनारा आहे. 'पॅरेडाईज' असेल तर ते असंच असावं असं वाटतं. निळं पाणी, कापसासारखी वाळू आणि त्यावर जग विसरून पडलेली गोरी अंगं. सिडनीच्या 'बॉनडाय बीच' वर असा देखावा पाहताना आपणही त्यात मिसळून जावं असं वाटतं.

ह्या गोऱ्यांकडे फालतू समुद्रकिनाराही सुंदर करण्याची कला आहे. लंडनजवळचा ब्रायटन हा काही सुंदर समुद्रकिनारा नाही. पण सुमार कल्पना अय्यरला पॅडिंग करून सेक्सी बनवावं तसा ब्रायटनचा किनारा सजवलाय.

आपल्या देशाला तर समुद्राने वेढलंय, किती तरी सुंदर समुद्रकिनारे आपल्याकडे आहेत. पण गोऱ्यांचं मेकअपचं

भान आपल्याकडे नाही. गोव्याच्या मीरामार बीचवर नुसता पाय ठेवला तरी पायाला गुदगुदल्या होतात. कलंगुटच्या वाळूत अंग टाकलं की तिथून उठावंसंच वाटत नाही. ती अंगाला गुदगुल्या करणारी वाळू ब्रायटनला नाही. तिथे वाळूच नाही मुळी. तिथे गोटे आहेत. ती खाडी आहे. तिथे अंगावर धावत येणारा समुद्र नाही. अशा समुद्रात शिरण्यात एक प्रकारची मजा असते. असा समुद्र पाहायलासुद्धा मस्त वाटतो. ब्रायटनकडे ते वैभव नाही. तो समुद्र शांत असतो ब्रिटिशांसारखा!

पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिथं सुट्टी घालवायला गेलेल्या माणसाला काहीही मिळतं. नेसत्या वस्त्रानिशी तिथे गेलात तरी काही अडत नाही. टॉवेल विसरलात? बीचवरच्या दुकानात मिळतो. गडबडीत वॉकमन किंवा कॅमेरा घरी राहिलाय? खिशात पैसे किंवा क्रेडिट कार्ड असेल तर तो मिळवण्यासाठी दहा पावलंसुद्धा चालावं लागत नाही. खाणंपिणं तर वाट्टेल ते! इतकंच काय पण 'सोबतीण' घरी राहिली तरी मिळायची सोय आहे.

बरं, ऑस्ट्रेलिया असो किंवा स्पेन, पाण्यात आणि पाण्याशी खेळता येणारे बहुतेक खेळ तिथं खेळता येतात. यॉटिंग-स्किईंग करण्याची सोय असते. यॉट आणावी लागत नाही, भाड्याने मिळते. पाण्यात खोल जाऊन शंख-शिंपले पाहायची हौसही भागवता येते. पाण्यात नुसतं डुंबायचं असेल तर प्रश्नच नाही. पोहता येत नसेल तरी काळजी करण्याचं कारण नाही. लाईफ जॅकेटस् मिळतात. ती अंगात अडकवायची आणि पाण्यात पडायचं. तिथे लहान मुलं मजेत पाण्यात डुंबत असतात आणि त्यांचे आई-बाप वाळूत डुंबत असतात. पाण्यात डुंबणाऱ्या त्यांच्या बच्छड्यांची काळजी करण्याची गरज नसते. लाईफगार्डस् डोळ्यांत तेल घालून गस्त घालत असतात आणि तरीही काही विपरीत झालं तर दोन ॲम्ब्युलन्स सज्ज असतात.

बरं, इंग्लंड - ऑस्ट्रेलिया जाऊ देत. थायलंड हा तसा आपल्यालासारखा गरीब देश. पण तिथल्या पट्टाया बीचवर गेलं की पाय काढवत नाही. तिथेही वॉटर स्पोर्टस् अगदी रग्गड आहेत. वॉटर स्कूटर घेऊन लाटांवर आरूढ होण्यात काय मजा असते ते अनुभवल्याशिवाय कळत नाही. बरं, पोहता येत नसेल तरी काळजी नाही. तुमच्या अंगात लाईफ जॅकेट असतं आणि पाहीजे असल्यास 'बॉडीगार्ड' ही मिळतो. तो मागच्या सीटवर बसतो आणि तुम्हाला मनमुरादपणे लाटांशी खेळता येतं.

बरं, तुमचा कधी पॅराशूटशी संबंध आलाय? आयुष्यात कधी येईल असं वाटतही नाही ना? मलाही वाटत नव्हतं. पण एकदा पट्टाया बीचवर पॅराशूटला लोंबकळल्याचा अनुभव मी घेतला. किती सोपं तंत्र होतं. पॅराशूटची लांबलचक दोरी लॉंचला अडकवली जाते आणि लॉंच समुद्रात फिरायला लागली की हवा भरलेलं पॅराशूट वर जातं. लाईफ जॅकेट लावून आपण त्याला लटकत असतो. दहा मिनिटं फिरून लॉंच पुन्हा किनारी




येने. हातातली पॅराशूटची वि... ...री खचली की आपणसुद्धा अलग... ...ळूवर उतरतो. बायकासुद्धा अशी मजा लुटू शकतात. हल्ली आपल्या गोराई बीचवरही अशी धमाल कर... येते असं मी ऐकून आहे.

मुंबईच्या आसपासच्या समुद्रकिनाऱ्यावर किंवा गोव्याला असं काही उभारणं कठीण नाही. मुंबईच्या आसपास किती सुंदर समुद्रकिनारे आहेत. अलिबागजवळ किहीम आहे. थोडं पुढे मुरुड-जंजिऱ्याचा समुद्र आहे. पालघरजवळ केळव्याचा समुद्र आहे. तिथं छोटंसं ब्रायटन किंवा मॅजोरिका (स्पेनमधला एक बीच) वसवणं कठीण नाही. महाराष्ट्र टुरिझमला ते शक्य नसेल तर खासगी उद्योगांना परवानगी द्यावी.

त्याचा फायदा आपल्याला तर होईलच पण देशालाही होईल. भारताला बहुमोल विदेशी चलन मिळू शकेल. उन्हाळ्यात बरंचसं युरोप-स्पेनला जातं. का ? स्पेनला सूर्यप्रकाश वेगळा आहे किंवा समुद्रात मोती मिळतात म्हणून नव्हे. सुट्टीचा क्षणन्‌क्षण एन्जॉय करता यावा ह्यासाठी सुविधा तिथे असतात म्हणून ते तिथे जातात. तुम्ही त्यांना त्या सुविधा भारतात द्या. ते भारतात येतील. त्यासाठी त्यांना 'उन्हाळ्याची' वाट पाहायचीही गरज नाही. मुंबई-गोव्याचं हिवाळ्यातलं हवामान त्यांच्या सहज पसंतीस पडू शकतं. त्यांचा पौंड, त्यांचा फ्रँक, त्यांचा मार्क आपल्या रुपयापेक्षा केवढा तरी श्रीमंत आहे. त्यामुळे त्यांना इथे खर्च करताना हातही आखडता घ्यायची गरज नाही आणि आपल्याला विलायती चलन मिळेल.

(३ जुलै १९९४)

## □ म्हणे वात्स्यायन आमचा !

तुम्ही कधी मुलाबाळांबरोबर सेक्सवर बोललायत ?

हे वाचल्याबरोबर, 'काय वेड लागलंय का ?' असं तुम्ही मनातल्या मनात म्हटल्याचं माझ्या लक्षात आलंय.

आपल्याकडे कदाचित चार मित्र किंवा मैत्रिणी आपापसात सेक्सवर बोलत असतीलही. एरवी सेक्सवर मनमोकळी चर्चा होत नाही. टोळकं जमलं की अचकट विचकट बोललं जातं, चावट जोक्स सांगितले जातात, पण गंभीरपणे सेक्सवर बोलण्याची आपली तयारी नसते.

नवरा-बायकोही सेक्सवर एकमेकांशी फार क्वचितच बोलत असावेत.

तिथे युरोपात अनोळखी माणूसही सेक्सवर बोलायला कचरत नाही. हवापाण्यावर बोलावं त्या सहजतेने तो सेक्सवरही बोलतो.

मला एक प्रसंग आठवतोय. मी जर्मनीत फ्रँकफर्टवरून म्युनिकला चाललो होतो. गाडीत कंपार्टमेंटमध्ये येऊन एक मुलगी बसली. जिन्स, पिवळा टी शर्ट आणि पाठीवर हॅवरसॅक असा तिचा वेष होता. तिथे हॅवर सॅक वेगळ्या प्रकारची असते. त्यात शिरून तुम्ही झोपूनही जाऊ शकता. त्यामुळे एखाद्या स्टेशनवरही तुम्हाला सहज पथारी पसरता येते.

ती माझ्या समोर बसली. हाय हॅलो झालं. अनोळखी माणसाशी जवळीक साधायला ते शब्द चांगलेच उपयोगी पडतात. मुख्य म्हणजे ती इंग्लिशमध्ये बोलायला लागली. जर्मनीत इंग्लिश बोलणारी व्यक्ती भेटणं हा मुंबई - आटपाटी यष्टीत सुंदर आणि फॅशनेबल मुलगी भेटण्याएवढा कठीण योगायोग आहे. जर्मन मंडळी इंग्लिशचं ज्ञान असूनही आपल्याला इंग्लिश येत नाही असं दाखवतात. संपूर्ण युरोप इंग्लिशला 'नावडत्या बायको' सारखं वागवतं. ती मुलगी अमेरिकन होती. अमेरिकन माणूस भिंतीशीही बोलू शकतो. अमेरिकेत ती आरलिंग्टनला राहायची. अठरावं वर्ष तिने नुकतंच ओलांडलं होतं आणि युरोपच्या सफरीवर ती निघाली होती.

मी तिला विचारलं, "तू एकटीच ?"

ती म्हणाली, "का, काय झालं ? मी आता 'ॲडल्ट' आहे." तिला 'ॲडल्ट' असण्याचं भयंकर अप्रूप वाटत होतं. कारण तिथे ॲडल्ट असणं हा कसलंही स्वातंत्र्य उपभोगण्याचा पासपोर्ट असतो.

मी म्हटलं, "तसं नाही. तुला भीती वगैरे वाटत नाही. माझी बायको दिवसाढवळ्यासुद्धा टॅक्सीत बसायला घाबरते."

ती हसली आणि म्हणाली, "कसली भीती? वाटेत कोण ना कोण बॉय फ्रेंड भेटतोच."

आणि ती चिमुरडी मुलगी वेगवेगळ्या विषयांवर मोकळेपणाने बोलली. सेक्सबद्दल तर तिचं सरळ सोपं तत्त्वज्ञान होतं. आवडलेल्या मुलांबरोबर सेक्स करण्यात तिला कसलीही नैतिक भीती वाटत नव्हती. मॅकडोनाल्डमध्ये जाऊन हॅमबर्गर खावा त्या सहजतेने ती आवडलेल्या मुलाबरोबर सेक्स करत होती.

"पोटाची भूक भागवताना आपल्याला नैतिक बंधनं नसतात, मग शरीराची भूक भागवताना का असावी?" असा तिचा खुल्लमखुल्ला सवाल होता.

"पण भावनात्मक गुंतागुंतीशिवाय नुसतं सेक्स विचित्र वाटत नाही?" मी विचारलं.

ती म्हणाली, "माणूस आवडला की थोडी भावनात्मक गुंतागुंत होतेच. तेवढी पुरेशी असते. पूर्णपणे गुंतून जावं असा मुलगा अजून मला भेटायचा आहे."

"एडस्ची भीती नाही वाटत? समोरच्यावर विश्वास कसा काय टाकतेस?"

"कंडोम कशासाठी आहे?" तिचा खडा सवाल होता. अमेरिकेत कंडोमची ओळख शाळेतच होते. शाळेत मशीनमध्ये पैसे टाकल्यावर जसा कोक मिळतो, चॉकलेट मिळतं, तसे कंडोमही मिळतात. त्या मुलीचं कौमार्य वयाच्या पंधराव्या वर्षी संपलं होतं आणि तिने ते मला अभिमानाने सांगितलं. अशा मुली तिथे पोत्याने असतात.

मला माझ्या एका अमेरिकेहून आलेल्या मित्रानं सांगितलेली गोष्ट आठवतेय. तो म्हणाला, "माझ्या अमेरिकन मित्राकडे बसलो होतो. त्याची चौदा-पंधरा वर्षांची मुलगी शाळेत 'एड्स प्रोग्रॅम' वर एक लेक्चर देऊन आली. (ऐकून नव्हे) तिने तिथे कंडोम्सही वाटले होते. त्यातले काही ती घरी घेऊन आली. ते तिने वडिलांना दिले आणि त्यातले दोन उचलून स्वत:कडे ठेवून म्हणाली, "आज पार्टीला जायचंय. लक असेल तर या कंडोमचा उपयोग होईल."

आपल्यासाठी ह्या परिकथा आहेत. मी युरोपात अठरा-वीस वर्षांच्या मुलामुलींचे अनेक घोळके पाहिले आहेत. रंगीबेरंगी पक्ष्यांच्या थव्यांसारखे दिसतात. त्यांच्या गोऱ्या कातडीला कुठलाही रंग शोभतो. रंगीबेरंगी कपड्यात आणि पाठीवर हॅवरसॅक घेऊन ते फिरत असतात. एकत्र राहतात, फिरतात आणि सूर्यकिरणं एन्जॉय करतात. माझ्याप्रमाणे टुरिस्ट बसमधून ते शहर पाहत नाहीत. हातात त्या शहराचे नकाशे घेऊन पायी भटकत असतात. मध्येच विरंगुळा म्हणून एखाद्या चौकात गिटार वाजवत धुंदपणे नाचतात. समुद्र सापडला तर मऊ वाळूत मस्तपैकी सनबाथ घेत पडतात. असं मस्तपैकी स्वैर जीवन जगत असतात. ते पाहताना आपल्याला हेवा वाटतो.

ज्या मोकळेपणाने ही मंडळी जीवन जगतात त्याच मोकळेपणाने ती मुलंमुली टी.व्ही. वर सेक्सची चर्चा करतात. एकदा लंडनमध्ये मी तिथल्या चॅनेल फोरने प्रस्तुत




केलेला सेक्स टॉक हा कार्यक्रम पाहिला होता. तीन-चार मुलं-मुली टी.व्ही. वर सेक्सवर चर्चा करीत होती आणि विषय होता. 'ऑरगॅझम' म्हणजे प्रणयसुखातला सर्वोच्च बिंदू.

नुसता हा विषय ऐकून आपल्याकडे मध्यमवर्गीयांचं डोकं गरगरेल. त्या मुली रेसिपीवर बोलावं त्या सहजतेनं सेक्सवर बोलत होत्या.

"अगं भाजी करायला घेतली आणि फोडणी द्यायला विसरले..." असं नव्याने स्वयंपाक करायला शिकलेली मुलगी ज्या त्राग्याने सांगेल त्या त्राग्याने एक गोरी मुलगी म्हणाली, "काय सांगणार, १९ व्या वर्षापर्यंत माझं कुणी चुंबनच घेतलं नाही."

"अग काल एकदाचा तो मलई कोफ्ता जमला बुवा" असं विजयी मुद्रेनं सांगावं, त्या मुद्रेने एका मुलीने सांगितलं, "मी ऑरगॅझमचा पहिला अनुभव घोड्यावर बसल्यावर घेतला. तोपर्यंत मित्रांशी संभोग करूनही मला तो अनुभव मिळत नव्हता."

काही मुलांनी सांगितलं की संभोगसुखातला मुलींचा परमोच्च बिंदू कधी येतो, ते आपल्याला ठाऊक नाही. त्यांचं एवढं अज्ञान, तर आपल्या बंदिस्त समाजातल्या मुलांचं अज्ञान केवढं असेल! साधी कुटुंबनियोजनाची जाहिरात मुलाबाळांबरोबर बघताना कावरीबावरी होणारी आपण माणसं! हा त्यांचा स्वैरपणा आपल्याला कसा पचणार!

आणि म्हणे वात्स्यायन आमचा!

(१७ एप्रिल १९९४)

जुलै-ऑगस्टमध्ये लंडनला जाणं हे एक सुख असतं. अर्थात सुख कशाला म्हणायचं हा वैयक्तिक प्रश्न झाला.

त्यावेळी तिथं क्रिकेटचा मोसम तेजीत असतो. विम्बल्डन आपलं पाहून झालेलं असतं. 'टूर द फ्रान्स' ची पिवळी जर्सी कोण मिरवतंय ते बी.बी.सी. दाखवत असतं.

जे तुमच्या सुखाच्या कल्पनेत असेल ते सुख तुम्हाला मिळतं.

सुर्य रात्री दहा वाजले तरी हटत नाही. त्याला लंडन सोडावंसं वाटत नाही. तो लंडनवर इतका खूष असतो की पहाटे चारला पुन्हा हजर होतो. खिडकीतून तुम्हाला खुणावत राहतो. बोलावत राहतो. तो जणू सांगत असतो, "झोपून काय राहता, चला, बाहेर पडा. लंडनमध्ये या मोसमात झोपायचं नसतं." तो उठवतो खरा, पण त्या दिवसात तो भयंकर मिष्किल होतो. उबदार दिवसाचं तो सकाळीच प्रॉमिस देतो. तुम्ही ब्रायटनच्या समुद्र किनाऱ्यावर लोळायचा प्रोग्रॅम तयार करता आणि मस्तपैकी लोळत असताना तो स्वत: हळूच नकळत ढगाआड जातो आणि बोचऱ्या, थंड वाऱ्यांना पुढे करतो. अंगावर पटापट कपडे चढतात. आपल्यासारख्यांना तर स्वेटर लागतोच. थोडा थंड पाण्याचा शिडकावाही होतो आणि मग हसत हसत सूर्य बाहेर येतो. 'कसं फसवलं!' च्या आविर्भावात! सूर्याची ही भंकस आवडत असेल तर लंडनला ते सुख मिळतं.

लाल टपोरेदार चेरी, महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी 'पाळण्यातली' वाटावी अशी मोठ्ठी स्ट्रॉबेरी, त्यावर जाड मलईचा थर, भगवी, भलीमोठी पीच, टोमॅटोच्या कुटुंबात शोभतील अशी अलुबुखार, शंभर प्रकारची कॉफी, शंभर प्रकारची चॉकलेटस्, शंभर प्रकारची आईस्क्रीम्स्, शंभर प्रकारची वाइन ही तुमच्या सुखाची कल्पना असेल तर तेही सुख तुम्हाला मिळतं.

## □ शिष्टाचाराची दुनिया

मला आणखीन दोन गोष्टी आवडतात. मला ब्रिटिश माणसाची शिस्त आवडते. मला ब्रिटिश माणसाचे शिष्टाचार आवडतात. मला ब्रिटिश माणसाची लोकशाहीवरची श्रद्धा आवडते. युद्ध जिंकण्यासाठी चर्चिलला तेच जिंकून देऊ शकतात आणि युद्ध जिंकल्यावर चर्चिलला तेच हरवू शकतात.

शिष्टाचार त्यांच्या नसानसात भिनलेले असतात. 'थँक्यू' हा शब्द लाळेइतकाच त्यांच्या तोंडात असतो. विदाउट तिकीट प्रवास करणाऱ्या माणसाला चेकरने पकडलं, चेकरने दंड वसूल केला

की तो त्या माणसाला 'थँक्यू' म्हणतो. रस्त्यात दंगल करताना पोलिसाने कुणाला पकडलं की त्याची मुंडी धरली जाते, पण त्याने बेड्या घालायला हात पुढे केले, त्याला बेड्या घातल्या की हात पुढे केल्याबद्दल पोलीस त्याला 'थँक्यू' म्हणतो. माझ्या मित्राचं लंडनमध्ये दुकान आहे. वीस पेन्सचा पेपर कुणी विकत घेतला तरी 'मच ओब्लाइजड' हा शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडायला उतावीळ झालेला असतो. पुण्याच्या एका प्रसिद्ध दुकानदाराने ते पाहिलं तर त्यांना नक्की घेरी येईल. तिथं पुडी बांधणाऱ्या नोकरालाही उद्धटपणे वागायचं ट्रेनिंग आहे, कपाळावर आठ्या पडत नसतील, गिऱ्हाईकावर उपकार करतोय ही भावना चेहऱ्यावर दाखवता येत नसेल आणि गिऱ्हाइकावर खेकसणं जमत नसेल तर त्या दुकानदाराकडे नोकरीवर ठेवत नाहीत.

'थँक्यू' इतकेच गुडमॉर्निंग, गुडइव्हिनिंग. गुडनाइट, हॅव अ नाइस टाइम, चीअर्स, टेक केअर वगैरे शब्द त्यांच्या तोंडात दबा धरून बसलेले असतात. सकाळी घराबाहेर पडताना ब्रिटिश माणूस गुडमॉर्निंगचा जप करतच बाहेर पडतो. समोरून येताना भाजीवाला भेटो, झाडूवाला किंवा पोलीस ऑफिसर - गुड मॉर्निंगचं स्तोत्र तो ऐकवत जाणार. हिथ्रोवरचा इमिग्रेशन ऑफिसर किंवा कस्टमवाला तुम्हाला छळ छळ छळेल. आडवे-तिडवे प्रश्न विचारील. पण शेवटी 'हॅव अ नाइस टाइम' म्हणेल. विमानतळावरून परत पाठवण्याचे (डीपोर्ट करण्याचे) प्रकार हिथ्रोवर काही वेळा होतात त्यावेळीही 'हॅव अ नाइस टाइम बॅक होम' असं म्हणतात की नाही देव जाणे!'

तिथे रेस्टॉरंटमध्ये गेल्यावरही काही शिष्टाचार पाळावे लागतात. आपल्याकडे सर्वसाधारण हॉटेलात शिरल्यावर आपण मोकळ्या टेबलावर जाऊन बसतो. वेटर मेनूकार्ड हातात देतो. मेनूकार्डची टंचाई असेल तर 'काय गरम आहे?' विचारल्यावर भटाने पोथी सांगावी तसा तो सांगत सुटतो. 'वडा-सांबार, इडली, मसाला-उपमा' वगैरे वगैरे!'

'पोऱ्या, जरा फडका मारून घे आणि थंड पाणी घे' ही त्याची ऑर्डर म्हणजे उडीपी टाइप हॉटेलच्या 'ट्रीटमेंट' ची परिसीमा. इंग्लंडमध्ये तुम्ही 'पिझ्झा हट'मध्ये गेलात तरी 'प्रेमाची ट्रीटमेंट.' तुम्ही आत शिरल्यापासून अख्खं रेस्टॉरंट रिकामं असलं तरी टेबलावर जाऊन बसणं हा शिष्टाचार नाही. प्रथम एक चुणचुणीत मुलगी किंवा स्मार्ट सुटवाला नौजवान तुमचं स्वागत करणार. तुमचं टेबल व्यवस्थित लावलं जाणार. तसं ते व्यवस्थित लावलेलंच असतं. पण पुन्हा लावणं हा शिष्टाचाराचा भाग. मग अदबीने मेनूकार्ड देणं आणि पुढचे सोपस्कार. पिझ्झा न खाता फक्त कोक प्यायलात तरी शिष्टाचारात बदल नाही.

वेळ पाळणं आणि शब्द पाळणं हा तिथला आणखीन एक शिष्टाचार. तिथले क्रिकेटपटूही दिलेली वेळ पाळतात. एकोणसशे श्यहाऐंशीच्या लॉर्डस् कसोटी सामन्याची गोष्ट मला आठवतेय. सामना संपत आला होता. भारतीय संघ सामना जिंकत आला




होता. आपण एकोणीसशे एकाहत्तर साली ओव्हलला जिंकत होतो. त्यानंतर इंग्लंडमध्ये यशाच्या जवळ यायची ती दुसरी वेळ होती. एकोणीसशे एकाहत्तर साली इंग्लंडला हरवताना रे इलिंगवर्थ इंग्लंडचा कर्णधार होता तो त्यावेळी बीबीसीवर समालोचन करीत होता. त्याच्याशी बोलावं, एकोणीसशे एकाहत्तरच्या विजयाची त्याला तुलना करायला लावावी असं माझ्या मनात आलं. मी त्याला त्यासंबंधी विचारलं. सुरुवातीला बोलायचा त्याचा मूड दिसला नाही. विनंतीच्या दोन-चार पायघड्या वाढवल्यावर तो तयार झाला. पण म्हणाला, "आता माझी कॉमेंट्रीची टर्न आहे. पण लंच किंवा लंचनंतर तुझ्याकडे मी येईन. प्रेसबॉक्समध्ये." आणि निघून गेला. वाटलं, लावली टोपी त्याने! अशा प्रसंगी काही भारतीय क्रिकेटपटूंचा मला वाईट अनुभव आला होता. पण माझ्या दृष्टीनं रे इलिंगवर्थची मुलाखत महत्त्वाची होती. लंचला त्याची माझी चुकामूक होईल म्हणून मी बाहेर जाऊन लंचही घेतला नाही. शेवटी लंच संपला. पुन्हा सामना सुरू झाला. वाटलं झालं. रे इलिंगवर्थने 'टोपी' लावली. मी उदरभरणासाठी प्रेसबॉक्सच्या बाहेर पडायचा निर्णय घेत होतो. इतक्यात कुणीतरी खांद्यावर हात ठेवला आणि म्हटलं, "यस, आय

ॲम रेडी फॉर इंटरव्ह्यू'' तो रे इलिंगवर्थ होता आणि एकदा यस म्हणाल्यावर तो हातचं राखून बोलला नाही. ब्रिटिश शिष्टाचाराला तो जागला.

ब्रिटिशांचा स्वभाव मला आवडत नाही, पण त्यांचे शिष्टाचार आवडतात. लंडनमध्ये महिनाभर फिरल्यावर ते काही काळ आपल्या अंगात भिनतात. ते मोठ्या हौसेने मी भारतात घेऊन येतो, पण मुंबईत बसमध्ये चढल्यावर ते बघता बघता पळून जातात. 'सुट्टे पैसे काढा, नाहीतर खाली उतरा.' 'ए म्हातारे, एका रुपयासाठी दहा रुपयांची मोड हवी हो तुला' म्हणणारा कंडक्टर भेटल्यावर 'शिष्टाचारा' ची तिथे थांबायची काय बिशाद लागलीय!

■

(९ जुलै १९९५)

## माझी इंग्लंडमधली क्रिकेटगिरी

अनुभवाची मायक्रोफिल्म काढून मनाच्या अर्काईजमध्ये मी जतन करून ठेवलीय.

एकोणीसशे श्यहाऐंशीचा तो क्रिकेट मोसम. भारतीय संघाचा क्रिकेट दौरा 'कव्हर' करायला मी गेलो होतो. भारतीय संघाची विजयी घोडदौड सुरू होती आणि कुणीतरी टूम काढली. आपल्या भारतीय पत्रकारांचा संघ तयार करून इंग्लंडच्या पत्रकारांविरुद्ध सामने खेळूया. कुणी नकार द्यायचा प्रश्नच नव्हता. इंग्लंडमध्ये खेळायला मिळतंय. क्रिकेटच्या जन्मभूमीत खेळायला मिळणार! आम्हांला आमच्या भाग्याचा हेवा वाटायला लागला. लहानपणी हातात बॅट घेतल्यावर काही महत्त्वाकांक्षा उफाळून येतात. त्यात देशासाठी खेळणं आणि इंग्लंडमध्ये जाऊन खेळणं या असतातच असतात. काही काळाने 'काही जमत नाही' असं वाटलं की या महत्त्वाकांक्षा आपोआप अडगळीत फेकल्या जातात. तशा त्या माझ्या मनाच्या

पुन्हा एकदा मुलुखगिरीला निघायचा माझा विचार आहे. फिरायला मला मनापासून आवडतं. नवीन माणसांना भेटणं, नवीन स्थळं पाहणं हा माझा छंद आहे. आहे तसा महाग छंद, पण कसंबसं चाललंय.

माणसाला पंख असते तर बरं झालं असतं. ते स्थलांतर करणारे पक्षी पहा ना. समुद्र आरामात पार करतात. त्या पक्ष्यांचा मला हेवा वाटतो. माणसाला देवाने पंख दिले नाहीत, मग माणसाने विज्ञान नावाच्या देवाला भजलं. त्याच्याकडून विमान घेतलं. पक्ष्यांचा राजा गरुडापेक्षा मोठं, वेगवान आणि ताकदवान. पण ते पंख त्याचे स्वत:चे असतात. विमान आपलं नसतं. त्याच्या उपयोगासाठी भरपूर पैसे मोजावे लागतात पण या जगात लेखणीला मदत करणारी माणसं असतात.

आमचा एकवीस क्रीडा पत्रकारांचा संघ इंग्लंड आणि युरोपला निघाला. मुख्य हेतू तिथं जाऊन आमच्या 'तोलामोला'च्या संघाबरोबरच्या क्रिकेटचे सामने खेळणे. उपहेतू - तिथल्या वर्तमानपत्रांची ऑफिसेस, त्यांची कार्यपद्धती पाहणं. बी.बी.सी. त डोकावणं. युरोपात काही स्पोर्टस् क्लब आणि स्टेडियम्स पाहणं वगैरे!

इंग्लंडमध्ये क्रिकेट खेळणं हा एक वेगळा अनुभव असतो. यावेळी मी तो घेईनच असं नाही. आम्ही पत्रकार नेहमी एक तुणतुणं वाजवत असतो. "तरुणांना संधी दिली पाहिजे. तरुणांना वाव दिला पाहिजे." मग इथेही आमच्या स्तरावर तरुणांना नको का संधी द्यायला? पण जुन्या

कुठल्यातरी अडगळीत फेकल्या गेल्या होत्या. पण त्यापैकी किमान एक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी संधी अशी दत्त म्हणून हजर होईल असं वाटलं नव्हतं.

'किट'चं काय करायचं हा पुढचा प्रश्न होता. श्वेतवस्त्र खरेदीसाठी एका कौंटी क्लबच्या दुकानात शिरत असताना मला संदीप पाटील भेटला.

"काय खरेदी करतोयस ?" त्याने विचारलं.

"उद्या आमची मॅच आहे. त्यासाठी कपडे पाहतोय." असं म्हटल्यावर त्याने मला वेड्यात काढलं. म्हणाला, "माझ्या रूमवर ये आणि कपडे घेऊन जा. पैसे काय वर आले आहेत ?"

क्रिकेटपटूंमध्ये कर्ण फार थोडे असतात. संदीप पाटील हा त्यातला एक. त्याच्याकडे गेल्यावर त्याने मला नखशिखान्त पांढरा करून सोडलं. पांढरी टोपी, पांढरा शर्ट, पिवळसर पांढरी फ्लॅनेल, पांढरे मोजे आणि बूट त्याने माझ्यासमोर ठेवले. "हे तुझे" त्याने सांगितले. करकरीत कोरे कपडे माझे झाले.

चंदू पंडितने बॅट दिली. (ती मात्र परत करायच्या बोलीवर)

एक गडबड झाली. संदीपच्या पायांपुढे माझा पाय म्हणजे केळीच्या पानापुढे मेंदीचं पान. त्यामुळे रमण लांबाचे बूट घ्यावे लागले. नाहीतरी त्या दौऱ्यावर रमण लांबाला फारसं काम नव्हतंच.

मैदान सुंदर होतं. खरं तर इंग्लंडमध्ये मैदान सुंदर होतं म्हणणं म्हणजे 'श्रीदेवीची काय फिगर आहे' असं म्हणण्यासारखं आहे. तिथे प्रत्येक मैदानच सुंदर असतं. केस 'सेट' करावेत तशी हिरवळ 'सेट' केल्यासारखी वाटते. अगदी कुठल्याही मैदानावर पाय ठेवून धावायला लागलं की पायाला स्प्रिंग्ज फुटल्या आहेत असं वाटतं. निव्वळ ती मजा अनुभवण्यासाठी क्षेत्ररक्षण करावंसं वाटतं. आमची ही हौस प्रतिस्पर्धी संघाने ओळखली असावी, त्यांनी आम्हांला मैदानभर पळवलं.

आमच्या फलंदाजीच्या वेळी आमच्यातून खेळणारे भारतीय संघाचे व्यवस्थापक 'राजसिंग डुंगरपूर' पहिल्या चेंडूवर कोसळले. कोसळलेला डोंगर परत येत असताना कर्णधाराने आदेश दिला - "आता तू जा खेळायला." माझा 'नृसिंह' अवतार खेळपट्टीकडे निघाला. 'चंदूची बॅट, रमणचे बूट, संदीपचे कपडे!' पहिल्या तीन चेंडूने दोन - तीन धडे दिले. गोलंदाजी टाकताना आधी धडे मिळालेच होते. मी सरळ चेंडू टाकला. इंग्लिश वातावरणात त्याला हवेने वळण दिलं. अचानक स्विंगची सिद्धी आपल्याला प्राप्त झाली असं उगाचच वाटायला लागलं. फलंदाजी करताना जाणवतं की चेंडू कासवाच्या गतीनं बॅटकडे येतो.

चार-पाच चांगले ऑनड्राईव्ह बसल्यावर तीस-पस्तीस धावांची खेळी करून परतलो. तेव्हा राजभाईंच्या शब्दांनी मला दिलासा दिला. "तू प्रेसचा वेंगसरकर आहे", राजभाई म्हणाले. कुणाला कसं हरभऱ्याच्या झाडावर चढवायचं हे राजभाईंना चांगलं जमतं.



आम्ही मॅचही हरलो हे सांगणं नलगे पण त्यानंतरच्या हेनिकेन बीयरची चव जिभेवर ठेवत मारलेल्या गप्पा, स्नूकर स्टीकशी केलेली धडपड आणि ते क्लबचे वातावरण सर्वच धमाल होतं.

पुढची मॅच आम्ही हरलो. पण ती माझ्या दृष्टीने संस्मरणीय होती. एका पांढऱ्या केसाच्या पन्नाशीच्या पुढे झुकलेल्या फलंदाजाला मी बाद केलं आणि आमच्यातून खेळणारा पाकिस्तानचा कमर अहमद माझ्याकडे धावत आला आणि म्हणाला, '' पपू (माझं टोपण नाव) तुला कळलं, तू कुणाची विकेट घेतलीयस्? '' मी मान हलवली. तो म्हणाला, '' अरे, तू टेस्ट विकेट घेतलीय. तो ॲलन ओकमन होता. ससेक्स आणि इंग्लंडचा खेळाडू! '' लंचला ऑकमनने तो चेंडू त्याचीं सही करून मला दिला. म्हणाला, कसोटी बळीचं हे माझ्यातर्फे बक्षीस. चांगला चेंडू टाकलास. तो ऑफब्रेक वळणार म्हणून मी खेळलो. तो सरळ गेला. मी फक्त मंद हसलो. खरं काय झालं ते फक्त मलाच ठाऊक होतं. मी चेंडू वळवायचा आटोकाट प्रयत्न केला, पण तो नटखट चेंडू माझ्या बोटांना फसवून सरळ गेला. फक्त घडलं एवढंच की त्याने माझ्याबरोबर ओकमनलाही फसवलं.

आम्ही फलंदाजी केली तेव्हा ओकमनने पहिल्या चेंडूपासून जुन्या चेंडूने गोलंदाजी टाकली. गेल्या मॅचच्या स्कोअरमुळे माझी आघाडीला बढती झाली होती. ओकमनचा एकही चेंडू दिशा आणि टप्प्याची प्रतारणा करणारा नव्हता. त्या वयातली त्याची अचूकता बघून वेड लागलं. शेवटी व्यावसायिक क्रिकेटपटूच्या हाताची सवय सहजासहजी सुटत नाही.

यावेळी मी खेळेन असं वाटत नाही. पण अगदी नातवालां कौतुकाने सांगता येतील एवढे इंग्लंडमध्ये खेळलेल्या क्रिकेटचे किस्से मी मनात तुडुंब भरून ठेवले आहेत. काहीही सांगण्यासाठी हक्काने समोर बसवता येईल असा श्रोता तोच तर असतो.

■

(२ जुलै १९९४)

ग्रंथालय
ग्रंथालय ८०७
२८५५५२
२५/३/९८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## □ ॲमस्टरडॅमचं व्हिनस टेंपल

इंग्लंड-युरोपमध्ये मुलुखगिरी करून मी नुकताच परतलो. काही पाहिलेल्या शहरांना भेटी दिल्या. काही नव्या शहरांत फिरायला मिळालं.

तिथे फिरत असताना इथल्या बातम्या कळत नाहीत. कारण एक तर युरोपात इंग्रजी वर्तमानपत्र सापडणं हे उन्हाळ्यात पूर्ण कपड्यातली स्त्री सापडण्याएवढं कठीण काम आणि सापडलंच तरी भारत नावाचा देश जगाच्या पाठीवर कुठे तरी आहे हे त्यांना फक्त ठाऊक असतं; पण तो त्यांच्या खिजगणतीत नसतो. घरी फोन केल्यावरही 'तुम्ही कसे आहात आणि मी कसा आहे' यापलीकडे बोलायला खिसा परवानगी देत नाही. बघताबघता पाचदहा डॉईश मार्क्स किंवा स्विस फ्रॅन्क टेलिफोनच्या पेटीत अदृश्य होतात.

पॅरिसहून मुंबईला परतताना भारतातली इंग्रजी वर्तमानपत्रं हातात आली आणि इतर बातम्यांबरोबर मधू-मिलिंद-सप्रे-सोमणाच्या साहसी जाहिरातीबद्दल वाचायला मिळालं. घरी आल्यावर फोटो पाहिला, पण खरं सांगू, काहीच नाही वाटलं. फोटो पाहून उडणं जाऊ देत, पण उठून बसावंसंसुद्धा नाही वाटलं. त्याला कारणं आहेत. एक म्हणजे मिलिंद सोमण देखणा असला तरी मधु सप्रे माझ्या सौंदर्याच्या व्याख्येत बसणाऱ्यापैकी नाही. बऱ्याचवेळा दोघं एकत्र आले की नेमकी मधू कुठली आणि मिलिंद कुठला हे चटकन् कळत नाही. पिळदार तो मिलिंद हा निकष लावून मी ओळखण्याचा प्रयत्न करतो.

आणि दुसरं म्हणजे ज्या वातावरणातून मी आलो होतो, ज्या वातावरणात महिनाभर राहिलो होतो तिथे नग्नता, नग्न जाहिराती, सेक्स, पोर्नोग्राफी या गोष्टींबद्दल हॅमबर्गर, पास्ता, वाईन किंवा भाववाढ एवढ्या सहजतेने बोललं जातं. आपल्याकडं अशा वेळी ठराविक प्रतिक्रिया उमटतात. भारतीय संस्कृतीचे पुजारी आक्रमक होतात. त्यांच्यातले नेमस्त नाकं मुरडतात. जी जमात पश्चिमेकडे कान-डोळे-मेंदू लावून बसलेली असते, त्यांना पश्चिमेजवळ गेल्याचं समाधान मिळतं. त्यात शरीर उघडं टाकायचं ज्यांनी साहस केलेलं असतं त्यांचा मात्र कार्यभाग साधतो. त्यांचं उखळ व्यवस्थित पांढरं होतं. अजून आपला समाज सेक्सच्या बाबतीत पुरोगामी नाही. त्यामुळे त्याला एकदम आघात सहन होणं तसं सोपं नाहीय.

पाश्चिमात्य जग याबाबतीत केवढं

पुढे आहे याचा एक नमुना ॲमस्टरडॅममध्ये पहायला मिळाला. बारा वर्षांपूर्वी मी ॲमस्टरडॅमला गेलो होतो. त्यावेळी हा 'नमुना' नव्हता. यावेळी हा नमुना पहायला आमच्यातला प्रत्येक भारतीय पत्रकार वाट पाहात होता.

तिथे एक सेक्स म्युझियम होतं. युरोपातलं 'एकुलतं एक' असं त्याचं वर्णन केलं गेलं होतं. आर्ट म्युझियम, नॅचरल हिस्ट्री म्युझियम तसं हे सेक्स म्युझियम ! त्यांनी असं म्हटलं होतं, ' लैंगिकतेशी आपला सामना हल्ली मोकळेपणाने होतो. ही आपल्या आयुष्यातली रोजची गोष्ट झालीय. आपले विचार संकुचित नाहीत याचं ते प्रतीक आहे, पण लैंगिकता ही माणसाला प्रत्येक काळात भिडलीय. काही वेळा चोरपावलाने, काही वेळा विशिष्ट वस्तूंच्याद्वारे! कलेचं असं कुठलंही दालन नाही ज्यात लैंगिकतेचं प्रतिबिंब पडलेलं नाही. ती कुठल्या ना कुठल्या स्वरूपात तुम्हाला भिडतेच. लिथिओग्राफीचे पेंटिंग्ज, ब्रॉन्झ, चिनीमातीच्या वस्तू, फोटो किंवा चित्रपट वगैरे कुठलीही कला त्याला अपवाद नाही. प्रत्येक काळात एखाद्या अधिकृत संस्कृतीबरोबरच दुसरी अनधिकृत संस्कृती अस्तित्वात होतीच. हा म्युझियम ती अनधिकृत संस्कृती उघडी करून दाखवतो.'

त्या म्युझियमला नाव ' व्हिनस टेंपल ' असं दिलंय. आत शिरताना व्हीनसचा नग्न पुतळा तुमचं स्वागत करतो. सुरुवातीला असं वाटतं की, काहीतरी भंकस, पोर्नोग्राफीच्या चित्रांचं प्रदर्शन वगैरे असणार. थोडंसं विनोदी अंगाने मांडलेलं ! ते तसं होतंच, पण फक्त तेवढंच नव्हतं. त्याला गंभीर स्वरूपही होतं. उलट गंभीर स्वरूप बोअर होऊ नये म्हणून अधूनमधून विनोदी गोष्टींची पखरण होती. दोन पुरुषी लैंगिक अवयवांनी तयार केलेलं आसन होतं. त्या आसनांच्या दोन खुर्च्यांवर बसलं की समागमाच्या वेळच्या हालचालींच्या वेळचा भास व्हायचा. कित्येक मुलामुलींनी त्या आसनांवर बसून फोटो काढून घेतले.

तिथे मेरीलीन मन्रोचा पूर्णाकृती पुतळा होता. तिचा उडलेला स्कर्ट सावरण्याची ती नेहमीची पोज आणि ते तिचं हास्य, पुतळा बनवणाऱ्याने हुबेहूब उचललं होतं. मी ठरवलं, मेरीलीन मन्रोच्या हातात हात घालून फोटो काढायचा. 'तूं नहीं तो पुतळा सही।' फोटोसाठी हाताला स्पर्श केला आणि सायरन वाजायला लागला. विजेचा झटका लागल्याप्रमाणे मी हात काढून घेतला. मला वाटलं, 'पहारेकरी' मंडळी येणार. तसं काही घडलं नाही. मी दुसऱ्या दालनात गेलो तेव्हा पुन्हा सायरनचा आवाज आला. मी हसलो. माझ्या विचाराच्या कुणीतरी मेरीलीन मन्रोशी लगट केली होती, त्यावेळीही पहारेकरी आले नाहीत. मेरीलीनच्या आकर्षणाची त्यांना बहुतेक सवय असावी.

पण गंभीरतेने मांडलेल्या गोष्टी खूप इंटरेस्टिंग होत्या. काही जुन्या काळात संभोग करताना चोरून काढलेले फोटो होते. 'डीप थ्रोट' या अमेरिकेत गाजलेल्या पहिल्या ब्ल्यू फिल्मपासून आजच्या जगातल्या पुढारलेल्या सेक्स फिल्मचा इतिहास होता. आपल्या कामसूत्राची दखल घेतलेली होती आणि विलासी संस्थानिकांच्या विलासाची चित्रं होती.




गलेलठ्ठ माणसं काय अडीअडचणींना तोंड देत सेक्स करतात, त्याचं चित्रमय दर्शन होतं. एका अद्वितीय पुरुषाचा फोटो होता. रासपुतीनलाही हेवा वाटावा असा तो पुरुष होता. त्याच्या लैंगिक अवयवाची लांबी वीस इंचाची होती. रासपुतीनचेही फोटो तिथे होते. रासपुतीन नदीवर आंघोळ करायला गेला की बायका त्याला पहायला धावत. त्याचं पिळदार शरीर आणि शिस्न हे खास आकर्षण होत म्हणे! रशियन झारच्या कुटुंबातल्या बायकाही रासपुतीनचं आकर्षण टाळू शकल्या नाहीत. 'उरोज कुंभापरी' हे वर्णन फिकं वाटावं अशा विशालहृदयी महिलांची चित्रं होती. 'बायसेक्स्युअल' म्हणजे नेमकं काय हे मी फक्त वाचलं होतं. तिथल्या चित्रांनी माझं ज्ञान समृद्ध केलं. त्यात एका राणीचा फोटो होता. तिला घसघशीत दाढी होती. स्तन होते आणि तरीही शिस्न होतं. 'तिच्या सौंदर्याने घायाळ होऊन एका दिवसात आठजणांनी मागणी घातली.' असा तिच्या फोटोखाली उल्लेख होता. या आठजणांत पुरुष किती आणि बाया किती याचा हिशेब फक्त नव्हता. युरोपमध्ये विकृती सॅडिझमसुद्धा मिरवलं जातं. या म्युझियममध्येही ते मिरवलं होतं. 'पहा, पहा समलिंगी संभोग किती जुना आहे' हे सांगण्यासाठी इतिहास मांडला होता. स्त्रीला आणि पुरुषांना साखळदंडाने बांधून त्यांना संभोग करायला लावणाऱ्या पुरुष-स्त्रियांच्या सॅडिस्ट प्रकारांचंही दर्शन होतं. घोडा, कुत्रे वगैरे प्राण्यांशी केलेल्या संभोगाचंही प्रदर्शन होतं.

हे सर्व पाहताना आजूबाजूला फिरणारी मुलंमुली आणि बापे-बाया आणि बुजुर्गांवरही माझं लक्ष होतं. त्या गोऱ्या मंडळींच्या नजरेत 'आज म्या काय पाहिलं' हा भाव सापडलाच नाही. एखादी विनोदी गोष्ट पाहून त्यांना हसू फुटायचं. काही रंगात येऊन ओठात ओठ मिसळायचे. त्यांच्याही एखाददोन शंका कुशंकांना त्यांना उत्तरं सापडली असावीत. पण पुस्तक प्रदर्शन पाहावं त्या सहजतेने ती मंडळी सेक्स म्युझियम पाहत होती.

अशा वातावरणातून आल्यावर काय कप्पाळ वाटणार मधू-मिलिंदबद्दल! ■

(१३ ऑगस्ट १९९५)

आपण भारतीय आणि शिस्त यात मनिषा कोईराला आणि शालीनता एवढं दूरचं नातं आहे.

छोट्या छोट्या गोष्टीतसुद्धा शिस्त पाळायचा आपल्याला तिटकारा असतो. साधं बस पकडणं घ्या.

दिल्ली - कलकत्त्यात बस पकडणं हे रोमहर्षक वगैरे मानलं जायला काहीच हरकत नाही. पण हल्ली मुंबईतही ती गोष्ट साधीसुधी राहिलेली नाही. सकाळी शिवाजीपार्कच्या एक्काहत्तरच्या बसस्टॉपवर चला - साधारण साडेदहाच्या सुमारास. जेमतेम दहा-पंधरा मंडळी असतात. काही 'बायका' आपल्या शाळेतून सुटलेल्या मुलांना घेऊन उभ्या असतात. नीट रांगेत उभं राहिलं तर काहीच बिघडणार नाही. बरं, एक्काहत्तर क्रमांकाची बस, त्याच बसस्टॉपवरून सुटत असल्यामुळे बसायला जागा प्रत्येकाला मिळणार हे नक्की असतं. तरीही माणसं रांगेत उभी राहात नाहीत आणि राहिली तर बस आल्यावर बसच्या छोट्या दरवाजापुढे नुसती झुंबड उडते. त्यात लहान मुलाला घेऊन घुसू पाहणाऱ्या 'आयाच' पुढे असतात.

खरंच, कुठले संस्कार ते मुलांवर करीत असतात ?

गोऱ्या माणसाचा आपण कितीही दुस्वास केला, तरी त्यांचे काही गुण घेण्यासारखे असतात. सार्वजनिक शिस्त, सार्वजनिक समजुतदारपणा, सार्वजनिक स्वच्छता आणि सार्वजनिक उत्सव हे नक्की घेण्यासारखे गुण आहेत.

## □ अशी शीस्त हवी

तिकडे शिस्तीच्या बाबतीत 'मुंडा बिगडा जाए' प्रकार नाहीच. कारण आपल्याप्रमाणे 'अम्मा बिगडी जाए' प्रकार नाही. तिथे क्रिकेटच्या मॅचच्या वेळी लंच आणि टीच्यावेळी लहानलहान मुलं मैदानावर खेळतात. चाळीस पन्नास मुले तर सहज असतात. पण एकही पोरगा 'खेळपट्टी'च्या वाटेला जात नाही आणि 'आता मॅच पुन्हा सुरू होतेय' अशी सूचना झाल्याबरोबर मुलं डाव टाकून स्टॅण्डस्‌मध्ये पळतात. आपल्याकडे ही सोय ठेवली तर... मुलांना बाहेर काढणं हे एक काम होईल.

क्रिकेटपटूंच्या स्वाक्षऱ्या घेताना आपल्याइथलं चित्र तुम्ही पाहिलंच असेल. एक तर आपल्याला स्वाक्षरी सर्वात आधी मिळावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. ती मिळाली नाही तर लाखांचं नुकसान आहे, या आविर्भावात प्रत्येकजण दुसऱ्याला ढकलत असतो आणि स्वाक्षरी देणारा खेळाडू तर साफ चिरडला जातो. बरं, अनेकांना आपण स्वाक्षरी का घेतोय,




कुणाची घेतोय त्याचीही कल्पना नसते. आम्रेची स्वाक्षरी घेऊन आपण राजेश चौहानची स्वाक्षरी घेतली आहे, या सुखात राहाणारी मंडळी मी पाहिली आहेत. लोक कशावरही स्वाक्षरी घेतात. बसच्या तिकिटावरही घेतात. काही वेळा वाण्याचं बिलही चालवलं जातं. पुढे ते कुठल्या कचऱ्याच्या डब्यात जातं, घेणाऱ्यालाही कळत नाही.

तिथे असं चित्र दिसणार नाही. लहान मुलंसुद्धा शिस्तबद्ध असतात. एक तर ते रांगेत उभे राहतील आणि स्वाक्षरीच्या वहीत स्वाक्षरी घेतील. आडदांडपणा तर कधीच करणार नाहीत.

रांग लावणं हे त्यांच्या रक्तात आहे. बस पकडण्यासाठी ते कधीही रांग सोडून धावणार नाहीत. युरोपात बऱ्याच वेळा बसला कंडक्टर नसतो. कंडक्टरचं काम ड्रायव्हर करतो. पुढच्या दरवाजातून प्रवाशाने बसमध्ये चढायचं. कुठं जायचंय ते सांगायचं. मग ड्रायव्हर पैसे घेऊन तिकीट देतो. यात थोडा वेळ जाणारच. पण म्हणून बोंबाबोंब, घुसाघुसी वगैरे प्रकार नाही.

तुम्ही म्हणाल तिथे गर्दी नसते. खरंय. पण आमच्या एक्काहत्तरच्या स्टॉपवर तरी गर्दी कुठे असते?, लंडनमध्ये सकाळी ऑफिसच्या वेळी किंवा संध्याकाळी ऑफिस सुटताना बस किंवा ट्यूब रेल्वेत गर्दी असते. पण गर्दीच्या वेळीही ट्रेनमधून आधी प्रत्येकाला उतरून दिलं जातं आणि मग चढणारे चढतात. 'उतरने का है? नहीं ना, फिर बिच में कायकू खडे हो? साला समझता नहीं.' छापाचे बंबई हिंदीतले डायलॉग,

इंग्लिश शैलीत तिथं कधीच ऐकायला येत नाहीत. माणसं काही वेळा मुंग्यासारखी गर्दी करतात, पण महत्त्वाचे म्हणजे मुंग्यांच्या शिस्तीने वावरताना दिसतात.

रेल्वेचे रूळ ओलांडणे हा आपला एक आवडता छंद आहे. रेल्वेने पूल केवळ पैसे उडवण्यासाठी किंवा त्यांच्या इंजिनीअर्सची पैसे खाण्याची सोय म्हणून बांधले आहेत असा अनेकांचा समज आहे. रेल्वे रूळ ओलांडताना कित्येक मरतात हे ठाऊक असूनही बरीच मंडळी हा छंद सोडत नाहीत. युरोपात ट्रॅकवर पाय ठेवलेला माणूस मी आजपर्यंत पाहिलेला नाही. माणसं पुलाचा वापर करतात. सबवे वापरतात. रूळ फक्त ट्रेनसाठीच असतात, पादचाऱ्यांसाठी नसतात, हे त्यांना पक्कं ठाऊक आहे. तिथे ट्रेनचा वेग एवढा आहे की रुळावर उतरणंसुद्धा धोक्याचं असतं. मी एकदा फ्रॅन्कफर्टवरून म्युनिकला गेलो, अंतर होतं सहाशे पन्नास किलोमीटर्स. ट्रेन चार तासात गेली. ही दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. आज वेग त्याहून प्रचंड झालाय.

तिथे गाडी (कार) चालवणं हा एक आनंद आहे. कारण पुन्हा शिस्तबद्धता. तुमच्या गाडीला हॉर्न नसला तरी चालतो. कारण हॉर्न कुणी वाजवत नाही. तुम्ही गाडी चालवताना मागून कुणी हॉर्न वाजवला तर तो तुमच्या कुठल्या तरी गोष्टीचा निषेध करतोय असं मानायला काहीच हरकत नाही. ड्रायव्हर सर्व काही योग्य सिग्नल्स देत असतो. त्याला लेन बदलायची असेल तरी तिथं सिग्नल द्यावाच लागतो. बॉब विलीसच्या गोलंदाजीच्या स्टार्टप्रमाणे आपल्याकडे गाडी चालवली जाते. काही वेळा तारुण्याची आणि हिंदी चित्रपटाची हवा डोक्यात गेलेली पिढी तर अशा रीतीने गाडी चालवते की, ती वळणं घेणं सापालासुद्धा जमणार नाही. तिथे आपली लेनसुद्धा कुणी सोडत नाहीत आणि सोडली तर सिग्नल देऊन मागच्याला आपण कुठे चाललोय हे 'खुणेने' सांगितल्याशिवाय तर नाहीच नाही.

झेब्रा क्रॉसिंगवरून रस्ता ओलांडणारा माणूस युरोप-अमेरिकेत काय, गल्फमध्येही सुरक्षित असतो. गाडी कितीही वेगाने येवो. झेब्रा क्रॉसिंगवरून माणूस चालताना दिसला की ती गाडी 'हॅण्डस् अप' केल्यासारखी थांबते. कारण झेब्रा क्रॉसिंगवर अपघात म्हणजे ड्रायव्हरचं ड्रायव्हिंग करिअर संपलं. ड्रायव्हर गाडी नुसती थांबवत नाही, पादचाऱ्याला 'थॅन्क्यू' असं म्हणतो आणि मग पुढे जातो.

आपल्याकडे पादचारी आणि गाडीवाला यांची सायकॉलॉजी वेगवेगळी असते. पादचाऱ्याला गाडीवाल्यावर खुन्नस असतो. गाडी चालवणारा बेदरकार असतो, त्याला पैशाचा माज असतो, अशी त्यांची समजूत असते. पण पादचारी गाडीवाला झाला की पादचाऱ्यांना 'सिविक सेन्स' नाही ही त्याची व्यथा असते. खरं तर शिस्तीची गरज दोघांनाही असते.

खरंच, गोऱ्यांएवढी नाही तर निम्म्याने सार्वजनिक शिस्त आपण अंगात भिनवली तरी या देशाचा खूपच फायदा होईल.

■

(२३ ऑक्टोबर १९९४)

# श्रीलंका पुराण

## □ ळळा लावणारा लिओ

पुनर्जन्म आहे की नाही मला ठाऊक नाही, पण परदेशात अशी काही माणसं भेटतात की त्यांचं प्रेम पाहिल्यावर वाटत राहतं की त्या माणसाचा आणि आपला गेल्या जन्मी तरी ऋणानुबंध असावा.

कोलंबोतल्या लिओ विजयसिंघेबद्दल तरी मला असं वाटतंच वाटतं.

ह्या माणसाची आणि माझी ओळख १९८५ मधली. श्रीलंकेला मी प्रथमच जात होतो. जाण्यापूर्वी मुंबईचा माजी क्रिकेटपटू मिलिंद रेगे मला म्हणाला, "तिथे लिओ विजयसिंघे" नावाचा माझा मित्र राहतो. मी त्याच्याकडे काही दिवस राहिलो होतो. सुनील गावस्करशीही त्याची खास दोस्ती आहे. मी त्याला चिठ्ठी देतो. बघ, तुला कदाचित तो मदत करील."

मिलिंद रेगेची एक चिठ्ठी एका माणसाशी माझं कायमचं नातं जुळवणार आहे ह्याची मला कल्पना नव्हती.

तिथे जाताना कुणाकुणाला काय भेट घेऊन जावं म्हणून विचार करीत असताना कुणीतरी सांगितलं, "तिथे चहा उदंड पिकतो. पण कॉफी मिळत नाही. लिओला 'ब्रुकबॉन्ड' कॉफी घेऊन जा. तो खूश होईल."

लिओ विजयसिंघेला शोधायला मला वेळ लागला नाही. त्यावेळी श्रीलंकेच्या बोर्डात तो पदाधिकारी होता. मी त्याला माझी भेट प्रेमाने दिली आणि म्हटलं, "मुंबईत कुणीतरी म्हटलं, तुला कॉफी आवडते म्हणून कॉफी घेऊन आलो." तो जोराने हसला आणि म्हणाला, "तुझी कुणीतरी फिरकी घेतलेली दिसतेय. मला कॉफी आवडते हे ठीक आहे. पण तू ज्या कंपनीची कॉफी आणलीयेस ना, त्या कंपनीत मी अधिकारी आहे. ही ब्रुकबॉन्ड कॉफी मला ब्रेड ॲण्ड बटर मिळवून देते." माझा चेहरा पडला. माझा पडलेला चेहरा उचलायला मदत करीत लिओ म्हणाला, "नेव्हर माईंड, शेवटी भेट ही भेट असते. भारतातल्या ब्रुकबॉन्डची चव कशी आहे ते तर मला कळेल." आणि मग मला तो बारमध्ये घेऊन गेला. "दुपारची वेळ आहे, मस्तपैकी बीअर मारू." तो म्हणाला आणि हायनिकेन बीअरचा तो हिरवा टीन माझ्या हातात ठेवला.

आम्ही खूप गप्पा मारल्या. तो तसा त्यावेळी पन्नाशीच्या उंबरठ्यावर असावा. पण वागायचा मित्रासारखा. मित्र म्हटल्यावर गप्पांना कुठलाच विषय वर्ज्य नव्हता. क्रिकेटपासून सुंदर मुलींपर्यंत! त्याच्या माझ्या काही आवडीही जुळल्या. तो सुनील




गावसकरच्या फलंदाजीचा चाहता. मी सुद्धा सुनीलचा चाहता. सुनील कसोटी सामने खेळण्यापूर्वी लंकेत विद्यापीठ संघातर्फे खेळायला गेला होता. लिओने धाकट्या भावासारखा त्याचा तिथे सांभाळ केला. 'तू मोठा क्रिकेटपटू होणार.' असं लिओने त्याला तेव्हा सांगितलं होतं. आजही लिओ त्याचं भाकीत कसं खरं झालं ते वारंवार सांगत असतो.

तो रॉय डायसच्या फलंदाजीवर लुब्ध. मला तर रॉय फलंदाजीला आला की नजर हटवावीशी वाटायची नाही. लिओ त्यावेळी सतत मॅचला यायचा नाही. पण रॉय डायस फलंदाजीला आला की लिओ आसपास असणार ह्याची मला खात्री असायची. रॉयचे दोन-चार मोत्यासारखे कव्हर ड्राइव्हज डोळ्यांत साठवले की तो मला शोधत प्रेसबॉक्समध्ये यायचा. हातात हायनिकेन बीयरचे दोन कॅन असायचे. एक त्याच्यासाठी, एक माझ्यासाठी. त्या माणसाने हायनिकेन बीयर तिथे मला अक्षरशः प्रेमाने पाजली.

अजित वाडेकरचा तर तो भक्त आणि मी परमभक्त. माणूस बडबड्या असला आणि स्वभावाने उमदा असला की माझे सूर आपोआप जुळतात. श्रीलंकेतून निघताना त्याने मला दोन सेंटच्या बाटल्या भेट केल्या. त्यानंतर वर्ष-दहा महिने आमचा पत्रव्यवहार राहिला.

मध्ये आठ वर्षं गेली. पुन्हा श्रीलंकेत गेलो तेव्हा ब्रुकबॉन्ड कॉफी घेऊन जाणार नाही एवढी दक्षता घेतली. तिथे पोचल्यावर ताज समुद्र हॉटेलात अजित वाडेकरकडे गेलो होतो. त्याच्याकडे कुणीतरी बसलं होतं. अजितला मी म्हटलं, "अरे, मला लिओ विजयसिंघेला भेटायचंय, तुझ्याकडं फोन नंबर आहे त्याचा ?" अजितने माझ्याकडे

बघितलं आणि कोचवर बसलेल्या माणसाकडे बोट दाखवून म्हणाला, 'हा माणूस कोण आहे असं वाटलं ? अरे, हा लिओ आहे !''

मी निरखून पाहिलं. जुन्या लिओच्या खुणा मी त्याच्या चेहऱ्यावर शोधत होतो. चेहरा जरा जास्त सुरकुतला होता. डोक्यावरचे केस कमी झाले होते. शरीर थोडं स्थूल झालं होतं. लिओलाही मला नीट ओळखायला जमलं नाही. आणि मग तो अचानक म्हणाला, ''पपू !'' मला तो माझ्या टोपणनावाने ओळखायचा. पुन्हा सूर जुळले.

श्रीलंकेतले चाळीस दिवस मी कधीच विसरणार नाही. मीही ताजमध्ये होतो. अजित वाडेकरही तिथं होता. चाळीस दिवस रोज रात्री मी. अजित, लिओ आणि विजय लोकापल्ली हा आणखीन एक पत्रकार असे चौघेजण कधी अजितच्या, कधी माझ्या रूमवर गप्पा मारत बसायचो. संध्याकाळी पार्टी असो, नसो. पार्टी असेल तर पार्टीनंतर भेटायचो. पण गप्पा झाल्या नाहीत अशी रात्र नव्हती. मधल्या काळात लिओचं हायनिकेन बीयरवरचं प्रेम ओसरून स्कॉच व्हिस्कीवर बसलं होतं. आमचं हे सातत्याने भेटणं पाहून काही पत्रकारांच्या पोटात दुखायला लागलं होतं. काही म्हणायचे, ''वाडेकरांचं 'कोड ऑफ कंडक्ट' फक्त खेळाडूंसाठी आहे. स्वत:साठी आणि दोन पत्रकारांसाठी नाही.'' लिओची बायको त्यावेळी नुकतीच गंभीर आजारातून उठली होती. तिला डॉक्टरकडे घेऊन जायचं असायचं. पण तरीही लिओने आम्हाला भेटणं कधी चुकवलं नाही. त्याने चर्च चुकवलं असेल, पण वाडेकर नावाच्या देवाची भेट नाही चुकवली.

भारतीय संघ आला की तो 'विजयसिंघे' राहात नाही. तो भारतीय होऊन जातो. त्याला आम्ही गंमतीने 'टूर फादर' म्हणायचो. ऑस्ट्रेलियात म्हणे 'टूर वाईफ' मिळते. ती मुलगी दौराभर तुमच्याबरोबर बायकोसारखी राहते. लिओने आम्हाला वडिलांचं प्रेम दिलं आणि निघताना आमच्याप्रमाणे लिओचे डोळेही पाणावले होते. तो म्हणाला, ''पुन्हा भेटेपर्यंत या चाळीस दिवसांच्या आठवणी काढत जगणार!''

परवा श्रीलंकेत गेलो तेव्हा लिओ हजर होताच. वाडेकरला तर त्याने हॉटेलच्या लाउंजमध्येच गाठलं. यावेळी वाडेकर आणि विजय लोकापल्ली लंका ओबेरॉयमध्ये राहात होते, मी समोर रणमुथु हॉटेलमध्ये होतो. मी लिओला म्हटलं, ''तू काय बाबा, आता फक्त ओबेरॉयमध्ये जाणार. माझ्या गरीबखान्यात कशाला डोकावशील ?'' तो चिडला, म्हणाला, ''हेच काय तू मला ओळखलंस ?'' मी म्हटलं, ''अरे, गंमत केली.'' पण त्याला पटेना. मला वाईट वाटू नये म्हणून तो आधी माझ्याकडे यायचा आणि मग ओबेरॉयला जायचा. यावेळीही अठरा दिवस अठरा मिनिटासारखे भुर्रकन उडाले.

पुन्हा त्याला भेटेपर्यंत आम्हीही त्या अठरा दिवसांच्या आठवणींवर जगणार आहोत.

■

(१६ ऑक्टोबर १९९४)

## □ सीतेच्या अशोकवनात

जगभर मुलुखगिरी करताना विविध देशातल्या अंतर्गत प्रवासाचा मी अनेकदा अनोखा अनुभव घेतलाय. प्रत्येक देशातल्या प्रवासाची एक वेगळी खासियत असते.

श्रीलंकेचा चेहरा तसा आपल्या देशासारखा. पण तरीही तिथल्या अंतर्गत प्रवासाचा अनुभव काही वेगळाच होता. तिथे मी एकदा कोलंबोहून कॅन्डी आणि कॅन्डीहून न्यूरेलियाला गेलो होतो. दोन्ही तशी हिल स्टेशनंच. एक खंडाळ्यासारखं तर दुसरं उटीसारखं. श्रीलंकेत समुद्रकिनारा सोडला की आपण सरळ डोंगरच चढतो.

डोंगर चढणाऱ्या बसेस तशा छोट्या चणीच्या असतात. जास्तीत जास्त मेटॅडोरची ज्येष्ठ बहीण शोभावी अशी बस. तिथे बसमध्ये पॅसेज ठेवायचा प्रघात नाही. फोल्डिंग सीट ठेवून तिथेही बसण्याची सोय केलेली असते. प्रवास दोन-अडीच तासांचा असल्यामुळे आणि बाहेरचा निसर्ग तुमचं लक्ष खेचून घेत असल्यामुळे कोंबून भरलेल्या बसमधला प्रवासही त्रासदायक वाटत नाही.

डोंगरावरच्या छोट्या वळणावर नागमोडी वळणं घ्यायला छोटी बस उपयोगी पडते. त्या डोंगरावरून जाताना एक अफाट सुंदर दृश्य दिसतं. दूरदूरवर भाताची हिरवीगार रोपटी पसरलेली असतात. आणि मधेच तांबूस-पिवळ्या नारळाच्या झाडांचा प्रचंड परिवार दिसतो. आपल्याला समुद्रकिनाऱ्याच्या आसपास नारळाची झाडं पाहायची सवय झालेली असते. इथे नारळाची झाडं डोंगरमाथ्यावर दिसतात. हे तांबूस-पिवळे नारळ गोड पाण्याने तुडुंब भरलेले असतात. एका नारळात पोट भरवण्याची क्षमता असते. पण प्रवासात पोटभर पाणी कधीकधी त्रासदायक ठरतं. कारण निसर्गाच्या हाकेला 'ओ' देण्यासाठी वाटेत सुलभ शौचालयं नसतात.

कॅन्डी ते न्यूरेलिया हा प्रवास असामान्य आहे. त्या छोट्या देशाला निसर्गाने किती भरभरून दिलंय हे या प्रवासात कळतं. कॅन्डी ते न्यूरेलिया हे अंतर पन्नास-साठ मैलांचं असेल, पण पोचायला चार तास लागतात. कारण रस्त्याची वळणं केवळ नागमोडी नसतात, ती कुरळ्या केसांसारखी होऊन जातात. विमानातून पाहिलं तर तो डोंगर शिवाजी महाराजांच्या काळातल्या जिरेटोपसारखा वाटावा. आम्ही तिथे मेटॅडोर करून गेलो होतो. पण डोंगर चढताना 'मेरी - गो-राऊंड 'मधे बसलोय असं वाटत होतं.

वाटेत एका बाजूला खोल दरी दिसते आणि दुसऱ्या बाजूला चहाची रोपटी.



श्रीलंकेच्या चहाला जगात फार मोठा मान आहे. चहाच्या मळ्यांचं सौंदर्य काय वेगळंच असतं. हिरवी झालर लावलेल्या दुलईसारखे ते मळे दिसतात आणि डोंगर छानपैकी ही दुलई अंगावर ओढून झोपलाय असं वाटतं.

डोंगर चढत असताना दर चार पाच मैलांनंतर निसर्गाने एखाद्या धबधब्याची सोय केली होती. आणि लोकांनी धबधब्याच्या पायथ्याशी रंगीबेरंगी फुलांच्या बागा फुलवल्या होत्या. ते पावसाळ्याचे दिवस होते. त्यामुळे वाटेत मधेच काळसर ढग आमची वाट अडवायचे. त्यांना पार केलं की मधेच सूर्य दर्शन देऊन जायचा.

न्यूरेलियात पोचल्यावर जाणवलं की अशी सुंदर टुमदार छोटी शहरं मी फार क्वचित पाहिलीयत. त्या छोट्या शहरात कित्येक गोल्फ क्लब्स् आहेत, एक नैसर्गिक तलाव आहे आणि तलावाच्या आसपास सिनेमात दिसतात तसे बंगले आहेत. कोलंबोतल्या कित्येक लक्ष्मीपुत्रांचे बंगले न्यूरेलियात आहेत. तिथे तापमान बारा-पंधरा डिग्री सेंटिग्रेडच्या वर कधी जातच नाही. रावणाने जेव्हा सीतेला पळवून लंकेत नेलं, तेव्हा या न्यूरेलियाच्या आसपास ठेवलं होतं. त्या विभागाला 'सिताएलिया' म्हणतात. रावणाने सीतेला पळवणं

वगैरे वाईटच. पण तो तेवढा निर्दयी नसावा. नाहीतर तिला एवढ्या सुंदर ठिकाणी ठेवलंच नसतं.

न्यूरेलियाहून मात्र आम्हाला घाईने परतावं लागलं. कारण संध्याकाळी चारपासूनच धुकं आपले हातपाय पसरायला लागतं. आणि मग त्या कुरळ्या केसासारख्या रस्त्यावरून गाडी चालवणं कठीण होऊन बसतं.

आम्ही न्यूरेलियाहून कॅन्डीला गेलो. कसोटी सामन्याच्या विश्रांतीच्या दिवशी मी न्यूरेलियाला जाण्याचा उपद्व्याप केला होता. संध्याकाळी कॅन्डीत परतलो तो डोकं गच्च धरून येताना बसचं ते 'मेरी-गो-राऊंड' जास्तच जाणवलं. कॅन्डीहून कोलंबोला परतताना मी ट्रेनने गेलो. ती ट्रेन आपल्यासारखीच आहे. कारण शेवटी ट्रेनही आपल्याप्रमाणेच ब्रिटिशांनी त्यांना दिलेली देणगी आहे. पण त्या ट्रेनची एक खासियत आहे. त्या ट्रेनला ऑब्झर्व्हेशन क्लास नावाचा एक वर्ग आहे. गाडीच्या शेवटच्या डब्याला चारी बाजूने काच असते. त्यामुळं मऊ सीटवर बसल्या बसल्या आजूबाजूचं सृष्टिसौंदर्य तृप्त होईपर्यंत डोळ्याने पिता येतं. त्या प्रवासाचं वर्णन एका वाक्यात करायचं तर तो दोन तासांचा खंडाळा घाट आहे. निसर्गाशी शत्रुत्व असणारा माणूसच त्या निसर्गावरून नजर हटवू शकतो.

न्यूरेलियाहून परतताना एक डोक्यात विचार आला. मी सीता असतो तर... न्यूरेलिया सोडून अयोध्येला नक्की गेलो नसतो.... नाही, तसं नाही म्हणायचं मला... रामालाच लंकेत रहायची विनंती केली असती, रम्य ही स्वर्गाहून लंका, उगाच म्हणतात का?

■

(३० ऑक्टोबर १९९४)

# न्यूझीलंड पुराण

## कोलंबसाला दंडवत

गोऱ्यांचं मला एका बाबतीत कौतुक वाटतं. फिरण्याच्या बाबतीत ही माणसं कमालीची साहसी असतात. त्यांच्या साहसामागे हेतू असेल, पण 'जीव' ही गोष्ट कस्पटासमान मानून तें फिरतात. कोलंबस नावाचा माणूस भारत शोधता शोधता अमेरिकेला पोचला, पण कौतुक मला त्याच्या साहसाचं वाटतं. अटलांटिक सागरावर मात करून तो तिथे पोहोचला. बरं, मात करायला आजच्यासारख्या बोटी त्यावेळी नव्हत्या. शिडाच्या बोटी! रोज मृत्यूशी लढायचं आणि भारताचं स्वप्न पाहायचं.

पोर्तुगीज, डच, इंग्रज भारतात व्यापारासाठी आले, नंतर त्यांनी राज्य केलं वगैरेही ठीक आहे, पण ते येताना प्रत्येक वेळी किमान दहा वेळा तरी मृत्यूला भेटून आले असणार. मी न्यूझीलंडला गेलो तेव्हा तिथे पोहोचल्यावर पहिली गोष्ट काय जाणवली असेल तर कॅप्टन कूकचं मोठेपण! कॅप्टन कूक हा इंग्लिश माणूस. कुठे इंग्लंड, कुठे न्यूझीलंड! जवळपास दोन-अडीचशे वर्षांपूर्वी हा माणूस फिरतफिरत थेट दक्षिण ध्रुवाजवळच्या न्यूझीलंडला पोहोचला. वाटेत या माणसाने किती संकटांचा सामना केला असेल? तिथे पोहोचल्यावर तिथल्या आदिवासी जमातीचा कसा सामना केला असेल? या विचाराने मी वेडा झालो. ख्राईस्टचर्चला कॅप्टन कूक प्रथम पोहोचला ती जागा आजही दाखवली जाते. तर या सर्व गोष्टींचा विचार करण्यामागे एक कारण होतं. आजच्या आधुनिक सुखसोईंचा उपभोग घेत मी मुंबईहून ऑकलंडला गेलो. त्यासाठी तेहतीस तास लागले, पण ऑकलंडला पोहोचल्यावर तेहतीस वर्षं लागल्यासारखं वाटलं.

प्रवासाचा शीण वगैरे म्हणतात तो फक्त मुंबईहून आटपाटीला एस.टी. चा प्रवास केल्यावर किंवा मुंबईहून नागपूरला दुसऱ्या दर्जाच्या डब्यातून गुदमरत पोहोचल्यावर जाणवतो असं नाही. विमानात छानछान पदार्थ खात, मस्तपैकी वाईन पीत आणि हवाईसुंदरींच्या सान्निध्यात असतानाही 'शीण' जाणवू शकतो हे न्यूझीलंडला जाताना मला कळलं.

मुळात युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडला जाणारी विमानं आपल्या इथून मध्यरात्री किंवा पहाटे सुटतात. ही गोरी माणसं महाडँबीस आहेत. स्वत:च्या देशात रात्री दहानंतर यांची विमानं उडत नाहीत. लंडनचा हिथ्रो विमानतळ रात्री दहानंतर सकाळी पाचपर्यंत जवळजवळ रिकामा असतो. त्यामुळे




आपल्यावर जुलूम झालाय आणि तो आपण सहन केलाय. मध्यरात्री किंवा पहाटे विमान असलं की, झोपेचं खोबरं होतं. त्यामुळे जास्त थकायला होतं.

माझ्या त्या लांबलचक प्रवासात मुंबईहून सिंगापूरचं विमान पहाटे तीनला होतं. त्यामुळे रात्रभर जागरण करण्यापलीकडे इलाजच नव्हता. खरं तर सिंगापूर एअरलाइन्सएवढी सुंदर सर्व्हिस इतर विमानात फार क्वचित मिळते. त्या वीतभर कमरेच्या हवाईसुंदऱ्या तुमच्यापुढे स्वर्ग उभा करतात. तुमचा शब्द खाली पडू देत नाहीत. 'शब्द' तुम्हालाही अर्थात जपून फेकावे लागतात. '' माझ्या मांडीवर बसून भरव '' म्हणालात तर तसे शब्द झेलले जात नाहीत.

तर सांगत काय होतो? हं, त्या रात्रीच्या जागरणामुळे या स्वर्गाचा नीट उपभोग घेता येत नाही. मुंबई-सिंगापूर प्रवास हा जवळपास पाच-साडेपाच तासांचा आहे. जगात फिरण्याची तुमची पहिली वेळ असेल तर सिंगापूर विमानतळ हे दुसरं जग वाटतं. मी जगातले किमान तीस-पस्तीस विमानतळ पाहिले आहेत, पण सिंगापूरच्या 'चांगी' विमानतळाची सर कुणालाही नाही. 'चांगी' सचिन तेंडुलकर असेल तर इतर जास्तीत जास्त सिध्दु-जडेजा वगैरे! फ्रॅन्कफर्टचा विमानतळ चांगीपेक्षा मोठा असावा. तिथे विमानं उतरतात म्हणून त्याला विमानतळ म्हणायचं. ते खरं छोटं शहरच. प्रचंड शॉपिंग सेंटर्स, सिनेमा पाहायला थिअटर्स, अगदी 'तसे सिनेमे' थोडक्यात निळे सिनेमे पाहायचे असतील तरी सोय आहे. फ्रॅन्कफर्ट विमानतळावर न कंटाळता पाच-सहा दिवस सहज वस्तीला राहता येईल.

पण चांगी विमानतळाचा नखरा वेगळा आहे. नीट-नेटका कमालीचा स्वच्छ आणि

जागोजागी सौंदर्य जातीने जपलंय असं वाटतं. सिंगापूर विमानतळापेक्षा स्वस्त शॉपिंग फक्त दुबई विमानतळावर असावं. चांगीच्या शॉपिंग सेंटरवरून नजर हटत नाही, पण तरीही प्रत्येक वेळी आपला खिसा किती छोटा आहे याची जाणीव तो विमानतळ करून देत असतो. एक छोटं उदाहरण देतो. विन्डो शॉपिंग करता करता मला एक घड्याळ दिसलं. ते प्रचंड आवडलं. 'लव्ह ॲट फर्स्ट साईट' सारखा तो प्रकार होता. अगदी माधुरी दीक्षितला पाहताक्षणी प्रेमात पडावं तसं! त्याची किंमत मी काचेतून पाहिली. मला शंभर डॉलर्स असावी असा संशय आला. बरं, शंभर सिंगापूर डॉलर्स. म्हणजे साधारण बावीसशे रुपये! म्हटलं घेऊन टाकूया. तिथल्या सेल्समनला सांगितलं, "जरा दाखव." तिच्या चेहऱ्यात मला थोडं आश्चर्य दिसलं. मला राग आला. "साले, भारतीयांना समजतात काय? आम्ही गरीब असू. नसेल आमच्या चेहऱ्यावरून श्रीमंती टपकत, पण बावीसशेचं घड्याळ घेता येणार नाही? तिने मोडक्या तोडक्या इंग्रजीत मला सांगितलं, "शंभर टक्के सोन्याचं आहे." माझं स्वगत सुरूच होतं. "सोन्याचा माज आम्हाला दाखवता. अरे, एकेकाळी आमच्या देशात सोन्याचा धूर निघायचा." मी तोऱ्यात खिशातून 'क्रॉस' चं पेन काढलं आणि शंभर अमेरिकन डॉलरच्या ट्रॅव्हलर चेकवर सही केली आणि तिला दिलं. माझं मनगट ते घड्याळ मिरवायला आसुसलं होतं. तो चेक पाहून तिने 'आ' वासला आणि नंतर शांतपणे म्हणाली, "नाइन मोर चेक्स लाईक धीस." मी पुन्हा एकदा घड्याळाची किंमत पाहिली. माझ्या न्यूझीलंड दौऱ्याच्या अपेक्षित खर्चाची किंमत त्या छोट्या प्राईस टॅगवर लिहिली होती. होय! एक हजार डॉलर्स! आयुष्यात एवढा चेहरा कधी पडला नव्हता. अगदी आवडत्या मुलींनी नकार दिल्यावरसुद्धा!

चांगी विमानतळावर माझा बारा तासांचा मुक्काम होता. तिथे जायची माझी तिसरी वेळ. तरीही तो पाहण्याची हौस फिटत नाही. एका टर्मिनलपासून दुसऱ्या टर्मिनलपर्यंत फिरावंसं वाटतं. फिरण्यात त्रास नसतो. कारण तिथे सरकत्या जिन्याबरोबर सरकत्या 'जमिनी' ची सोय आहे. आपण स्टीलच्या जमिनीवर उभं राहायचं. सरकत सरकत आपण दुसऱ्या टोकाला पोहोचतो. एका टर्मिनलवरून दुसऱ्या टर्मिनलला जायला तिथे 'स्कायट्रेन' आहे. दर तीन मिनिटांनी ती येते आणि तीन मिनिटांत दुसऱ्या टर्मिनलला घेऊन जाते. तुम्ही तिथे मोठा मुक्काम टाकणार असाल तर सिंगापूर शहराला तीन तासांची फुकट सहलही मारण्याची सोय आहे.

रात्र जागल्यामुळे मी थोडी झोप घ्यायचं ठरवलं. विमानतळावर हॉटेलसारख्या खोल्या भाड्याने मिळतात. तुम्हाला पुढच्या फ्लाईटच्या आधी दोन तास उठवायची सोयही असते. मी थकलो असल्यामुळे मस्त झोप काढली आणि सिडनीला जायच्या विमानात बसलो, तेव्हा बाहेर काळोख होता, पण माझ्या दृष्टीने सकाळ झाली होती. 'जेट लॅग'ची ती सुरुवात होती. ■

(१३ नोव्हेंबर १९९४)

## □ किवींचं आदरातिथ्य

ऑस्ट्रेलियन माणसं धष्टपुष्ट का, हे नुसतं 'क्वान्टास' या विमानसेवेने प्रवास केला तर कळतं. विमानात जे जेवण येतं ते प्रोटीन्स आणि चरबीने भरलेलं असतं. चीज आणि लोणी हे त्यांचे घरचे पदार्थ. जगाला हे पदार्थ ते पुरवतात. त्यामुळे त्यांच्या जेवणात त्याचा वापर गोवेकरानं नारळाचा करावा तसा सढळ हाताने केलेला असतो. काही विमानसेवा 'जनता दर्जा' च्या (एकॉनॉमी क्लास) प्रवाशांना मद्य मोफत देत नाहीत. खास कारण काही नसावं. विमानातले प्रवासी खास मद्यपानासाठीच विमानातून प्रवास करतात असा त्यांचा समज असावा. क्वान्टासवाले त्याबाबतीत उदार आहेत.

सिंगापूरहून सिडनीला पोहचायला सात तास लागले. खरं तर त्या विमानात झोप येईल असं मला वाटलं नव्हतं. कारण सिंगापूरला तब्येतीत झोप झाली होती. पण पोट भरणाऱ्या त्या पाहुणचाराने डोळे कधी मिटले गेले ते समजलंच नाही.

सिडनीहून ऑकलंडला जायला पुन्हा मला सहा तास सिडनी विमानतळावर थांबायचं होतं आणि त्यानंतर पुढे तीन-साडेतीन तासांचा प्रवास होता. पुढारलेल्या देशातल्या विमानतळाची एक खासियत असते. वेळ कसा घालवायचा हा प्रश्न तिथं पडत नाही. ड्यूटी फ्री शॉप्स तुम्हाला त्यांच्याकडे खेचत असतातच. पण सिडनीत फार सुंदर 'रिटायरिंग रूम' होती. ऑस्ट्रेलियातली सर्व वर्तमानपत्रं तिथे होती, मासिकं होती. चहा, कॉफी, कोक, पेप्सी वगैरेंची मशिन्स होती. बिस्किटांची छोटी पाकिटं होती. मुद्याची गोष्ट म्हणजे सर्व फुकट होतं, पण सर्वांसाठी नाही. फक्त क्वान्टासच्या प्रवाशांसाठी!

बऱ्याच वेळा पाहुणचार ही गोष्टही अंगावर येते. या प्रवासात ती आली. कारण घर सोडून तीस तास झाले होते, पण अजून ऑकलंड दिसत नव्हतं. मी ऑकलंडला पोचलो तेव्हा चौतीस तास होऊन गेले होते. खरोखरच त्याक्षणी कोलंबस, कॅप्टन कूक, वास्को-द-गामा वगैरे मंडळी ज्या सागरावरून मी प्रवास केला होता, त्या सागराएवढी मोठी वाटायला लागली होती. मी ऑकलंडला पोचलो तेव्हा तिथे रात्र झाली होती. पुढारलेल्या देशात रात्रीअपरात्री पोचलात तरी तसा त्रास नसतो. विचार करा, तुम्ही आपल्या सहार विमानतळावर उतरलायत आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तुम्हाला साताऱ्याला जायचंय्. विमानतळ तुम्हाला किती मदत करू शकेल? फार तर मुंबईत हॉटेल




शोधण्याइतपत आणि तिथपर्यंत पोचण्यासाठी टॅक्सीची व्यवस्था! ऑकलंडला त्या विमानतळावरच्या छोट्या टुरिस्ट काऊंटरवरच्या चुणचुणीत मुलीला (तिथे मुली सर्व चुणचुणीत असतात. 'काकूबाई' वाटणाऱ्या मुली मला तरी दिसलेल्या नाहीत.) मी कोडी घालावी तशी पाच सहा कोडी घातली आणि टेलिफोन नावाच्या जादूई यंत्राच्या आधारे तिने प्रत्येक कोडं आरामात सोडवलं.

कोडी तरी पाहा : १) ऑकलंडमध्ये स्वस्त दरात एका रात्रीपुरता आडोसा हवा. २) तो हॅमिल्टनला जाणाऱ्या बसस्टेशनजवळ हवा, ३) विमानतळावरून दुसऱ्या दिवशीच्या हॅमिल्टनला जाणाऱ्या बसचं रिझर्व्हेशन हवं, ४) हॅमिल्टनला पाच दिवस राहायला पन्नास-साठ न्यूझीलंड डॉलर्सच्या आतलं एक मोटेल हवं, ५) मोटेल क्रिकेट ग्राऊंडच्या जवळ हवं.

तिने ही कोडी सोडवायला दहा-पंधरा फोन सहज केले असतील. नकार आला तरी तिचा चेहरा कधी पडलेला पाहिला नाही. (त्यांना तशी 'नकार' पचवायची सवय नसते.) तरीही एखाद्याने नाकारल्यावर स्थितप्रज्ञपणे दुसरा नवरा मुलगा पाहणाऱ्या आपल्या

मुलीसारखी ती एका हॉटेलवाल्याने नकार दिला तर दुसऱ्याशी बोलायची. शेवटचं कोडं सोडवताना तिने फक्त मला विचारलं, "मोटेल तसं मैदानाजवळ नाही, पण मोटेल मालकाने तुम्हाला त्याच्या गाडीने तिथे सोडलं आणि आणलं तरी चालेल ना?"

पंधरा मिनिटांत माझी कोडी संपतील याची कल्पना मला नव्हती. आमच्या दादरला "पश्चिम एक्सप्रेस वेळेवर आहे काहो", या प्रश्नाचं उत्तर मिळायला पंधरा मिनिटं लागतात आणि देणारा उत्तर असं देतो, की पुढच्या पंधरा जन्माचं ऋण त्याने आमच्या डोक्यावर टाकलंय. असो. आपलेच दात आपलेच ओठ! त्या मुलीने प्रत्येक बिलातले दहा टक्के घेतले. उरलेले नव्वद टक्के तिथे भरा असं सांगितलं.

ऑकलंडमधल्या त्या मोटेलला 'बॅकपॅकर्स होस्टेल' असं म्हणतात. ज्याला स्वस्तात राहायचंय त्याच्यासाठी ते बेस्ट! एक हॉल असतो. त्यात टी.व्ही. वगैरे. एक-दोन मशीनवाले फोन. म्हणजे नाणी टाकली की जगात कुठेही फोन फिरवायला तुम्ही मोकळे. स्वैपाकघरात भांडीकुंडी असतात. फ्रीज असतं, ओव्हन असतं. तुमचा चहा, ब्रेकफास्ट तुम्ही करून घ्यायचा. तुमच्याबरोबर आणखीन काही मंडळी अर्थातच तिथे राहात असतात. पण झोपायची सोय मात्र रेल्वेच्या 'टू टायर' डब्यासारखी.

तिथेच मला एक मध्यमवयीन चार्ल्स भेटला. साठीकडे झुकलेला. तिथे साठीची मंडळी 'म्हातारी' म्हटली जात नाहीत. ती नसतातच म्हातारी. ती तगडी असतात आणि मस्तपैकी दिवसभर राबतात. तो टिपिकल 'किवी' होता. न्यूझीलंडर्स स्वतःला किवी म्हणतात. किवी हा त्यांचा राष्ट्रीय पक्षी आहे. मरतुकडा, चेटकिणीसारखं तोंड असणारा पक्षी डोळ्यासमोर आणा. तो किवी! पंख असतात म्हणून त्याला पक्षी म्हणायचं. एरवी त्याला उडता येत नाही. पण माणसं मात्र मरतुकडी नसतात. चांगली तगडी असतात. तिथे पोट सुटलेला माणूस सापडणंही जॉय मुखर्जी, विश्वजीत यांचे फॅन्स सापडण्याएवढी कठीण गोष्ट आहे.

तो चार्लस् क्रिकेटप्रेमी होता. स्वतः बऱ्यापैकी क्रिकेट खेळलेला. त्याची ओळख झाल्यावर तो बोलायला लागला. माझ्या दृष्टीने हा जरा वेगळा अनुभव. साहेबांच्या देशातले गोरे तसे बोलायला महाग. हा भडाभडा बोलत होता. क्रिकेट, हॅडली, कपिल, इंदिरा गांधींपासून फिजीतल्या भारतीयांपर्यंत तो विविध विषयांवर बोलत होता. स्वस्थ झोपणंही त्याला ठाऊक नव्हतं. झोपल्यावर तो असा घोरला की वाटायचं, दुरून कुठून तरी धबधब्याचा आवाज ऐकू येतोय. त्यात झोपायची व्यवस्था 'टू टायर' सारखी. बरोबर माझ्या डोक्यावर तो झोपला होता. त्याच्या शंभर किलोच्या शरीराने कूस बदलली की त्या लाकडी फळ्या कुरकुरायच्या. त्यांचीही काय चूक?

एवढं वजन, त्या तरी कशा सहन करणार? मला तर त्याच्या बायकोची कीव आली.

दुसऱ्या दिवशी मी उठेपर्यंत तो मैल -दोन मैलांची रपेट मारून आला होता. ब्रेकफास्ट झाल्यावर मी त्याला सांगितलं, "मला हॅमिल्टनला जायचा बसस्टॉप दाखवशील ?" तो मला बसस्टॉपपर्यंत सोडायला आला. गोऱ्यांच्या देशात पाहुणचार ही सर्वात महाग गोष्ट असते. माझं सामान थोडं जास्त होतं. तरीही त्या चार्लस्‌ने एक बॅग डोक्यावर घेतली. गोरा माणूस अशी मदत करू शकतो यावर तोपर्यंत माझा विश्वास बसला नव्हता.

जाताना तो एवढं म्हणाला, "मी ख्राईस्टचर्चला तुला भेटतो. जमल्यास एखादा मॅचचा पास माझ्यासाठी ठेव. एक गोष्ट मात्र नक्की कर. मला तुमच्या त्या जीनियस तेंडुलकरला भेटायचंय. देशील नं भेट घडवून ?"

त्याच्या संगतीने मिळालेल्या आनंदासाठी त्याने मागितलेला मोबदला तेवढा मोठा नव्हता.

■

(२० नोव्हेंबर १९९४)

## □ रस्त्यावर तरंगणारी बस

ऑकलंडहून हॅमिल्टनला मी अक्षरश: तरंगत गेलो. विमानाचं तरंगणं मी अनुभवलं होतं. बोटींच्या तरंगण्याचा आनंद घेतला होता. बस रस्त्यावर तरंगताना क्वचितच अनुभवायला मिळते. न्यूझीलंडच्या रस्त्यावर बस तरंगत जाते.


एखाद्या काळ्या सुंदरीच्या नितळ त्वचेसारखे ते डांबरी रस्ते दिसतात. बसही इतकी सुंदर असते की तारुण्यपीटिकेसारखा एखादा छोटासा उंचवटा मध्ये आला तरी त्याची चाहूल तुम्हांला बसमध्ये लागत नाही. तो छोटासा धक्का बसच शोषून घेते. भरलेला चहाचा पेला तुम्ही हातात धरला तर एकही थेंब बशीत पडणार नाही याची खात्री तुम्हाला बस ड्रायव्हर देऊ शकतो.

तिथे बसप्रवासात विमानसेवेसारखी एक सोय असते. नाही, 'बससुंदरी' वगैरे प्रकार नाही! पण जसं विमानात तुम्ही 'चेकइन' होता तसं बसमध्ये तुम्हाला 'चेकइन' केलं जातं. तुम्हाला विमानाप्रमाणे बोर्डिंग कार्ड दिलं जातं. आणि बरोबरचं हॅण्ड बॅगेज सोडलं तर तिथे तुमचं इतर सामान आणि तुम्ही यांची फारकत होते. सामान बसच्या डिकीत तेच टाकतात. मुख्य म्हणजे प्रवासात एक-दोन वेळा बस बदलावी लागली तरी सामान इथून तिथे उचलून घेऊन जायची काळजी तुम्हाला करायची गरज नाही. ते काम बस कंपनीतर्फे आपोआप होतं.

ऑकलंड-हॅमिल्टन प्रवास दोन तासांचा होता. ऑकलंडच्या विमानतळावरच माझी बहुतेक कोडी सुटली असल्यामुळे जागा शोधणं वगैरे प्रश्नच नव्हता. बसस्टॅण्डवर उतरल्या उतरल्या मी मोटेल मालकाला फोन केला. तो पाच मिनिटांत गाडी घेऊन हजर झाला. 'आय ॲम जेम्स' त्याने स्वत:ची ओळख करून दिली. तो पन्नाशीच्या पुढे असावा. शरीर पिळदार होतं. मुख्य म्हणजे चेहरा हसरा होता.

"तू मला रोज क्रिकेटच्या ग्राऊंडवर घेऊन जाणार ना?" मी आपली खात्री करून घेतली. मूलभूत सचोटी नावाचा जो प्रकार आहे तो या पहिल्या जगात पाहायला मिळतो. एखाद्या छोट्या गोष्टीसाठी कुणी फसवलंय वगैरे प्रकार होत नाहीत.

'यप' एका शब्दाने त्याने उत्तर दिलं. अमेरिकन लोकांसारखी 'यस' ला 'या' म्हणायची त्यांना सवय नाही. ते 'यप' म्हणतात. संपूर्ण न्यूझीलंडच्या दौऱ्यावर 'यप' हा शब्द माझ्या जिभेवर



पेईंगगेस्टसारखा राहिला.

प्रथम जेम्स मला त्याच्या मोटेलवर घेऊन आला. मी इंग्लंडमध्ये 'बेड ॲण्ड ब्रेकफास्ट' प्रकारात राहिलोय. चांगल्या हॉटेलमध्ये राहिलोय. 'ट्रॅव्हेल इन' मध्येही राहिलोय. पण हॅमिल्टनचं मोटेल हा ग्रेट प्रकार होता. बैठ्या इमारतीतला तो एक चक्क मोठा फ्लॅट होता. लिव्हिंग रूम, किचन आणि दोन बेडरूमवाला फ्लॅट! मी राहतो ते घर त्यापेक्षा कितीतरी छोटं आहे. पुन्हा किचनमध्ये ओव्हन, रेफ्रिजरेटरपासून सर्व काही. न्यूझीलंडमध्ये मी बायकोला घेऊन गेलो नाही याचं मला दु:ख झालं. हे सर्व दिवसाकाठी साठ न्यूझीलंड डॉलरमध्ये. त्याचा रुपयांत हिशोब करण्यात अर्थ नाही. पण पहिल्या जगातल्या देशात न्यूझीलंड बरंच स्वस्त असावं याचा मला पहिला संशय तिथे आला.

घरात एक बेल होती. ती बेल अशी होती की जेम्स कुठेही असला तरी त्याला ऐकू जायची. तुम्ही 'पेजर' पाहिलायत ना? डॉक्टर्स किंवा मोठे व्यापारी कमरेला खोचून फिरत असतात. तसं काहीसं छोटंसं इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रूमेंट त्याने कमरेला लटकवलेलं होतं. कुठल्याही खोलीतून बेल मारली गेली की तो बागेत काम करत असला तरी त्याला ऐकायला जायची.

त्याने मला ठरल्याप्रमाणे मैदानावर सोडलं. मैदान तसं फार लांबही नव्हतं. फार फार तर शिवाजी पार्क मैदानाला एक फेरी एवढं लांब असावं. एकदा मी तिथून मोटेलपर्यंत चालत यायचं ठरवलं आणि रस्ता चुकलो. सहानंतर हॅमिल्टनमध्ये कर्फ्यू पुकारावा तशी शांतता असते. दुकानं बंद. रस्ते निर्मनुष्य! बरं, रस्ता लक्षात ठेवण्याच्या सकाळच्या खुणा रात्री दुकानं बंद झाल्यावर उपयोगी पडत नाहीत. तिथं टॅक्सी फोन करून बोलवावी लागते. स्टॅण्डला टॅक्सी लावून टॅक्सीवाले गप्पा मारत उभे आहेत असं दृश्य तिथे दिसणंच शक्य नाही. तिथे माणसं आहेत कुठे? सर्व मिळून पस्तीस लाखांचा तर तो देश. दादर, सायन, माहीम, धारावी गोळा केलं तरी पस्तीस लाख माणसं सहज जमा होतील.

तेवढी माणसं तिथे त्यांच्या संपूर्ण देशात आहेत. त्यामुळे गर्दी हा प्रकार नाहीच.

त्या हॅमिल्टनच्या मैदानावर कसोटी सामन्यासाठी आलेली माणसं वीसपंचवीस मिनिटांत अगदी सहज मोजता आली असती. त्यात त्यांचं प्रेम क्रिकेटवर होतं की सूर्याच्या सोनेरी किरणांवर हे सांगणं कठीण होतं. मऊ गवतात उघडं होऊन लोळणं आणि मग समोर तेच डोंगर, तीच घरं दिसू नयेत म्हणून क्रिकेट मॅच पाहणं, ह्यापलीकडे जास्त रस त्यांच्यातल्या निम्म्यांनासुद्धा नसावा. माणसं जमा व्हायची फक्त वन-डेच्या वेळी. त्यावेळी मात्र अचानक दहा-वीस हजार माणसं कुठून येतात हा प्रश्न पडतो. त्या शहरात त्यावेळी बहुधा इतर कामं ठप्प झालेली असावीत.

तिथली प्रेस बॉक्सेस तशी चिमणीच्या घरट्यासारखी छोटी असतात. ती काही वेळा खेळपट्टीच्या सरळरेषेतही नसतात. इतर गोष्टींची मात्र चंगळ असते. चहा कधी येणार याकडे नजर ठेवावी लागत नाही. चहा-कॉफीचं मशीन असतं. दूध असतं. कागदी कप असतात. अर्ध्या मिनिटाच्या आत स्वत:चा चहा स्वत: करून पिता येतो. खाण्यापिण्याची बऱ्यापैकी चंगळ असते. फळं, संत्र्याचा रस, बियर, सॉफ्ट ड्रिंक्स, वेगवेगळ्या प्रकारची बिस्किटस् यांनी रेफ्रिजरेटर भरलेला असतो. मॅच पाहायची की पाहुणचार झोडायचा हे तुम्ही ठरवायचं. जेवण बुफे पद्धतीचं. पण पद्धत त्यांची! 'जेवण शाकाहारी आहे' असं म्हटल्यावर त्यात एखादा चिकनचा तुकडा, अंडं किंवा माशाचा तुकडा नसेलच असं नाही. लालसर रंगाचं मांस (बकरा, गाय किंवा डुकराचं मटन) सोडून इतर कुठल्याही गोष्टीला शाकाहारी संबोधायची त्यांची तयारी असते. स्कोअर बोर्ड मिळवण्यासाठी तिथे स्कोअररभोवती फेरही धरावा लागत नाही. कॉम्प्युटरमधून स्कोअर बोर्डच्या कॉप्या येतात. मशीनने त्यांनी सर्व कामं सोपं करून टाकलंय. सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रेस बॉक्समध्ये अमक्याचा काका, तमक्याची बायको किंवा क्रिकेट न कळणारे व्ही.आय.पी. अजिबात नसतात. तो सर्व तमाशा आपल्याकडे.

■

(२७ नोव्हेंबर १९९४)

न्यूझीलंडच्या हॅमिल्टन शहरात मी पाच दिवस होतो, पण जवळपास कसोटी सामन्याच्या सोनेरी पिंजऱ्यात अडकल्याप्रमाणे!

'पॅरोल'वर फक्त दोनदा बाहेर पडायची मुभा मिळाली. एकदा हॅमिल्टन फिरायला, एकदा कुणा पटेलच्या घरी जेवायला जाण्यासाठी.

'मला तुझं शहर दाखवशील?'' मॅचला जाता जाता माझ्या मोटेलवाल्या जेम्सला मी विचारलं.

''जादा भाडा लगेगा भाई'' वगैरे थाटांचं भारतीय उत्तर आलं नाही. उलट, ''उद्या सकाळी अर्धा तास लवकर बाहेर पड, हॅमिल्टन फिरवून आणतो'', असं जेम्स म्हणाला.

आणि खरंच अर्ध्या-पाऊण तासात आम्ही हॅमिल्टन पालथं घातलं. स्वच्छ, टापटीप असं टिपीकल पहिल्या जगातलं टुमदार शहर होतं. खास आवर्जून पाहावं असं काही असणार तरी काय? न्यूझीलंडचा इतिहास जास्तीत जास्त दोनशे वर्षे असावा. त्यामुळे जे काही आहे ते आधुनिक.

उलट जेम्सच हिंदुस्थानाबद्दल चार गोष्टी विचारत होता. महात्मा गांधी, इंदिरा गांधी, चार-पाच क्रिकेटपटूंची नावं आणि अफाट गरिबी सोडली तर हिंदुस्थानबद्दल त्याला काही ठाऊक नव्हतं. इतक्या लांब यायला मला पैसे किती लागले याचंही त्याला प्रचंड अप्रूप होतं. मी ज्या मुंबई शहरातून आलो ते शहर जगातल्या

## □ हॅमिल्टनच्या पटेलांची पार्टी

कुठल्याही शहराएवढं आधुनिक आहे हे त्याला समजवावं लागलं, माझ्या शहरात एक कोटी माणसं राहतात म्हटल्यावर त्याने एकच प्रश्न विचारला, ''तुम्ही श्वास कसा घेता?'' तो सर्व अवाक् होऊन ऐकायचा. त्याचं अवाक् होणं समजण्यासारखं होतं. उद्या एखाद्या अरबाने मला सांगितलं की, माझी प्रॉपर्टी बिलीयन डॉलर्सची आहे तर मी नाही त्या प्रॉपर्टीची कल्पना करू शकणार. आपली मध्यमवर्गीय कल्पना कोटी रुपयांच्या पुढे मुष्किलीने जाते. त्याचं तसंच आहे. ज्या देशाची लोकसंख्या पस्तीस लाख आहे. त्यांना एका शहरात एक कोटी कसे राहतात याची कल्पना करणंही कसं शक्य आहे?

पटेलांकडे जेवायला जाताना मी हॅमिल्टनची हद्द ओलांडली. खरं तर मी तसा त्याच्याकडे आगंतुकच पाहुणा होतो. मी अजित वाडेकरच्या रूमवर गप्पा मारायला गेलो होतो. अजित म्हणाला, ''चल, एका 'मामूने' जेवायला बोलावलंय.




तूसुद्धा चल.'' दौऱ्यावर 'मामू' शब्द उच्चारला की क्रिकेटपटूंचे डोळे चमकतात. दौऱ्यावर भारतीय जेवण जेवायला क्रिकेटपटू अक्षरश: 'तरसत' असतात. कारण रोजच्या सॅण्डविचेस, पिझ्झा आणि थंडगार चिकनने सर्वांना कंटाळा आलेला असतो. परदेशातले भारतीय मग या खेळाडूंना प्रेमाने जेवायला बोलवतात. काही वेळा मैदानावर ते डबेही आणून देतात. त्यांना 'मामू' असं टीमने दिलेलं नाव आहे.

त्या दिवशी ते पटेल 'मामू' होते. ही मामू मंडळी अर्थातच श्रीमंत असतात आणि त्यात तो पटेल होता. पटेल नावाचा गरीब माणूस कुणी पाहिलाय? 'गरीब' पटेल किंवा बाईचं वेड नसणारा अरब ही स्पेसिमिन्स मी तरी पाहिलेली नाहीत.

या पटेलांनी आम्हाला त्यांच्या फार्म हाऊसवर नेलं. 'आम्हाला' या शब्दात वाडेकर, सचिन, संजय, प्रवीण, विनोद, सुनील, डॉ. अली इराणी, अझर वगैरे अनेक क्रिकेटपटू अंतर्भूत आहेत. त्यांच्या दोन-चार गाड्या होत्या. कुठल्या, त्या मी ठामपणे सांगू शकणार नाही. गाड्यांचा मेक मला कधीच ओळखता येत नाही. एकवेळ दोन सरदारजींपैकी सतविंदर कोण आणि सुखविंदर कोण हे मी ओळखू शकेन, पण होंडा आणि टोयाटो ही गाड्यांवरची अक्षरं वाचल्याशिवाय मला गाड्या ओळखता येत नाहीत. तिथं जाताना नेहमीप्रमाणे तरंगत गेलो एवढं आठवतं.

क्रिकेटपटूंबरोबर अशा काही ठिकाणी मी अनेकदा गेलोय, पण काही मूठभर क्रिकेटपटू सोडले तर इतरांचं वागणं 'ग' ची बाधा झाल्यासारखं असतं. आपण त्यांच्याकडे जेवायला जाऊन 'मामूवर' उपकार करतोय अशी काहींची वागणूक असते. 'मामू' कडे अर्थातच त्यांची मित्रमंडळी जमलेली असतात. त्यांना क्रिकेटपटूंबद्दल आकर्षण असतं. त्यांना क्रिकेटपटूंशी बोलायचं असतं. चार प्रश्न विचारायचे असतात. क्रिकेटपटूंना दिवसभर

क्रिकेट खेळल्यावर बोलणं नकोसं वाटतं. त्यात काही 'मामू' ची मित्रमंडळी बऱ्याच वेळा विचित्र, मूर्ख प्रश्नही विचारतात. काही क्रिकेटपटूंना त्याचा राग येतो. त्यांना कंटाळा येणं मी समजू शकतो, पण म्हणून एकदा त्यांच्या घरी जेवायला गेल्यावर त्यांच्याशी नीट न बोलणं मला तरी 'मामू'चा अपमान करण्यासारखं वाटतं. तसं असेल तर त्या क्रिकेटपटूंनी 'मामू'ची आमंत्रणं स्वीकारू नयेत. उद्या क्रिकेटपटू घरी आल्यावर "तुमच्या हैदराबादला तांदूळ कसा किलो मिळतो?" किंवा "खरीप पिकांची हिंदुस्थानात सध्या काय अवस्था आहे?" असे प्रश्न त्यांना कुणी विचारावे अशी अपेक्षा आहे का?

दुसरी एक गोष्ट मला खटकते. काही क्रिकेटपटू जेवण झालं नि स्वीट डीशवर ताव मारला की गाडीत जाऊन बसतात. जणू आपलं पोट भरलं, आता बस्स निघायचं या थाटात! जेवण झाल्यावर किमान घरातल्या अन्नपूर्णेला "जेवण चांगलं झालं होतं" किंवा "जेवायला बोलावल्याबद्दल आभारी आहे" असं बोलणंही काहींना जड जातं. हे मला कधीच आवडलेलं नाही.

त्या दिवशी पटेलांकडून परतताना मी 'मामू'शी गप्पा मारत होतो. त्यांचा दूधदुभत्याचा धंदा होता. गेली तीस-पस्तीस वर्षं ती पटेल मंडळी तिथे होती. या धंद्याचं तिथे बी टाकणारे पटेलही त्या पार्टीत होते. त्यांनी मला प्रेमानं विचारलं, "तुम्ही काय करता?" माझ्या पत्रकारितेबद्दल माहिती देत असताना मी त्यांना सांगितलं, "मी पेशाने सिव्हिल इंजिनीयर आहे." त्यांनी क्षणाचा विलंब न लावता मला म्हटलं, "मग तुम्ही हिंदुस्थानात काय करताय? इथे या. पाहिजे ती मदत करतो. तिथे हिंदुस्थानात काय ठेवलंय? भूक? गरिबी?"

आपल्याच मंडळींचा हिंदुस्थानाबद्दल हा दृष्टिकोन आहे, तर तिथल्या गोऱ्या किवींचा काय असणार?...

■

(४ डिसेंबर १९९४)

## □ शील ! काय असतं शील ?

हॅमिल्टनवरून मी नेपियरला गेलो. बसचा तसा हा सहा तासांचा प्रवास होता, पण मी तुम्हाला मागेच सांगितलं की बस तिथे तरंगते. त्यामुळे थकवा वगैरे जाणवायचा प्रश्न नसतो. वाटेत रोतारुवा नावाच्या एका छोट्या शहरात मी बस बदलली. पण शरीर एका मऊ सीटवरून दुसऱ्या मऊ सीटवर घेऊन जाणं यापलीकडे मला काही कष्ट करावे लागले नाहीत. आपलं सामान एका बसमधून दुसऱ्या बसमध्ये परस्पर जातं.

रोतारुवाच्या बसस्टॅण्डला जर बसस्टॅण्ड म्हणायचं असेल तर भारतातल्या सर्वात पॉश बस स्टेशनलाही गोठा म्हणावं लागेल. तिथं बस थांबली म्हणून तो बसस्टॅण्ड आहे असं कळलं. एरवी आर्किटेक्टने आपली सर्व शक्ती पणाला लावून छोटं शॉपिंग सेंटर बांधलंय असं वाटत होतं. रोतारुवा हे तसं आपल्या कऱ्हाड किंवा सांगलीसारखं छोटं शहर; पण त्या रोतारुवाच्या बसस्टॅण्डवर प्रवाशाला जे हवं ते मिळत होतं. आपल्या बऱ्याच बसस्टॅण्डवर मुतारी कुठे संपते आणि बसस्टॅण्ड कुठे सुरू होतो हे कळत नाही. तिथे टॉयलेटमध्ये बसून ब्रेकफास्ट करायलाही घाण वाटली नसती इतकी ती स्वच्छ होती. छोटे पुतळे, आर्ट पिसेस, रंगीबेरंगी फुलांच्या बागा वगैरेने ते बसस्टेशन सजवलेलं होतं.

एक खरंय की रोतारुवात टुरिस्ट भरपूर येतात. तिथे गरम पाण्याचे झरे आणि ज्वालामुखी आहेत. बस त्या शहरात शिरतानाच नाकात सल्फरच्या वाफांचा वास शिरतो. वाटेत डोंगराच्या टोपीतून वाफा निघताना दिसत होत्या. ज्वालामुखी ही मी आजपर्यंत न पाहिलेली गोष्ट आहे, पण नशीब कसं असतं ते पहा. ते मला ज्वालामुखीच्या जवळ घेऊन गेलं. पण ज्वालामुखी मला पाहता आला नाही. वाफाळलेली डोंगराची टोपी पाहण्यासाठी तिथे हेलिकॉप्टरची सोय आहे, पण मॅचसाठी नेपियरला पळायचं असल्यामुळे नाइलाज झाला.

तिथे प्रवासात कंटाळा येत नाही याला आणखीन एक कारण आहे, खिडकीबाहेर डोकं काढलं की सर्वत्र फक्त हिरवंगार दिसतं. त्या हिरवेगारपणातही ओबडधोबडपणा नसतो. एखाद्याने अंगणातलं गवत कापून त्याला गालिचाचं रूप द्यावं तसा निसर्गाने गालिचा पसरवून टाकलाय असं वाटतं. त्यावर गुरं, बकऱ्या बागडत असतात. फक्त मळलेल्या कपड्यातले, अंगावर गरिबीच्या खुणा



दाखवणारे गुराखी तिथे नसतात. ते असलेच तर पॉश जीनवाले असतात. आणि कोपऱ्यात त्यांची कुठे तरी गाडी उभी असलेली दिसते.

त्यांच्याकडे गरिबी नाही असं नाही. तिथेही गरिबी आहे; पण त्यांच्या गरिबाकडे किमान तीन खोल्यांचं घर, एक टी.व्ही., एक फ्रीज, एक ओव्हन, एक वॉशिंग मशीन, एक गाडी वगैरे असतेच, फक्त एकच चैनीची गोष्ट असणे म्हणजे तिथली दारिद्र्यरेषा! त्यामुळे गावातून बस वळसा घेऊन जातानाही जी छोटी घरं किंवा बंगले दिसतात, त्यात छानपैकी सफरचंद आणि संत्र्यांच्या बागा असतात आणि शनिवार असेल तर गोरा किवी आपले हात मातीने घाण करीत असतो. या गोऱ्या माणसांना आपलं शरीर समुद्र, तलाव किंवा तरणतलावाच्या पाण्यात बुडवल्याशिवाय, नाहीतर मातीत हात घातल्याशिवाय चैनच पडत नाही.

निसर्गाचं प्रचंड वरदान लाभलेला हा देश आहे हे बसप्रवासात कळतं. त्या निसर्गाच्या कुशीत झोकून देण्यातही धोका नसतो. त्याला कारण आहे. हिंस्र पशू वगैरे त्या देशात नाहीतच. तिथे सापसुद्धा नाहीत. बसतो विश्वास? गवतात किंवा झाडाखाली अगदी कुठेही पथारी टाका, काहीही त्रास व्हायचा नाही. तिथे पक्षी आहेत. ते पण न उडणारे. त्यांच्याकडे जगातला सर्वात मोठा पोपट आहे. त्याला कॅकपो म्हणतात. पण या पोपटालाही छोट्या झुडपांच्या वर उडता येत नाही. तिथे म्हणे मोआ नावाचा पक्षी होता. त्या पक्ष्याची उंची चक्क दोन पुरुष होती. म्हणजे पक्ष्यांमधला डायनॉसोरच तो. पण पूर्वीच्या आदिवासींनी त्यांची शिकार करून त्यांना संपवून टाकलं. त्यांचे खास पक्षीही आता त्यांच्या अभयारण्यातच

दिसतात.

निसर्गाची रूपं पाहत मी नेपियरला पोहोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. नेपियर हे छोटंसं टुमदार शहर होतं. मी त्याबद्दल एकदा गंमतीत एका खेळाडूला म्हटलं, ''हे शहर एवढं छोटं आहे, की कपिलचा चेंडू फलंदाजापर्यंत पोचायच्या आत सहज पाहून होईल.'' तिथलं मोटेल हे हॉटेलसारखं होतं, पण त्या हॉटेलमधली ती संध्याकाळ मी विसरणार नाही. एरवी नेपियर तसं थंड आणि गारठलेलं होतं. रस्त्यावर माणूस दिसणं मुष्कील होतं. पण शुक्रवार आला की तिथले पब्ज धगधगायला लागतात. मुलामुलींचे तांडे जमा होतात. हातात ग्लास आणि ग्लासात मदिरा! मदिरा डोक्यात शिरायला लागली की त्यांचे पाय संगीताबरोबर हलायला लागतात.

त्या आमच्या मोटेलच्या बारमध्ये त्या दिवशी नुसती धमाल होती. ग्लासाला ग्लास आपटत होते. काहीजण धुंद होऊन नाचत होते. काहींनी नाच आटोपून कोपऱ्यात जागा घेतली होती. मुला-मुलींचे ओठ एकमेकांत मिसळणं ही तिथे मुखशुद्धीसाठी लवंग खाण्याएवढी सामान्य गोष्ट. काही जोडप्यांना पाहून झाडाला विळखा घातलेल्या वेलींची आठवण येत होती. बरं तिथं बागडणारी जोडपी ही युगेन्युगे प्रेमात पडलेली जोडपी नव्हती. काहींची त्या पबमध्ये येईपर्यंत साधी तोंडओळखसुद्धा नसेल. ती तशी लागत नाही. मदिरा आणि धुंद करणारं संगीत डोक्यात भिनायला लागलं की त्यांची शरीरं एकमेकांपासून दूर राहू शकत नाहीत. तेव्हा ते नाव-गाव वगैरे काही ओळखत नाहीत. ओळखतात तो फक्त स्पर्श! तिथेच कुठल्याशा खोलीत किंवा कधी झाडांच्या मागे किंवा गाडीच्या मागच्या सीटवर कुठेही त्यांची शरीरं एकमेकांत मिसळतात. शरीराची भूक संपल्यानंतर ती पुन्हा एकमेकांना ओळखतसुद्धा नाहीत. त्यांना तिथे शनिवार-रविवार सुट्टी असते आणि बऱ्याच जणांना आठवड्याचा पगार मिळतो. आठवड्याभरचा शीण मग ते अशा पबमध्ये शुक्रवार आणि शनिवारी रात्री घालवतात.

त्या शुक्रवारी रात्री त्या पबमधला धिंगाणा रात्री दोन-तीनपर्यंत सुरू असावा. मी बाराला खोलीत परतलो. ते वातावरण मलाही धुंद करीत होतं. मदिरा फारशी पोटात न जाताही कानशिलं तापत होती. पण आपण अशा संस्कृतीतून आलेले असतो, की तो मोकळेपणा हवासा वाटला तरी पाय तिथे वळत नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी मॅचला जाण्यापूर्वी मी ब्रेकफास्ट घ्यायला खाली गेलो. रात्रीच्या धुंद वातावरणाच्या खाणाखुणा त्या पबवर होत्या. काचांचा खच पडला होता. मदिरेचा घमघमाट सुटला होता. मुलींचं शील हे काचेसारखं असतं असं आपण मानतो. त्या फुटलेल्या काचा मला त्याची आठवण करून देत होत्या. त्या पबने अनेक शीलं फुटलेली पाहिली असावीत. पण एखाद्या गोऱ्या मुलीला हे तुम्ही सांगितलंत तर ती काय म्हणेल ठाऊक आहे? शील? काय असतं शील? ■

(११ डिसेंबर १९९४)

नेपियरची क्रिकेट मॅच संपल्यावर मी ऑकलंडला गेलो. यावेळी उड्डाण हवेतून होतं. नेपियरचा विमानतळ तसा त्या शहरासारखाच छोटेखानी. पण अत्यंत स्वच्छ आणि सुंदर. लोकसंख्या कमी असली की बरेच प्रश्न सुटतात. शंभर टक्के साक्षरता आणि कमी लोकसंख्येमुळे स्वच्छता टिकवणं सोपं जातं.

मी ऑकलंडला गेलो ते विमान अठरा सीटर होतं. खेळण्यातलं वाटावं तसं. अशा देशात श्रीमंत माणसांकडे स्वत:ची विमानं वगैरे असतात. मी आमच्या विमानाची वाट पाहत होतो, तेव्हा एक कुणाचं तरी प्रायव्हेट विमान फुलपाखराने फुलावर उतरावं तसं अलगद उतरलं. दोन माणसं त्यातून उतरली. विमानतळावर भाड्याने कोऱ्या गाड्या मिळतात. त्यातली एक गाडी एकाने उचलली आणि कामाला निघून गेला. संध्याकाळी तो कदाचित परतला असेल. गाडी त्याने विमानतळावर परत केली असेल आणि विमानात बसून रुबाबात आपल्या गावी गेला असेल. डोंबिवलीहून एका हातात डबा आणि दुसऱ्या हातात रेल्वेच्या डब्याची दांडी धरून पोटासाठी मुंबईत येणाऱ्या माणसाला स्वर्ग स्वर्ग म्हणतात तो हाच असं वाटेल...

मला ऑकलंडला घेऊन जाणारं ते छोटंसं विमान तसं बरंच खालून उडत होतं. त्यामुळे डोंगर, दऱ्या अगदी हाकेच्या अंतरावर दिसत होत्या. छोट्या बोटींच्या शिडांचा गुच्छ दिसायला लागला आणि लक्षात आलं. ऑकलंड आलं. ऑकलंडला

## □ रंगीबेरंगी शिडांच्या बोटींचं शहर

तेथे 'सिटी ऑफ सेल्स' म्हणतात. त्या बंदरात बोटीच बोटी असतात. ऑकलंड हे न्यूझीलंडचं सर्वात मोठं शहर, पण लोकसंख्या किती ठाऊक आहे? फक्त आठ लाख ! पण त्यामुळे या शहरात माणसं तरी दिसतात. रस्ते अगदी सुनसान वाटत नाहीत. पण खरं सांगू, रस्त्यातल्या माणसापेक्षा समुद्रातल्या शिडांची गर्दी जास्त वाटते. जगात दर माणशी इतक्या शिडांच्या बोटी दुसऱ्या कुठल्याही शहरात नाहीत. तिथे लोक गाडी ठेवावी तेवढ्या प्रेमाने शिडाच्या बोटींचा ताफा बाळगतात.

हे शहर डंबेल्ससारखं आहे. एका प्रचंड हार्बर पुलाने दोन वेगळ्या बंदराला जोडून टाकलंय. तिथे अश्विन लाडवा नावाच्या एका गुजराथी मित्राने मला दोन दिवस ऑकलंड फिरवलं. ऑकलंडमध्ये सर्वात जास्त भारतीय आहेत. त्यामुळे हे शहर बरंचसं कॉस्मॉपॉलिटन वगैरे वाटतं. ही सर्व भारतीय मंडळी काही भारतातून



आलेली नाहीत.

न्यूझीलंडमध्ये असलेले बरेच भारतीय फिजीमधून आले आहेत. फिजीमध्ये एकेकाळी प्रचंड भारतीय वस्ती होती. नेहमीप्रमाणे तिथेही आर्थिक नाड्या भारतीयांच्या हातात होत्या. क्रांती झाली आणि तिथल्या मूळवंशाच्या लोकांनी भारतीयांना पिटाळून लावलं. ही मंडळी कधी भारतात परतत नाही. एक तर भारतातले दोर त्यांनी कधीच कापलेले असतात. दुसरं म्हणजे एका विशिष्ट जीवनपद्धतीत जगल्यावर भारतात परतणं त्यांना जमत नाही. फ्लॅटमधून चाळीत जाणं आपल्याला तरी जमेल का ?

हल्ली बरेच इंजिनीयर, डॉक्टर्सही भारतातून न्यूझीलंडला जातात. पैसा, चांगली जीवनपद्धती हे त्यांच्यापुढचं आकर्षण असतं. मी ऑकलंडला होतो त्यावेळी होळी होती. एका रामाच्या देवळाच्या आवारात आम्ही होळी साजरी केली. परदेशात आपला एखादा सण साजरा करण्यात एक वेगळं थ्रील असतं. भारतीय माणूस भोगवादाकडे झुकला तरी आपली संस्कृती मात्र सहजासहजी सोडत नाही.

(अश्विन लाडवाची कथा मात्र इतर भारतीयांपेक्षा थोडी वेगळी आहे. तो मूळचा इंग्लंडचा. म्हणजे जन्म इंग्लडचा. शाळेत शिकताना आणि मग ऑटोमोबाईल्सचा अभ्यास करताना त्याला जाणवलं की इंग्लंडमध्ये समानता आणि स्वातंत्र्य असलं तरी ते फक्त त्यांच्या घटनेत आहे. रस्त्यावरच्या सर्वसाधारण गोऱ्या माणसाला त्याच्या गव्हाळपणाचा

तिरस्कार वाटतो. तो भारतीय माणसांवर दुय्यम नागरिकत्व लादण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याला इंग्लंड सोडावंसं वाटलं. त्याचे आई-वडील, भाऊ, बहीण सर्व आजही इंग्लंडमध्ये आहेत. त्याला गोऱ्यांच्या पारतंत्र्यात जगायचं नव्हतं. त्याने इंग्लंड सोडलं.)

तिथून तो ऑस्ट्रेलियात जाऊन सिडनीला महिना - दोन महिने राहिला. पण तिथेही त्याला इंग्लंडसारखा अनुभव आला. बरं, मघाशी मी म्हटलंय, पहिल्या जगात वाढलेल्या माणसाला तिसऱ्या जगात रमणं कठीण जातं. त्यामुळे तो भारतात आला नाही. आफ्रिकेत जाणं कठीण. कारण तिथे जाऊन राजकीय अंदाधुंदीच्या ज्वालामुखीवर बसण्यात काय अर्थ आहे? त्यामुळे न्यूझीलंडला आला. तिथे त्याला जाणवलं की त्याच्या कातडीच्या रंगामुळे त्याचा अपमान होत नाही. त्याने ऑकलंडमध्ये राहायचं ठरवलं. गेली दोन वर्षं तो तिथे राहतोय. त्यांचं स्वत:चं गॅरेज आहे. अजून तरी त्याला प्रॉब्लेम आलेला नाही.

ऑकलंडच्या 'मरीन ड्राइव्ह'वरून त्याने फिरवलं. एका बाजूला समुद, समुद्रात रंगीबेरंगी शिडांच्या बोटी, किनाऱ्यावर मोठेमोठे वृक्ष आणि एका बाजूला सुंदर इमारती. आजही डोळे मिटून बसलो तरी तो 'मरीन ड्राइव्ह' डोळ्यांपुढे येतोय. तिथे जवळच एक मत्स्यालय आम्ही पाहिलं. न्यूझीलंड-ऑस्ट्रेलियात त्याला 'मरीन वर्ल्ड' म्हणतात. तिथे शार्क मासे पाहायला मिळतात. मुख्य म्हणजे ते तुमच्या आसपास फिरत असतात. जाडजूड काचेचा एक बोगदा तयार केलेला असतो. त्या काचेपलीकडे ते मासे असतात. त्यामुळे आपण माशांच्या मधून चाललोय असा भास होतो. तिथे म्युझियम असो किंवा मत्स्यालय, अगदी म्हाताऱ्या मंडळींना आणि मुलांना तो नीट न थकता पाहता येईल त्याची काळजी घेतलेली असते. त्या मत्स्यालयात एक फिरणारा पट्टा होता. त्या पट्ट्यावर उभं राहून तो मत्स्यालय पाहायचा. पट्टा फिरत असल्यामुळे तुम्हाला चालावं लागत नाही आणि मुलं त्या पट्ट्यावर टेबल ठेवून बसू शकतात.

त्यानंतर अश्विन मला एका ज्वालामुखीचं विझलेलं रूप दाखवायला घेऊन गेला. फक्त साडेसातशे वर्षांपूर्वी त्या शहराजवळ साठ ज्वालामुखींचं अस्तित्व होतं. आता तिथे प्रचंड खड्डा पडला होता. अंडाकृती असा तो खड्डा होता आणि जॉगर्स त्या खड्ड्यात एका टोकाकडून उतरायचे आणि दुसऱ्या बाजूने वर यायचे. त्या डोंगरावर एकच झाड आहे. त्यामुळे त्याला वन-ट्री-हिल म्हणतात. खरंच, निसर्ग अशा लीला कशा खेळतो हे माणसाच्या आकलनाच्या पलीकडचं आहे.

■

(१८ डिसेंबर १९९४)

## □ नखरेल राजधानी

वेलिंग्टन ही न्यूझीलंडची राजधानी आणि न्यूझीलंडचं सर्वात देखणं शहर! राजधानी ही नेहमी एखाद्या मॉडेलसारखी नखरेल असते. फक्त नखरेल नाही, आकर्षित करणारी! वेलिंग्टन तशी आहे. पण तिने फक्त मानवनिर्मित नट्टापट्टा केलेला नाही. माणसाने तिचं सौंदर्य वाढवलंय. पण निसर्गानंही तिला भरभरून दिलंय.

विमानातून वेलिंग्टनच्या विमानतळावर उतरताना हे शहर आपला चेहरा दाखवतं. सफरचंदी कांतीच्या पडदानशीन पठाणी मुलीनं क्षणभर चेहऱ्यावरचा पांढरा पडदा दूर करावा आणि तिच्या सौंदर्यानं आपण थक्क व्हावं, तसं ते दर्शन असतं. कारण अचानक पांढरे ढग संपतात आणि हे शहर डोकावतं. विमानातून प्रवास करताना का कुणास ठाऊक, पण कधी एकदा विमान जमिनीला टेकतंय असं मला वाटत असतं. आकाशात तरंगताना आपण असुरक्षित आहोत अशी भीती वाटत राहते. पण वेलिंग्टनला विमान पटकन उतरल्यावर वाईट वाटलं. देव प्रसन्न व्हावा, त्यानं आपल्याला गरुडाचे पंख द्यावेत आणि या शहराला आपण घिरट्या मारत बसावं असं वाटत राहिलं. हल्ली देव इतक्या सहजासहजी प्रसन्न होत नसावा. पण मला देवावर चिडण्याचा काय हक्क आहे! त्याउलट मी त्याचे आभार मानायला हवेत. तो वेलिंग्टनला मला घेऊन आला. इंद्रलोकाची त्याला झलक दाखवायची असावी.

या शहराची गंमत अशी आहे की, ते न्यूझीलंडच्या उत्तर बेटाच्या पश्चिमी टोकाला आहे. ते एक बंदर आहे. पण डोंगराने तळहातावर घेतलेलं बंदर आहे. त्यामुळे एका बाजूला समुद्र आहे आणि दुसऱ्या बाजूला डोंगर. या शहरातली माणसं कामाला बंदरावर येतात आणि राहायला डोंगरावर जातात. थोडक्यात त्यांचं फोर्ट समुद्रसपाटीवर आहे आणि बोरिवली मुलुंड डोंगरावर...!

मी विमानतळावरून मोटेलला टॅक्सीनं जाताना, महिला टॅक्सी ड्रायव्हरला म्हटलं, "तुमचं शहर वरतून फार सुंदर दिसलं. त्या मोटेलकडे जाणारा रस्ता कुठून जातो मला ठाऊक नाही. पण त्या समुद्राकडच्या रस्त्यानं घेऊन जाशील? तो थोडा दूरचा असेल तर ठरलेल्यापेक्षा थोडं जास्त भाडं घे." तिनं एक गोड स्मित माझ्याकडे फेकलं आणि ती म्हणाली, "एवढंच ना, माझं शहर तुला आवडलं. चल, तुला फिरवते. भाडं तू ठरलेलंच दे." गाढव कुठली! मी तिला सांगणार होतो,




"दोन दिवस मुंबईत टॅक्सी चालव. गिऱ्हाईकं ही फक्त लुबाडण्यासाठीच असतात, हे शिकायला मिळेल. मग पुन्हा असा गाढवपणा करणार नाहीस."

त्यांची वृत्तीच वेगळी आहे. सत्ययुगात वावरल्यासारखी ती मंडळी प्रामाणिकपणावर श्रद्धा ठेवतात. फसवणं त्यांना पाप वाटतं. मी ऑकलंडला एका दुकानातून काही सेंटस् विकत घेतली. 'ड्रेकर नुऑ' हे आफ्टर शेव्ह इतक्या स्वस्तात त्या दुकानातल्या सेल्सगर्लनं दिलं की मी न राहवून विचारलं, "हे जेनुइन आहे ना?" तिला तिच्या राष्ट्रीयत्वाचा अपमान झाल्यासारखा वाटला. ती उसळून म्हणाली, "असे धंदे तुमच्या आशियाई देशात असतील. इथं आम्ही असे उद्योग करीत नाही. आम्हाला नवीन स्टॉक करायचा आहे म्हणून आम्ही सेल लावलाय. तुम्ही हे वापरा आणि दुसऱ्या दुकानात जाऊन तुम्हाला जे जेनुइन (अस्सल) वाटतं त्याचा वास घेऊन पहा. जर त्यात फरक वाटला तर मी हे आफ्टर शेव्ह परत घेईन. जा, पुढच्या कुठल्याही दुकानात जाऊन पाहून या. मी तुमची वाट पाहते." तेव्हाही मला वाटलं होतं, की मुंबईतल्या मनिष मार्केटमध्ये न्यूझीलंडच्या दुकानदारांना, 'गिऱ्हाइकांना कसं फसवावं' या विषयावर एक क्रॅश कोर्स द्यावा. विसाव्या शतकातही ही मंडळी कुठल्या जुनाट श्रद्धा घेऊन जगत असतात. न्यूझीलंडमधल्या हिंदुस्थानीयांनीही अजून त्यांना कसलेच धडे दिलेले दिसत नाहीत. सिंगापूरचे हिंदुस्थानी पहा. आपल्या व्यापाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसतील. सिंगापुरात तशी हुकूमशाही आहे. शिक्षा कठोर आहेत. तो प्रगत देश. पण हिंदुस्थानी व्यापारी तुम्हाला हातोहात फसवू शकतो.

वेलिंग्टनच्या त्या महिला टॅक्सी ड्रायव्हरनं त्यांचा समुद्रकिनारा फिरवून मला मोटेलवर आणून सोडलं. पण फार काळ मोटेलवर पडून राहायची माझी इच्छा नव्हती. ते शहर,

ते शहराचं विमानातून दिसलेलं देखणेपण मला खुणावत होतं.

"सिटी सेंटरला कसं जायचं?" मी मोटेलच्या मालकिणीला विचारलं. "तुम्ही समोरच्या रस्त्यानं चालत जा. पुढं सर्व सिटी सेंटर तर आहे." तिनं समोरच्या एका रस्त्याकडे बोट दाखवत सांगितलं. त्या राजधानीतल्या बहुसंख्य व्यापारी इमारती, फॅशन शोमध्ये भाग घेणाऱ्या माणसांप्रमाणं नटलेल्या होत्या. मी वेड्यासारखा कॅमेऱ्याची कळ दाबत गेलो. प्रत्येक सुंदर इमारत कॅमेऱ्यात असावी असं मला वाटत होतं. शहराचे रस्ते तसे प्रशस्त नाहीत. पण जागोजागी कारंजे, शॉपिंग आर्केडस् आणि स्क्वेअर्स आहेत. रस्त्यांवर खुर्च्या आणि छत्र्या रोवून तयार केलेल्या रेस्टॉरंटमध्ये बियर पीत बसून राहावंसं वाटतं.

पण मला तो मागचा डोंगर हाक मारत होता. तिथं अंगावरच्या केसासारखी डोंगरात रुतून बसलेली लाकडी घरं पाहायची होती. तिथं डोंगर चढायला एक सोपा मार्ग होता. केबल कार! केबल कार ही तशी दोनतीन डब्यांची सुबक ट्रेन. रुळावरून पळते. डोंगरावरून जर एखादा दगड खाली सोडला तर तो जसा घरंगळत खाली येईल तशी ती डोंगरावरून घरंगळत खाली येते आणि वर जाते. डोंगरावरची लिफ्टच तिला म्हटलं पाहिजे. जगातल्या अनेक शहरांत अशा केबल कार आहेत. हाँगकाँगला ज्या डोंगरमाथ्यावर टॅक्सीनं जायला वीस मिनिटं लागतात, तिथं ही केबल कार पाच मिनिटांत घेऊन जाते. वेलिंग्टनलाही तोच प्रकार होता. पाच मिनिटांत आम्ही डोंगर चढून गेलो. वर रेस्टॉरंट होतं आणि एक बोटॅनिकल गार्डन. त्या बागेतून फेरफटका मारून मी त्या रेस्टॉरंटमध्ये बसलो. विमानातलंच दृश्य पुन्हा समोर होतं. समुद्र, त्या काठावर बागडणारं शहर आणि आजूबाजूच्या डोंगरावर चढत जाणारे रस्ते. खेळण्यातल्या वाटाव्या अशा छोट्या रंगीबेरंगी गाड्या आणि हिरव्यागार झुडपातून डोकं वर काढून समुद्राकडे पाहणारे छोटे बंगले. पस्तीस लाख लोकसंख्या आणि महाराष्ट्राएवढा भूभाग. श्रीमंती अशी झुडपाझुडपातून टपकणारच.

त्या डोंगरमाथ्यावरच्या हॉटेलातून पाय काढवत नव्हता. पण मोटेलवर परतण्यापूर्वी मला क्रिकेटच्या स्टेडियमवर चक्कर मारायची होती. ते स्टेडियमही जगातल्या काही नैसर्गिकदृष्ट्या सुंदर स्टेडियममधलं एक असावं. प्रचंड ओंजळीत एखादी बशी घेतल्याप्रमाणं ते डोंगराखाली वसलं होतं. सिलिंगला लटकणाऱ्या घुमटासारखं प्रेस बॉक्स होतं. प्रेस बॉक्सच्या खिडकीची फट जरी उघडली तरी गार वारा झोंबतो म्हणजे काय होतं ते कळायचं. दोन स्वेटर, जॅकेट आणि शर्टातून शिरून तो बर्फाळलेला वायूदेव अंगावर शहारे उठवायचा. मैदानावर नेहमीप्रमाणं हिरव्या गवताची रांगोळी होतीच. शहराच्या सौंदर्याला डाग लागणार नाही याची काळजी त्या सुंदर मैदानानंही घेतली होती.

आणि तिथंच मला नंतर ती गोड मिशा भेटली.

(२५ डिसेंबर १९९४)

तर ती मिशा नावाची गोड पोरगी मला वेलिंग्टनला भेटली. ती तिथल्या बँक ऑफ न्यूझीलंडची कर्मचारी.

भारत - न्यूझीलंड क्रिकेटमालिका बँक ऑफ न्यूझीलंडने पुरस्कृत केलेली. त्यामुळे ती तिथे मैदानावर होती. तिचं काम होतं पाहुण्यांकडे लक्ष ठेवणं. हवं नको ते पाहणं. थोडक्यात हॉस्पिटॅलिटी डिपार्टमेंट तिच्याकडे होतं.

दोनदा फॅक्स पाठवण्याच्या निमित्ताने तिची ओळख झाली. फॅक्स खाली क्लबहाऊसमध्ये होता आणि आमचं प्रेस बॉक्स झुंबरांसारखं वर स्टेडियमच्या छताला लटकलेलं! क्लबहाऊस आणि प्रेसबॉक्समध्ये तब्बल शंभर पायऱ्यांचं अंतर असावं. दिवसभर थंडगार वाऱ्याचं शरसंधान सहन करीत मी प्रेसबॉक्समध्ये बसलो होतो. मॅच संपल्यावर ठरवलं की क्लबहाऊसमध्ये लिहीत बसावं. कारण दोन्ही कर्णधारांच्या मुलाखती घेऊन पुन्हा शंभर पायऱ्या चढणं माझ्या जिवावर आलं होतं.

त्यामुळे त्या मैदानाच्या टुमदार क्लबहाऊसचा एक कोपरा लिहिण्यासाठी पकडला. मॅच संपली होती. क्लबहाऊसमध्ये धमाल वातावरण होतं. काहींच्या पोटातली व्हिस्की त्यांच्या डोक्यात जाऊन पोचली होती. तरीही ती त्यांच्या ग्लासात नाचत होती. काहींची शरीरं संगीताच्या तालावर हलायला लागली होती आणि मी तिथे कोपऱ्यात सचिनच्या झंझावाती खेळीसाठी नवीन कोणती विशेषणं वापरावी याचा विचार करीत बसलो होतो.

## ▫ मिशाचं तत्त्वज्ञान

इतक्यात कुणीतरी एक व्हिस्कीचा ग्लास माझ्या पुढ्यात ठेवला. माझी मान खाली होती. ग्लास ठेवणारा हात नाजूक गोरा होता. नाजूक शरीराने विश्वामित्राची तपश्चर्या भंग पावली होती. ते तर ऋषी! मी आपला साधा माणूस. मी वर पाहिलं. आपल्या पूनम धिल्लॉंसारखी दिसणारी एक वीस-बावीस वर्षांची मुलगी समोर उभी होती. तीच ती! मला फॅक्स पाठवायला मदत करणारी हे मी ओळखलं. मघाशी तिने 'मिशा' म्हणून ओळख करून दिली होती. "हा एक पेग मार आणि मग काम कर." तिने सल्ला दिला.

सर्वसाधारणपणे सुंदर मुलीचं मन मोडायला मला आवडत नाही. पण लिहीत असताना मला तरी मदनिका स्फूर्ती देते, मदिरा नाही. त्यात मुळात मला व्हिस्की तशी मनापासून आवडत नाही. मी तिला म्हटलं, "मला तुझ्याशी खूप गप्पा मारायच्या आहेत. पण मी एवढं लिहिणं संपवतो. फॅक्स पाठवतो. मग गप्पा मारीत




बसूया.''

''ओह! शुअर'' ती म्हणाली. पाश्चिमात्य मुलींचं एक बरं असतं. गप्पा मारायच्या असतील तर त्या उगाच अय्या - इश्शचा घोळ घालत नाहीत. त्यांना एखाद्याला नाही म्हणायचं असेल तर ''चल, लोचट कुठला. मागे लागलाय मेला'' अशीही कॉमेंट नसते. मुळात लाजणं, मुरका मारणं त्यांना ठाऊकच नसतं. गाल आरक्त होणाऱ्या काकोडकरी कादंबरीतल्या मुली तिथं नसतात.

माझी कॉपी लिहून फॅक्स झाल्यावर मी तिला म्हटलं, ''चल, मला तुझ्याशी गप्पा मारायच्या आहेत.'' माझी वाईनची आवड मी तिला आधीच सांगितली होती. तिच्यासारखीच गोरी, थुईथुई नाचणारी वाईन ग्लासात घेऊन ती आली. मला तिच्याशी न्यूझीलंडबद्दल बोलायचं होतं. पण त्यापेक्षा जास्त ती भारताबद्दल विचारायला उत्सुक होती. आपल्याला जेवढी ग्वॉटेमाला किंवा पेरुबद्दल माहिती असते, तेवढी त्यांना भारताबद्दल असते. त्यात ती त्यांच्या दर्जाचा विचार करता गरीब होती. ती म्हणाली, ''मी गरीब आहे. देशाबाहेर जाणं जाऊ देत, मी अजून ऑकलंडसुद्धा नाही पाहिलं.'' पण त्यांच्या आणि आपल्या गरिबीच्या व्याख्येत किती फरक आहे हे मी तिला समजावून सांगितलं. ''गटारावर झोपडी बांधून राहणाऱ्या माणसाची तू कल्पना करू शकतेस?'' तिच्या अंगावर शहारा आला.

तिचं लग्न झालं नव्हतं. आता ती स्वतंत्रपणे छोट्या फ्लॅटमध्ये राहात होती. पण आईवडिलांबरोबर राहताना तिची बेडरूम छोटी होती. त्याची तिला खंत होती.

"आमच्याकडे दहा बाय दहाच्या खोलीत दहाजणं दाटीवाटीने राहतात." असं मी म्हटल्यावर तिला श्रीमंत झाल्यासारखं वाटलं की नाही देव जाणे! पण तिने अभावितपणे एक प्रश्न विचारला, "मग ते सेक्स कसं करतात? सर्वांसमोर?" त्यांना जेवण रोज लागतं. तसं रोज सेक्सही लागतं. ती उपासमार ते वयात आल्यानंतर सहन करीत नाहीत.

मी तिला आणखीन एक सांस्कृतिक धक्का दिला. मी तिला सांगितलं, "आमच्यात लग्न अजूनही ठरवून होतात. मुलगी मुलाला 'दाखवली' जाते. 'केक' ची बशी घेऊन ती नटून मुलापुढे येते आणि मग मुलीला पसंत केलं जातं." (पोह्यांच्या बशीला केकच्या बशीत बाटवण्याचं काम मला नाइलाजानं करावं लागलं. कारण पोहे म्हणजे काय हे इंग्लिशमध्ये सांगणं माझ्या कुवतीपलीकडचं होतं.) पण हे ऐकल्यावर ती हतबुद्ध झाली. "कांगारूच्या पोटी पेंग्वीन जन्माला आला" असं मी तिला सांगितलं असतं तर एकवेळ तिने विश्वास ठेवला असता, पण लग्नं 'जमवली' जातात हे ती पचवू शकत नव्हती. कशी पचवणार? तिचं तत्त्वज्ञानच वेगळं होतं.

अजून वीस वर्षांनी मी न्यूझीलंडमध्ये गेलो तर हीच मिशा मला कदाचित सांगेल, "पूर्वी आमच्या देशात लग्नं व्हायची. आता आम्ही असेच राहतो. तो फाटक्या जीन्समधला मुलगा दिसतोय ना, तो रॉबिनचा. आणि ती त्या इंडियन पोराबरोबर नाचताना मुलगी दिसतेय ना, ती जेम्सपासून झालेली. आता मी ख्रीसबरोबर राहते. मुलं नकोच असं आम्ही ठरवलंय."

बरं, मिशा ही तिथली बंडखोर मुलगी नव्हती. ती तिथल्या एखाद्या कुलकर्ण्यांची निशा किंवा पवारांची आशा होती. पण तिथला समाजच तसा आहे. ती म्हणाली, "मी सोळाव्या वर्षी आईवडिलांचं घर सोडलं आणि बॉयफ्रेंडबरोबर राहायला गेले. आता मी एखाद्या शनिवार-रविवारी आईवडिलांना भेटायला जाते. नाताळात आम्ही भावंडं कुठेही असलो तरी आईवडिलांच्या घरी नाताळ साजरा करायला एकत्र येतो. मग पुन्हा घराबाहेर पडतो." जोपर्यंत चोचीने दाणा भरवायचा असतो तोपर्यंत त्यांचं आणि आईवडिलांचं घरटं एक असतं. जवानीचे पंख फुटले की ते उडून जातात. स्वत:चं घरटं बनवतात.

तिच्या गाडीतून तिने मला मोटेलवर सोडलं. जाताजाता ती मला तिचं तत्त्वज्ञान सांगून गेली. म्हणाली, "आम्ही आजच्यासाठी जगतो. स्वत:साठी जगतो. उद्या कुणी पाहिलाय?"

■

(१ जानेवारी १९९५)

## □ मोत्यासारखा देश

'ख्राईस्टचर्च' शहर हा आमच्या न्यूझीलंड दौऱ्याचा शेवटचा टप्पा होता.

डोळे बंद करून ह्या शहरात जर कुणी आणून टाकलं, तर आपण इंग्लंडमध्ये आहोत की न्यूझीलंडमध्ये हे कळणार नाही, एवढा ब्रिटिशांचा शिक्का ह्या शहरावर आहे. ह्या शहराला निसर्गाने वाळीत टाकलंय. कॅरमबोर्डासारखं अगदी सपाट शहर आहे.

पण ह्या शहरावर सौंदर्याची आभूषणं माणसाने चढवली आहेत. आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्याला वेडं करायची ताकद ह्या शहरात आहे. एकोणीसाव्या शतकातल्या राखाडी दगडातल्या इमारती हिरा जपावा तशा जपलेल्या आहेत. ऑकलंड, वेलिंग्टनला आधुनिकतेचा स्पर्श आहे. ख्राईस्टचर्चला इतिहासाचा वरदहस्त आहे. हे शहर तिथल्या माणसांनी हिरवं करून टाकलंय. शहराचा एक तृतीयांश भाग मोठमोठ्या बागांनी व्यापलाय. शहरात कुठेही फिरलात तरी झाडाची सावली तुम्हाला साथ देत असते. तिथलं हेगल पार्कचं दोनशे हेक्टरचं आहे.

ह्या शहरातली माणसं मात्र 'इंग्लिश'वाली नाहीत. त्यांचे पूर्वज अर्थात ब्रिटिशच होते. कॅप्टन कूकने युनियन जॅक तिथे फडकवल्यानंतर न्यूझीलंड ब्रिटिशांच्या अंमलाखालीच आलं. तसा न्यूझीलंडचा इतिहास रंजक आहे. कित्येक शतकं ही बेटं निर्मनुष्य होती. हजार वर्षांपूर्वी मध्य पॅसिफिकमधल्या हवाई बेटावरची माणसं लाटांशी झुंजत छोट्या बोटीतून न्यूझीलंडला आली. त्या जमातीला माओरी म्हणतात. 'क्युपे' नावाच्या महान खलाशाने त्याच्या जमातीच्या मंडळींना प्रथम न्यूझीलंडमध्ये आणलं. तेव्हा ते न्यूझीलंडला 'आवो-तावा-टोवा' म्हणायचे. 'लांबलचक पांढऱ्या रंगाची जमीन' असा त्या आवो तावा टोवाचा अर्थ! अबेतास्मान हा न्यूझीलंडला पोचणारा पहिला गोरा माणूस. सोळाशे बेचाळीसमध्ये तो तिथे पोचला. तो डच होता. कुठे हॉलंड, कुठे न्यूझीलंड! पहा किती उपद्व्यापी होते ते! पण माओरींनी त्याचे अनेक खलाशी मारल्यावर त्याने तिथून पलायन केलं. त्यानंतर एकशेपंचवीस वर्षांनी सतराशे एकोणसत्तर साली ब्रिटिश रॉयल नेव्हीच्या कॅप्टन कूकने तिथं पाऊल ठेवलं. ख्राईस्टचर्चजवळच्या बंदराजवळ जिथे कॅप्टन कूक जाऊन आला, तिथे कॅप्टन कूकच्या साहसाचं छोटं चित्रांचं प्रदर्शन आहे. केवळ कारमधून त्या डोंगरावर जाता येतं. ब्रिटिशांनी मग नेहमीप्रमाणे गोड गोड




बालून माओरींना गुलाम केलं. आजही माओरी हे तिथले हरिजन आहेत. थोडाफार भारतीयांसारखा गव्हाळ असा त्याचा रंग आहे. त्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर लाटण्यात आल्या. ते अन्यायाविरुद्ध आजही लढत असतात.

पण ह्या ब्रिटिशांनी जगभर जमिनीच्या रूपातले हिरेच शोधले. न्यूझीलंड हा असा एक हिरा आहे. लोक युरोप-अमेरिकेत जातात, बँकॉक-सिंगापूरला जातात. पण तशा मोठ्या संख्येने न्यूझीलंडमध्ये जात नाहीत. केवळ तिथली माहिती नसल्यामुळे असेल कदाचित, पण निव्वळ हॉलिडेसाठी जावं अशी ही जागा आहे. क्रिकेट कव्हर करण्याकरता दौऱ्यावर गेल्यावर तिथे फारसं फिरता येत नाही. पण वेळ असेल तर निसर्गाची वेगवेगळी रूपं आपण तिथे सुखात पाहू शकतो.

कितीतरी प्रकारे तिथे सहली आयोजित केल्या जातात. तुम्हाला सायकलिंगची आवड असेल तर केवळ सायकलिस्टसाठी तिथे सहल असते. अगदी सहा दिवसांपासून अठरा दिवसांच्या सहली. ही सहल स्वच्छ हवेतून तुम्हाला धबधबे, जंगलं, सोनेरी समुद्रकिनारे, अगदी पाहिजे तिथे घेऊन जाते. बरं, सायकल त्यांची, आणि सायकल चालवायला तुम्ही 'सुपर फिट' वगैरे असण्याची गरज नाही. थकलात तर बरोबरच एक व्हॅन असते. त्यात बसून यायचं.

तिथल्या सुविधा पाहिल्या की पर्यटकाला आकर्षित करण्यासाठी काय काय करता येतं ते कळतं. तुम्हाला तुमच्या वेगाने, तुमच्या इच्छेप्रमाणे फिरायचंय तर त्यासाठी कॅरवान असतात. त्या वेगवेगळ्या आकाराच्या असतात. त्यात जास्तीत जास्त सहा माणसं प्रवास करू शकतात. पण ती नुसती गाडी नसते हो, तुमच्या घराला चाकं लावलेली असतात. त्या गाडीत, अन्न शिजवायला गॅस, हिटर, फ्रीज, थंड पाणी, गरम पाण्याचा शॉवर, भांडी, टॉवेल्स, कपबशा अगदी सगळं सगळं असतं. आणखीनच काय हवंय तुम्हाला! वाटलं, एखाद्या धबधब्यापुढे मुक्काम टाकावा, आरामात मुक्काम टाकता येतो. वाटेत छोटे छोटे मोटर कॅम्पस असतात. तिथे तर टी.व्ही पासून स्विमिंग पूलापर्यंत सर्व असतं. गोरा माणूस शहरात राहो किंवा रानात, तो आधुनिक सुविधा तिथे कशा मिळतील ह्याचा सदैव विचार करत असतो.

तुम्ही किंचित साहसी असाल तर जीव आणि हाडं सांभाळून तुम्हाला तिथं बऱ्यापैकी साहस करता येतं. 'बंगी जंप' हा त्यापैकी एक प्रकार आहे. रबराच्या दोऱ्याला 'बंगी' म्हणतात. त्या दोऱ्या तुमच्या घोट्याला बांधतात. डझनवारी रबरी दोऱ्यांतून 'बंगी' दोर तयार केला जातो. तो बांधल्यावर तुम्हाला सत्तर मीटर्सवरून (साधारणपणे सात मजल्यांची इमारत) पाण्यात उडी मारता येते. एक उडी मारली की तीन-चार वेळा खालीवर उडता येतं. आणि मग एखाद्या तराफ्यात तुम्हाला घेतात. ही बंगी जंप तिथे अतिशय लोकप्रिय आहे. कारण ११ वर्षांच्या मुलापासून ७७ वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत ही उडी कुणालाही अगदी आरामात मारता येते. ह्या साहसाला तिथे साधारण दोन हजार रुपये लागतात. पण हा अनुभव म्हणजे जन्मभराची ठेव असते.

न्यूझीलंडला जवळजवळ दहा हजार किलोमीटर्सचा किनारा आहे. आपल्या देशाला त्यापेक्षा मोठा किनारा आहे. पण समुद्राचं पाणी हे देशातली घाण पचवायचा मोठा सेप्टिक टॅंक आहे, असंच आपल्याकडे मानलं जातं. तिथे निळ्या पाण्यातला खजिना तुम्हांला पाहता येतो. मोती नाही सापडत, पण विविध रंगांचे आणि विविध प्रकारचे मासे पाहता येतात. काही ठिकाणी सत्तर-सत्तर मीटर खोलवर सूर्यप्रकाश आरामात पोचतो. इतकं पाणी स्वच्छ असतं. तिथे कुठलाही सोम्यागोम्या 'डायव्हर'चा ड्रेस आणि इतर आयुधं चढवून हे समुद्रातलं वैभव पाहू शकतो.

तिथं काही ठिकाणी सुमद्रात अशा जागा आहेत की, व्हेल आणि डॉलफिन ह्या माशांना तुम्ही थेट समुद्रात पाहू शकता. वाघ पिंजऱ्यात पाहणं आणि रानात पाहणं ह्यात फरक आहे. तसेच व्हेल हा एखाद्या मत्स्यालयात पाहणं आणि समुद्रात पाहणं ह्यात फरक आहे. साठ-पासष्ट फूट लांबीचे व्हेल मासे तिथे दहा फुटांवरून पाहता येतात.

खिशात पैसे असतील आणि हौस असेल तर कधी तरी न्यूझीलंडकडे वळा. दूर दक्षिणेकडे आहे हा देश! हा मोत्यासारखा देश शोधायला जवळपास दक्षिण ध्रुवाकडे जावं लागतं. पण तिथं पोचल्यावर श्रमाचं काही वाटत नाही. शेवटी मोतीही समुद्राच्या तळाशीच मिळतो. म्हणून तर त्याची किंमत मोठी असते. ■

(८ जानेवारी १९९५)

## □ न्यूझीलंड : एक एड्‌समुक्त देश !

न्यूझीलंडमधल्या एका विमानतळावर मोठ्या अभिमानाने लिहिलेलं एक वाक्य मी वाचलं. तो विमानतळ कुठला हे नीट आठवत नाही. बहुधा ख्राइस्टचर्चचा असावा. जे लिहिलं होतं ते महत्त्वाचं होतं- 'आमचा देश एडसमुक्त आहे.'

जगात असं सांगू शकतील, असे फार देश अस्तित्वात नाहीत. मला आठवतंय, न्यूझीलंडला जाण्यापूर्वी माझा एक मित्र गंमतीनं म्हणाला होता, ''न्यूझीलंडला एकटा चाललायस का वैनींना घेऊन ?'' म्हटलं. ''एकटा, पण का ?'' मग तो हसत म्हणाला, ''जा. बिनधास्त जा. आणि धमाल करून ये.'' मी त्याला प्रामाणिकपणे विचारलं, ''अरे, कसली धमाल ?'' त्याला वाटलं, मी वेड पांघरून पेडगावला - सॉरी, न्यूझीलंडला जातोय. ''अरे माहीत नाही तुला ? तो एडसमुक्त देश आहे.''

मला ती भंकस वाटली. त्या विमानतळावरच्या घोषवाक्याने माझ्या मित्राच्या बोलण्यातलं तथ्य समजलं.

ही पाहणी कधीची हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण त्या विषाणूंना कुठल्याही देशात शिरायला व्हिसा लागत नाही. रक्ताचं नातं जुळलं की बहुतेक वेळा प्रसार होतोच.

न्यूझीलंडला एडस् नाही म्हणजे काय ! तिथं 'ब्रह्मचर्य हेच जीवन' मानणारी मंडळी आहेत किंवा परपुरुष-परस्त्रीशी संबंध ही गोष्ट पुराणात जमा झालीय, असा अर्थ कुणी काढू नये. पाश्चात्त्य जगाला ते शक्य नाही. चॉकलेट, वाइन आणि सेक्स या गोष्टी ते टाळू शकत नाहीत.

त्यांचं तत्त्वज्ञान मुळात वेगळं आहे. आपण केवळ स्वत:साठी जगत नाही. जगताना मुलंबाळं, बायको, आईवडील यांचा विचार करतो. (सासू-सुनांच्या मारामाऱ्या आणि त्यामुळे नवऱ्याची होणारी ओढाताण जमेस धरूनसुद्धा) अजूनही बऱ्याच प्रमाणात आजोबा-आजी, भाऊ-बहिणी यांची जबाबदारी आपण स्विकारतो.

कौटुंबिक त्यागाची परंपरा आजही आपल्याकडे थोडी आहे. एखाद्या घरात वडील भावाने किंवा वडील बहिणीने लग्न न करता स्वत:च्या भावंडांना आधार देऊन वाढवलेलं उदाहरण सापडतं. पती लुळापांगळा झाला तर त्याला पाचोळ्यासारखा फेकून देऊन दुसऱ्या हिरव्या पानाशी आपल्याइथल्या स्त्रिया




लगेच नवा संसार थाटत नाहीत. ऊठसूठ 'नवी विटी नवं राज्य' हा प्रकार आपल्याकडे नसतो. उलट स्वत:ची भावना, स्वत:ची सुखं यांना तिलांजली देऊन नवऱ्याची शुश्रूषा करणाऱ्या बायका आजही रग्गड असतात.

हे योग्य की अयोग्य यावर वाट्टेल तेवढा वाद घालता येईल. पण आपल्या समाजाची ही आजची वस्तुस्थिती आहे, हे मान्य करायला हवं. आपल्याकडेही चंगळवाद वाढतोय. पण पाश्चिमात्यांपेक्षा त्याबाबतीत आपण बरेच दूर आहोत.

तिथं प्रकार वेगळा आहे. "मी आणि माझ्यासाठी" हा विचार तिथे अत्यंत प्रबळ आहे. बिरबलाची 'माकडीण आणि तिच्या मुलाची' गोष्ट, तुम्हाला ठाऊक आहे. तिथे माकडिणीसारख्या वागणाऱ्या बायका खूप सापडतील. मला पाचसहा वर्षांपूर्वीची जुनी गोष्ट आठवतेय. त्यावेळी दोन जर्मनीमधली भिंत नुकतीच तुटत होती. स्वातंत्र्याचा सुगंध पश्चिम जर्मनीतून पूर्व जर्मनीत चालला होता. तो सुगंध हवाहवासा वाटणं मी समजू शकतो. पण पूर्व जर्मनीतली काही तरुण मंडळी त्या सुगंधामुळे एवढी वेडीपिशी झाली की मुलंबाळं पूर्व जर्मनीत सोडून त्या स्वातंत्र्याच्या सुगंधामागे धावत सुटली. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड त्याला अपवाद नाहीत.

त्यांच्या 'मी आणि माझं सुख' ह्या संज्ञेखाली 'सेक्स' हे सुख येतं आणि तो कुठूनही मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. एडसमुळे ते सुरुवातीला घाबरले. पण

एडस् कसा रोखता येतो ह्याचं ज्ञान त्यांनी मिळवलं. त्या ज्ञानाला त्यांनी आपला टॉर्च बनवलं. त्या उजेडात त्यांनी पुढचा मार्ग शोधला. तिथे निरोधचा उपयोग लहान मुलामुलींना माहीत असतो. कारण त्यांना तसं शिक्षण दिलेलं असतं. आपण मात्र आपल्या मुलांसमोर 'सेक्स' हा शब्द उच्चारायला घाबरतो.

तिथे एखादी मिशा माझ्यासारख्या परक्या माणसाला विचारू शकते, "तुमच्या देशात दहा बाय दहाच्या खोलीत अख्खं कुटुंब राहिलं तर ते 'सेक्स' कसं करतात?" आपल्याकडे एखादी स्मिता, कुणा परक्याशी ह्या विषयावर बोलू शकेल? अजून आपल्या ऐंशी टक्के मुली 'मिशा' चं धैर्य दाखवू शकणार नाहीत. कारण मिशाला जन्म झाल्यापासून वेगळ्या खोलीत रात्री झोपवलं जातं. एकटेपणाचं, फक्त स्वत:च्या सुखाकडे आणि स्वातंत्र्याकडे पाहण्याचं बीज तिथे रोवलं जातं. त्यामुळे स्वत:चं संरक्षण कसं करायचं याची माहिती तिला असते.

एड्स पसरण्याचं आणखीन एक मोठं ठिकाण असतं कुंटणखाने आणि हॉस्पिटल्स. ह्या अशा बऱ्याच गोष्टी अधिकृत असल्यामुळे चोरूनमारून अशा गोष्टी सहसा होत नाहीत. मुळात ज्याला आपण 'बाहेरख्याली' पणा म्हणतो, त्याला ते 'नाइट लाइफ एन्जॉय करणं' असं म्हणतात. बाहेरख्यालीपणा हे पाप नसून सुखाचा एक मार्ग आहे, असं तिथे मानलं जातं. त्यामुळे एखाद्याला बाहेरख्यालीपणा करायचाच असेल तर त्याला नाकावर बोट ठेवून एखाद्या टॅक्सीवाल्याला किंवा हॉटेलच्या वेटरला विचारावं लागत नाही. वर्तमानपत्रात जशा सिनेमा-नाटकांच्या जाहिराती असतात. तशा 'एंटरटेनमेंट' अशा जाहिराती असतात, त्या जाहिरातीत 'एकटेपणा' घालवायची सोय दिलेली असते. खाली टेलिफोन नंबर आणि पत्ता असतो. फोनवर तुमचं काम होऊ शकतं. पण त्या कमर्शियल सेक्स वर्कर्सचं एड्सबद्दलचं ज्ञान अद्ययावत असावं. विशेषत: त्या अगतिक नसाव्यात. एखाद्याने निरोध वापरायला नकार दिला किंवा त्यासाठी जास्त पैसे देण्याची लालुच दाखविली तर त्या मोहाला बळी पडत नसाव्यात. नाहीतर त्यांना एड्सवर नियंत्रण ठेवणं शक्य झालं नसतं.

तिथली हॉस्पिटलं तर अद्ययावतच असतात. कुठल्याही पेशंटला रक्त देताना एचआयव्ही चाचणी झाल्याशिवाय रक्त दिलंच जात नाही. मोठी शहरं सोडली तर आपल्या देशात अजूनही सर्वत्र अशी यंत्रणा नाही.

शिक्षण आणि कमी लोकसंख्या, ह्यामुळेच सर्व सुखं दोन्ही हातांनी उपभोगून त्यांना एड्ससारखा महाराक्षस दूर ठेवणं सोपं झालंय.

■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास २०९
दा. क्र. २८५०२
२५।३।९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

(१५ जानेवारी १९९५)

# ऑस्ट्रेलिया पुराण



## □ आता सफर ऑस्ट्रेलियाची

माझं 'न्यूझीलंड पुराण' मी गेल्या रविवारी संपवलं. या पुराणाला वाचकांचं प्रेम माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त लाभलं. काहींनी भेटून, काहींनी पत्रांतून, काहींनी फोनवरून ह्या पुराणाबद्दल प्रतिक्रिया कळवली.

"त्याला थांबवा रे, बस झालं पुराण!" असं म्हणणारे फोन किंवा पत्रं आली नाहीत, हे सुदैव! एक प्रतिक्रिया तर मला उत्साहाचं अमृत पाजून गेली. सौ. कांता नाबर यांची ती प्रतिक्रिया होती. त्या आणि त्यांचे यजमान, दोघेही आज 'सीनियर सिटिझन्स' आहेत. "मी आज पंचाहत्तर वर्षांचा आहे." मिस्टर नाबरांनी मला खणखणीत आवाजात सांगितलं. त्या दोघांनी अर्धं जग पालथं घातलंय. अमेरिका, युरोप पाहून झालंय. (अद्यापि ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडकडे फिरकले नाहीत. पण 'न्यूझीलंडपुराण' वाचून त्यांना ह्या वयात न्यूझीलंडला जायची इच्छा झालीय.)

माझं न्यूझीलंड पुराण तिथेच सफल झालं असं मला वाटलं.

यश मिळालं की उत्साह वाढतो. वाढलेल्या उत्साहात तुम्हाला ऑस्ट्रेलियातून फिरवून आणावंसं वाटतंय. थोडक्यात, धाकट्या भावाकडून मोठ्या भावाकडे घेऊन जायचा हा माझा प्रयत्न आहे.

"ऑस्ट्रेलियाच का?" हा प्रश्न विचारलात, तर माझ्याकडे उत्तरं रगड आहेत.

हा एक विचित्र खंड आहे. पृथ्वीवरचा सर्वांत जुना खंड आणि सर्वांत छोटा खंड! ह्या खंडातल्या दोनतृतीयांश भागात फक्त वाळवंट आहे. ओसाड! काही पिकत नाही तिथं, पण तरीही हा प्रचंड श्रीमंत खंड आहे.

जमिनीत हात घातला की तिथं सोनं लागतं. कोळसा तर कुठंही लागतो. डॉक्टर प्रधान म्हणून माझे एक मित्र सिडनीच्या आसपास राहतात. त्यांनी घर बांधलं. घर बांधण्यासाठी पाया खणला तर कोळसा लागला. आपल्या इथं पाया खणताना चटकन कडक जमीन लागली तर हायसं वाटतं. चला, पायाचा खर्च थोडा कमी झाला. पण तिथं कोळशाचं कुणाला फारसं काही वाटलं नाही. काय वाटणार! एखादी गोष्ट रोजची झाली की अप्रूप संपतं. निसर्गाने एका हातानं दोनतृतीयांश जमीन तिथल्या माणसाच्या हातून काढून घेताना दुसऱ्या हातानं किती भरघोस दिलंय त्याची झलक मेलबोर्नजवळच्या सोन्याच्या खाणी आणि दुकानातले किंमती खडे पाहिल्यावर कळतं.



पण समुद्र ही त्या देशाला निसर्गानं दिलेली सर्वात प्रेक्षणीय देणगी आहे. छत्तीस हजार किलो मीटर्सच्या किनाऱ्यावर रोज निळ्याशार समुद्राच्या लाटा कोसळत असतात. तिथली सर्व मोठी शहरं ह्या समुद्रात पाय सोडूनच बसली आहेत. त्या किनाऱ्यांवरून अनवाणी चालताना पायाच्या तळव्यावर मोरपीस फिरल्याची भावना होते. ती किमया तिथल्या सोनेरी वाळूची. बस! वाळूच्या बिछान्यावर समुद्राची लाट अंगावर ओढून फक्त पडून राहावं. गुदगुल्या करत अंगावरून परतणारी लाट शरीरावर जे रोमांच उठवते ना, त्याचं वर्णन करता येत नाही. ते अनुभवावं लागतं. प्रेमाच्या पहिल्या स्पर्शानंतर उठणाऱ्या रोमांचाचं थोडंच वर्णन करता येतं! त्या लाटेने उठलेले रोमांचही तसेच असतात.

स्नॉरकेलिंग किंवा स्कुबा डायव्हिंग करायची तुमची तयारी असेल तर विविध रंगांच्या माशांचा खजिनाच तुमच्या हातात येतो. रंगीबेरंगी मासे अंगा-खांद्यावर खेळवत तुम्ही समुद्राच्या तळाशी जाऊन कोरल्स पाहू शकता. नसेल मेहनत घ्यायची, सर्व ऐषारामात हवं असेल तर एका वातानुकूलित, पाणबुडीशी नातं सांगणाऱ्या बोटीत जाऊन बसायचं. ऑस्ट्रेलियन चीज चघळत आणि आंबटगोड फळांच्या रसासारख्या लागणाऱ्या वाईनचे घोट घेत, समुद्राच्या तळघरातून फेरफटका मारायचा. खरं सांगू, समुद्राच्या तळघरात केवढी प्रचंड दौलत आहे ह्याची कल्पना फक्त वरचा निळा पृष्ठभाग पाहून येत नाही आणि ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडएवढी सामुद्री दौलत जगात इतरत्र कुठे आहे असं वाटत नाही. उगाच नाही कॅप्टन कूक तिथं गेला!

युनियन जॅकवाल्या साहेबाला कितीही शिव्या घाला. पण एक गोष्ट कबूल करावी

लागते. तो होता हरहुन्नरी! संपत्तीचा वास त्याला ग्रेट ब्रिटनमध्ये बसल्याबसल्या यायचा. मग ती संपत्ती डोंगरावरची असो, जमिनीतल्या पोटातली नाहीतर समुद्राच्या तळघरातली! आणि तो तिथे पोचल्याशिवाय तिथल्या हजारो वर्षे राहणाऱ्या माणसांना त्या संपत्तीची कल्पनासुद्धा नसायची.

ऑस्ट्रेलियाचंच पहा. पन्नास हजार वर्षांपासून तिथे माणसाची वस्ती आहे. जगातल्या विविध देशांतले खलाशी या खंडाला चक्कर मारून गेले असतील, पण युनियन जॅकवाला कॅप्टन कूक तिथं पोचला आणि त्या खंडात बदल व्हायला लागला. ह्या साहेबांच्या देशाला त्यांचे गुन्हेगार कुठे नेऊन 'ओतावेत' हा प्रश्न होताच. हा प्रचंड खंड, त्या कामासाठी त्यांना भावला. सिडनीत मग अशा गुन्हेगारांची कॉलनीच उभारली गेली. हळूहळू इतरत्र देशोधडीला लागलेले लोकही ह्या खंडात जमा व्हायला लागले.

असं करत अठराशे अडुसष्ट साल उजाडलं. त्या आसपास गोऱ्यांना उमगलं, देवाने ह्या भूमीत सोनं आणि खनिजसंपत्ती पुरून ठेवलीय. साहेबाला ठाऊक होतं की गुन्हेगारांना स्वर्गात पाठवायचं नसतं. त्यांनी गुन्हेगार पाठवणं थांबवलं. पण ज्यांना संपत्तीची लालसा होती आणि ज्यांच्याकडे लाटांच्या हजारो मैलांच्या भिंती आणि अस्मानीच्या सुलतानशाहीशी लढत, समुद्र पार करायची हिंमत होती ते ह्या स्वर्गात येऊन पोचले.

गोरेसाहेब कुठेही गेले तरी साहेबांसारखेच राहणार. त्यांनी सोन्याच्या खाणी शोधल्या. पण खाणीत अंगमेहनत कोण घेणार? साहेबाला ठाऊक होतं की ह्या भूतलावर 'आशिया' नावाचा खंड आहे. प्रजोत्पादन हे तिथलं सर्वात मोठं उत्पादन आहे. त्यामुळे माणसं भुकेलेली असतात. पोटासाठी काहीही काम करायला तयार असतात. तिथली मंडळी अंगमेहनतीच्या कामासाठी आणणं सोपं असतं. चिनी मंडळी आली. खाणीत काम करायला लागली.

हळूहळू गोऱ्यांच्या वेगवेगळ्या वसाहती एक झाल्या. ऑस्ट्रेलिया एक देश झाला. आता गोऱ्यांचं राज्य आहे. ह्या गोऱ्यांना जुन्या साहेबांबद्दल प्रेम नाही, उलट रागच आहे. पण त्या खाण कामगारांच्या आजच्या पिढ्या गोऱ्यांना मागे टाकून पुढे चालल्या आहेत. ऑस्ट्रेलियन विद्यापीठात मेरिटमध्ये येणारी मुलं चिनी आणि भारतीय असतात.

असो! बरंच काही सांगायचंय, ऑस्ट्रेलियातल्या माझ्या थोड्याबहुत अनुभवाबद्दल. मग माझं बोट धरून फिरणार ना ऑस्ट्रेलिया?

■

(२२ जानेवारी १९९५)

## □ ... आणि गणपती पावला

ऑस्ट्रेलियाला जाण्याचा एक रस्ता नरिमन पॉइंटवरच्या क्वान्टासच्या ऑफिसातून जातो.

'क्वान्टास' हे ऑस्ट्रेलियन विमान कंपनीचं नाव.

तिथं एक तरुण आणि देखणा सेल्स सुपरवायझर एक मराठी माणूस आहे. अनुप कर्णिक हे त्याचं नाव. ऑस्ट्रेलियाला जाण्याचा मार्ग तो फार प्रेमाने दाखवतो.

एका एजंटकडून धक्का खाल्ल्यानंतर मला कुणीतरी हा मार्ग दाखवला. त्या दिवसापासून सिंगापूरच्या दक्षिणेला जायची वेळ आली की, अनुप कर्णिक माझा गाईड असतो आणि एअरलाइन क्वान्टास!

ऑस्ट्रेलियन व्हिसा ही तशी फार मोठी डोकेदुखी नाही. त्रास एकच आहे, की त्यांची एम्बसी दिल्लीत आहे. व्हिसासाठी दिल्लीला जायची गरज लागत नाही. पण तुमची कागदपत्रं हवी तशी नसतील तर गोंधळ होतो. त्यांचा टुरिस्ट व्हिसा चक्क फुकट असतो. पण तुमचा चंचुप्रवेश मुसळप्रवेश होणार नाही हे तुम्हाला कागदपत्राद्वारे व्हिसा ऑफिसला पटवावं लागतं. 'भारतीयाला दिली ओसरी, भारतीय हातपाय पसरी' असा अनुभव पहिल्या जगातल्या देशांना येतो. त्यामुळे ते टुरिस्ट व्हिसा देतानाही काळजी घेतात. ऑस्ट्रेलियन व्हिसा घेऊन ऑस्ट्रेलियाला गेल्यावर तिथले इमिग्रेशनवाले फारसा त्रास देत नाहीत. अर्थात काही ठराविक प्रश्न असतात. म्हणजे 'कुठे राहणार?', किती दिवस राहणार? येण्याचं कारण? वगैरे! काही वेळा पैसे किती आहेत याचीही चौकशी होते. तुमची उपासमार होऊ नये आणि झालीच तर त्याचं ओझं त्यांच्या सरकारवर पडू नये हा त्यांचा विचार असतो.

परदेशी जाताना मित्र-नातेवाईकांसाठी भेट वगैरे घेऊन जायची आपल्याला हौस असते. तिथल्या कुठल्या तरी नातेवाईकाला रव्याचे लाडू आवडत असतात किंवा चिवड्यासाठी तो व्याकुळ झालेला असतो. काही वेळा अशी छोटी लाच देऊन महागड्या देशात पंधरा-वीस दिवस मुक्काम ठोकणंही सोपं जातं. काहींना तिथल्या मंडळींना भारतीय कलाकुसर दाखवायची हौस असते. त्यामुळे चंदनाची नक्षीदार पेटी किंवा तत्सम गोष्ट भेट देण्याचीही उबळ काहींना येण्याची शक्यता असते. ऑस्ट्रेलियाला जाताना अशा गोष्टी नेणं टाळावं.

कारण सांगतो, ही मंडळी त्यांची झाडं, त्यांची जनावरं, त्यांची माणसं,




आजच्या परवलीच्या शब्दात सांगायचं तर त्यांच्या पर्यावरणाच्या बाबतीत भयानक जागरूक आहेत. कुत्रं, मांजर, पक्षी वगैरे काही नेलंत तर त्याला 'क्वारनटाईन' मध्ये ठेवतात. ते त्यांच्या ऑस्ट्रेलियन जातभाईमध्ये मिसळण्यायोग्य आहेत अशी खात्री झाल्यावरच त्यांना मोकळीक मिळते. सुदैवाने माणसांच्या बाबतीत ते अजून तरी इतकी जागरुकता दाखवत नाहीत. पण फुलझाडे, लाकडाचं कुठलंही सामान आणि खाण्याचे पदार्थ ह्याकडे ससाण्याच्या नजरेने लक्ष ठेवतात. त्यांच्या कस्टमचं म्हणणं त्यांनी प्रत्येक विमानतळावर मोठ्या अक्षरात लिहिलेलं असतं. त्यांच्या पर्यावरणाला धोका निर्माण करणारं काहीही तुमच्याकडे असेल, तर ते त्यांच्या निदर्शनास आणून द्या, तुम्ही फसवण्याचा प्रयत्न केलात तर पाच-दहा हजार डॉलर्सच्या वरचा दंड तुम्हाला आरामात होऊ शकतो आणि अधिकाऱ्यांचे हात ओले करण्याच्या आत्मविश्वासाने तिथे कधीही जाऊ नये. आपल्याच हातात बेड्या पडायची शक्यता दाट असते.

मी बावळटासारखा फराळ घेऊन गेलो होतो. उदा., लाडू, चिवडा, चकल्या वगैरे. तिथल्या कस्टमवाल्यांनी फराळ फेकून नाही दिला, पण लाडू आणि चिवडा म्हणजे काय हे त्यांना समजावून सांगताना माझ्या पाककलेविषयीच्या ज्ञानाचे धिंडवडे निघाले. बरं, आमच्या इंग्रजीच्या मास्तरांनी चिवड्याला इंग्लिशमध्ये काय म्हणतात हे कुठे शिकवलं होतं? आमच्या इंग्रजी वाचनमालेत लाडूला 'लड्डूज' हा शब्द होता, पण त्या गोऱ्या कस्टम अधिकाऱ्यांच्या अभ्यासक्रमात तो शब्द नसावा. पुन्हा रवा म्हणजे काय हा प्रश्न आलाच. त्यांच्या डोक्यात अशा वेळी 'अमली पदार्थ' फिरत असतात. त्यामुळे त्याने

किंचित चव पाहिली. चव त्याला आवडलेली दिसली. 'व्हेरी टेस्टी!' असं तो बोलल्यावर माझ्या बायकोचाही चेहरा खुलला.

"तुम्हालाच फक्त मी केलेले लाडू आवडत नाहीत. त्या गोऱ्यालासुद्धा तो लाडू आवडला पहा." तिथल्या तिथे मला घरचा अहेर मिळाला. "मूठभर चिवडाही त्याला देऊन पहा हो, माझ्या आईने केलाय. त्याला नक्की आवडेल." हा पुढचा 'स्त्रीहट्ट' मला धुडकावून लावायची ताकद अंगात कशी आली देव जाणे, पण "थँक यू" म्हणून कस्टम अधिकाऱ्याच्या तावडीतून लगेच सुटका झाल्यावर माझा जीव भांड्यात पडला.

मी घाबरलो होतो त्याला कारण होतं. ऑस्ट्रेलियात माझा पहिला मुक्काम ॲडलेडला होता. ॲडलेड हे सर डॉन ब्रॅडमनचं गाव! म्हणजे माझ्यासारख्या क्रिकेटप्रेमीचं तीर्थस्थान! आपल्या क्रिकेटमधल्या देवाला भेटायला जायचं हे मी ठरवून टाकलं होतं. बरं, देवाकडे जाताना रिकाम्या हाताने तर जाता येत नाही. काहीतरी घेऊन जायला हवं. काय घेऊन जावं हा माझ्यापुढे मोठा प्रश्न होता. तिथलाच ऑस्ट्रेलियन पुष्पगुच्छ घेऊन जाण्यात मला रस नव्हता. काहीतरी भारतातून न्यावं ही इच्छा होती, पण अशा वेळी प्रश्न असतो न्यायचं काय? त्यात तो तर कुबेर!

अशी कोडी बायका छानपैकी सोडवतात. बायको म्हणाली, "आपण लाकडात कोरलेली गणपतीची मूर्ती देऊया. ब्रॅडमनच्या घरात इतर सर्व गोष्टी असतील. गणपती थोडाच असणार?" बायकोचा युक्तिवाद बिनतोड होता.

तिनेच गणपती आणला. तो नक्षीदार कागदात बांधला. त्यावर नावाचं कार्ड चिकटवलं आणि ॲडलेडला आम्ही घेऊन आलो. "लाकडाच्या वस्तू दाखवायलाच हव्यात" ही पाटी मी ॲडलेडच्या विमानतळावर वाचली आणि हादरलो. प्रामाणिकपणा दाखवला तर तो लाकडाचा गणपती कस्टम ऑफिसर फेकून देईल अशी भीती होती. त्यांच्या दृष्टीने ते लाकूड होतं. माझ्या दृष्टीने ती ब्रॅडमनला द्यायची भेट होती आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे तो गणपती होता. आपला देव! नाही दाखवलं आणि ती गिफ्ट सापडली की दंड होता. त्या दंडाच्या आकड्यात मी दोनदा ऑस्ट्रेलियाला चक्कर मारली असती,

गणपती नावाप्रमाणे दुःखहर्ता आहे हे त्यादिवशी उमगलं. कस्टम ऑफिसरची नजर त्याच्याकडे वळलीच नाही. म्हणूनच रव्याच्या लाडवाची चव त्याच्या जिभेवर रेंगाळत असतानाच मला पळायचं होतं.

विमानतळावरून बाहेर पडल्यावर मी बायकोला परिस्थितीची जाणीव करून दिली, पण ती गोऱ्याने केलेल्या रव्याच्या लाडवाच्या कौतुकांतून पूर्णपणे बाहेर आली नव्हती. ब्रॅडमन या शब्दाच्या उच्चारासरशी ती म्हणाली, "रव्याच्या लाडवाची एक जादा पुडी मी घेऊन आलेय. ती ब्रॅडमनला दिली तर..." ■

(२९ जानेवारी १९९५)

## □ संगीतमय ॲडलेड

सर डॉन ब्रॅडमनना द्यायचा लाकडात कोरलेला गणपती वाचवून मी ॲडलेड विमानतळावर उभा होतो.

आनंदाचा पहिला भर ओसरल्यावर मी सुधीर ठाकूरांच्या घरी फोन लावला. सुधीर ठाकूर म्हणजे जयहिंद प्रकाशनच्या ग. का. रायकरांचे जावई. ॲडलेडला मी त्यांच्याकडे राहणार होतो. सुधीर ठाकूर त्यावेळी मुंबईत होते. पण विजूताईंनी फोनवर सांगितलं, "टॅक्सी करा आणि ओबान स्टेशनवर या. मी तिथून तुम्हाला पिकअप करते." त्यावेळी त्यांना ड्रायव्हिंग लायसन्स मिळालं नव्हतं आणि तिथे "बिनधास्तपणे गाडी चालवायची यार. आर.टी.ओ.- ने धरलं तर पटवता येतं." वगैरे आत्मविश्वास दाखवता येत नाही. छोट्यामोठ्या स्तरावरं हात ओले करणं हा प्रकार नसतो. ड्रायव्हिंग लायसन्स ही तर काळजीपूर्वक जपण्याची गोष्ट असते. गाडीशिवाय माणूस तिथे अक्षरश: लुळा असतो. गाडीची चाकं हे माणसाचे पाय असतात.

'ओबान स्टेशन' हा माझ्या दृष्टीने एक नवा शब्द होता. मला त्याचा उलगडा झाला नाही. टॅक्सी ड्रायव्हरला विचारल्यावर तो म्हणाला, "ओह! ती बस आहे." त्याला क्रिकेटवर बोलण्यात जास्त रस होता. विशेषत: सचिन तेंडुलकरबद्दल! आणि मी सचिनच्या 'गावचा' म्हटल्यावर त्याला चेव चढला. त्याचे सचिनबद्दल प्रश्न विचारून झाल्यावर मी त्याला सर डॉनबद्दल विचारत होतो. त्या ओबान स्टेशनकडे जाता जाता तो मला ॲडलेड क्रिकेट ग्राऊंडजवळ घेऊन गेला आणि एखादं तीर्थक्षेत्र दाखवावं तसं म्हणाला, "हे आमचं क्रिकेट ग्राऊंड. मॅच असताना माझा मुक्काम इथेच जास्त असतो. त्या दिवशी टॅक्सी बंद. आजही मी तिथे येणार आहे."

त्याने मला ओबान बस स्टेशनवर सोडलं. तेव्हा नुकतंच कुठे उजाडलं होतं. विजूताई वाट पाहत उभ्या होत्या. 'ओबान' काय कुठे दिसली नाही.

"ओबान काय भानगड आहे?" मी विजूताईंना विचारलं. डोक्यातून ओबानचा विचार काही जात नव्हता.

"अहो, ती बस आहे. रस्त्यावर चालते आणि रुळावरही. जर्मनीमधून अलीकडेच आणलीय. तुम्ही मॅचला जाणार ना तेव्हा ओबाननेच जा." विजूताईंनी ओबानबद्दलची माझी उत्सुकता आणखीनच ताणली.

त्यांच्या घरी जाऊन विश्रांती घ्यायला वेळच नव्हता. मॅचला पळायचं

होतं. ब्रेकफास्ट घेऊन मी निघालो, तेव्हा गंधाली - विजूताईंची मोठी मुलगी माझी गाईड होती. आणि त्यांच्या छोट्या मुलाला गौरवला भारतीय क्रिकेटपटू पाहायचे होते. त्या मॅचएवढीच हौस मला ओबानने प्रवास करायची होती.

ॲडलेडच्या ज्या उपनगरातून आम्ही ओबान पकडली तिथे ओबान रुळावरून धावत होती. ती एखाद्या लांबलचक अलिशान बससारखी होती. तिला चाकंही बससारखीच होती. फक्त रुळावरून धावताना त्या बससारख्या चाकांच्या बाजूने रुळावरून धावणारी चाकं काँक्रीटच्या रुळात अडकायची आणि अक्षरश: ट्रेनच्या वेगाने ती पळायची. सिटी सेंटर आल्यावर ती चाकं आत लपली आणि ती बस झाली. ॲडलेडसारख्या फारशी गर्दी नसलेल्या पण लांबलचक पसरलेल्या शहराच्या दृष्टीने ती आदर्श आहे. सिटी सेंटरला जिथे गर्दी असते तिथे ती बससारखी वावरत असल्याने कुठंही वळू शकते. पण मुख्य शहराबाहेर मोकळी जागा भरपूर आहे आणि शहराने हातपायही लांब पसरले आहेत तिथे वेगात पोचायला रूळ उपयोगी पडतात. आधी ट्रेन आणि मग वेगळी बस असा प्रवास त्यामुळे ॲडलेडला वाचतो. अर्थात मुंबईसारख्या शहरात हा टू इन वन प्रकार चालणार नाही. जिथे लोकल ट्रेनमध्ये पोत्यात बटाटे कोंबावेत तशी माणसं कोंबलेली असतात तिथे बससारखी ओबान आपल्याला परवडणारच नाही.

फक्त साडेनऊ लाख लोकसंख्येचं शहर आहे ॲडलेड. पण आडवंतिडवं पसरलंय एखाद्या आडदांड माणसासारखं. शहर परीटघडीचं आहे. 'आपलं शहर सुंदर आहेच. स्वच्छही ठेवा' असे फलक तिथे लावलेले नव्हते. पण तरीही शहर स्वच्छ होतं. घाण करायला माणसंच रस्त्यात दिसत नाहीत. ठाकूर राहत होते त्या ॲडलेडच्या उपनगरात तर दुपारी रस्त्यावर माणूस चालताना दिसणं ही उघडा एस्किमो दिसण्याएवढी कठीण गोष्ट! दिसलेच तर आमच्यासारखे टुरिस्ट, नाहीतर म्हातारी माणसं. इतर चालताना दिसतात सिटी सेंटरमध्ये नाहीतर एखाद्या बागेत. रस्त्यावरून ते फक्त चार चाकांच्या गाडीतून फिरतात.

खरं तर ॲडलेडमध्ये चालत फिरण्यासारखं सुख नाही. माणसांपेक्षा झाडं आणि बागा जास्त आहेत. त्यामुळे कुठेही फिरलात तर छत्री धरणाऱ्या राजाच्या सेवकाप्रमाणे सावली घेऊन झाड उभं असतं. ओबानने आम्हाला जिथे सोडलं तिथून क्रिकेट ग्राऊंडवर पायी जायला अर्धा तास लागला. पण हा अर्धा तास जाणवला नाही. कारण वाटेत एकाहून एक सुंदर इमारती आणि बागा लागत होत्या. तिथलं सेंट फ्रान्सिस कॅथेड्रल जुन्या ॲडलेडची झलक दाखवतं. त्याच्या रंगीत काचांच्या खिडक्या फार आकर्षक वाटतात. सुप्रीम कोर्टाची इमारत पाहिली की पटतं, त्या काळात ब्रिटिश जे काही बांधायचे ते भक्कम आणि सुंदर असायचं. पण सध्याचे ऑस्ट्रेलियन आर्किटेक्टही कलेच्या बाबतीत कमी नाहीत. क्रिकेट स्टेडियमच्या जवळ असलेलं ॲडलेड फेस्टिव्हल सेंटर

पाहात राहावंसं वाटतं. ती भव्य इमारत नाही की एखाद्या प्रासादासारखी नाही. मॉर्डन आर्टमधलं शिल्प असावं असं ते सेंटर दिसतं. टॉरेन्स नदीच्या काठावर हे शिल्प एकोणीसशे सत्त्याहत्तर साली उभारलं गेलं. तिथल्या कॉन्सर्ट थिएटरची क्षमता दोन हजार माणसांची आहे. सिडनीमधलं ऑपेरा हाऊस जास्त प्रसिद्ध आहे. पण निखळ सौंदर्य आणि उपयुक्तता याचा विचार केला तर ॲडलेडचं फेस्टिव्हल सेंटर त्या ऑपेरा हाऊसपेक्षा तसूभरही कमी सुंदर नाही.

त्या सेंटरचं सौंदर्य डोळ्यांत रेंगाळत असतानाच मी ॲडलेडच्या क्रिकेट मैदानावर पोहोचलो. जगात इतकी सुंदर मैदानं फार कमी आहेत. त्यानंतर मी सिडनी पाहिलं, ब्रिस्बेन पाहिलं, मेलबर्न पाहिलं. ती स्टेडियमस् प्रचंड आहेत. एक लाख प्रेक्षक मेलबर्नमध्ये बसले की ते मैदान अंगावर आल्यासारखं वाटतं. ॲडलेडचं मैदान भव्य नाही. पण बिलीयर्ड टेबल अंडाकृती झालं आणि प्रचंड वाढलं तर जसं दिसेल तसं ते दिसतं.

तो परिसरच अस्सल कलावंताला वेड लावणारा आहे. ते जुनं चर्च, त्यातला तो घंटानाद, ते फेस्टिव्हल सेंटर. त्याचं प्रतिबिंब मिरवत, रमतगमत फिरणारी टॉरेन्स नदी, त्या नदीत गळ टाकून बसलेला एकांडा शिलेदार वगैरे गोष्टी एखाद्या चित्रकाराला आव्हान ठराव्या अशाच.

मी तिथे गेलो तेव्हा संगीत महोत्सव सुरू होता. जगातले कलाकार आपली कला त्या कॉन्सर्ट हॉलमध्ये हजारो प्रेक्षकांपुढे पेश करीत असतानाच क्रिकेटमधला एक कलाकार त्या क्रिकेट ग्राऊंड नामक नैसर्गिक बिलीयर्डस् टेबलावर आपली कला दाखवत होता. त्याच्या हातातली बॅट कॉन्सर्ट हॉलमधल्या व्हायोलिनवादकाच्या 'बो' सारखी नाजूक वाटत होती. ती बॉलवरून फिरली की त्यातून उमटणारे सूरही रसिक प्रेक्षकांच्या कानाला गोड लागत होते. त्या कलाकाराचं नाव होतं महंमद अझरुद्दीन!

भारत तो सामना हरला. पण त्या संगीतमय वातावरणाचा गोडवा अजूनही कानात साठून राहिलाय.

■

(५ फेब्रुवारी १९९५)

## □ घर आणि माणसं, दोन्ही प्रशस्त


अॅडलेडमध्ये मी दिलीप ठाकूराचा बंगला पाहिला आणि माझे डोळे विस्फारले.

मी ज्या सुधीर ठाकूरकडे उतरलो होतो त्यांचा दिलीप हा भाऊ आहे. तो दहा-पंधरा वर्षे तिथे आहे. तो आणि त्याची बायको फिजिओथेरपिस्ट आहेत. वैद्यकीय व्यवसायातली कुठलीही डिग्री घेऊन तुम्ही ऑस्ट्रेलियात गेलात की तुमच्या हातावरची धनरेषा वाढतच जाते. मेहनत अर्थातच करावी लागते. पण मेहनतीचं झाड सदैव फळांनी बहरलेलं असतं. मुंबईतला फिजिओथेरपिस्ट स्वप्नसुद्धा पाहू शकणार नाही असं वैभव दिलीप ठाकूरकडे आहे.

छोट्याशा टेकडीवर त्याचा बंगला आहे. त्या टेकडीने मुकुट चढवल्यासारखा तो बंगला दिसतो. त्याचा हॉल इतका मोठा आहे, की एखादी गाण्याची मैफल, नाटकाचा प्रयोग सहज होऊ शकतो. किंबहुना दिलीपची कल्पना तो हॉल मोठा करताना तीच होती. भारतातून कलाकार आले की अॅडलेडमधली मराठी माणसं दिलीपच्याच घरी जमतात.

ऑस्ट्रेलियात राहणारा माणूस 'घर' या गोष्टीबाबत भयंकर सुखी असावा. मुलीचं लग्न आणि घर या दोन गोष्टी अशा आहेत, ज्यासाठी मुंबईच्या मध्यमवर्गीय माणसाला आयुष्याची पुंजी ओतावी लागते. तरीही मिळून मिळून मिळणार तीन खोल्या. म्हणजे मुलाचं लग्न झालं की बोंबला! इतरांनी मग हॉल किंवा स्वयंपाक खोलीत झोपायचं. यावरून एक गोष्ट आठवली, ऑस्ट्रेलियात एका गोऱ्या मित्राला छोटचा घरात राहणाऱ्या माझ्या मित्राचा किस्सा सांगितला होता. त्याचं हसून हसून पोट दुखलं.

तर तो किस्सा असा आहे - एक मोठी बाल्कनी आणि खोली असलेल्या घरात तो माझा मित्र, त्याचे दोन भाऊ आणि आईवडील राहायचे. पुढचं त्याच्या शब्दातच सांगतो, "आम्ही सर्व एकत्र झोपायचो. एकदा रात्री जाग आली. बाजूला सहज आईवडिलांकडे पाहिलं आणि डोळे गच्च मिटून घेतले. दुसऱ्या दिवसापासून मी माझा बिछाना गॅलरीत घातला. वडिलांनी विचारलं, "का रे गॅलरीत झोपतो?" मी काय सांगणार कपाळ. फक्त म्हटलं इथे वारा चांगला लागतो. बहुधा वडीलही समजूतदार असावेत. वर्ष-दीड वर्षाच्या आत चंदू, माझा दुसरा भाऊ, गॅलरीत झोपायला आला. मी त्याला विचारलं, "का रे, गॅलरीत का?" "तू पाहिलं तेच मी पाहिलं" तो म्हणाला आणि मग आम्ही




दोघं मिळून तिसरा भाऊ गॅलरीत झोपायला कधी येतो याची वाट पाहायला लागलो.''

हे ऐकून तो ऑस्ट्रेलियन मित्र फक्त गडबडा लोळायचा शिल्लक होता. त्यांच्याकडे हे घडूच शकत नाही. तिथे माणसी एक खोली असणं ही चिल्लर गोष्ट आहे. ज्याला आपण श्रीमंतीच्या सुखसोयी म्हणतो, त्या गोष्टी तिथे प्रत्येक खोलीत सहजपणे असतात. हे इथपर्यंत ठीक आहे. पण मुंबईत मध्यमवर्गीय जाऊ देत, उच्च मध्यमवर्गीय समजल्या जाणाऱ्यांकडे बाथरूममध्ये टब किती जणांकडे असतात? जवळजवळ नसतात. तिथे टबशिवाय बाथरूम तयार होत नाही. ही सुद्धा त्यांच्या दृष्टीने चिल्लर गोष्ट आहे. पण त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे उच्च मध्यमवर्गीय माणूस तिथे घरात एखादा स्विमिंग पूल, स्पा किंवा जॅक्युझी सहज मिरवतो. हे प्रकार तुम्ही - आम्ही फक्त हिंदी सिनेमातल्या बंगल्यात पाहतो. तेही व्हिलनच्या, हिरोच्या नव्हे. कारण व्हिलन स्मगलिंग करत असतो. हीरो बिचारा सदाचारी असतो. सदाचारी राहून त्याला फक्त घरात शॉवर किंवा गिझर परवडतो. तिथे ऑस्ट्रेलियात स्मगलिंग न करता चारचौघांसारखी मेहनत करून अजिबात पैसे न खाता किंवा कट न घेता एखादा डॉक्टर, एखादा इंजिनीयर किंवा ऑफिसर स्विमिंग पूल - जॅक्युझीवाल्या प्रशस्त घरात सहज राहू शकतो.

तिथे घराप्रमाणे माणसंही प्रशस्त आहेत. मनाने आणि शरीराने! शुद्ध हवा, चीज, लोणी यांची आहारात रेलचेल आणि वाईन यामुळे हडकुळा ऑस्ट्रेलियन माणूस सापडणं ही काळा पारशी सापडण्याएवढी कठीण गोष्ट आहे. तीच गोष्ट मुलींच्या बाबतीत!

'उफाड्याची' हा शब्द त्यांच्या शरीरयष्टीला न्याय देऊ शकतो. गोऱ्या बिंदू, माला सिन्हा, मौसमी, नीतू सिंग आजूबाजूला फिरतात असं वाटतं. पंडितराज जगन्नाथ नाटकात, जगन्नाथ लवंगिकेचं वर्णन करताना म्हणतो, "उरोज कुंभापरी रम्य हा कुंभ शोभतो शिरी." तिथे शिरी कुंभ घेऊन फिरणाऱ्या कुणीच नसतात. पण उरलेलं वर्णन मात्र लवंगिकेसारखं! त्यांच्यात नाजुकपणा नसतो. लाजणं, मुरडणं तर त्यांना ठाऊकच नाही. क्रिकेटची मॅच पाहायला येताना एक तोकडी हाफ पॅन्ट आणि ब्रेसियरची थोरली बहीण वाटावी अशी चोळी त्यांना पुरते. तो तिथला समर ड्रेस! ऑस्ट्रेलियात मुलींचं प्रमाण एका मुलामागे दोन मुली असं आहे. कुठल्याही क्रिकेटपटूसमोर ऑस्ट्रेलियन दौऱ्याच्या आठवणी काढा, त्याने उसासे टाकलेच पाहिजेत. त्यांना ऑस्ट्रेलियाला जाताना इंद्राच्या दरबारी फेरी मारून आल्यासारखं वाटतं.

ही माणसं बोलायलाही चांगली आहेत. गोरा ब्रिटिश आणि गोरा ऑस्ट्रेलियन यांच्या स्वभावात खूपच तफावत आहे. ब्रिटिश माणसाचं बोलणं जितक्यास तितकं. ब्रिटीश माणूस ट्रेन किंवा बसमध्ये बसला की पुस्तकात किंवा वर्तमानपत्रात डोकं खुपसून बसतो. ऑस्ट्रेलियन माणसाला गप्पा मारायला आवडतात. अनोळखी माणसाच्या खांद्यावरही ते आरामात हात टाकतात. त्यामुळे इंग्लंडमधल्या गाडीच्या डब्याप्रमाणे ऑस्ट्रेलियात शांतता नसते.

मला वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्याच्या वेळची गोष्ट आठवते. तो सामना इंग्लंडला हरवून पाकिस्तानने जिंकला. ऑस्ट्रेलियन जनतेची इंग्लिश संघावर परंपरागत खुन्नस, त्यामुळे त्या दिवशी ऑस्ट्रेलियन्स अफाट खूष झाले. मेलबर्नला तो सामना संपवून घरी परतताना ट्रेनमध्ये गर्दी होती, ऑस्ट्रेलियन्स जास्त होते. डोक्यात बीयर चढली होतीच. मी माझ्या स्टेशनवर उतरेपर्यंत किमान शंभर जणांनी माझ्याशी हस्तांदोलन केलं असेल. त्यांना मी पाकिस्तानी वाटलो. अर्थात फक्त गव्हाळ रंगावरून.

सांगायचा मुद्दा काय, घट्ट मिटलेले ओठ, तोंडावर शिळे भाव घेऊन गोरे ब्रिटिश फिरतात. ऑस्ट्रेलियन माणूस बरोबर याच्या उलट. त्यामुळे ऑस्ट्रेलियात फिरताना कंटाळा येत नाही.

■

(१७ एप्रिल १९९४)

## □ श्रीमंत मराठी माणूस

प्रचंड श्रीमंत मराठी माणूस सापडणं ही मिशी नसलेली सिंधीण सापडण्याएवढी आजही मला कठीण गोष्ट वाटते.

मध्यंतरी शिवसेनाप्रमुखांच्या प्रचारदौऱ्याचा वृत्तांत पाठवण्यासाठी एक छोटा दौरा मी त्यांच्याबरोबर केला. त्यांची गाडी एका ठिकाणी एका बंगल्याच्या पोर्चमध्ये शिरत असताना ते मला म्हणाले, "मी पैज लावायला तयार आहे. हा बंगला मराठी माणसाचा असू शकत नाही. मराठी माणूस अजून गरीबच राहिलाय."

तो बंगला खरंच मराठी माणसाचा नव्हता.

पण मराठी माणसांची ऑस्ट्रेलियातली घरं पाहून मी काही वेळा थक्क होत होतो. डॉ. प्रधानांचा बंगला पाहून माझी छाती फुगली. जगाच्या पाठीवर कुठे तरी मराठी माणूस चित्रपटात पाहतो तशा बंगल्यात राहतो हे पाहून बरं वाटलं. अर्थात मराठी माणसाला असं वैभव परदेशांतच शक्य असतं. तिथे एखादा हुशार डॉक्टर, शास्त्रज्ञ, इंजजिनीयर वैभवात राहू शकतो. प्रधानांच्या तोडीची श्रीमंत माणसं ऑस्ट्रेलियात रग्गड असतील. त्यांचं मला कौतुक होतं मराठी म्हणून.

ते सिडनीच्या जवळ गॉसफोर्ड नावाच्या छोट्या शहरात राहतात. मुंबईच्या परिघाबाहेर जसं ठाणं किंवा कल्याण तसं ते गॉसफोर्ड होतं. सिडनीला रात्री मॅच संपल्यावर आम्ही त्यांच्याबरोबर गॅसफोर्डला गेलो होतो. गाडीत त्यांचं कुटुंब होतं. ते, त्यांची डॉक्टर बायको, दोन मुली आणि आम्ही दोघं असे सहाजण गाडीत ऐसपैस बसलो होतो. झोप डोळ्यावर होती. गाडीत डुलक्या घ्यायलाही जागा होती. ती गाडी नेमकी कुठली होती मला आठवत नाही.

कारण काही गोष्टी मी नेमक्या ओळखू शकत नाही. उदा., चप्पट नाकाच्या पिवळ्या जमातीत मला सोडलं तर नेमका चिनी कुठला, कोरियन कुठला, जपानी कुठला आणि थायी कुठला हे मी सांगू शकणार नाही.

झी टी. व्ही. वर एवढी गाणी पाहूनसुद्धा नेमकी सोमी अली कुठली, सोनाली कुठली आणि शिबा कुठली यात गोंधळ उडतोच. सुदैवाने ममता कुलकर्णीने स्टारडस्टवर अगदी ऐसपैस हजेरी लावून गोंधळातून स्वतःचं नाव कमी केलं. आता मी ममता कुलकर्णी पाठमोरीही ओळखू शकतो.

परदेशी गाड्यांचंही तसंच आहे. होंडा, निसान, वोल्वो, फेरारी,




बी.एम.डब्ल्यू, ऑडी वगैरेंच्या गोंधळातून नेमकी गाडी ओळखणं कठीण जातं. प्रधानांच्या उरलेल्या दोन गाड्या मला नीट आठवतायत. एक होंडा होती. अर्थात तिची पोटजात म्हणजे ॲकॉर्ड की इतर काही ते आठवत नाही. दुसरी मर्सिडीज होती. मी जशी मॅडोना कुठूनही ओळखतो तशी मर्सिडीज कुठूनही ओळखतो. प्रधानांनीही मला आवर्जून सांगितलं होतं, ''मी जेवढी मेहनत ऑस्ट्रेलियात घेतली तेवढी भारतात घेतली असती तरी मर्सिडीज ठेवणं मला जमलं नसतं. माझं गाड्यांवर प्रेम आहे.''

गाड्यांचा जनानखाना ठेवायला तुम्हांला प्रेमाएवढा पैसाही लागतोच. पण त्यांचं गाड्यांवर प्रेम नक्कीच असावं. त्या रात्री १२-१२॥ च्या सुमारास प्रत्येकाच्या डोळ्यांवर झोप असताना गाडीतून काहीतरी बारीक आवाज यायला लागला. ते अस्वस्थ झाले. त्यांनी गाडी थांबवली. कशामुळे आवाज येतोय याचा अंदाज घेतला. पण तो आवाज येतच राहिल्यावर ते शेवटपर्यंत चिंताक्रांत वाटले. तो आवाज पडलेल्या सुईपेक्षा मोठा नव्हता. पण तोही खुपायला गाडीवर प्रेम असावं लागतं. अर्थात अशी गाडी असली तरच आवाज खुपतो. फियाट असेल तर आवाज आला नाही तर विचित्र वाटतं.

रात्री त्यांच्या बंगल्यावर पोहोचल्यावर कधी एकदा झोपतो असं झालं होतं. बंगल्याची शान मला सकाळी उठल्यावर कळली. उठून खिडकीच्या बाहेर डोकावलो तर पाणी दिसलं. खिडकीजवळ गेल्यावर कळलं की एखाद्या माणसाची पाद्यपूजा करावी तशी त्या बंगल्याचीच पाद्यपूजा सुरू होती. बंगल्याबाहेर जेट्टी होती. (बोटीसाठी लाकडी बंधारा)

आणि दोन-चार छोटचा यॉटस् पाण्यात डुलत होत्या.

मी ते दृश्य पाहात असताना डॉ. प्रधान मला म्हणाले, "ती माझी जेट्टी आणि यॉटस् अधूनमधून मी बोटिंग करतो. त्या बाबतीत मी पूर्ण ऑस्ट्रेलियन आहे."

ऑस्ट्रेलियन माणूस बीयरएवढाच पाण्यावर प्रेम करतो. बीयरने तो घसा ओला करतो. पाण्याने घसा ओला करायच्या भानगडीत तो पडत नाही. पाण्यात त्याला डुंबायला आवडतं. श्रीमंत ऑस्ट्रेलियन माणसाकडे स्वत:ची यॉट असते. सुट्टी मिळाली की ती घेऊन तो समुद्रात शिरतो. प्रधानांनी हौस भागवायला खाडीच्या तीरावर घर बांधलं आणि स्वत:ची जेट्टी बांधली. घरात बिलीयर्ड आणि टेबलटेनिसची टेबल्स ही सुखं आपल्याकडच्या मराठी माणसाच्या घरात क्वचित असतात. प्रधानांकडे ती सुखं होती. प्रशस्त हॉल, मनुष्याचं सुख वाढवणारे आणि मनुष्याला मदत करणारं प्रत्येक मशीन त्यांच्याकडे होतं. पण घरात नोकरचाकर कुणीही नाही. चहा प्याल्यावर कप त्यांनीच धुऊन-पुसून ठेवले.

घरापुढच्या बागेत त्यांनी भाज्या लावल्या होत्या. "जेवताना यातली कुठली तरी भाजी ताटात येणार." त्यांनी सांगितलं, "चला, माझा दुसरा बंगला दाखवतो" म्हणून मर्सिडीजमधून दुसऱ्या बंगल्यावर ते मला घेऊन गेले. गेल्या लेखात मी ऑस्ट्रेलियातल्या प्रशस्त बंगल्याचं वर्णन केलं होतं. त्यांचा दुसरा बंगलाही तसाच होता. स्विमिंगपूल जॅक्युझी वगैरे! "आम्ही इथे सध्या राहत नाही. पण बंगला 'वेल फर्निशड्' आहे."

"वीस वर्षांच्या मेहनतीनंतर मी हे कमावलं. पण वीस वर्षांत अफाट मेहनत घेतलीय मी. बऱ्याच वेळा ४८-७२ तास न झोपता मी काम केलंय. त्यामुळे हे उभं राहिलं. आजही आम्हांला दोघांना मिळून १८ तास काम करावं लागतं. पण मेहनतीतून आम्ही काय उभं केलंय ते आपल्यापैकी कुणी तरी पाहावं अशी इच्छा होती. तुम्ही आलात, मला बरं वाटलं."

■

(१९ फेब्रुवारी १९९५)

## □ सुखदु:खं स्थलांतरितांची

परदेशी स्थायिक झालेल्या जवळपास प्रत्येकाला वाटत असतं की आपल्या देशातलं कुणी तरी यावं. त्याने आपण मिळालेलं यश पाहावं. तिथे त्याचं कौतुक करणारं कुणी नसतं: कारण रोज गाडीत बसणाऱ्या माणसाला गाडीत बसण्याचं कौतुक नसतं. ते कौतुक आयुष्य रस्त्यावरून चालण्यात गेलेल्या माणसाला असतं. गॉसफोर्डच्या प्रधानांना त्यांचं यश मला दाखवताना आनंद होतोय हे मला कळत होतं. तेवढाच आनंद त्यांचं वैभव पाहताना मला होत होता. पहिल्या पिढीतल्या इमीग्रंटची कथा ही अगदी नेहमीच फिनिक्स पक्षासारखी नसते, पण त्याला तिथे स्वत:चं घरटं एक एक काडी करत जमवायचं असतं. मदतीला घरच्या कुणाचा हात नाही, अशा परिस्थितीत उभं करायचं असतं. त्यामुळे मला तरी त्यांचं नेहमीच कौतुक वाटतं.

डॉ. प्रधानांचं गॉसफोर्ड गाव, हे आपल्या स्वप्नातल्या गावासारखं आहे. एका बाजूला डोंगर आहे आणि दुसऱ्या बाजूला पाणी. पहिल्या जगातलं गाव हे आपल्या गावासारखं नसतं. शेणाने सारवलेली किंवा झावळीचं छप्पर डोक्यावर ओढणारी घरं तिथे नसतात. घरं अद्ययावत असतात. गॉसफोर्डची काही घरं आरामात पाण्यात पाय सोडून बसली होती. ज्यांना डोंगराच्या कुशीत राहायला आवडतं त्यांनी घरं तिथे बांधली होती. अशा ठिकाणी शहरापेक्षा गावात राहण्यातच गंमत असते. शहराच्या सर्व सुखसोयी तिथे असतातच. अगदी शाळा, कॉलेज आणि अद्ययावत हॉस्पिटलसह. पण शहरातली ती वर्दळ, दगदग नसते. पुन्हा राहणीमान शहरापेक्षा थोडं स्वस्तच.

तिथे प्रधानांचा स्वत:चा कन्सल्टिंग रूम-कम दवाखाना आहे. सकाळी बायकोने तो सांभाळल्यावर प्रधानांनी मला गॉसफोर्ड आणि आजूबाजूचा निसर्ग दाखवला. संध्याकाळी त्यांच्या सौ. ने आम्हाला फिरवलं.

गोरा माणूस तुमच्याकडून औषधपाणी अगदी पूर्ण विश्वासाने घेतो. त्याला डॉक्टर 'गोरा' लागत नाही? त्यांच्या दवाखान्यातली गोऱ्या रोग्यांची रांग पाहून मी विचारलं.

ते म्हणाले, "तो जमाना गेला. आम्ही भारतीय निष्णात आहोत हे त्यांना पटलंय." आणि त्यांनी पुढे जे सांगितलं ते छाती फुगण्यासारखं होतं. भारतीय आणि चिनी डॉक्टर्सनी तिथल्या गोऱ्या डॉक्टर्सची पंचाईत करून टाकलीय. भारतीय आणि




चिन्यांची मुलंही याबाबतीत आघाडीवर आहेत. तिथे मेडिकलच्या प्रवेशासाठी आपल्याप्रमाणेच पंच्याण्णव-अठ्ठयाण्णव टक्के गुण लागतात. त्यात भारतीय-चिनी मुलेच आघाडीवर असतात. त्यामुळे गोऱ्यांची पंचाईत व्हायला लागली. त्यांनी मग एक शक्कल लढवली. मार्कांच्या टक्क्याबरोबरच एक मौखिक परीक्षा ठेवली. त्यामुळे मार्क कमी पडूनही या परीक्षेद्वारे गोऱ्या मुलांना मेडिकलला जायचा एक रस्ता मिळाला.

भारतीय मुलांच्या हुशारीमागे काही रहस्य वगैरे नाही. तिथं भारतातून गेलेली मंडळी मुळातच हुशार असतात आणि मेहनतीही असतात. त्याशिवाय त्यांचे दरवाजे तुमच्यासाठी उघडत नाहीतच, पण महत्त्वाची आणखीन एक गोष्ट आहे. या स्थलांतरितांची मुलं तशी सुखात वाढलेली असतात. पण घरात अभ्यासाचे आणि मेहनतीचे संस्कार त्यांच्यावर होत असल्यामुळे गोऱ्या मुलांपेक्षा ते थोड्या वेगळ्या संस्कारात वाढतात. गोऱ्या घरातला मुलगा अठरा वर्षांचा झाला की घरातून तो पहिल्यांदा बाहेर उडायला बघतो. "पोराला अठराव्या वर्षापर्यंत वाढवला" ही तिथल्या सामान्य गोऱ्यांच्या दृष्टीने बापाच्या कर्तव्याची परिसीमा असते. चिमण्याचे पंख आता बळकट आहेत. त्याने भरारी घ्यायला हरकत नाही ही त्यांची भावना असते. तिथे एक तर उच्च शिक्षण महाग असतेच आणि गोरे फार मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षणाकडे वळत नाहीत. आपली परंपरा वेगळी आहे. मुलामुलींचे शिक्षण पूर्ण होऊन त्यांचे लग्न झाल्याखेरीज आपलं कर्तव्य संपलं असं आपल्याकडचे

आई-वडील मानत नाहीत. अर्थात तिथे उच्च शिक्षण महाग असतं, पण स्थलांतरित भारतीय मेहनतीने सुखवस्तू झाल्यामुळे त्यांच्या मुलांच्या ते आवाक्याबाहेरचं नसतं.

तिथला प्रत्येक स्थलांतरित सुखवस्तू (त्यांच्या मोजमापाने) झालाय असं मानायचं कारण नाही. ऑस्ट्रेलियन सरकारने स्थलांतरितांसाठी दरवाजे उघडल्यावर बरेच भारतीय तिथे गेले. तिथे जायचा मार्ग तसा कठीण नाही. दिल्लीच्या ऑस्ट्रेलियन एम्बसीत इमिग्रेशनचे फॉर्म मिळतात. ते भरायचे. तुमच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे काही गुण बहाल केले जातात. अर्थात गुणांच्या बाबतीत तिथे कुठल्या शैक्षणिक पात्रतेची जास्त गरज आहे त्यावर गुण अवलंबून असतात. तिथल्या मागणीप्रमाणे इमिग्रेशन दिलं जातं. म्हणजे समजा तिथे कॉम्प्युटर इंजिनीयरची मागणी असेल तर ती शैक्षणिक पात्रता असलेल्यांना आधी संधी मिळते. त्यांना नर्सेसची गरज असेल तर नर्स असलेल्या महिलांना संधी मिळते. ते गणित असं आहे.

इमिग्रेशन मिळालं म्हणजे तिथे नोकरी मिळाली असं नाही. नोकरी तुम्ही तिथे जाऊन शोधायची असते. नोकरी मिळेपर्यंत तुम्हाला तिथे छोटं घर किंवा हॉटेलातली रूम राहायला दिली जाते आणि उदरनिर्वाहासाठी एक भत्ता मिळतो. त्याला 'डोलमनी' म्हणतात. या 'डोलमनी'च्या जोरावर तुम्ही उदरभरण करू शकता, पण चैन नाही. इथून जाणाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवायची असते की पायघड्या घालून तुमची तिथे वाट पाहिली जात नाही.

एक उदाहरण देतो. मेलबोर्नला एका तेलगू कुटुंबाकडे मी राहात होतो. नाव घेत नाही, पण तो कुटुंबप्रमुख इंजिनीयर होता. हिंदुस्थानात सिमेन्ससारख्या कंपनीत तो वरच्या हुद्यावर होता. कंपनीचं घर होतं. गाडी होती. कंपनीतर्फे तो एकदा जर्मनीला गेला आणि तिथलं राहणीमान पाहून तो वेडावला. महालात राहायची आपली लायकी असताना आपण झोपडीत राहतो याबद्दल त्याची खात्री झाली. जर्मनीने काही भारतीयांसाठी दरवाजे उघडलेले नाहीत. मग काय करायचं? त्याने ऑस्ट्रेलिया गाठली. कारण राहणीमान थोडं त्याच प्रकारचं. हिंदुस्थानातला बंगला आणि गाडी सोडून तो मेलबोर्नला आला. तिथे येऊन त्याला दोन वर्षं झाली होती, पण अपेक्षित सुखं काही त्याला मिळाली नव्हती. तिथे स्वत:ची गाडी असणं ही पुण्यात स्वत:ची सायकल असण्याएवढी सामान्य गोष्ट आहे, पण त्याची स्वत:ची गाडी नव्हती. त्याला इंजिनीयर म्हणून त्याच्या लायकीचा जॉब मिळाला नव्हता. तो हुशार आहे. आज ना उद्या तो तिथेही मोठा होईल, पण स्वत:चं घर सोडून दुसऱ्याच्या देशात वनवासाला जायची गरज काय? मग त्या वनातली झाडं सोन्याची असली तरी काय झालं?

त्यामुळे एक लक्षात ठेवायचं की तिथला प्रत्येकजण डॉ. प्रधान नसतो आणि प्रधान व्हायलाही कष्ट कमी नसतात.

■

(२६ फेब्रुवारी १९९५)

## □ तो दिवसच ग्रेट होता

ऑस्ट्रेलियात ॲडलडला खास जाऊन पाहावं असं काही नाही. 'खास' ची माझी व्याख्या अशी की आग्र्याला आपण ताज पाहायला जातो. पॅरिसला जाऊन आयफेल टॉवर पाहून पिगालमध्ये किमान चक्कर मारल्याशिवाय अस्सल पर्यटकाला मोक्ष मिळत नाही.'

तर असं काही खास ॲडलेडमध्ये नाही. स्वच्छ, सुंदर, शांत शहर, कडक इस्त्रीच्या कपड्यासारखं, राहायला चांगलं आहे. अद्ययावत आणि कमी लोकसंख्येची शहरं राहायला नेहमीच चांगली असतात, पण जीवाचा आटापिटा करून पाहावं असं तिथं सर्वसाधारण माणसाच्या दृष्टीने काही नाही.

नाही म्हणायला शॉपिंग आर्केडमधले दोन स्टेनलेस स्टीलचे एकावर एक ठेवलेले मोठे गोळे पाहण्यासारखे आहेत. संपूर्ण 'पियाझा' चं प्रतिबिंब त्यात पडलेलं दिसतं. बरं, शॉपिंग सेंटर्समधून फेरफटका मारायला हरकत नाही. तसं तिथं 'विन्डो शॉपिंग' नेहमीच आकर्षित करतं. तिथं ठेवलेली प्रत्येक वस्तू आपल्या घरात आणि आपल्या अंगा-खांद्यावर असावी असं वाटतं.

'डायमारु' या शॉपिंग सेंटरमध्ये गेल्यावर मनात पहिली इच्छा जन्म घेते की आपल्यावर देव प्रसन्न व्हावा आणि 'वत्सा, काहीही माग' असा कोरा चेक त्याने आपल्यासमोर ठेवावा. देवाने कधी काळी असा कोरा चेक दिलाच तर काय मागावं यासंबंधी तुमच्या इच्छाआकांक्षा वेगवेगळ्या असतील. कुणी आयुष्य मागेलं, कुणी संपत्ती मागेल, एखादा चाणाक्ष मॅडोना मागेल. (म्हणजे संपत्ती आणि मादक सौंदर्य हातात हात घालून येईल.) पण तुम्ही 'डायमारु' मध्ये असाल किंवा लंडनच्या 'हॅरॉड्स'मध्ये, तर त्याक्षणी ते शॉपिंग सेंटर मागण्यापलीकडे तुम्ही दुसरा विचारच करणार नाही.

पण देव प्रसन्न झाला नाही तर मध्यम किंवा उच्च मध्यमवर्गीय माणसाला बीयरचा कॅन, एखादा शर्ट, रंगीबेरंगी सनग्लासेस सोडल्या तर बाकी काही विकत घेणं परवडत नाही. तिथं स्वेटर्स किंवा लोकरीचे कपडे सुंदर मिळतात. मुंबईत गुलाबी थंडी पडावी आणि ते स्वेटर्स अंगावर असावेत असं मला नेहमी वाटतं. (स्वप्न पाहायला पैसे थोडेच मोजावे लागतात !) पण ते मध्यमवर्गीय खिशाला परवडत नाही. लोकर त्यांच्या घरात बनते. ऑस्ट्रेलियात माणसांएवढ्याच दणकट मेंढ्या आणि गाई-म्हशी 'धष्टपुष्ट' वाटतात. पण तरीही



स्वेटर्स महाग, कारण लोकर देणाऱ्या मेंढ्या त्यांच्याकडे असल्या तरी लोकरीवर पुढचे संस्कार जपान करतं आणि त्यातल्या त्यात चीन-तैवानमध्ये तयार झालेले स्वेटर्स स्वस्त तरी असतात. लोकरीवर संस्कार करून ती ऑस्ट्रेलियन माणसाच्या हातात पडली की ती महाग होते.

तर सांगायचा मुद्दा असा की, ॲडलेडला शॉपिंगसाठी जाऊया म्हणून जायची तसदी घेण्यासारखे तिथे काही नाही, पण क्रिकेटप्रेमीला तिथं जाऊन सर डोनाल्ड ब्रॅडमनचं दर्शन घेतल्याशिवाय मोक्ष मिळत नाही. म्हणून माझ्या दृष्टीनं ते तीर्थस्थान होतं.

'२-होल्डन स्ट्रीट, केसिंग्टन पार्क, ॲडलेड' हा त्या तीर्थस्थानाचा पत्ता. चला, ॲडलेडला आलोच आहोत तर सौ. ब्रॅडमनच्या हातचा चहा घेऊन जाऊ इतक्या सहजतेनं. त्या घरात शिरता येत नाही किंवा दरवाजाची बेल वाजवल्यावर! "एवढ्या लांबून आलात. आत्ताच आमच्या हिने गरम गरम पिझ्झा केलाय. खाऊनच जा." असं खुद्द सर डॉन सांगतायत असं चित्र डोळ्यांसमोर आणू नका. तो देव अलीकडे क्वचितप्रसंगी दर्शन देतो. मला त्याने दर्शन दिलं ही गणपतीची कृपा. मी गणपतीची मूर्ती ॲडलेडच्या कस्टम ऑफिसरचा डोळा चुकवून आणली होती. ती पण सर डॉनना दिली. सर डॉन भेटले नाहीत तरी हरकत नाही. सिटी सेंटरमधला जुना म्युझियम ॲडलेडला गेलात तर पाहायला विसरू नका. म्युझियममध्ये नेहमीच्या वस्तू आहेतच. तिथल्या आदिवासी जमातीची कौतुकं आहेच. (त्या आदिवासींना ऑस्ट्रेलियातल्या गोऱ्यांनी काय कमी छळलं नाही. आजही त्यांच्या गिळंकृत केलेल्या जमिनी त्यांना मिळत नाहीयेत, पण त्यांची

कौतुकं म्युझियममधून केली की जग त्याची नोंद घेतं. असो.) पण या म्युझियममध्ये सर डॉन ब्रॅडमनच्या वस्तूंचं एक खास दालन आहे. त्यांचे कपडे, त्यांचे ग्लोव्हज्, त्यांनी वापरलेल्या बॅटी, त्यांना मिळालेली काही बक्षिसं, जुने स्कोअर कार्डस्, जुनी कात्रणं वगैरे गोष्टी तिथं ठेवल्या आहेत. ते दालन आपल्याला ब्रॅडमनच्या काळात घेऊन जातं. ज्यांना ब्रॅडमन नीट माहीत नाही त्यांना त्यांच्या देवत्वाची प्रचीती आणून देतं.

मला त्या दालनाचे फोटो घ्यायचे होते. मी आपला सभ्य माणसासारखा परवानगी घ्यायला गेलो. मी एक पाहिलंय, जगात अशा ठिकाणी परवानगी मागायला आपण गेलो की हातात नकार पडतो किंवा आमच्या हातात नाही, वरच्या अधिकाऱ्याला विचारायला हवं वगैरे उत्तरं मिळतात. ॲडलेडचा तो म्युझियम त्याला अपवाद नव्हता. त्या अधिकाऱ्यांनी मला सुनावलं, "त्यासाठी मला सर डॉन ब्रॅडमनची परवानगी घ्यावी लागेल, तसा आमचा नियम आहे. तुम्ही समोरच्या कोचावर बसा. मी त्यांच्याशी फोनवर संपर्क साधता येतो का पाहतो." मी आपला आज्ञाधारकपणे कोचावर जाऊन बसलो. परवानगीची वाट पाहता पाहता माझ्या लक्षात आलं की, एक गोरा पर्यटक बिनधास्तपणे कॅमेरा चालवतोय. मी ठरवलं की सभ्यपणा थोडा बाजूला ठेवायचा. सरळ कॅमेरा घेतला आणि फोटो काढले. फोटो काढून परत कोचावर येईपर्यंत तो अधिकारी शोधत माझ्याकडे आला आणि म्हणाला,

"तुमचा इथला फोननंबर देऊन ठेवा. ब्रॅडमनकडून परवानगी घेणं अजूनही आम्हांला जमलेलं नाही. जमलं की कळवतो."

"जरूर कळवा." मी त्यांना म्हटलं आणि ठाकूरांच्या घरचा नंबर दिला. त्या दिवशी ठाकूरांना घेऊनच मी सर डॉनना भेटलो. तिथून ठाकूरांच्या घरी जेवायला गेलो. रात्री सौ. ठाकूरांनी सांगितलं, "ॲडलेडला येऊन तुम्ही ॲडलेडचा कॅसिनो पाहिला नाही हे योग्य नाही. चला, कॅसिनोत जाऊया."

का कुणास ठाऊक, कॅसिनो ह्या गोष्टीचं मला स्वत:ला कधीच आकर्षण वाटलेलं नाही. जुगारात माझं नशीब नाही, हे त्यामागचं कारण असेल. माझं नशीब इतकं वाईट आहे की रमी खेळताना, मी टाकलेलं पान पुढचा माणूस हमखास उचलतो. जोकरला माझ्याजवळ यावं असं कधी वाटतच नाही आणि एकदा गंमत म्हणून तीन पत्ते खेळताना माझ्याकडे तीन राण्या आल्या. "राण्यांचा ट्रायो" म्हटल्यावर खिशातले सर्व पैसे लावले, पण समोरच्याकडे तीन एक्के निघाले. त्या दिवशी ठरवलं, बाई-पत्त्यातली असली तरी-टाळायची. कारण त्यात नशीब नाही.

पण सौ. ठाकूरांच्या आग्रहाखातर मी गेलो. कॅसिनो नेहमीसारखाच होता. ती गोल चक्रं, ती उभी चक्रं, पत्त्याचे डाव वगैरे. प्लॅस्टिकच्या रंगीबेरंगी नाण्यांचा खुळखुळाट ऐकायला येत होता. बायकोने सांगितलेल्या नंबरवर दहा डॉलर लावले. गोल चक्र वेगाने

फिरून थांबलं आणि माझा डोळ्यांवर विश्वास बसेना. दहाचे पन्नास डॉलर झाले.

तो दिवसच ग्रेट होता. कुणाला न भेटणारा ब्रॅडमनं भेटला आणि चक्क जुगारात पैसे मिळाले. पण त्यानंतर मी पुन्हा कधी कॅसिनोत गेलो नाही. माझ्या कुंडलीत असे दिवस फार नाहीत हे मला ठाऊक आहे.

■

(५ मार्च १९९५)

सिडनी ही ऑस्ट्रेलियाची मुंबई आहे.

बहुरंगी-बहुढंगी, रात्ररात्र जागवणारी. कुणालाही आपली वाटावी अशी.

इथे फक्त गोरे दिसत नाहीत. पिवळे चिनी-कोरियन दिसतात. आपले भारतीयही तिथे बरेच आहेत. मराठी माणूससुद्धा तिथे शेकड्यात मोजावा लागेल. सिडनीत फिरताना वेगवेगळ्या काळातल्या इमारती दिसतात. तुम्ही जॉर्ज स्ट्रीटवरून चाललात तर जुनं आणि नवं स्थापत्यशास्त्र एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून उभं राहिलेलं दिसेल आणि त्या जॉर्ज स्ट्रीटच्या टोकाला पोचलात की तुम्ही रॉक्सला जाऊन अडकता.

रॉक्स म्हणजे सिडनीचा गर्भ. इथूनच नवं सिडनी शहर जन्माला आलं. कॅप्टन आर्थर अकरा बोटित अकराशे माणसं घालून बारा हजार सागरी मैलांचं अंतर पार करून इथं आले. त्या अकराशे मंडळीत सातशे गुन्हेगार होते. एका वर्षात तिथं ब्रिटिश पद्धतीचं पहिलं 'गव्हर्नमेंट हाऊस' उभारण्यात आलं. १९४० साली तिथं सोनं सापडल्यावर गोरं जग तिथं घुसलं. पण आजही तिथे त्या काळातल्या गुन्हेगारांनी उभारलेली घरं व्यवस्थित उभी आहेत. 'कॅडमनस् कॉटेज' नावाची एक जुनी इमारत त्या जुन्या आठवणी चाळवत आजही तिथे उभी आहे. १८१६ ही तिची जन्मतारीख. रॉक्सचं ऐतिहासिक रूप तसंच ठेवताना तिथे घाण होणार नाही हे त्यांनी

## □ स्वर्ग तिथे सापडेल

डोळ्यात तेल घालून पाहिलंय. आपल्याकडे जुनं शहर पाहताना जो अनुभव येतो तो तिथे येत नाही. आपण फक्त जुनं ते सोनं म्हणतो. तिथे जुनं सोन्यासारखं जपलेलं असतं.

तुम्ही 'रॉक्स' कडून 'किंग क्रॉस'ला गेलात की तुमचा मूड बदलतो. तुम्ही रंगेल असाल तर तिथून पाय सहजासहजी हलणार नाहीत. वेगवेगळ्या रंगाचे दिवे तुमचं लक्ष आकर्षित करून घेतील. अर्धनग्न मुलींच्या जाहिराती तुम्हाला त्यांच्याकडे ओढतील. चाणाक्ष असाल तर तुम्ही सिडनीच्या रेडलाईट एरियातून फिरतायत हे लक्षात यायला वेळ लागणार नाही. पुरुषांनी 'विंडो शॉपिंग' करायला काही हरकत नाही. लालबत्ती विभागाला शहराची 'खरुज', 'महारोग', 'कॅन्सर' किंवा तत्सम विशेषण लावलं की आपलं सामाजिक कर्तव्य पार पडतं. पण तिथं नाइट लाइफ हा कौतुकाचा भाग असतो. ते हॅम्बर्गर खातात. वाइन पितात.


टेनिस खेळतात. तशीच नाइट लाइफची मजा लुटतात. ती बकाल, कुबट वास मारणारी एरिया नसते.

पण सिडनी पायी चालून पाहण्यासाठी तिचं एकदा 'वरतून' दर्शन घेणं सर्वात उत्तम. त्यासाठी तीनशे मीटर उंचीच्या सिडनी टॉवरवर जावं. पाच डॉलरमध्ये वर जाता येतं. दक्षिण गोलार्धातील ती सर्वात उंच इमारत मानली जाते. तिथून शिवधनुष्यासारखा तो सिडनी हार्बर ब्रीज दिसतो. हा पूल सिडनीचं वैभव आहे. १९३२ साली तो तयार झाला. वरतून सिडनी ऑपेरा हाऊसही एखाद्या पाण्यात कमळ उगवावं तसं दिसतं. त्याचं छप्पर कमळांच्या पाकळ्यांसारखं आहे. सिडनीच्या सांस्कृतिक जीवनाचं ऑपेरा हाऊस हे शो-पिस आहे. सिनेमा, बॅले, नाटक, शास्त्रीय संगीताच्या बैठकी ऑपेरा, रॉक संगीताचा धांगडधिंगा, एकूण कलेची वेगवेगळी रूपं एका मोठ्या कुटुंबाप्रमाणं इथं नांदतात. तो अनुभव घ्यायला हरकत नाही. अनुभवाची किंमत भारतीय रुपयांत फक्त एक हजार दोनशे पन्नास रुपये आहे. पण इतक्या दूर गेल्यावर सौंदर्यानुभव रुपयांत मोजता येत नाही.

असं टॉवरमधून सिडनीचं दर्शन घेतल्यावर मग खाली येऊन मोनोरेल घेऊन सिडनी हार्बरवर जावं. मोनोरेल ही आपल्यासाठी नावीन्यपूर्ण गोष्ट आहे. या मोनोरेलमधून सिडनीचं होणारं दर्शन मनोहर आहे. ही रेल शहराच्या हृदयात आहे आणि रक्तवाहिनीसारखी ह्या हृदयात फिरते. एका बाजूला एकमेकांच्या मिठीत विसावलेले फ्लायओव्हर्स आहेत. हे इतके मिसळलेले असतात की एक कुठून सुरू होतो आणि दुसरा कुठे संपतो ते कळत नाही. मोनोरेलने एकदा हार्बर गाठलं की तिथून पाय निघणं कठीण जातं. शॉपिंग तिथे, जेवण तिथे, एक्सरेटेड सोडून सर्व नाईट लाईफ तिथे आणि पाहण्यासारखी सर्व स्थळे तिथे. कॅटमरीनमध्ये बसायचं आणि समुद्रात बागडायचं.

पण कॅटमरीनमध्ये बसण्यापूर्वी सिडनीचं मत्स्यालय पाहायलाच हवं. त्यापुढे मुंबईतलं मत्स्यालय हे डबकंच आहे. पण ऑकलंडचं मत्स्यालय सिडनीच्या मत्स्यालयापुढे म्हणजे सेंट पीटर्सपुढे गावचं चर्च! त्यांचा मत्स्यालयाचा कन्सेप्ट आपल्या मत्स्यालयापेक्षा वेगळाच असतो. तिथे माशांच्या घरात आपण फिरत असतो. आपल्या घरात मासे नसतात. काचेचे प्रचंड टनेल. त्यात पाणी आणि शार्कपासून रंगीबेरंगी माशापर्यंत सर्व प्रकारचे मासे. समुद्राच्या पोटातलं जग किती सुंदर आहे याची ती झलक असते.

एकदा कॅटमरीनमध्ये बसलात की ती तुम्हाला विविध ठिकाणी घेऊन जाते. त्या शिवधनुष्याकृती प्रचंड हार्बर पुलाचं दर्शन देते. शास्त्राला गुलाम करून माणसाने केवढी प्रगती करून घेतली आहे हे तो पूल पाहिल्यावर कळतं. ऑपेरा हाऊसमध्ये माणसाच्या कल्पनाशक्तीचा आणि कलेच्या आसक्तीचा प्रत्यय येतो. तुम्हाला झाडाफुलांची आवड असेल तर नीट प्रेमाने जोपासलेलं बोटॅनिकल गार्डन तिथे आहे. सत्तावीस हेक्टरच्या



जमिनीवर चारशे प्रकारची झाडंझुडुपं तिथं फुलवली आहेत. त्या गार्डनच्या उतारावर गालिच्यासारख्या पसरलेल्या गवतावर लोळायला खरी मजा येते. तुमचे डनलॉप आणि यू फोम त्यापुढे झक मारतात. "पर्यटकहो, घ्या इथे विश्रांती" असे तिथे फलक नाहीत. पण फलक लावायची गरजच नाही. बोटीतून ती झुडुपं आणि गवताच्या पायघड्या पाहिल्या की रसिक माणूस लोळायला तिथे जातोच. प्राणी पाहण्याची हौस असेल तर तिथून प्राणिसंग्रहालयही जवळ आहे. त्या प्राणिसंग्रहालयात एक गोष्ट बरी असते. अमक्या प्राण्याला हात लावू नका, तमकी गोष्ट करू नका अशी कटकट नसते. कोआला हा छोटा केसाळ प्राणी. ही कांगारूप्रमाणे ऑस्ट्रेलियाची एक खासीयत. या कोआलांना हातात घेऊन गोंजारत फोटो काढायची मुभा तुम्हाला असते. या कॅटमरीन सर्व्हिसमध्ये एक सोय चांगली आहे. तुम्ही एक विशिष्ट तिकीट घेतलं की या हार्बरच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या विविध गोष्टी पाहू शकता. समजा, त्या बोटॅनिकल गार्डनमध्ये लोळायचं असेल तर कॅटमरिनने तिथे उतरायचं.

हे सर्व सुंदरं आहेच. पण वेडावलो होतो बॉनडाय बीच पाहून. अंगावर येणारा निळा समुद्र, लुसलुशीत वाळू पाहिली की माझ्या पायांना तिथं न्यावं लागत नाही. ते आपोआप तिथे सरकतात. बॉनडाय बीच हा असा बीच आहे की जिथून निघताना पाय जड होतात. गोल्ड कोस्ट सिटीएवढी ती वाळू गुदगुल्या करणारी नाही. पण बॉनडाय बीचचं दृश्य अफाट असतं. विशेषत: शनिवार रविवारी असंख्य गोरे स्त्री-पुरुष आपलं शरीर वाळूत आणि निळ्या समुद्रात 'झोकून' देतात. चतकोर कपड्याशिवाय त्यांच्या

अंगावर काही नसतं. समोरच्या रस्त्यावरच्या दुकानात तुम्हाला सर्व मिळतं. कॉसच्युम्स, टॉवेल, प्लास्टिकची गादी, रंगीबेरंगी छत्री, शरीराला लावायचं तेल, रंगीबेरंगी गॉगल, हवी असल्यास यॉट किंवा छोटा तराफा घ्यायचा आणि समुद्रात शिरायचं. "निळं पाणी, पाण्यावर ती प्लॅस्टिकची गादी, हातात बीयर आणि आजूबाजूला सौंदर्य मिरवणाऱ्या मुली," वगैरे स्वर्गात रमणारा व्हिलन आपण हिंदी चित्रपटात पाहतो. सुखाची प्रत्येकाची व्याख्या वेगळी असते, पण सुखाच्या अनेक कल्पनांत मी वर सांगितलेली व्हिलनची गोष्ट अंतर्भूत असेल तर तुम्हाला व्हिलन व्हायची गरज नाही.

■

(१९ मार्च १९९५)

परवा एक मित्र डोळे मिचकावत मला म्हणाला, "जैन टीव्ही लावत जा. विशेषत: शनिवारी रात्री. निळे चित्रपट दाखवतात."

निळ्या चित्रपटासारखं काहीतरी दिसल्यावर वयाच्या पस्तिसाव्या वर्षीही तो रोमांचित वैगरे झाला होता. त्याने सांगितल्याप्रमाणे मी शनिवारी रात्री जैनचा चॅनेल लावला. चित्रपट पाहिला. खरा गडद निळा चित्रपट तो नव्हता. थोडीशी निळाई होती, बस!

आपला शहरी समाज या दृष्टीने आता थोडा 'प्रौढ' होत चाललाय. हे प्रौढत्व आपल्या समाजाला मानवणारं नसल्यामुळे गडद निळाई दाखवण्यावर आपल्याकडे बंदी आहे. अर्थात कुठल्याही व्हिडीओ लायब्ररीतून निळे चित्रपट (ब्ल्यू फिल्म्स) सहज मिळतात. वर नाव भक्त प्रल्हाद किंवा तत्सम असेल, पण आतल्या लीला प्रल्हादाच्या नसतात.

पाश्चात्त्य देशांत आणि ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्ये वर येसू किंवा मेरीचं नाव देऊन ब्लू फिल्म विकावी लागत नाही. त्यांनी प्रौढांचं प्रौढपण मान्य केलंय. त्यांचा हा चित्रपट पाहायचा हक्क मान्य केलाय. तुम्हाला अठरावा वाढदिवस होइपर्यंत फक्त थांबावं लागतं. तो झाला की तुम्हाला प्रौढ समजलं जातं आणि प्रौढांच्या मनोरंजनासाठीची दालनं तुमच्यासाठी उघडली जातात.

ही दालनं वेगवेगळी असतात. सेक्स शॉप्स, पीप शो, छोटे कॅब्रे, ब्लू फिल्मस्‌ची थिएटर्स, टॉपलेस बार्स वगैरे छोट्या-मोठ्या गोष्टी मी सध्या जमेस धरत नाही.

## □ प्रौढ मनोरंजन

सेक्स शॉप ही एक विचित्र गोष्ट आहे. बाहेर पाटी लिहिलेली असते, 'तुम्हाला जर आपल्या हातून गुन्हा होतोय असं वाटत असेल तर कृपया आत येऊ नका.' खरं तर ही पाटीच तुम्हांला आत खेचते. पहिल्यांदा माणूस 'आपण गुन्हा तरी काय करतोय' हे पाहायला आत शिरतो.

तुमच्या सेक्स आणि नीतिमत्तेबद्दल कल्पना जुनाट नसतील तर गुन्हा केल्यासारखं अजिबात वाटत नाही.

तिथे सेक्सविषयक सर्व असतं. म्हणजे ब्लू फिल्मच्या कॅसेटस्, संभोगाच्या निरनिराळ्या आसनांची चित्रं वगैरे. या गोष्टी हिंदुस्थानातही पाहायला मिळतात, पण तिथे इतरही असतं. म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची औषधं असतात. त्यात विविध स्प्रे आणि स्पॅनिश फ्लायसारखी वासना चेतवणारी औषधं. आपण वेडे होतो सेक्स करण्याचे




कृत्रिम अवयव पाहून! ते रबराचे असतात. त्याचं काम एवढंच - संभोगसुख द्विगुणित व्हावं. बरं, त्यात स्त्री-पुरुष भेदभाव नाही. पुरुषापेक्षा बाईच्या सुखाची जास्त काळजी घेतलीय असं मला सुरवातीला वाटलं, पण नंतर पुरुषी चैन पाहिली चक्क एक डॉल होती. टंच बाईसारखी दिसणारी, पण रबराची. एरवी ती उशी एवढी बारीक असते. फोल्ड केलेली. त्यांत हवा भरली की तुमच्यापुढे रबराची सोफिया लॉरेन तयार. ती कशासाठी असते हे मी सांगायची गरज नाही.

एक गोष्ट ध्यानात ठेवा, तिथे मिळणारी प्रत्येक गोष्ट महाग असते. त्यामुळे विकत घेणाऱ्यांपेक्षा बघे तिथं जास्त असतात. या वस्तू विकायला बहुतेक दुकानात बायका असतात. तुम्ही त्यांना एखाद्या गोष्टीबद्दल विचारलत तर त्या अत्यंत शांत चेहऱ्याने तुम्हाला त्या वस्तूचा उपयोग समजावून सांगतात. आपल्याला कदाचित त्या बाईला सरळसरळ सेक्सच्या उपकरणाबद्दल विचारायला लाज वाटेल, पण सौभाग्यवस्तू भांडारातल्या सेल्स गर्लने गंगावन किंवा आकड्यांची माहिती द्यावी त्या सहजतेने त्या मुली तुम्हाला हवी ती माहिती देतात.

'पीप शो' हा आपल्यासाठी आणखी एक नवखा प्रकार. आपल्याकडे पूर्वी नाही का 'दिल्ली का कुतुबमिनार देखो' किंवा 'हेमामालिनी का रोमान्स देखो' म्हणत एक खेळ यायचा. डोळ्यापुरती फट असायची आणि त्यातून आत पाहिलं की चित्रं दिसायची, पण तो 'पीप शो' वय वर्ष आठ ते दहा किंवा फार तर चौदासाठी असायचा. हा अठराच्या पुढच्यांसाठी असतो. या 'पीप शो' साठी छोट्या छोट्या

केबिन्स असतात. एकावेळी एकच माणूस केबिनमध्ये जाऊ शकतो. तिथे सुरुवातीला काहीच दिसत नाही. भोवताली डोळे फिरवले की एक यंत्र दिसतं. त्या यंत्रात एक नाणं टाकायचं. त्या त्या देशाच्या चलनाप्रमाणे. मग एक चौरस फुटाच्या आकाराच्या काचेभोवतीचं आवरण बाजूला होतं. आत नग्न बाई नाचत असते. काही वेळा अशा ठिकाणी लेस्बीयन शो (दोन स्त्रियांची संभोगावस्था) सुद्धा दाखवतात. साधारण तीन-चार मिनिटांसाठी ती नग्न बाई आणि तुम्ही यात फक्त त्या काचेचं अंतर असतं. ती नाच करते. खरं तर अंगविक्षेपच म्हणावं. एखादा फ्लाईंग कीस देते आणि आतून कळ दाबते. ती चौरस फुटाची काच बंद होते. पुन्हा उघडायची असेल तर आणखी एक नाणं टाकायचं.

बरं, ब्लू फिल्म पाहायची असेल तर शनिवार रात्रीची वाट पाहायची गरज नाही. छोटंसं थिएटर असतं आणि सोळा मि.मी. च्या फिल्म्स् असतात. तिकीट काढून आत शिरलात की कितीही तास आत बसा. सतत फिल्म सुरू असते. अर्थात फिल्म्स तीन-चारच असतात, पण त्या आपल्याला पुन:पुन्हा दाखवल्या जातात.

इथे फिरणारी मंडळी कोण असतात हे महत्त्वाचं आहे. तिथले रहिवासी फार क्वचित तुम्हाला तिथे सापडतील. या जगात मोकळेपणा इतका आहे की, त्यांना त्याचं काही अप्रुप नाही. त्यांची तरुण मंडळी पब्ज किंवा डिस्कोत मग्न असतात. इथे वळायला त्यांना वेळ नसतो. जे स्वत: रतीसुखात मग्न असतात त्यांना इतरांनी केलेला संभोग पाहण्याचा आंबटशौकीनपणा आवडत नसावा. तिथे असतात पर्यटक. गोरे, जपानी, अरब वगैरे. हिंदुस्थानी पर्यटकही आपला खिसा चाचपत फिरताना दिसतात. ब्लू फिल्म पाहण्यात म्हाताऱ्यांना जास्त रस असतो. एका थिएटरच्या डोअरकीपरने मला सांगितलं होतं की, काही म्हातारे तिथे दिवसभर बसतात.

एक गंमत म्हणून हे सगळं पाहायचं असेल तर पाश्चात्त्य जगात तुम्हाला हे कुठेही मिळेल. पण सिडनीत असाल तर किंग क्रॉस रोडवरून एक चक्कर मारा. जैन टीव्ही 'बालभारती' एवढा निरागस वाटेल.

■

(२६ मार्च १९९५)


## □ देखणं ब्रिस्बेन


सिडनीच्या खालोखाल प्रेमात पडावं असं ऑस्ट्रेलियन शहर म्हणजे ब्रिस्बेन आणि तिथून तासाच्या अंतरावर असणारी गोल्ड कोस्ट सिटी. सर्वच ऑस्ट्रेलियन शहरं समुद्रकाठावर आहेत. ब्रिस्बेन समुद्राबरोबर नदीच्या अंगाखांद्यावर खेळणारं शहर आहे.

सिडनीप्रमाणेच या शहराचा इतिहास अट्टल गुन्हेगारांपासून सुरू होतो. कॅप्टन लोगनच्या कडक शिस्तीखाली गुन्हेगारांनी हे शहर वसवलं. सुरुवातीला इतरांना या शहराजवळ फिरकू देत नव्हते. पण सोन्याच्या खाणी गवसल्यावर ब्रिस्बेनवरचं इतरांचं आक्रमण रोखणं कठीण गेलं आणि बघता बघता हे शहर जगाच्या नकाशावर जाऊन बसलं. एकोणीसशे ब्याऐंशी साली तिथे 'कॉमन वेल्थ गेम्स' झाले. एकोणीसशे अठ्ठ्याऐंशी साली वर्ल्ड एक्स्पो साजरं झालं. एक्क्याण्णव साली लायन्सचं आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन झालं आणि साउथ बँक पार्कलँडचं उद्घाटन झाल्यावर तर ब्रिस्बेनचा चेहरा बदलला.

गोऱ्या माणसाची एक गोष्ट मला आवडते. फुलझाडांचे ते खरे सगेसोयरे असतात. ते जिथे राहायला जातात तिथे प्रथम बाग वसवतात आणि मग स्वत:चं घर. आता पाहा ना. ब्रिस्बेनमध्ये आले अट्टल गुन्हेगार. पण त्यांनी अठराशे चोवीसमध्ये वसवलं. बोटॅनिकल गार्डन. ते अपुरं वाटलं म्हणून अठराशे पंचावन्न साली आणखी एक बोटॅनिकल गार्डन उभारलं. आता तर ब्रिस्बेनच हिरवंगार आहे. आपण जंगलं तोडतो. ते वसवतात. त्यांनी ब्रिस्बेनमध्ये सव्वीस हजार पाचशे हेक्टर्समध्ये जंगलं वसवली. माऊंट कुथा नावाचा ब्रिस्बेन शहरात एक डोंगर आहे. त्या माथ्यावर जाऊन ब्रिस्बेन पाहिलं की ब्रिस्बेन हिरव्या रंगाचा कोट चढवलेल्या बलदंड पुरुषासारखं वाटतं.

तिथं जुनं आणि नवं ब्रिस्बेन पाकात रसगुल्ला मुरावा तसं मुरून गेलंय. ब्रिस्बेन नदीच्या एका कमनीय काठावर सिटीसेंटर वसलंय. तिथे सँडस्टोनपासून तयार केलेलं चर्च तुम्हाला वसाहतीच्या दिवसांकडे घेऊन जाईल, पण पुढच्या पावलावर एखादा असा ग्लास टॉवर दिसेल की तुम्ही धाडकन नव्या युगात येऊन थडकाल. ब्रिस्बेनमध्ये तर ग्लास टॉवर्सचं प्रदर्शन आहे. ब्रिस्बेनएवढे सुंदर ग्लास टॉवर्स मी फक्त न्यूझीलंडमध्ये वेलिंग्टनला पाहिले होते. इमारतीच्या इमारती विविध रंगांच्या काचांनी तयार झालेल्या असतात. त्या काचांमुळे इमारतींना ठोकळेबाजपणाचं रूप येत नाही. एखाद्या




स्त्रीप्रमाणे इमारतीलाही लावण्य असतं हे तिथे कळतं.

ब्रिस्बेनमध्ये फिरताना जुन्या-नव्याचं द्वंद्व मनात सतत होत असतं. सिटी हॉल पाहिला की भव्यत्वाची प्रचीती येते. एकोणीसशे तीस साली तो बांधला. मधाळ रंगांच्या सँडस्टोनची ती इमारत आहे. खरं तर तिला इमारत म्हणणं म्हणजे गंडस्थळाला कपाळ म्हणण्यासारखं आहे. त्यांना प्रासाद हाच शब्द योग्य. आयॉनिक आणि कॉरिंथियन पद्धतीचे स्तंभ त्या इमारतीला आहेत आणि त्यावर पंचाऐंशी फूट उंचीचा क्लॉक टॉवर आहे. त्यात एक आर्ट गॅलरी आणि म्युझियमही आहे.

ब्रिस्बेनमधल्या आणखी सुंदर प्रासादतुल्य इमारती म्हणजे तांब्याचं घुमट असलेलं कस्टम्स हाऊस, नालडॅहम हाऊस (त्याचा आता पॉश क्लब झालाय) आणि जुनं पोर्ट हाऊस-जुनं वसाहतीचं वातावरण टिकवून ठेवणारं ते रेस्टॉरंट आहे. आजही तिथे पाय ठेवलेल्या पहिल्या गुन्हेगारांनी बांधलेल्या दोन इमारती आहेत. एकात रॉयल हिस्टॉरिकल सोसायटीचं ऑफिस आहे. दुसरी पवनचक्की आहे. ती अठराशे अठ्ठावीस साली बांधली. तिचा पूर्वी उपयोग कैद्यांचं धान्य दळण्यासाठी केला गेला आणि एकोणीसशे चौतीस साली ऑस्ट्रेलियन दूरदर्शनच्या पहिल्या ब्रॉडकास्टसाठीही उपयोग करण्यात आला. आज जुन्या आठवणी जपत ती पवनचक्की उभी आहे.

साउथ बँक हा या शहराचा नवा आणि तरुण चेहरा आहे. जिथे 'एक्स्पो ८८' ने ठाण मांडलं होतं, तिथंच साउथ बँक उभारलं गेलं. मी मघाशीच म्हटलंय की काहीही उभारताना गोरा माणूस आधी झाडांची काळजी घेतो. ब्रिस्बेन नदीचा हा

काठही त्यांनी हिरवा करून टाकलाय. ब्रिस्बेनवासीयांच्या दृष्टीने ते करमणुकीचं स्थळ आहे. हुंदडण्याचं, पिकनिक साजरी करण्याचं आणि कलात्मक भूक भागवण्याचं. तुम्ही चालत फिरा किंवा सायकलने, (सायकलसाठी खास वेगळे मार्ग आहेत.) शहरात राहून निसर्गाच्या मांडीवर बागडतोय असं वाटतं. हिरव्या रंगाचा कंटाळा आला तर स्वागत करायला समुद्राची निळाई असतेच.

पण तुमची कलात्मक हौस भागवण्याची क्षमता आहे. या साउथ बँकला खेटून उभं असलेल्या क्वीन्सलॅण्ड कल्चरल सेंटरची. नदीच्या रम्य काठावर आर्ट गॅलरी, म्युझियम, लायब्ररी आणि ऑपेरा हाऊस एकत्र कुटुंबासारखी नांदतात. जगात काही स्थळं असतात, की जी पाहिल्यावर वाटतं की आपल्याकडे या स्थळांचं वर्णन करण्यासाठी शब्दभांडार नाही. हे क्वीन्सलॅण्ड कल्चरल सेंटर पाहताना तसं वाटतं. मी अनुभव घेऊन तो तुमच्याकडे 'पास ऑन' करू शकत नाही. ते पाहायलाच हवं.

आर्ट गॅलरीत काय नाही? ऑस्ट्रेलियन आणि आंतरराष्ट्रीय कलेचं कलेक्शन आहे. मुख्य म्हणजे वर्कशॉप्स, फिल्मस् लेक्चर्समधून त्यातलं सौंदर्य लोकांना खुलवून दाखवण्याचा प्रयत्न आहे.

त्यांचा ऑडिटोरियम पाहिला की आपल्या ऑडिटोरियम्सना 'बैठकीची खोली' म्हणावंसं वाटतं. बॅले, ऑपेरा, संगीताच्या बैठकीसाठी जो ऑडिटोरियम आहे तो अद्ययावत तर आहेच, पण दोन हजार माणसं तर आरामात बसू शकतात. म्युझियमही असाच तगडा आहे. त्यांच्या ब्रोशरप्रमाणे या म्युझियममध्ये वीस लाखांच्यावर वस्तू आहेत. नैसर्गिक सायन्स आणि क्विन्सलॅण्डचा सामाजिक इतिहास दाखवणारा म्युझियम तर अफलातून आहे. ऑस्ट्रेलिया असो किंवा युरोप, तिथले म्युझियम किंवा आर्ट गॅलऱ्या या घाईगर्दीत पाहण्याच्या गोष्टी नसतात. दर्दी माणूस दिवसेंन्दिवस तिथे घालवू शकतो. या कल्चरल सेंटर्सच्या विविध इमारती आणि त्याचं इंटीरियर डेकोरेशन पाहणं हासुद्धा एक वेगळा अनुभव असू शकतो.

म्हणूनच मी मघाशी म्हटलं, हा अनुभव वाटता येत नाही. तो घ्यायलाच हवा. ब्रिस्बेनला गेलात तर घ्यायला विसरू नका !

■

(२ एप्रिल १९९४)

# हवाई पुराण



# ▫ चला वाळूच्या देशात

या वेळी शारजा-दुबईला मी क्रिकेट सामन्यांसाठी गेलो होतो.

एकोणीसशे त्र्याऐंशी साली मी इंग्लंडहून येताना काही तास दुबई विमानतळावर थांबलो होतो. ते दुबईचं छोटंसं का होईना, माझं पहिलं दर्शन होतं. विमानातून बाहेर आल्यावर उष्णता म्हणजे काय असू शकते याची मला पहिल्यांदा जाणीव झाली. सेहेचाळीस डिग्री सेंटिग्रेड त्यावेळी उष्णतामान होतं आणि विमानातून ड्यूटी फ्री शॉपमध्ये जाईपर्यंत भट्टीतून चालल्यासारखं वाटलं. आत अर्थात सर्वच एअरकंडिशण्ड. त्यावेळी दुबईतलं ड्यूटी फ्री शॉप हे जगातलं सर्वात स्वस्त ड्यूटी फ्री शॉप मानलं जायचं. त्यात मी इंग्लंडच्या हिथ्रोवरून आलेलो. हिथ्रोवर खरेदी करण्यापेक्षा लंडनमध्ये हॅरॉडस्‌ला किंवा आपल्याकडच्या ताजच्या शॉपिंग सेंटरमध्ये खरेदी करणं स्वस्त पडत असावं. त्यामुळे जो तो त्या दुबईच्या ड्यूटी फ्री शॉपिंग सेंटरवर तुटून पडला होता.

मी सिव्हिल इंजिनीयरिंगची पदवी घेतल्यावर दुबईला नोकरीला जायचा विचार केला होता. आमचा अर्धा वर्गच दुबई-मस्कतला निघून गेला होता. काही घरगुती कारणांमुळे मी जाऊ शकलो नाही. आपण जाऊ शकलो नाही याची टोचणी मनाला लागली होती. विमानातून पाहिलेलं वाळवंट आणि उतरल्यावर अनुभवलेली भट्टी पाहून वाटलं, झालं ते बरं झालं. पण त्यानंतर १९८५ पासून परवापर्यंत क्रिकेटच्या निमित्ताने तिथं जाणं होतच राहिलं. प्रत्येक वेळचा अनुभव वेगळा होता. प्रत्येक वेळी अरब अमिरातीतला फरक जाणवत होता. वाळू कमी कमी होऊन वाळूची जागा रंगीबेरंगी काचांनी नटलेल्या गगनचुंबी इमारती किंवा रंगीबेरंगी फुलांचा संसार थाटून बसलेली हिरवीगार झाडं घेतायत असं वाटत होतं.

दुबई - अबूधाबी, शारजा किती बदललंय हे पाहण्यासाठी दुबईतला म्युझियम पहावा. कॉसमॉस स्ट्रीटकडे शॉपिंगसाठी जाताना पार दुबईतल्या त्या मार्केटच्या मुखावरच ते म्युझियम वसलय. तिथे जुनं दुबई दिसतं आणि नवं दुबई जुन्या दुबईच्या किल्ल्यात ते म्युझियम वसलंय. फक्त चाळीस वर्षांपूर्वी तिथे काहीही नव्हतं. मातीची घरं, गाढवाच्या पाठीवरून आणलेलं पाणी, लंबूटांग उंट, खजुराची झाडं, सर्वत्र वाळूच वाळू आणि गरीब अरब. मासेमारी आणि समुद्रातले मोती काढणे हा धंदा. मातीच्या महालात राहणाऱ्या राजाने कर काढून टाकल्यामुळे दुबई आजच्या भाषेत

सांगायचं तर 'फ्री पोर्ट' झालं होतं, पण तरीही श्रीमंती ओसंडून वाहत नव्हती.

खरं तर वाहत होती, पण समुद्राखालच्या खडकांत काळ्या तेलाच्या रूपाने. एकोणीसशे बासष्ट साली तिथे तेल गवसलं आणि दुबई, अबुधाबी, शारजा या अरब अमिरातीतल्या छोट्या छोट्या राज्यांनी कात टाकली. एकोणीसशे एकाहत्तर साली त्यांनी एमिरातीची स्थापना केली. प्रेमाने एकमेकांचे हात हातात घेतले. एकसंध राष्ट्र स्थापन झालं आणि प्रगती सुरू झाली. ती जगातल्या इतिहासातली सर्वात अफलातून प्रगती असावी. पंधराव्या-सोळाव्या शतकातला देश आधुनिकतेच्या बाबतीत अमेरिका - युरोप - जपानच्या खांद्याला खांदा लावून उभा राहिला.

तेल मिळण्यापूर्वी तिथे एकही रस्ता नव्हता. एकही! आज रस्ते पाहून बोटं तोंडात जातात. दुबई ते अबुधाबी हे अंतर एकशे साठ किलोमीटर्स आहे. साधारण मुंबई-पुण्याएवढं. पण आठ पदरी रस्ता आहे. रस्ता इतका तुळतुळीत की 'खड्डा शोधून देणाऱ्यास दहा हजार रुपयांचं बक्षीस' जाहीर करायलाही हरकत नाही. कारण सापडणारच नाही खड्डा. हायवेवर दिवे हा प्रकार त्यांना परवडतो. दिवेही असे की पिवळ्या प्रकाशाने रस्ता उजळून निघतो. त्यामुळे हा प्रवास मोजून पावणेदोन तासांत होतो. सकाळ असो किंवा रात्र !

उंटाची जागा अत्याधुनिक गाड्यांनी घेतलीय. 'साध्या' टोयाटोतून ताशी १४० किलोमीटर्सच्या वेगाने जाताना पोटातलं पाणी हलत नाही. तिथे टोयाटोला 'साधी' हेच विशेषण असतं. फियाट, ॲम्बेसॅडर आणि मारुतीतून फिरणाऱ्या आपल्यासारख्या मंडळींना टोयाटो 'सम्राज्ञी' वाटणार. तिथे हायवेवरून टोयोटोमधून जाताना बाजूने एखादी मर्सिडीज, लॅबॉरगिनी किंवा फेरारी इतक्या भुर्रकन जाते की आपण बैलगाडीतून प्रवास करतोय असं वाटतं. एखादा हिंदुस्थानी किंवा पाकिस्तानी माणूस ताशी एकशेचाळीसच्या वेगाने जात असतानाही डोक्यात हायवेवरच्या स्पीड रडारची भीती ठेवून असतो. ताशी अडीचशेच्या वेगाने जाणं हा अरबाचा रोजचा खेळ आहे. तीस वर्षांपूर्वी ज्यांच्या हातात उंटाचे लगाम होते त्यांच्या हातात आता रोल्सरॉईस, बी. एम. डब्ल्यू., पोर्शे वगैरे गाड्यांच्या चाव्या आहेत. त्यांचे जुने सहकारी 'उंट' वाळवंटात फिरत असतात. पूर्वी ते फिरत फिरत हायवेवर यायचे आणि ताशी दीड-दोनशेच्या वेगाने येणाऱ्या गाड्यांपुढे अकस्मातपणे उभे राहायचे. तिघांच्याही चिंधड्या उडायच्या. उंटाच्या, गाडीच्या आणि गाडीच्या मालकाच्या. त्यावर उपाय काय ?

अरबांनी हायवेवर दोन्ही बाजूला कुंपणं उभी केली आहेत. तीस वर्षांपूर्वी अमिरातीत फक्त एक हॉस्पिटल होतं आणि एक-दोन शाळा होत्या. सामान्य अरबाला शिक्षणाचा गंध नव्हता. तेलाच्या पैशावर फक्त शाळा नाही बांधल्या गेल्या. अलाइनला अद्ययावत विद्यापीठ उभारलं गेलं. जगातली सर्वोत्तम वैद्यकीय सेवा लोकांना उपलब्ध झाली. जी

माणसं झोपडीवजा घरात, उन्हाळ्यात तर आकाशाचं छप्पर डोक्यावर घेऊन राहत होती ते अशा बंगल्यात राहायला लागले की ज्या बंगल्याच्या खिडकीचे साधे पडदे हलवायलाही अरबाला बसल्या जागेवरून उठावं लागत नाही. हातातला रिमोट कंट्रोल दाबला की काम होतं. हातात रिमोट कंट्रोल घेऊन फिरायचं एवढाच त्रास.

'परमेश्वर हा दयाळू असतो', 'भगवान के घर देर है, अंधेर नहीं है' वगैरे गोष्टी दुबईत पटतात. 'शेकडो वर्षं ही माणसं कशी जगली असतील' असा ते वाळवंट पाहून प्रश्न पडतो. रणरणतं ऊन, गरम वाळू आणि पाण्यासाठी वणवण या गोष्टी पिढ्यान् पिढ्या त्यांच्या पाचवीला पुजल्या होत्या. परमेश्वर त्यांची कठोर परीक्षा घेत होता. तीस वर्षांपूर्वी तो प्रसन्न झाला. आणि त्याने तेलाचं अस्तित्व दाखवून दिलं. त्याक्षणी त्यांचा वनवास संपला आणि विलास सुरू झाला. पैशाने विकत मिळणारी कुठलीही गोष्ट आज अरबांकडे आहे आणि जग ज्या पेट्रोलसाठी तरसतंय ते पेट्रोल तिथे आजही पाण्यापेक्षा स्वस्त मिळतं.

■

(३० एप्रिल १९९५)

# □ शॉपिंग आणि दुबई

'उंट आणि अरब.' 'तेल आणि अरब', एवढंच घट्ट नातं. 'शॉपिंग आणि दुबई' यांचं आहे. सर्वसाधारणपणे भारतीय मंडळी दुबईला नोकरीसाठी जातात नाहीतर शॉपिंगला. लोकं लंडन पाहायला जातात. स्वित्झर्लंड पाहायला जातात. तसे 'दुबई' पाहायचंय म्हणून दुबईला जाणारे थोडेच. तशी दुबई प्रेक्षणीय आहे. वाळवंटही सुंदर असू शकतं, हे अलआईनजवळच्या 'जबलाफित' या बोडक्या डोंगरावरून खाली तांबूस रंगाच्या वाळूवर नजर टाकली की कळतं! तरी सर्वसाधारण माणूस खरा रंगलेला दिसतो, डेरा आणि पार दुबईतल्या दुकानात. डोळे विस्फारून तो शोकेसमधला माल न्याहाळत असतो. त्या शोकेसमधला प्रत्येक टी.व्ही., प्रत्येक वॉकमन, प्रत्येक गॉगल किंवा प्रत्येक घड्याळ त्याला हवं असतं, पण त्याचा खिसा छोटा आहे याची जाणीव त्याला प्रत्येक दुकान करून देतं.

पण गंमत अशी आहे की अरबांचा खिसा मोठा आहे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' हे आपल्याला शिकवलं जातं, पण अरबांना वाळूचे कण न रगडताच तेल मिळालंय. त्यातून पैसा मिळाला. अगदी झटपट! त्यामुळे त्यांची हौस वाढली. हट्ट वाढला. लहानपणी आपण हट्टी राजपुत्र-राजकन्येच्या गोष्टी वाचतो ना, 'राजकन्येने हट्ट धरला. अमुक एक गोष्ट हवी. मग राजाने दवंडी पिटवली.' वग़ैरे! अरबांचा तसा प्रकार झाला. बरं, हट्ट पुरवायला जर्मनी, फ्रान्स, जपान, चीन, तैवान, कोरियासारखे देश होतेच. त्यांच्या मालांनी दुबई -अबुधाबी बाजारपेठा धडाधड भरल्या. त्यामुळे जगातली कुठलीही गोष्ट तिथे मिळू शकते. नायगारा उचलून आणता येत नाही म्हणून, नाहीतर अरबांनी तोही उचलून आणला असता. त्यांच्या दृष्टीने ती दुकानं म्हणजे द्रौपदीची थाळी आहे. मागितलं की मिळालं.

एकोणीसशे चौऱ्याऐंशी-पंच्याऐंशी च्या सुमारास आम्ही पत्रकार आणि क्रिकेटपटू दुबईच्या मार्केटातून फिरायचो, त्यावेळी डोळे खऱ्या अर्थाने दिपायचे. आज काळ बदललाय. त्यावेळी 'लिबरलायझेशन' हा शब्द भारतात अस्तित्वात नव्हता. 'समाजवाद' या शब्दाची आपल्याकडे चलती होती. टी.व्ही. म्हणजे 'ईसी', घड्याळ म्हणजे 'एचएमटी', पेन म्हणजे 'विल्सन' किंवा 'म्हात्रे' ही आपली समीकरणं होती. कपड्यांना सेंटचा स्पर्श एखाद्या श्रीमंताच्या लग्नात गेल्यावर व्हायचा. एरवी कुठलंस




अत्तर किंवा गुलाबपाणी हा आपल्या सुगंधाचा कडेलोट. 'म्हैसूर सॅन्डल सोप' हा मध्यमवर्गीयांच्या सुवासिक आंघोळीचा शेवटचा शब्द होता. त्याचा वापरही दिवाळीला व्हायचा. फॉरेनचा 'लक्स' हा फक्त नट्यांच्या आंघोळीसाठी असतो याची जाणीव महिन्याकाठी हातात येणारा पगार करून द्यायचा. व्हीसीआर आणि वॉशिंगमशीन ही फक्त श्रीमंतांच्या 'घरचं माप' ओलांडणारी उपकरणं होती. अशा वेळी दुबईच्या बाजारपेठेतून वेगवेगळ्या साबणापासून व्हीसीआरपर्यंतच्या विविध प्रकारच्या विविध देशांतल्या वस्तू पाहिल्या की मन माशी बनून त्या प्रत्येक वस्तूवर किमान बसून यायचं.

त्यावेळी एका दिरहॅमची (अरबी चलन) रुपयातली किंमत साडेतीन रुपये होती. दहा दिरहॅमला सुंदर टी शर्ट मिळायचा आणि शंभर दिरहॅममध्ये अप्रतिम घड्याळ यायचं. त्यामुळे शॉपिंगला गेलं की छोटा खिसाही कसा फाटत जायचा ते कळायचं नाही. ते कळायचं परतताना कस्टम ऑफिसरने बॅग उघडल्यावर. दयाळू कस्टम ऑफिसर भेटला तर थोडक्यात निभावायचं. खडूस भेटला आणि त्याने बॅगेतल्या प्रत्येक वस्तूचा पंचनामा केला की संपलं.

केवळ माल आणून इथे विकण्यासाठी दुबईला जाणारी माणसं त्यावेळी रगड होती. 'इम्पोर्टेड' गोष्टींची आपल्याला असलेली क्रेझ भयंकर आहे. अगदी इम्पोर्टेड 'गंजीफ्रॉक' घालणारी माणसं तीस इंचाची छाती चाळीस इंची करून घालायचे. लोकांना 'मेड इन सायप्रस', 'मेड इन श्रीलंका' वस्तू आवडायच्या पण 'मेड इन इंडिया' वस्तू फालतू वाटायच्या.

रशियात क्रांती झाली आणि जगाची 'साम्यवाद - समाजवाद' वगैरे भंपकपणातून सुटका झाली. लिबरलायझेशनची चलती झाली. भारतीय बाजारपेठेतही विविधता आली, इथला माल सुधारायला लागला. हातातलं टायटनचं घड्याळ 'इम्पोर्टेड' वाटायला लागलं. नॅशनलच्या व्हीसीआरला पर्याय मिळायला लागले. सखू मोलकरणीची जागा मध्यमवर्गीय घरातही व्हिडिओकॉनच्या वॉशिंगमशीनने घेतली, तिकडे रुपयाची किंमतही घसरली. एका दिरहॅमसाठी दहा रुपये मोजायला लागले. गल्फवॉरनंतर दुबई महागली आणि दुबईला खरेदीसाठी जाणं खर्चिक ठरायला लागलं. दुबईच्या सरकारने व्हिसाची किंमतही दोन हजार रुपयांवर नेऊन ठेवली. आता फक्त खरेदीसाठी दुबईला जाणं 'परवडणारं' राहिलेलं नाही.

तरीही दुबईला गेलेला माणूस रिकाम्या बॅगेने परतत नाही त्याला कारण आहे. तिथे विविधता प्रचंड आहे. आज मुंबईत रेबॅनचा गॉगल मिळतो. पण तरी त्याच्या विविधतेवर मर्यादा आहे. तिथे रेबॅनच्या शॉपमध्ये शिरलात तर हजार रुपयांपासून दहा-पंधरा हजार रुपयापर्यंतचे वेगवेगळ्या प्रकारचे रेबॅन मिळतात आणि आपल्याला इथे फक्त रेबॅन ठाऊक असतो. दुबईत करेरा, कार्टियर, पुलीस, बॉस वगैरे इतक्या विविध कंपन्यांचे इतके विविध नमुने असतात की जेव्हा आपण एखादा विकत घेतो तेव्हा इतर किमान पंधरा गॉगल्सना नकार द्यायला जिवावर आलेलं असतं.

तुम्ही सॉनीचा एक वॉकमन घ्यायला जाता. तो दुकानदार शंभर दिरहॅमपासून पाचशे दिरहॅमपर्यंतचे सर्व वॉकमन तुमच्यासमोर ठेवतो. नाव 'सॉनी' असलं तरी ते सर्व जपानचे नसतात. एक कुठला मलेशियातला, दुसरा कुठला सिंगापूरचा, तिसरा इंडोनेशियाचा, चौथा कोरियातला. त्या प्रत्येक वॉकमनवर मन बसत असतं आणि मग तो दुकानदार चारशे दिरहॅमचा म्हणून एक 'पीस' काढून दाखवतो. 'मेड इन जपान' ची रेंज तिथून सुरू होते. तुमचा गोंधळ वाढायला लागतो.

लहान मुलाला घेऊन खेळण्याच्या दुकानात अजिबात शिरू नका. तुम्हाला लहान व्हावंसं वाटेल. प्लास्टिक आणि इलेक्ट्रॉनिक्सने हातात हात घालून काय क्रांती केलीय ती पाहताना 'लहानपण देगा देवा' असं वाटतंच वाटतं.

सुवासांवर प्रेम असणारा माणूस सेंटच्या दुकानात शिरला की 'सुवासिक' होऊनच बाहेर पडतो. इतक्या बाटल्या 'टेस्टर' म्हणून ठेवलेल्या असतात की त्या हाता-अंगावर मारून आपल्या शरीराला नेमका कुठला वास येतोय आणि आपल्याला नेमका कुठला सुवास आवडलाय हे कळत नाही.

दुबईत शॉपिंग हे गोंधळात टाकणारं असतं, पण करायचं कसं याचा स्वानुभव पुढच्या वेळी. ■

(७ मे १९९५)

दुबई ही शॉपिंगची मक्का आहे. कट्टर शॉपर ऐपत असेल तर दुबईला भेट दिल्याशिवाय राहात नाही.

पण दुबईत सिंगापूर-हाँगकाँगसारखी प्रशस्त आणि अवाढव्य शॉपिंग सेंटर्स फार कमी आहेत. आत शिरल्यावर महालात शिरलोय असे वाटावं आणि काहीही विकत घ्यायला 'अरबी खिसा' हवाच असं जाणवून देणारी तीन शॉपिंग सेंटर्स तिथे आहेत. एक 'अलगुरेर', दुसरं 'बर्जुमान' आणि तिसरं शहराच्या उंबरठ्यावर. तिथे खरेदी करणं हा तसा स्टेटस सिंबॉल आहे. अरब, गोरे विविध क्रेडिट कार्डस् मिरवत तिथे फिरत असतात. भारतीय-पाकिस्तानीही असतात. पण ते शोकेसची शान, तिथली सजावट, गुळगुळीत इटालियन मार्बल, चमत्कारिकपणे उडणारे रंगीत कारंजे, मुलांना निव्वळ मस्ती करण्यासाठी उभारलेली 'खेळणी घरं' यांकडेच विस्मयचकित होऊन पाहात असतात. एखाद्या अरबाने मुंबईतला कोसळणारा पाऊस पाहावा तसा! खरेदी फक्त मनातल्या मनात.

म्हणजे तिथून आपण खरेदी करूच शकत नाही असे नाही. पूर्वी मी अलगुरेरमधून शर्ट घेतले आहेत. परवा 'बर्जुमान' मधून मी 'पुलिस' या इटालियन कंपनीचा गॉगल घेतला. पण त्यासाठी दोन गोष्टी तुम्हाला जमल्या पाहिजेत. एक म्हणजे निर्लज्जपणे भाव करण्याची तयारी! होय, चक्क 'बारगेनिंग' आणि कुठल्याही

## □ चक्कर शॉपिंगच्या मक्केची

वस्तूच्या प्रेमात न पडणारे खंबीर मन! काही वस्तू इतक्या अप्रतिम असतात की, मन एखाद्या वस्तूत गुंतलं की ते सोडवता येत नाही. मग खिसा टर्रकन फाटतो.

मोठ्या शॉपिंग सेंटर्समधल्या प्रत्येक वस्तूला किंमतीचा टॅग असतो. तो अरब आणि गोऱ्यांसाठी असतो. आपल्यासाठी नाही. मी बर्जुमानमधल्या एका पॉश दुकानांतल्या मराठी सेल्समनला विचारलं होतं, ''इथे आणि बाहेरच्या वस्तूच्या किंमतीत किती फरक असतो?'' तो म्हणाला, ''किमान शंभर दिरहॅमचा (नऊशे रुपये फक्त) असतो.'' पुढच्या दुकानात जाऊन मी गॉगलची किंमत शंभर दिरहॅमने कमी केली. होय नाय करत टॅगवरच्या किंमतीपेक्षा ऐंशी दिरहॅम (सातशे वीस रुपये) कमी करून मी तो गॉगल घेतला. इंग्लंड, युरोपात मोठ्या शॉपिंग सेंटरमध्ये भाव केला जात नाही. 'मार्क्स ॲण्ड स्पेन्सर्स' मध्ये तीस पौंडाची पॅन्ट तुम्ही पंचवीस पौंडाला मागू शकत नाही. दुबईत




निर्लज्ज बारगेनिंगला पर्याय नसतो. बर्जुमान किंवा अलगुरेरमधून बाहेर पडलात की टॅक्सीवाल्याची पुन्हा तुमच्याकडे पाहण्याची नजर बदलते. एरवी पार दुबईत कुठेही पाच दिरहॅमला घेऊन जाणारा टॅक्सीवाला दहा दिरहॅमच्या खाली तुम्हांला टॅक्सीत बसू देत नाही. तुमचा स्टेटस वाढलेला असतो. त्याची किंमत तुम्हाला द्यावीच लागते.

भारतीय-पाकिस्तानी माणसं घाऊक शॉपिंग मलबाऱ्यांच्या दुकानात करतात. तसा देरादुबईतला 'घाऊक बाजार' वेड लावतो. तिथे पाहिलेला प्रत्येक शर्ट आणि पॅन्ट आपल्या वॉर्डरोबमध्ये असावी असं एखाद्याला वाटलं नाही तर तो माणूस गांधी-विनोबाच्या पंथातला आहे असे समजावं. ज्यांना कपड्यांचा 'षौक' आहे त्यांची 'नियत' बिघडू शकते, पण तिथे दुःख असं वाटतं की, एकाच प्रकारचे एक किंवा दोन शर्ट घेता येत नाहीत. डझनाच्या हिशेबात घ्यावे लागतात. 'माल आणणे आणि विकणे' या उद्योगात असणारी मंडळी तिथे वास करत असतात. स्वतःच्या पोटापुरती खरेदी करायला मलबारी उत्तम! 'दुबईहून' आलेल्या बॅगेकडे अपेक्षेनं बघणारे नातेवाईक असतात. त्यांना खूष करण्यासाठीही मलबाऱ्यांचं दुकान चांगलं! मलबाऱ्याचं दुकान 'जोजे वांछील तोते लाहो'' या तत्त्वाला गुरू मानून काढलेलं असतं. ते मोठं असेल किंवा अगदी दहा बाय दहाचं, पण एकाच दुकानात बूट-चपला, गॉगल्स, घड्याळं, कॅमेरा, रेडिओ, वॉकमन, खेळणी, कपडे, बॅगा, पावडर, सेंटस् वगैरे सर्व असतं. डोळ्यांसमोर कुठलीही वस्तू आणा, तिथे ती मिळते. मी अजून प्रयत्न केलेला नाही, पण मलबाऱ्यांकडे भुईमुगाच्या शेंगा किंवा डिप्थेरियांवरचं औषध मागायचा विचार आहे. माझी खात्री आहे, हळूच

त्या वस्तू माझ्या पुढ्यात ठेवून तो मला चकित करील.

या मलबाऱ्याचं वैशिष्ट्य असं आहे की, त्या दुकानात रावांपासून रंकापर्यंत सर्वांना खरेदी करता येते. कारण पाच दिरहॅमपासून शंभर दिरहॅमपर्यंत कुठलाही माल मिळतो. भाव करणं अर्थात आलंच. या दुकानातल्या मालाचा दर्जा अलगुरेर किंवा बर्जुमानच्या दर्जाएवढा नसतोच. ते साहजिक आहे. सोमी अली किंवा शिबाच्या रेटमध्ये चित्रपटनिर्मात्याला जुही चावला मिळू शकत नाही. हेच तत्त्व तिथं आहे. पण मलबाऱ्याकडचं घड्याळ किंवा टोस्टर टिकत नाही असं नाही. ते कामचलाऊ असतं.

मध्यमवर्गीयांसाठी खरेदीचं उत्कृष्ट ठिकाण म्हणजे पाच दिरहॅम, दहा दिरहॅमवाली दुकानं! ''कोई भी माल उठाव, पाच दिरहॅम या दस दिरहॅम'' असं त्या दुकानाचं स्वरूप. गाडीत ठेवायच्या सेंटपासून टॉकिंग क्लॉक, तसबिरीपर्यंत अनेक आकर्षक वस्तू असतात. पांच किंवा दहा हे आकडे लहान वाटतात. त्यामुळे आपण घेत सुटतो. पंधरा वस्तूंनी भरलेली बॅग घरी घेऊन जाताना लक्षात येतं की पंधराशे रुपये बोल बोल म्हणता संपले आहेत. मुंबईत किंवा भारतात कुठेही पंधराशे रुपयांची खरेदी आपण इतक्या झटपट करत नाही. दहा दिरहॅमची वस्तू घेताना 'दहा दिरहॅमचीच तर आहे' अशी भावना असते. आपल्या रुपयात त्यांची किंमत शंभर झाली की वाटतं, ''अरे बापरे! शंभर रुपयांची वस्तू आहे.'' मानसिकता लगेच बदलते. म्हणून हा फरक पडतो.

पण तिथे अशीही दुकानं आहेत जिथे आपल्यासारखा मध्यमवर्गीय फुकट मिळणाऱ्या पुस्तकांशिवाय दुसरं काहीच घेऊ शकत नाही. 'ऐकया' नावाची फर्निचरची स्वीडिश शो-रूम हा त्यातला प्रकार. ते फर्निचर, तो सोफा, ते बेड, त्या बाथरूम पाहिल्या की, आपलं घर असं असावं यापेक्षा दुसरा विचार मनात येतच नाही. पण त्याचप्रमाणे 'देणाऱ्याचे हात हजारो दुबळा माझा खिसा' ही भावना आपल्याला प्रत्येक स्वप्नरंजनातून जागं करते. माझं मन त्या फर्निचरवर बसलं. गाद्या-सोफ्यावर मनसोक्त लोळलं. बाथरूममध्ये छानपैकी आंघोळ करून उंची टॉवेलने अंग पुसून किचनमधून फिरून आलिशान डायनिंग टेबलवर जेवलंसुद्धा! त्याला पैसे पडत नव्हते म्हटल्यावर प्रश्न नव्हता. इथे आलोय तर काही तरी विकत घेतलंच पाहिजे हा निश्चय मनात ठेवून मी तासभर फिरलो. एकदा हजार रुपयांचा टॉवेल विकत घेण्यासाठी हात सरसावलासुद्धा! तेवढ्यात मुंबईतली बायको कानात कुजबुजतेय असा भास झाला - ''बॉम्बे डाईंगच्या दुकानात दीड-दोनशेत यापेक्षा सुरेख टॉवेल मिळतात. काय सोनं लागलंय या टॉवेलला ?'' शेवटी फुकट मिळणारं इंटीरियरचं पुस्तक घेऊन बाहेर पडलो.

मुंबईतल्या सुताराची किंमत 'ऐकया' पाहिल्यावर कळते.

■

(१४ मे १९९५)

## □ इस्लामचं शिवधनुष्य

दुबई हे तसं इस्लामचा बुरखा चढवलेलं शहर आहे.

पण सौदी अरेबियांतल्या शहरांइतका हा पडदा जाडजूड नाही. तो आता तसा झिरझिरीत झालाय. तो पूर्णपणे फेकला जाणं कठीण दिसतंय, पण भोगवादी संस्कृतीला अरब कसे चटावले आहेत, हे त्या झिरझिरीत पडद्यातून स्पष्टपणे दिसतं.

देशाचा धर्म इस्लाम म्हटल्यावर इतर धर्मांना तोंड लपवावं लागलंय. तरीही कॅथॉलिक किंवा प्रोटेस्टंट चर्चेस्‌चं अस्तित्व कुठेतरी जाणवतं. देऊळ फक्त एकच आहे. त्या देवळाने एकदा दुबईच्या राजाचे प्राण वाचवले. त्यामुळे त्या देवळाला 'अभयदान' मिळालंय. पण आणखीन एक देऊळ बांधायचा प्लॅन पुढे केला गेला की तो ठोकरला जातो. तरीही इस्लामच्या सहिष्णुतेबद्दल बोलणारे बोलणारच ! तसे सहिष्णु मुसलमान इंडोनेशियाचे. आजही बालीत 'हिंदू संस्कृती' त्यांनी टिकवून ठेवली आहे. एरवी स्वत:च्या भूमीत दुसऱ्या धर्माला ते पाय ठेवायला देत नाहीत.

पण काही बाबतीत दुबईवाले उदार आहेत. तुम्ही तुमच्या घरात सत्यनारायण घालू शकता. तुमच्या घरात गणपती आणू शकता. पण गणपतींची मिरवणूक काढू म्हणाल तर परवानगी नाही. गणपतीला विसर्जनासाठी तुमच्या गाडीतून तुम्ही घेऊन जायचं. 'बाप्पा मोरया रे' किंवा 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' वगैरे मनातल्या मनात म्हणायचं.

देश त्यांचा म्हटल्यावर त्यांच्या प्रार्थना मात्र सर्वत्र ऐकू जातील अशी सोय आहे. मशिदी अशा रीतीने बांधलेल्या आहेत की मशिदीत पोचायला कुठल्याही नागरिकाला अर्धा किलोमीटरपेक्षा जास्त चालावं लागत नाही. ते धार्मिक असले तरी काही बाबतीत धर्मांध नाहीत. हिंदुस्थानातली बाबरी मशीद जमीनदोस्त करण्यात आली तेव्हा तिथल्या पाकिस्तानी आणि काही हिंदुस्थानी मुसलमानांची माथी भडकली. त्यांनी दुबईतल्या एकमेव मंदिरावर हल्ला केला. ताबडतोब पोलीस आले व त्यांनी दंगलखोरांना पकडलं. त्यांची रवानगी त्यांच्या देशात झाली. ''असले उद्योग करायचे असतील तर तुमच्या देशात जा'' असा सज्जड दम त्यांना देण्यात आला. मुख्य म्हणजे त्याप्रमाणे कृती झाली. आणि त्यापुढे एक महत्त्वाची गोष्टी झाली. पुन्हा ते देऊळ ठीकठाक करण्यात आलं.

आणखीन एक गंमत पाहा- डुकराचं मांस मुस्लिम निषिद्ध मानतात. पण सुपर मार्केटमध्ये 'पोर्क' तुम्हाला मिळू शकतं.




पण ते वेगळं ठेवलेलं असतं. मुस्लिमेतरांना विशिष्ट परमिटधाऱ्या दुकानांतून दारू मिळू शकते. तुम्ही हिंदू किंवा ख्रिश्चन म्हणून तुमच्यावर अन्याय होत नाही. पण त्यांचे कायदे तुम्हाला पाळावेच लागतात. दारू पिऊन तिथे गाडी चालवता येत नाही. सापडलात तर किमान दोन आठवडे जेलमध्ये काढायचे. रमझानमध्ये सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत मुस्लिम माणसांसमोर तुम्हाला खातापिता येत नाही किंवा सिगरेट पिता येत नाही.

पण कट्टर अरब मुस्लिमांनाही ही बंधनं थोडी जाचक वाटत असावीत. पूर्वी ठीक होतं. त्यांनी फारसं जग पाहिलं नव्हतं. श्रीमंत झाल्यापासून त्यांचा संचार वाढला. जगात 'मुक्तता' कशी असू शकते ते त्यांनी पाहिलं. ती मुक्तता ते स्वत:च्या घरात आणू शकत नाहीत. पण ते घराबाहेर पडून मुक्त होतात आणि दुबई -अबुधाबीत मर्यादित प्रमाणात मुक्त वागणाऱ्या मंडळीकडे कानाडोळा करतात. रशियातून आणि काही आफ्रिकन देशातून येणाऱ्या मुलींनी तर दुबईची संस्कृती हळूहळू बदलायला सुरुवात केलीय. पूर्वी दुबईत अगदी गोऱ्यांनाही अर्ध्या चड्डीत भटकणं, विशेषत: गोऱ्यांच्या मडमांनाही मांड्या दाखवत फिरणं शक्य नव्हतं. हल्ली उफाड्याच्या रशियन आणि काही काळ्या बायका आपलं उफाडपण उठावदार होईल असे कपडे घालून फिरत असतात.

रशियातला साम्यवाद संपला. त्यांचा पोलादी पडदा फाटला आणि रशियन मुलामुलींनी आखाताकडे मोर्चा वळवला. ते नोकरी-बिकरीला येत नाहीत. त्यांचा उद्देश असतो खरेदी! देरादुबईच्या घाऊक बाजारपेठेत त्यांचा फेरा असतो. दुबईत माल स्वस्तात विकत घ्यायचा आणि आता दरिद्री झालेल्या रशियात विकायचा हा त्यांचा धंदा. आज रशियन

मंडळींना विलायती मालाची चटक लागली आहे. ही चटक भागवायचा हा धंदा एक भाग आहे.

शरीर विकणं हा रशियन मुलींचा दुबईतला पोटधंदा आहे. व्याभिचारी स्त्री-पुरुषाला दगडांनी ठेचणे ही त्यांच्या कायद्याच्या पुस्तकातली शिक्षा, पण हा व्याभिचार अगदी बिनधास्तपणे सुरू असतो. ही शिक्षा फक्त पुस्तकातच शिल्लक आहे असं नाही. 'वर्षाकाठी एक दोन प्रेमी' दगड खातात. 'पण रशियन मुलगी त्यात सापडलेली ऐकिवात नाही. त्या 'भानगडीत तिथले' 'भारतीय-पाकिस्तानी' फारसे पडत नाहीत. पैसे कमवायला आलेल्या मंडळींकडे असा उडवण्याइतका पैसा नसतो. पाकिस्तानी त्यातल्या त्यात जास्त आंबटशौकीन. तिथे जुमैदा इथे सुंदर बीच आहे. बीचवर बरीच बंधनं झुगारून रशियन मुली जलक्रीडा करत असतात. त्यांना बघण्यासाठी आसुसलेल्या मंडळीत पाकिस्तानी बरेच दिसतात. पण त्यांच्या 'पोटधंद्याची' बरकत मात्र श्रीमंत अरबांमुळे आहे. पूर्वी मलबारी मुलींबद्दल असं बोललं जायचं. फिलिपीनो किंवा लेबॅनीज मुलींबद्दल असं बोललं जायचं. पण त्यावेळी ह्या माझ्या दृष्टीने 'ऐकीव' गोष्टी होत्या. दुबईच्या रस्त्यावर उभं राहिलेलं मी त्यांना पाहिलेलं नाही. डेरा दुबईच्या खाडीकडच्या रस्त्यावर आपल्या उफाडेपणाची कपड्यातून जाहिरात करत उभ्या असलेल्या मुली मी पूर्वी कधी पाहिल्या नव्हत्या. ह्या वेळी रशियन मुलींना पाहून आश्चर्य वाटलं. हॉटेल मालकही 'मुली पुरवणं' हा 'जोडधंदा' करायला लागले आहेत.

मी एका टॅक्सीवाल्याला त्याबद्दल विचारल्यावर तो खिन्नपणे म्हणाला, ''साहेब, जमाना बदल रहा है । वैसे दुबईभी बदल रही है'' तो नंतर म्हणाला, ''तुमच्याकडे गाडी असेल तर घेऊन तिथे उभे राहा. साखरेकडे मुंग्या जातात तशा त्या तुमच्याकडे येतील.''

बदलत्या जगापुढे व बदलत्या मूल्यांपुढे दुबईही वाकतेय. रमझान हा त्यांचा पवित्र सण. त्या सणाच्या वेळी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत खाण्यापिण्यावर बंधनं असतात. त्यामुळे श्रीमंत अरब सरळ परदेशात जातात. तिथं त्यांना बंधनं पाळावी लागत नाहीत. काही वेळा धर्म वाकवला जातो. गेल्या वर्षी रमझानच्या वेळी दुबईत टेनिसची आंतरराष्ट्रीय स्पर्धा होती. एरवी रमझान म्हणजे जेवणं, खाणं, पिणं बंद ! पण त्या स्पर्धेच्या ठिकाणी ह्या बंधनांना चक्क सूट दिली होती. वारुणीसुद्धा मनसोक्त वाहत होती. सिगरेटच्या धुराने वातानुकूलित खोल्या भरून गेल्या होत्या.

इस्लामचं शिवधनुष्य पेलवणं नव्या जमान्यात दुबईला बरंच कठीण जातंय.

■

(२१ मे १९९५)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रमांक 109
दा. क्र. 22662
25/3/00
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

"चल तुला आमच्याइथलं 'नाइट लाइफ' दाखवतो. रात्री साडेदहाला तयार राहा.'

दुबईतल्या एका मित्रानं मला फर्मावलं. 'दुबई आणि नाइटलाइफ' ? पाच वर्षांपूर्वी मी या गोष्टीवर विश्वास ठेवला नसता. 'मद्रासमध्ये बर्फ पडतोय, असं कोणी सांगितलं तर आपण विश्वास ठेवू ? किंवा सलमानखानने लफडी थांबवून ब्रह्मचर्याची दीक्षा घेतलीय असं कुणी ऐकवलं तर ते सत्य आहे असं मानू आपण ?

नाही. पूर्वी दुबईत नाइट लाइफ असतं या गोष्टीवर मी नव्हता विश्वास ठेवला ! पण यावेळी दुबईनं कात टाकलेली मी पाहत होतो. त्यामुळे अविश्वसनीय वाटावं असं काही नव्हतं.

एका पंचतारांकित हॉटेलात तो मित्र भेटला. आणखीन त्याचे दोन-चार मित्र होते. "आपल्याला अबुधाबीला जायचंय. हल्ली दुबईपेक्षा तिथे मजा आहे. अबुधाबी बघ, वेडा होशील." त्या मित्राने 'लिझ टेलर बघ, वेडा होशील', या थाटात सांगितलं.

"एवढ्या लांब जायचं आणि इतक्या रात्री ?" माझ्या पोटात गोळा आला होता. तिथून अबुधाबी एकशे साठ किलोमीटर्स आहे.

"इथे काय आपल्या हिंदुस्थानसारखे रस्ते नाहीत. दोन तासांत तिथे पोहोचू. चार साडेचारपर्यंत दुबईत परत आणि तोपर्यंत आमच्या दुबईतला हा डिस्को तर पाहून घे."

## ◻ अबुधाबी-दुबई रात्री झोपत नाही

रसिकतेपेक्षा एक नवा अनुभव मिळणार ही भावना मला अबुधाबीकडे खेचत होती. अबुधाबीला जाण्यापूर्वी मी तो डिस्को पाहिला. अर्थात तो डिस्कोसारखा डिस्को होता. मिणमिणते दिवे, सिगारेटचा सर्वत्र धूर, डोळ्यांत हळूहळू चढत जाणाऱ्या स्कॉचची धुंदी आणि काहींना उन्मादक वाटावं, पण काहींना कानावर अत्याचार वाटावा असं संगीत. त्या संगीतावर डोलणारे अरब आणि अरबांना नाचवणाऱ्या मुली असा तो देखावा होता. डिस्कोत पाय ठेवताना इस्लामला विसरायचं अशी जणू अरबांना ताकीद होती. तिथल्या मुली या हॉटेल मालकाने पेरलेल्या मुली होत्या. भारत, पाकिस्तानाहून आलेल्या, लेबॅनीज आणि फिलिपिनोही होत्या. त्यांचं काम अरबांच्या सान्निध्यात राहायचं. त्यांना जास्तीत जात मदिरा पाजून त्यांचं बिल वाढवायचं आणि मग डान्सफ्लोअरवर त्यांच्याबरोबर थिरकायचं. भारतीय-




पाकिस्तानी गिऱ्हाइकांकडे त्या फारसं लक्ष देत नाहीत. त्यांच्या खिशांचा आकार त्यांना ठाऊक असतो. बऱ्याच वेळा या मुली झिंगलेल्या अरबाला त्याच हॉटेलात त्याच्या बिछान्यापर्यंतही साथ देतात.

अबुधाबीतले रंग थोडे वेगळे होते. ते अस्सल भारतीय होते. मुंबईच्या असंख्य हॉटेलात जे चालतं तेच तिथं चालतं. मुजरा, डान्स पण फक्त पंचतारांकित हॉटेलातच. इतर ठिकाणी नाही. खरं म्हणजे त्यांच्या नाचाला मुजरा म्हणायचं म्हणजे डोंबाऱ्याच्या अंगचलाखीला बॅले म्हणण्यासारखं आहे. एखादा मुलगा किंवा मुलगी माइकवर गाणं म्हणते आणि भारतीय मुली त्यावर हातपाय हलवतात. एखाद दोन मुली कंबर हलवतात आणि श्रीमंत होऊन जातात. आम्ही अबुधाबीत अशा तीन-चार हॉटेलात फिरलो. एका हॉटेलात दोन-चार गोरे आणि दोन-चार अरब कुठले तरी यश साजरं करायला आले होते. फुगे फोडावेत तशा शॅम्पेनच्या बाटल्या फुटत होत्या. फसफसणारी शँपेन फक्त ग्लासात फसफसत नाही, ती हळूहळू डोक्यात शिरते. ती एका अरबाच्या इतकी डोक्यात शिरली की त्या नाचणाऱ्या मुलींपैकी एक मुलगी त्या रात्री लखोपती नाही तरी निदान सहस्रपती नक्की झाली असेल. ती नाजुक गोरी पोर नाजुकपणे कंबर हलवायची, आणि त्या घोळक्यातला एक अरब घायाळ व्हायचा. तिथं पद्धत अशी आहे की, मुलीच्या अंगावर पैसे उडवता येत नाहीत. त्याऐवजी एक कागदाचा हार हॉटेलचा वेटर त्या मुलीच्या गळ्यात घालतो. एका हाराची किंमत शंभर दिरहॅम म्हणजे साधारण नऊशे रुपये.

त्या चुणचुणीत मुलीने अरबाची रसिकता आणि फुगलेला खिसा हेरलेला होता.

ती कधी मुरका मारायची, कधी कंबर जास्त हलवायची, कधी भुवया उंचवायची. तिच्या प्रत्येक हालचालीवर खूष होऊन तो अरब हार फेकत होता. ती हार वेचत होती. तो अरब तिच्यासाठी पारिजातकाच्या झाडासारखा होता, आणि तिच्या एका हालचालीने पारिजातकाच्या फुलांचा सडा पडायचा, ती फुलं मात्र दिरहॅमच्या नोटांची होती.

या मुली येतात भारतातून. बऱ्याचशा मुंबईच्या कॉंग्रेस हाऊस आणि फोरास रोडवरच्या नाचणाऱ्यांच्या वस्तीतून. हॉटेल त्यांना तीन-तीन महिन्यांच्या करारावर बोलावते. राहायचं हॉटेलमध्ये. पगारही चांगला मिळतो. आणि त्या 'हारांच्या' किंमतीचा अर्धा वाटा त्या मुलींना मिळतो, अर्धा हॉटेलला जातो. मुंबईत हॉटेलात नाचण्यापेक्षा तिथं त्यांची कमाई जोरदार होते. त्यात एखाद्या अरबाची मर्जी बसली की सोन्या-चांदीची कमतरता नाही.

तिथं अरेबियन क्लब म्हणूनही प्रकार चालतो. त्यात इजिप्शियन मुली बेली डान्स करतात. बेली डान्स ही कला आहे. इजिप्तमध्ये या कलेचा खरा नखरा बघायला मिळतो. दुबईत त्याची नक्कल पाहायला मिळते.

एक-दोन वर्षांपूर्वी दुबईत हा उद्योग भलताच फोफावला होता. बेली डान्सने कॅब्रेचं रूप घेतलं होतं. एक वेळ अशी आली होती की कॅब्रे डान्सरलां अंतर्वस्त्राचं वजनही सहन व्हायचं नाही. काही काळ हे चाललं. एका ब्रिटिश वर्तमानपत्रात या नाइटलाइफवर चवीनं लिहिलं गेलं आणि दुबईच्या शेखनं धोरण थोडं कडक केलं.

कुणी काहीही म्हणो, हल्ली दुबई - अबूधाबीत अरबांना एक कायदा आणि अरबेतरांना दुसरा कायदा हा प्रकार आहे. शरीयत कायद्याप्रमाणे दारू पिणाऱ्या मुसलमानाला शिक्षा आहेच, पण मुसलमानाला दारू ऑफर करणाऱ्या स्त्री-पुरुषाला जास्त कडक शिक्षा आहे. तरीही आमच्या डोळ्यांसमोर शॅम्पेनच्या बाटल्या फुटत होत्या. आणि ती वारुणीची राणी अरबांचा घसा सुखावत होती. तोच अरब पहाटे स्वत:ची गाडी चालवत घरी जाणार, जाता जाता आणखीन एक कायदा तोडणार. पण कायदा तोडणारा अरब तिथे पटवापटवी करू शकतो. कायदा तोडणाऱ्या पाकिस्तानी किंवा भारतीयाला मात्र कुणी वाली नसतो. शरीयतमधल्या शिक्षा त्याच्यासाठी असतात.

अबुधाबीतली तीन-चार हॉटेलं पालथी घालून आम्ही रात्री अडीच वाजता निघालो. तेव्हाही तिथं 'चोली के पीछे क्या है' च्या तालावर मुली नाचत होत्या. पण आम्ही दुबईत पहाटे साडेचारला आलो तेव्हा मित्राच्या त्या पंचतारांकित हॉटेलात एक अरब दोन मैत्रिणींना घेऊन शिरत होता. वरच्या डिस्कोतला आवाजही कमी झालेला नव्हता.

मुंबईच सदैव जागी असते असं नाही. दुबईही हल्ली रात्री झोपत नाही. ■

(२८ मे १९९५)

## □ इथे ओशाळली रोल्स रॉईस

उंट हा प्राणी तुमच्या आमच्या आवडत्या प्राण्यांमध्ये मोडूच शकत नाही. एकदा देवांमध्ये सौंदर्यहीन प्राणी बनवायची स्पर्धा लागली असावी. त्यातून बहुधा उंट निर्माण झाला असावा. बेढब, कुरूप वगैरे विशेषणंही उंटापुढे हात टेकतात.

पण हाच उंट एके काळी अरबांना देव वाटायचा. एके काळी म्हणजे अगदी तीस-पस्तीस वर्षांपूर्वी. या उंटानेच त्यांना जगवलं आणि जगभर फिरवलं. तो गरम तप्त वाळूत लीलया फिरू शकायचा. तब्बल चौतीस दिवस तो पाण्याशिवाय राहू शकायचा, आणि हे करताना मालकाचं आणि मालकाच्या सामानाचं वजनही कुरकूर न करता झेलायचा. त्या वाळवंटात पाणी सापडलं नाही, तर आपल्या दुधाने मालकाची तहान भागवायचा.

बद्धूचा तर तो लाडका होता. बद्धू म्हणजे शहरापासून दूर वाळवंटात राहणारे अरब. बकरीच्या केसाचे तंबू करून राहणारे, शिकार करून जगणारे, पाणी मिळालं नाही तर उंटाच्या दुधाची कॉफी करून पिणारे आणि खजुरावर ताव मारणारे अरब!

अरबस्थानात तेल मिळाल्यानंतर बद्धूंची परिस्थितीसुद्धा सुधारली. ते सर्व शहरांकडे आले नाहीत. आजही ते वाळवंटात राहतात. अल-आईन अबुधाबीला जाताना मी त्यांची घरं पाहिली. बकरीच्या केसांचे तंबू आता अदृश्य झाले आहेत. त्यांची जागा एअरकण्डिशण्ड घरांनी घेतली आहे. उंटाची जागा फोरव्हीलर गाड्यांनी घेतली आहे. जिथे रस्ता संपतो आणि वाळू सुरू होते तिथे या फोरव्हीलर गाड्याच वाळू कापू शकतात. पाणी, वीज, मशिन्स... सर्वच त्यांच्या दिमतीला आहे. त्यामुळे उंटांची गरज कमी झाली आहे.

पण हे अरब आपल्या जुन्या दोस्ताला विसरलेले नाहीत. उंटांनी त्यांची हजारो वर्षं केलेली सेवा त्यांच्या डोक्यावर उपकाराचं प्रचंड ओझं टाकून गेलेली आहे. त्यामुळे सरकारने उंटाना वाऱ्यावर सोडलेलं नाही. जो कुणी उंट पाळतो. त्याला सरकार वर्षाला एका उंटापायी शंभर डॉलर्स (तीन हजार पाचशे रुपये) देतं. उंट पाळणं हे पूर्वीएवढं सोपं राहिलेलं नाही. पण पैसा आल्यावर अरबांनी एक नवा प्रकार जन्माला घातलाय. तो म्हणजे रेसचे उंट तयार करायचे.

अरबांना रेसचा भयंकर शौक आहे. आता महंमदाने सांगितलेल्या इस्लामच्या तत्त्वात जुगार अजिबात बसत नाही. त्यामुळे जुगाराला तिथे बंदी आहे, पण रेसला नाही. तुम्ही म्हणाल, रेस आणि




जुगार एक नाही का? त्यांना तसं वाटत नाही. आपल्याकडे मटक्यावर बंदी आहे. रेसवर कुठाय? त्यांना घोड्याच्या शर्यतीचं वेड आहेच. आता उंटांच्या शर्यतीचं वेड वाढलंय.

उंट हा काही घोड्यासारखा चपळपणे आणि ग्रेसफुली पळणारा प्राणी नाही. पण मग अरबांनी ठरवलं, निसर्गाला आपल्यापुढे नमवायचं. उंटाला चपळ करायचं, त्यांचे गोरे दोस्त यासाठी त्यांची बुद्धी राबवायला तयार होतेच आणि अरबांकडे त्यांच्या बुद्धीची किंमत देण्याएवढा पैसा आहे.

तीन वर्षांपूर्वी दुबईत त्यांनी उंट या विषयावरचं पहिलं आंतरराष्ट्रीय सिंपोझियम भरवलं. जगातले मोठमोठे शास्त्रज्ञ आले आणि त्यांनी उंटाच्या पैदाशीची नवी तंत्रं, कृत्रिम गर्भधारणा वगैरे विषयांवर चर्चा केली. गाठीशी पैसा असल्यामुळे फक्त वांझोटी चर्चा करून ते थांबत नाहीत. त्यांनी रेसचे उंट तयार करायची मुहूर्तमेढ दुबईच्या सेंट्रल व्हेटरनरी रिसर्च लॅबोरेटरीत रोवली. डॉ. अहंमद मुस्तानासिर बिल्लाह हे या उंट विभागाचे प्रमुख आहेत. त्यांच्या हाताखाली पंधरा उच्चशिक्षित शास्त्रज्ञ आहेत. गर्भधारणेचे नवीन तंत्र आणि कृत्रिम गर्भधारणेच्या साहाय्याने त्यांनी नव्या जातीच्या चपळ, वेगवान आणि त्यातल्या त्यात देखण्या दिसणाऱ्या उंटाची पैदास सुरू केली. तिथल्या उंटिणीचं बाळंतपण पाहून श्रीमंत शेखांच्या राण्यांनासुद्धा हेवा वाटत असावा इतकी उंटिणींची काळजी त्यांच्या बाळंतपणात घेतली जाते.

शास्त्राने उंटाचा व्यायाम आणि खाण्याचं पथ्य या क्षेत्रातही पाय ठेवलाय.

कृत्रिम गर्भधारणेच्या तंत्रामुळे सर्वोत्कृष्ट गुणवत्ता ते उंट रक्तात घेऊनच जन्माला येतात. पण त्या गुणवत्तेचा विकास होण्यासाठी त्यांचा व्यायाम, त्यांचं खाणं-पिणं यावरही काही बंधनं घालावी लागतात. वेगळी मेहनत घ्यावी लागते. तुम्ही ट्रेडमिल मशिन पाहिलंय? आपले ॲथलिट किंवा इतर खेळाडू स्टॅमिना जोखण्यासाठी वापरतात. पायाखाली पट्टा विशिष्ट वेगात आणि जमिनीशी वेगवेगळा कोन करून फिरत असतो आणि कॉम्प्युटर त्या खेळाडूचे छातीचे ठोके, त्याचा रक्तदाब, त्याची हृदयाची स्पंदनं टिपत असतो. दुबईत अठरा महिन्यांच्या उंटाला त्या ट्रेडमिलवर चढवतात आणि वेगाशी त्याचं शरीर कशी झुंज देतं ते पाहतात. नुसतं धावण्यावर त्याचा व्यायाम थांबत नाही. उंट झाले म्हणून काय झालं. नुसतं चालण्या-धावण्याचा त्यांनाही कंटाळा येतो. त्यामुळे मग त्यांना पोहण्यासाठी तलावात सोडण्यात येतं. उंटासाठी वेगळे स्विमिंगपूल केले आहेत.

जेवण-खाण्याच्या बाबतीत तर त्यांची चैनच चैन असते. वेगवेगळी व्हिटॅमिन्स, सकाळी ब्रेकफास्टला सिरीयलस् वगैरे! त्यांचा भटारखाना रिसर्च करणाऱ्या प्रयोगशाळेला खेटून उभा केलाय. तिथे नवा शोध लागला की उंटाला सशक्त बनवण्यासाठी दिलं तसं जेवण. त्यांचे चुलतभाऊ अजूनही सौदी अरेबिया, सुदान, राजस्थानच्या वाळवंटात ओझी वाहत फिरत असतात आणि हे मस्त ऐषआरामाचं जीवन जगत असतात. इतका ऐषआराम की आशिया-आफ्रिकेतल्या अर्धपोटी जनतेला वाटावं की देवाने प्रसन्न व्हावं आणि पुढल्या जन्मी दुबईत उंट म्हणून जन्माला घालावं.

हे अरबी ऐषआरामात वाढलेले उंट मात्र त्यांच्या इतर भावंडांप्रमाणे चौतीस दिवस पाण्याशिवाय राहू शकत नाहीत किंवा ओझीही वाहू शकत नाहीत. शर्यतीत मात्र डौलदारपणे वेगाने धावू शकतात.

पण या 'डौलदार वेगा'ची किंमत ठाऊक आहे? वीस लाख दिरहॅमपासून चाळीस लाख दिरहॅमपर्यंत कितीही असते. आपल्या रुपयाच्या भाषेत दोन कोटींपासून चार कोटींपर्यंत कितीही! एक चॅंपियन उंट दोन वर्षापूर्वी साडेसहा कोटी रुपयांना विकला गेला. अरब अमिरातीत उंटासाठी तेरा रेसकोर्स आहेत आणि शर्यतीची बक्षिसं प्रचंड असतात. त्यात पैशांबरोबर बी.एम. डब्ल्यू. सारख्या गाड्याही वाटल्या जातात. खरं सांगायचं तर आज उंटापुढे रोल्स रॉईसही ओशाळलीय.

■

(४ जून १९९५)

"अरे ते पाणी फुकट घालवू नकोस. पाणी इथे किती महाग आहे ठाऊक आहे ना?"

दुबईत, माझा मित्र दिलीप खेडेकर नेहमी ओरडायचा. दोन मिनिटं नळ उघडा ठेवण्याचं माझ्या हातून घडलेलं 'पाप' त्याला त्यासाठी पुरायचं.

दुबईत, एकेकाळी पाणी ही पाचूसारखी जपण्याची गोष्ट होती. गाढवावर पाण्याचे हंडे ठेवून पाणी विकायला येणाऱ्या अरबी बद्धूंचे किस्से आजही दुबईतली बुजुर्ग मंडळी सांगतात. पण आज मुंबईचा नळ फसवू शकतो, दुबईचा नळ फसवत नाही. उघडला की पाणी सातत्याने वाहात राहतं. दुबईतली हिरवळ पाहून मुंबई 'बोडकी' वाटते आणि अलआईन पाहून तर परमेश्वरालाही आपल्या नंदनवनात सुधारणा करावीशी वाटेल.

अवघ्या पस्तीस वर्षापूर्वी परिस्थिती केवढी वेगळी होती. जनावरं आणि झाडं कशी निसर्गाशी जुळवून घेतात हे त्या आखातातल्या वाळवंटात दिसायचं. काही प्राणी पाण्याशिवाय जगू शकायचे आणि काही झाडांची मुळं पाण्याच्या शोधात दोनशे फूट खोल जायची. ज्या झाडांच्या मुळांना स्वत: दोनशे फूट जाणं जमायचं नाही त्यांचा 'पाहुणचार' ही खोलवर जाणारी मुळं करायची.

माणूस तर पाण्याविना जगू शकत नाही. त्याने दुसरा मार्ग काढला. त्याने भुयारी बोगद्याची 'फलाज' पद्धत शोधली. जमिनीखाली 'वॉटर टेबल' असतं. त्यामुळे

## □ 'अलआईन' शहर? छे, प्रचंड बाग

छोट्या विहिरीसारखे खड्डे त्या वॉटरटेबलपर्यंत खोदले जात. काही काही वेळा त्या विहिरी शंभर फुटाच्यावरही खोदल्या गेल्या आहेत. मग ज्या दिशेला पाणी घेऊन जायचंय त्या दिशेला काही अंतरावर आणखीन एक विहीर खणली जाते आणि या दोन विहिरी मग बोगद्याने जोडल्या जातात. त्या बोगद्यांना किंचित उतार दिलेला असतो. त्यामुळे पाणी विनासायास वाहतं. त्या विहिरीला आणि बोगद्याला आतून दगडांचं आवरण असायचं. ही सर्व इस्लामपूर्व काळातली कमाल होती. किंबहुना 'फलाज' हा शब्दच ज्यूंच्या हिब्रू भाषेतला आहे. पण इस्लामच्या आक्रमणानंतर ही 'फलाज' बांधण्याची पद्धत सुरूच राहिली. अगदा परवा परवा म्हणजे तीस वर्षापूर्वी शेख अईसने 'जबेल हफीत' या डोंगराच्या बाजूला नवीन फलाज बांधले. आता समुद्राचं खारं पाणी गोड करता येतं. ते काम महागडं आहे. पण अरबांच्या




शब्दकोशातून 'महाग आणि स्वस्त' हे शब्द तेल मिळाल्यापासून पुसून टाकण्यात आलेले आहेत.

त्याचबरोबर त्यांनी वाळवंटही पुसून टाकायची धडपड सुरू केली आहे. दरिद्री माणूस अचानक श्रीमंत झाला की दारिद्र्याचं 'उट्टं' काढायचा त्याचा प्रयत्न असतो. अरबांनी ठरवलं - 'आम्ही फुलझाडं, हिरवळ याबाबत दरिद्री होतो काय? हे दारिद्र्य पुसून टाकायचं.' त्यामुळे त्यांनी अलआईन नावाची बाग उभारली. या 'बागेत' घरं आहेत, माणसं राहतात म्हणून फक्त त्या बागेला शहरं म्हणायचं.

दिलीप खेडेकर हा माझा मित्र दुबईहून मला या बागेत घेऊन गेला. ताशी १४० किलोमीटरच्या वेगाने तिथे पोहोचायला लागले दोन तास, पण प्रत्यक्ष अलआईन यायच्या पन्नास-साठ किलोमीटर्स आधीच आपण प्रचंड बागेत शिरणार आहोत याची चाहूल लागली. एरवी तिथे आपण वाळवंटात आहोत हे वारंवार जाणवतं. दुबई शहरातसुद्धा अजून वाळू टाळता येत नाही. हायवेवरून जाताना दोन्ही बाजूला वाळूचे छोटे डोंगर (सॅन्ड ड्यून्स) दिसतात, पण अलआईनमध्ये शिरण्यापूर्वी तब्बल पन्नास किलोमीटरपासून आपण वाळवंटातून जातोय ही भावनाच संपते. त्या प्रचंड हायवेच्या दोन्ही बाजूला झाडं आहेत. गर्द झाडं! त्यातून पलीकडचं वाळवंट दिसत नाही आणि रस्त्याच्या मध्यावर रंगीबेरंगी कण्हेरीची झाडं आहेत. त्या झुडपात पाणी मुळांपर्यंत पोहोचेल अशी चोख छोट्या छोट्या पाईपांची व्यवस्था केलीए. 'वैराण वाळवंट म्हणता काय? घ्या सगळं हिरवंगार आणि रंगीबेरंगी करून दाखवतो' असा माज ती झाडं आणि फुलं

बोलून दाखवतायत असं वाटतं.

अलआईन रंगीबेरंगी करण्याच्या अरबी अट्टाहासामागे निव्वळ 'माज' हे कारण नाही. अलआईन त्या आखातातला तसा सर्वात सुपीक प्रदेश. अरबस्थानातलं सर्वात मोठ्ठं ओयासिस 'बुरायमी' इथलंच. ते आता अबुधाबी आणि ओमानमध्ये विभागलं गेलंय. अलआईनवर अबुधाबीच्या शेखचं भलतंच प्रेम आहे आणि म्हणूनच त्याने ते हिरवंगार करायचं ठरवलं. या छोट्या शहरात जिथे रस्ता नाही किंवा इमारत नाही तिथे झाड आहे. वाळू नजरेलासुद्धा पडत नाही. त्या शेखला रंगाचं वेड असावं. तो फक्त हिरवेगारपणावर समाधान मानत नाही. वेगवेगळ्या फुलांच्या रूपाने त्याला निरनिराळे रंग उधळलेले पाहायला आवडत असावेत.

तिथल्या बगिच्यांमधले कारंजे हा तर अरबांनी काळावर उगवलेला सूडच वाटतो. काही वेळा त्या कारंज्यामधलं पाणी कुठून उडतं आणि कुठे पडतं याचं कोडं पडतं इतके केसाच्या गुंत्याप्रमाणे ते एकमेकांत गुंतलेले असतात. काय कमी आहे म्हणा त्या अबुधाबीच्या शेखला? त्याच्या जुन्या राजवाड्याचं चित्र पाहिलं. मातीच्या घरात राहायचा. आज तिथल्या शेखांच्या घरांच्या बाहेरच्या भिंती (कम्पाऊंड वॉल) पाहिल्या की आपले डोळे फिरतात. त्या खर्चात आपल्याकडे आलिशान बंगले तयार होऊ शकतात.

अलआईनमध्ये त्यांनी एक नियम पाळलाय. दुबई-अबुधाबीप्रमाणे आकाशात आरपार घुसणाऱ्या इमारती बांधायला तिथे परवानगी नाही. एरवी ज्या जुन्या दहा गावांमधून हे शहर तयार झालंय त्या गावांचा मागमूस आता राहिलेला नाही. प्रत्येक रस्ता काटकोनात मिळतो आणि कुठल्या चौकात रंगीबेरंगी फुलांचे अलंकार मिरवणारं 'आयलंड' नाही असं नाही. या फुलझाडांमुळे आणि छोट्या चणीच्या इमारतींमुळे शहर असूनही अलआईनला गावाचा 'चार्म' आहे.

या शहरांतल्या महत्त्वाच्या इमारतीचं सौंदर्य एकदा डोळ्यांत उतरलं की डोळ्यांतून हटत नाही. अलआईन नगरपालिकेची इमारत राजवाड्याची धाकटी बहीण वाटते. अलआईनमधलं एमिरेट्स विद्यापीठ पाहिलं की तिथल्या विद्यार्थ्यांचा हेवा वाटायला लागतो. अभ्यासासाठी असं वातावरण जगात फार थोड्या ठिकाणी सापडेल. आज जवळपास दहा हजार विद्यार्थी तिथे शिकतात. त्यातले बहुतेक सर्व अरब आहेत.

अर्थात इस्लामशी प्रामाणिक ते एका बाबतीत आहेत. मुला-मुलींना एकत्र शिकता येत नाही. मुलांसाठी कॅम्पस वेगळा, मुलींना वेगळा, पण गंमत म्हणजे विद्यापीठात मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे.

ज्ञानावरचा पडदा तरी मुलींच्या बाबतीत उघडला गेलाय. हेही वाईट नसे!

■

(११ जून १९९५)

## □ फॉसिल्सच्या दुनियेत

अल आईन शहरात मला फिरवायचं काम प्रकाश वर्तकने केलं. त्याच्या घरात गेल्यावर आपण शहरात आहोत हे विसरायला होतं. बैठं घर. दरवाजा उघडल्यावर आपण घरात शिरण्याऐवजी बागेत शिरतो. छोटी छोटी रंगीत फुलांची झाडं. मध्ये एक मोठं झाड. बहुधा खजुराचं असावं. मग एका बाजूला हॉल आणि दुसऱ्या बाजूला स्वयंपाकघर वगैरे. एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाताना बागेतून जाणं अपरिहार्य.

दुबईतली बरीचशी घरं काँक्रिटच्या काडेपेट्यासारखी वाटतात. बंदिस्त, घुसमटवून टाकणारी. अल आईनला काँक्रिटची बाग उभी राहणार नाही हे जाणीवपूर्वक पाहिलं गेलंय. प्रथम हिरवळीचा विचार करायचा, मग घराचा हे अल आईनचं तत्त्व आहे.

अलं आईनला हिरवळ तशी 'बाबा आदम'च्या काळापासून होती. त्यामुळे तिथे वस्ती अगदी ख्रिस्तपूर्व सहा हजार वर्षांपासून आहे. त्याच्या खाणाखुणा तिथे दिसतात. 'हिली टोंब' नावाची प्रचंड वास्तू तिथे आहे. एकोणीसशे सत्तेचाळीस साली तिची डागडुजी करण्यात आली. ती वास्तू म्हणजे ख्रिस्तपूर्व काळात डोकावायची खिडकी आहे. तिच्या भिंतीवर, छतावर काही माणसांची आणि जनावरांची चित्रं आहेत. गाढवावर स्वार झालेला माणूस, कुऱ्हाड घेऊन उभं असलेलं जोडपं, शिकारीवर ताव मारणारा सिंह वगैरे चित्रं त्यावर कोरली आहेत. तिथे जे माणसांचे हाडाचे सापळे सापडले त्यावरून असं दिसतं की, ही मंडळी उंच आणि तगडी होती आणि ऊस, गहू, बार्लीसारखी पिकं तिथे काढायची. अल आईन हे परमेश्वराने त्यांच्यासाठी वाळवंटात उभारलेलं नंदनवन होतं.

या नंदनवनाचा देवांनाही हेवा वाटेल असं रूप देण्याचं कर्तृत्व अर्थात शेख झईद बीन सुलतानचं. ज्या वाळवंटाने पूर्वी गुलाब पाहिले नव्हते तिथे गुलाब उगवले. रंगीबेरंगी फुले उभी राहिली. पण निव्वळ या सौंदर्यशाली फुलांवर त्याने पैसे उधळले नाहीत. त्याने हजार हेक्टरमध्ये गहू आणि विविध प्रकारच्या भाज्यांची लागवड केली. डेरी फार्म उघडलं. पोल्ट्री फार्म काढलं. आज त्या पोल्ट्री फार्ममधून दरवर्षाला त्यांना सहा कोटी अंडी मिळतात.

खजुराची झाडं वाढवायचा त्यांचा उद्योग परंपरागत आहे. सामान्य माणसाने गाडी थांबवून झाडावरचे खजूर खाल्ले तर त्याला शिक्षाबिक्षा होत नाही. खजूर ही




वाळवंटाला निसर्गाने दिलेली देणगी आहे. ती निसर्गाकडून घ्यायला परवानगी लागत नाही.

अल आईनमध्ये फिरत असताना दुरून एक डोंगर खुणावत होता. इतका बोडका डोंगर मी पूर्वी कधीही पाहिला नव्हता. गोटा केल्यासारखा तो तुळतुळीत होता. जवळ गेल्यावर कळलं की तिळाएवढा हिरवा भागसुद्धा त्या डोंगरावर नाही. दृष्ट लागू नये म्हणून तिळाएवढं हिरवं तीट त्या डोंगराला निसर्गाने लावायला हरकत नव्हती. त्या डोंगराला स्वत:चं असं वेगळं सौंदर्य मात्र नक्की होतं. त्याला जबेल हफीत म्हणतात.

तो डोंगर जवळ वाटला तरी तसा जवळ नव्हता. पण त्या डोंगराकडे जाताना वाळूच्या बदलत जाणाऱ्या रंगाने प्रचंड नेत्रसुख दिलं. सॅण्ड ड्यून्स (वाळूचे छोटे डोंगर) हा प्रकार पाहण्यासारखा असतो. हे सॅण्ड ड्यून्स आपल्या डोळ्यांना स्थिर वाटले तरी स्थिर नसतात. साधारपणे वर्षाला दोन फूट या वेगाने ते 'सरकतात.' शतकाचा विचार केला की हे सरकणं मोठं वाटतं. शतकानुशतकं अशा सरकण्यानेच वाळवंट तयार झालंय. या ड्यून्सखाली झाडं लपतात. खडकही लपतात.

दुबईतल्या ड्यून्सची वाळू तशी पांढरी आहे. तिथे समुद्राची कूस लाभल्यामुळे शिंपल्यांचा रंग वाळूला येतो. अल आईनच्या वाळूचा रंग लालसर आहे. डोंगरातले लोहाचे कण मिसळल्यामुळे त्या वाळूचा रंग तांबूस आहे. अल आईनचे हे ड्यून्स फक्त तीन

ते चार हजार वर्षं जुने आहेत. माणूस त्यापूर्वी तिथे होता. वाळवंट माणसानंतर तिथे आलं आणि माणसाच्या सुखात त्याने बिब्बा घातला.

तो जबेल हफीत डोंगर आणखीन वेगळी माहिती पुरवतो. आज त्या डोंगराची उंची चार हजार फूट आहे. चक्कर आणणारा कुरळ्या केसांसारखा रस्ता आहे. वरचं टोक गाठताना होंडासारख्या गाडीचीही दमछाक होते. वाटेत किमान एकदा आमच्या गाडीने विश्रांती घेतली.

पंचवीस दशलक्ष वर्षांपूर्वी हा डोंगर अस्तित्वात नव्हता. एका सपाट दगडाच्या रूपात तो समुद्राच्या पोटात तब्येतीत जेवून सुस्तावलेल्या माणसासारखा पहुडला होता. समुद्रातले जीव त्यावर बागडायचे. पृथ्वीच्या पोटात स्फोट झाला आणि हा भूभाग जो वर उसळला तो समुद्र पार करून थेट चार हजार फूट वर आला. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यावर हिरवळीचा अंश नाही. पण फॉसिल्सच्या रूपात पंचवीस दशलक्ष वर्षांपूर्वीचं प्राणिसंग्रहालय उभं आहे. अगदी आजच्या युगात सापडणाऱ्या शेलफिशचे फॉसिल्सही त्या डोंगरात अस्तित्वात आहेत. भूगर्भशास्त्राच्या अभ्यासकाच्या दृष्टीने तो डोंगर म्हणजे ज्ञानाची खाण आहे. समुद्राखालच्या अशा दगडातून अरबांना तेल मिळालंय. मात्र शास्त्रज्ञांना अजूनही जबेल हफीतमधून तेल मिळालेलं नाही.

एरवी गरम वाटणारी हवा या डोंगरावर थंड होऊन भेटते. पांढरी इजिप्शियन गिधाडं आपल्या डोक्यावर कसरती करीत असतात. दूरवर अल आईन हिरवी चादर अंगावर ओढून विसावलेलं दिसतं. फक्त बर्फालाच सौंदर्य नसतं. वाळूलाही सौंदर्य असतं असं त्या जबलाहफीतवरून दिसणारं दृश्य सांगतं. त्या लालसर-पांढऱ्या वाळूच्या लाटेच्या कुशीत शिरावं असं वाटतं.

जबेल हफीतच्या पश्चिमेच्या पायथ्याशी गोड पाण्याचा झरा आहे. त्याला एन अबु सुखना म्हणतात. आता तिथे अद्ययावत रिसॉर्ट झालंय. आम्ही त्या रिसॉर्टला फक्त चक्कर मारून अल आईनचा राजवाडा पाहायला गेलो. या राजवाड्यात त्यांचा आजचा शेख झईद बीन सुलतान जन्मला. या राजाला जुन्या गोष्टींबद्दल प्रेम असावं. त्याने एकोणीसशे श्यहाऐंशी-सत्त्याऐंशी साली या राजवाड्याची डागडुजी सुरू केली. आधुनिक तंत्रज्ञान आणि सिमेंट वगैरे मटेरियल वापरून त्याला जुन्या मातीच्या राजवाड्याचं रूप बदलून टाकताही आलं असतं. पण त्याचा हट्ट होता त्या जुन्या पद्धतीनेच राजवाड्याची डागडुजी करायची. शेवटी तो अरब आणि त्यात शेख ! स्वत:च्या रोल्स राईसला सोन्याची बटणं लावणारा. त्याने माती आणि वाळलेल्या गवताच्या भुकटीचं मिश्रण करायला लावलं. त्याच्या विटा बनवल्या आणि त्या विटांचं बांधकाम त्या माती आणि गवताच्या भुकटीच्या मिश्रणाने केलं आणि नंतर अल आईनमधल्या प्रत्येक किल्ल्याची डागडुजी या पद्धतीने केली.

अल आईन सोडताना एकच जाणवलं, पाण्यावर बाग जगात कुठेही उभी राहते. अल आईन उभारून अरबांनी बाग तेलावरही उभी राहते हे दाखवलं. ■

(१८ जून १९९१)

## परंपरावादी शारजा

आखातात पहिल्यांदा तेल शारजात सापडलं.

पण तेलापेक्षा क्रिकेटनेच शारजाला जागतिक नकाशावर आणलं. निदान क्रिकेट खेळल्या जाणाऱ्या खंडात शारजा माहीत झालं. वाळवंटात हिरवागार गवताचा गालिचा रुजू शकतो, आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रिकेट खेळलं जाऊ शकतं यावर वीस वर्षांपूर्वी कुणी विश्वास ठेवला नसता. बुखातीरने ते अविश्वसनीय काम करून दाखवलं. अलआईन हिरवंगार केलंय, पण पूर्वी तिथे हिरवेपणाची थोडी परंपरा तरी होती. तिथे ओयासिस होतं. इथे वाळूशिवाय काहीही नव्हतं. आजही शारजात किंवा दुबईत इतर प्रकारचं क्रिकेट वाळवंटात पसरलेल्या काँक्रीट खेळपट्टीवर खेळावं लागतं. त्यावर खेळणं म्हणजे काय कष्ट असतात हे समजण्यासाठी किमान एकदा खेळलं पाहिजे. अंगाची लाहीलाही होते. विहीर संपून जाईल एवढं पाणी प्यावं लागतं. डोळ्यांत कुणीतरी शेकोटी पेटवलीय असा भास होतो. पायाखाली गवत आलं की सर्वच मूड बदलून जातो. किमान उन्हाचा ताप सुसह्य होतो.

स्टेडियमबाहेरचं शारजा रखरखीत आहे. शारजा दुबईचं धाकटं भावंड वाटतं. पण एकाच कुटुंबात वाढून दोघांत फरक आहे. दुबई नखरेल आहे. तारुण्यानं मुसमुसलेल्या तरुणीसारखी ती वाटते. इस्लामिक कायद्यातून पळवाटा काढून जेवढं उदारमतवादी राहता येईल, तेवढी उदार दुबई राहते. तिनं परंपरेचा बुरखा जवळजवळ फेकून दिलाय. शारजा अजून बुरसटलेलं धार्मिक आहे. शारजाला बुरख्यात घालण्याचं काम सौदी अरेबियानं केलं. तिथल्या फैसल राजाने शारजाच्या शेखला मदत केली. एक अप्रतिम मशीद शारजात बांधून दिली, पण त्याबरोबर एक अट घातली की इस्लामिक कायद्यांचं उल्लंघन होता कामा नये. झालं. पहिली बंदी मद्यावर आली आणि दुबई - अबुधाबीमधलं मर्यादित 'नाईट लाईफ' सुद्धा शारजात आलं नाही.

मला एक जुना प्रसंग आठवतोय. दुबईहून 'मद्याचमन' आणि उदरभरण करून आम्ही शारजाला निघालो होतो. आमच्याबरोबर एक मुस्लिम पत्रकार होता. त्यानेही मद्यात आपला धर्म बुडवला होता. आम्ही शारजात शिरलो आणि आमची गाडी पोलिसांनी थांबवली. मद्याचा वास आला की 'स्मेलटेस्ट' ते घेतातच घेतात. आम्हाला काही झालं नसतं. फार तर दुबईत परत पाठवलं असतं. मुस्लिम मित्राला




शरियत लावला असता. सुदैवाने त्या पोलिसाने फक्त टॅक्सीच्या ड्रायव्हरची टेस्ट घेतली आणि आम्ही सुटलो.

पण याचा अर्थ शारजात मद्याचा थेंब नसतो असं नाही. जिथे क्रिकेट खेळलं जातं, जिथे विंडीज, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड वगैरेंचे संघ येतात तिथे 'ओलेपण' नाही असं शक्य आहे का ? पण मदिरा तिथल्या हॉटेलात लपूनछपून वाहते. अधिकृत पार्टीसाठी मात्र क्रिकेट संघाला दुबईला आणतात. अर्थात दुबई-शारजा अंतर तसं पंधरा-वीस किलोमीटर्सचं. चर्चगेट-दादरसारखं. पूर्वी शारजा संपताना किंवा दुबई सुरू होताना कळायचं. आता, मधल्या वाळवंटाच्या पट्ट्यावर वस्ती झालीय. त्यामुळे दुबई कुठे संपतं आणि शारजा कुठे सुरू होतं ते कळत नाही. पण जुन्या गमती तिथली बुजुर्ग मंडळी सांगतात. आखातातली पहिली आधुनिक शाळा शारजात सुरू झाली. दुबई - शारजात खाडी आहे. त्या खाडीला भरती आली की रस्ता पाण्याने भरायचा. मग शाळेला सुट्टी मिळायची.

आता शाळेसाठी दुबईच्या मुलाला ना शारजात जावं लागतं ना शारजाच्या मुलाला दुबईत. भारतीय मुलांसाठी तर आता भारतातल्या अभ्यासक्रमाशी संलग्न अशा शाळा आहेत. अभ्यासक्रम भारतासारखा. त्यामुळे दुबई - शारजातून जर भारतीय शाळेत प्रवेश घ्यायचा असेल तर सोपं जातं. अभ्यासक्रम भारतीय म्हटल्यावर पुस्तकं भारतीय आलीच. या पुस्तकांतली इतिहासाची पुस्तकं काही वेळा वादग्रस्त ठरतात. आपल्या इतिहासाशी इस्लामचा इतिहास तसा जोडला गेलाय. आता इस्लामचा इतिहास त्यांना

हव्या त्या रीतीने आपण थोडाच मांडणार ? त्यांना ज्या गोष्टी आक्षेपार्ह वाटतात, त्या पुस्तकातल्या भागावर पांढरा कागद चिकटवला जातो किंवा पिन मारून बंद केला जातो. तिथल्या शाळेत तो भाग मग शिकवता येत नाही. मुलांनी त्याचा अभ्यास मग हवं तर घरी करावा. असो.

शारजा दुबईएवढं सुधारलेलं नाही. तिथली सुधारणा वेगात होतेय असंही वाटत नाही. आम्ही क्रिकेटसाठी शारजाला गेलो की एक तर दुबईत राहतो किंवा शारजात राहिलो तरी ज्या दिवशी सामना नसतो त्या दिवशी आमचा वावर दुबईत असतो. शारजात राहण्यासाठी मात्र काही अप्रतिम हॉटेल्स आहेत. शारजा इंटरकॉन्टिनेंटल हॉटेल तर मी कधीच विसरणार नाही. हॉटेलची इमारतच अफलातून सुंदर आहे. दर्शनी भाग विशिष्ट प्रकारच्या काचेचा आहे. 'पाचर' मारावी तशी ती काच बसवली आहे. त्यामुळे फॉयरमध्ये नैसर्गिक प्रकाश मिळतो. या हॉटेलच्या एका बाजूला अर्थात खाडी आणि समोर त्या खाडीला खेटून जाणारा रस्ता. तो रस्ता त्या हॉटेलात शिरण्यासाठी घातलेल्या पायघड्यांसारखा वाटतो. एकेकाळी अब्दुल रेहमान बुखातीरची भागीदारी त्या हॉटेलात होती. तिथे तो क्रिकेटपटूंना ठेवायचा. पण पत्रकारांना स्वस्त दराने खोली द्यायचा. अर्थात खोलीच फक्त स्वस्त असायची. एरवी फ्रीजमधून मिनरल वॉटरची बाटली काढून तोंडाला लावली की आम्हां पत्रकारांचं 'अर्थकारण' डगमगायचं. सुदैवाने समोर एक मलबाऱ्याचं हॉटेल होतं. त्यामुळे ज्या पैशात इंटरकॉन्टिनेंटलमध्ये पाणी मिळायचं, त्या पैशात त्या मलबाऱ्यांकडे नाश्ता मिळायचा आणि वर पैसे उरायचे. थोडं पुढे 'गितार' नावाचं हॉटेल होतं. तिथे पांच दिरहॅम (त्यावेळी साधारण वीस रुपये) मध्ये पोटभर जेवण व्हायचं. पोटभर आग्रह करून करून वाढलेलं. हे लिमिटेड, ते लिमिटेड हा प्रकार नाही आणि प्यायला पाण्याऐवजी ताक हवं तेवढं. फक्त चूळ भरायला तेवढं पाणी वापरायला लागायचं. परवा शारजात गेलो होतो तेव्हा मी त्या 'गितार' मध्ये जेवलो. आता सात दिरहॅम मोजावे लागतात, पण आग्रहात कुठेही कमतरता नाही. पण नाव असं विचित्र का, हा प्रश्न पडला तुम्हाला ? मलाही पडला. त्याचं कारण सांगतो. त्या रेस्टॉरंटचं नाव गीता होतं. सरकारदरबारी कुणीतरी सांगितलं गीता या नावाला काफरांच्या हिंदूधर्मात पावित्र्य आहे. ताबडतोब फर्मान निघालं, ''नाव बदला.'' मालकाने गीताला 'र' जोडला.

शारजात दोन अप्रतिम सुंदर 'सुक' आहेत. सुक म्हणजे आजच्या भाषेत शॉपिंग सेंटर, मुस्लिम आणि आधुनिक आर्किटेक्चरचा 'निका' त्या सुकच्या निर्माणकर्त्यांने लावलाय. त्याचं बाह्यांग टेराकोटा आणि निळ्या दगडांचं आहे. कार्पेटस्, हिंदुस्थानी ज्वेलरी, पर्शियन पेंटिंग्ज वगैरेंचं प्रचंड कलेक्शन तिथे सापडेल, पण प्रचंड सुक बांधूनही माणसं शारजातून दुबईलाच शॉपिंगसाठी जातात.

'शॉपर्स पॅरडाईज' हा दुबईचा किताब कुणी हिरावून घेऊ शकलेला नाही आणि दुबईत स्टेडियम बांधूनही शारजातलं क्रिकेट दुबई पळवू शकलेलं नाही.

■

(२५ जून १९९५)



फ्रेंच पुराण

जाणाऱ्या माणसाच्या हातावर दही दिलं की तो परततो असं म्हणतात.

१९९० साली पॅरिस सोडताना कुणी हातावर योगर्ट (त्यांचं दही) ठेवल्याचं मला स्मरत नाही. हातावर मायेनं दही ठेवणारं तिथं होतं कोण म्हणा! पण नियतीच कधी कधी माया दाखवते. ती पुन्हा मला पॅरिसला घेऊन गेली.

पुन्हा नियती कधी अशी माया दाखवेल देव जाणे! पण पॅरिस सोडताना हातावर दही ठेवणारं कुणी तरी असावं असं नेहमी वाटत राहतं. ही नगरी कितीही पाहिली तरी मन तृप्त होत नाही.

'शाँजे एलिजे' वरून आणखीन एक चक्कर मारायला हवी असं परवा गेलो होतो तेव्हांही वाटलं. तरी तीनदा तो रस्ता पालथा घातला होता. सॅक्रकच्या पायऱ्या खुणावत राहतात. 'लुव्र' फार घाईत पाहिलं ही भावना, दिवस तिथे घालवले तरी मनातून जात नाही.

दोनदा जाऊनही पिकॅसोची आर्ट गॅलरी पाहिलीच नाही ही खंत पॅरिस सोडताना मनात होतीच.

आणि ती संध्याकाळ! पॅरिसएवढी सुंदर संध्याकाळ इतरत्र फार क्वचितच असेल. त्या फुटपाथवरच्या कॅफेमध्ये चोचीत चोच घालून बसलेलं गोरं तारुण्य, समोर निमुळत्या ग्लासात डोलणारी श्वेत किंवा रक्तवर्णी वारुणी आणि त्या वारुणीची हळूहळू चढत जाणारी नशा! तिथल्या 'संध्ये' मध्ये एक वेगळाच धुंदपणा आहे.

## ◻ पॅरिसमधला इंद्राचा दरबार

आजकाल चटकन 'वर' देणारे परमेश्वर राहिलेले नाहीत. पण ह्या भक्ताला भेटलाच तर काय वर मागायचा हे मी ठरवून ठेवलंय. 'किमान एक वर्षासाठी तरी विशीत नेऊन सोड आणि ते वर्ष फक्त पॅरिसमध्ये राहायला मिळू दे' असा वर मागेन. त्यानंतर उरलेलं आयुष्य रवांडा, सोमालिया किंवा ग्वाटेमालात गेलं तरी चालेल. त्या वर्षाच्या आठवणींच्या टॉनिकवर नरकातसुद्धा राहता येईल. तारुण्याच्या प्रात:काळी आणि मध्यान्हाला पॅरिसमध्ये राहतात ती नशीबवान माणसं, अशी नशीबवान माणसाची माझी व्याख्या आहे.

पॅरिस हे रसिकांचं शहर आहे. कुठलीही फॅशन पहिलं पाऊल पॅरिसमध्ये टाकते आणि मग तिचा जगप्रवास सुरू होतो.

जगातला सर्वोत्तम सुगंध पॅरिसमध्ये दरवळतो. शेनेल नीना रिची, पॉयझन... नाव घ्या तुमच्या आवडीच्या सेंटचं, त्याची जननी पॅरिस.




वारुणींचा सर्वात मोठा आणि लखलखता दरबार पॅरिसमध्ये भरतो.

संगीत, चित्रकला, शिल्पकला वगैरे कलांचं माहेरघर पॅरिसच. नुसते म्युझियम्स पालथे घालायचे म्हटले तरी दोन पाय अपुरे पडतात. दुसऱ्या महायुद्धात फ्रेंचांनी हिटलरपुढे फार चटकन गुडघे टेकले. लेनिनग्राडमध्ये घरन्‌घर नाझीविरुद्ध लढलं, लंडनने बॉंबिंगच्या कितीतरी जखमा सहन केल्या, पॅरिसला ओरखडाही आला नाही. एकेकाळी फ्रेंचांच्या ह्या पुचाटपणाबद्दल मला राग यायचा. पॅरिसचं वैभव उद्ध्वस्त होऊ नये म्हणून फ्रेंचांनी पॅरिस हिटलरच्या पायांवर ठेवलं असं म्हटलं जायचं. पॅरिस पाहिल्यावर त्यांनी फार मोठी चूक केली असं वाटत नाही.

पॅरिस मी तसं बरंच फिरलोय. ते तुम्हाला फिरवून आणायला मला नक्कीच आवडेल. त्या निमित्ताने गोड आठवणी चाळवता येतील. पण त्यावेळी मला एक बदनाम वस्तीत पाहिलेलं अनुपम सौंदर्य आणि कलेबद्दल सांगायला आवडेल. 'पिगाल' हे त्या वस्तीचं नाव. पिगाल म्हणजे पॅरिसमधला वासनेचा तरणतलाव. पॅरिसला गेलेला परदेशी माणूस पिगालमध्ये किमान डोकावल्याशिवाय राहात नाही. तिथं 'मुलॅरोज' नावाच्या थिएटरमध्ये रसिक मन शिरलं की त्याला बाहेर खेचून काढावं लागतं. हे थिएटर वासनेच्या डोहात उभं असलं तरी ते कलेचं मंदिर वाटतं. संध्याकाळ उगवली की ह्या मुलॅरोजचं लाल चक्र फिरायला लागतं आणि मग परदेशी पर्यटकांच्या गाड्या त्या थिएटरसमोर उभ्या राहायला लागतात.

ह्या थिएटरचे दर आधी सांगतो. स्टेजच्या जवळ बसणं, जेवण आणि शँपेनच्या

अर्ध्या बाटलीसह साधारण साडेसात हजार रुपये. उरलेल्या जागी बसणं आणि अर्धी शँपेनची बाटली मिळून दर साधारण चार हजार रुपये. खरं तर सर्वच इथे संपतं; पण त्या थिएटरच्या मालकांना गरीब भारतीयांची दया येत असावी. त्यांच्यासाठी त्यांनी बारजवळचा एक कोपरा राखून ठेवलाय. बारजवळ उभं राहून शो पाहणं आणि तहान भागवायला एक ग्लास शँपेन मोफत. दर अठराशे रुपये. हे अठराशे रुपये भरून मी आणि माझ्या दोन मित्रांनी शो पाहिला.

त्या थिएटरमध्ये बसलेल्या लोकांकडे पाहिलं की जगात समृध्दी कुठेय आणि दारिद्र्य कुठेय ते बरोबर कळायचं. शँपेनचा आस्वाद घेत, (इतर मद्य पिण्यासाठी असतं. शँपेनचा आस्वाद घ्यायचा असतो.) जेवत, तो शो पाहणारी मंडळी पिवळसर आणि चपट्या नाकाची होती. ती सर्व उगवत्या सूर्याच्या देशातून आली होती. बक्षीस म्हणून मिळालेली अर्धी बाटली शँपेन पिऊन वर आणखीन शँपेन विकत घेण्यासाठी क्षमता असलेली आणि शँपेनची नशा डोक्यात साठवत शो पाहणारी बहुतेक मंडळी गोऱ्या कातडीची होती आणि त्यांच्याबरोबर बसलेली थोडी फार पिवळी चपटी माणसं जपानमधल्या मध्यम, कनिष्ठ मध्यम वर्गातली असावीत. अरब फारसे दिसत नाहीत. कारण त्यांना कलेशी फारसं देणंघेणं नसतं. ते स्पर्शसुख घेत पिगालमध्ये इतरत्र फिरत होते. आणि तीन गरीब भारतीय ग्लासात थुई थुई नाचणारी वारुणीची सम्राज्ञी सांभाळत पायऱ्यांवर बसलेले होते. त्यात मी एक होतो.

हा शो म्हणजे तसा सांस्कृतिक शो आहे. नृत्य आणि संगीताचा. सांस्कृतिक म्हणजे फक्त फ्रेंच संस्कृती नाही. जपानी, अरबी संस्कृतीचंही त्यात दर्शन होतं. (पैसे त्यांच्याचकडे असतात) पण ह्या शोचं सौंदर्य आहे त्याच्या भव्यपणात. त्यांच्या वेगवेगळ्या रंगाच्या कॉस्च्युमस्‌मध्ये, नाचाच्या कम्पोझिशनमध्ये आणि त्याच्या एकंदरीत होणाऱ्या परिणामात. त्याचं अचूक वर्णन करायचं असेल तर कालिदासावर फिदा झालेली प्रतिभा आपल्याकडे पाहिजे. माझ्यासारख्या सटरफटर माणसाचं ते काम नाही. ते शब्दाचं भांडार आणू कुठून ? त्या शोमध्ये काम करणाऱ्या मुली पाहिल्या की वाटतं, रंभा - अप्सरा म्हणतात त्या ह्याच असाव्यात. इंद्राचा डोळा चुकवून रोज येत असाव्यात. प्रत्येकाची शरीरयष्टी जवळजवळ सारखी, फक्त रंग वेगळा. बहुतेकांचा गोरा, पण वेगळेपणासाठी काळा, पिवळा, गव्हाळ सुद्धा. एकाच मुलीची चाळीस-पन्नास प्रतिबिंबं स्टेजवर दिसतायत असं वाटतं. इतकं त्यांचं सौंदर्य सारखं, इतकी त्यांच्या हालचालीत 'एकवाक्यता' असते.

त्या तशा अर्धनग्न असतात. पण तरीही त्यांना पाहिल्यावर डोळ्यात वासना येत नाही. हाडामांसाचं शिल्प पाहतोय असं वाटतं आणि त्या सर्वात ज्येष्ठ शिल्पकाराबद्दल आदर वाटायला लागतो. अंगावरचे रंगीबेरंगी कपडे त्यांची नग्नता खुलवते. ती बटबटीत

करत नाहीत. प्रत्येक नाचाला एक कथानक असतं. कथानक तसं राजा-राणी - राजकन्येचं! गोष्टीच्या पुस्तकात आपण वाचतो तसंच! पण त्याचं संगीतमय रंगीबेरंगी रूप स्टेजवर पाहताना मन वेडावून जातं.

तो शो पाहिल्यावर दोन तास इंद्राच्या दरबारात हजेरी लावल्यासारखं वाटलं. मुलॅरोज मधून तरंगतच बाहेर पडलो. डोळ्यात त्या अप्सरा होत्या. पोटातली वारुणींची सम्राज्ञी डोक्यात जाऊन बसली होती. त्याक्षणी पाय जमिनीवर नव्हतेच. इतक्यात एक धक्का बसला. एक पॅरिसची परी खुणावत होती. शिल्पाच्या दुनियेतून मला वासनेच्या दुनियेत खेचायला उत्सुक होती. स्वर्गातून जमिनीवर आल्याची जाणीव तिने मला करून दिली. त्याक्षणी मॅडोनाने खुणावलं असतं तरी मी शिल्पाची दुनिया सोडली नसती. इतका मी त्यात हरवलो होतो.

■

(१७ सप्टेंबर १९९५)

पॅरिसची मजा लुटायची असेल तर फ्रेंच भाषा यायला हवी.


नाही आली तरी ही भाषा धमाल उडवते. तिची जननी लॅटीन. त्यामुळे ती नात्याने इंग्रजीची सख्खी बहीण. पण लिपी सोडली तर दोघींचे गुण तसे वेगळे, स्पेलिंगवरून उच्चार करायला गेलात तर संपलात. 'सॅक्रे - कर' उच्चारताना ते सॅक्रेनंतर 'क' वरच थांबणार. पॅरिस लिहिताना अगदी Paris असं लिहिणार पण उच्चारताना स गायब होतो. म्हणणार 'पारी' शेवटच्या LLES ला स्मरून आपण VERSAILLES ला व्हर्सॉइल्स म्हणणार. त्यांना इतका जड उच्चार जमत नाही. ते व्हर्साय म्हणून थांबणार. मग LLES चा लांबलचक शेवटचा डबा त्या शब्दाला कशाला ? त्याला उत्तर नाही. मॅट्रिकपर्यंत मी जे काही थोडं फ्रेंच शिकलो तेव्हापासूनच मला या नको असलेल्या शब्दांच्या डब्याचं कोडं काही सुटलेलं नाही. 'शॉजेएलिजे' या नावानं तर मला दमवलंय. अनंत वेळा मी त्याचा उच्चार चुकलोय. कारण त्याचं स्पेलिंग CHAMPS ELYSEES. तीस वर्षांपूर्वी, तीन वर्षे मी शिकलेलं फ्रेंच काही पॅरिसमध्ये माझ्या कामाला आलं नाही. सुदैवाने बान्जू, बॉसुवा, मेसी हे शब्द आठवत होते. हे शब्द पॅरिसमध्ये मात्र अचानक उपयोगी पडतात. नागपुरी माणसाच्या तोंडात जसे पान, तसे फ्रेंचांच्या तोंडात हे शब्द. मेसी हा शब्द इंग्रजी थॅन्क यूचा फ्रेंच भाऊ. इंग्रजांप्रमाणे फ्रेंचांना हा शब्द

## □ मायमराठी आणि फ्रेंच मावशी

न उच्चारता जगता येत नाही.

पण ज्याला ही भाषा कळत नाही. त्यालासुद्धा ही भाषा गोड वाटू शकते. कठोर उच्चाराचे शब्दच या भाषेत नाहीत. स्विस चॉकलेटसारखे फ्रेंच शब्द जिभेलाही गोड लागतात.

फ्रान्स आणि इंग्लंडमध्ये फक्त खाडीचं अंतर आहे. बोट अवघ्या तासाभरात हे अंतर पार करते. अगदी डोव्हरला उभं राहिलं की, कॅलेचा किनारा अस्पष्ट दिसतोसुद्धा आणि आता तर खाडीतून बोगदा काढलाय. इंग्रज माणसाला तर तिकिटासारखा नुसता पासपोर्ट दाखवला तरी फ्रान्समध्ये जाता येतं. व्हिसा वगैरे भानगड नाही. पण तरीही फ्रेंच माणसं इंग्रजांच्या भाषेला आपल्या देशात फारशी घुसखोरी करू देत नाहीत. त्यांचा भाषेचा कट्टरपणा अफाट आहे. पन्नासच्या पुढच्या



बहुतेक मंडळींना इंग्रजी येत नाही. तरुण मंडळी त्यातल्या त्यात बोलू शकतात. पण त्यांना होणारे कष्ट जाणवतात. माझ्याबाबतीत घडलेला किस्सा मी कधीच विसरणार नाही. कुठल्याशा एका ठिकाणचा पत्ता विचारत मी फिरत होतो. 'न... पा' ''न....पा'' ह्या पलीकडे उत्तर मिळत नव्हतं. एका तरुणाला विचारलं. त्यानेही खांदे उडवून 'न..पा' म्हटलं. पण तो थोडा पुढे गेला आणि वळून म्हणाला, ''मला येतं इंग्लिश, पण मी बोलणार नाही.'' अर्थात मला वेगळा अनुभवही आलाय. परवा पॅरिसमध्ये असताना हॉटेलच्या शेजारी एक बस-डेपो होता. हॉटेलकडून एफेल टॉवरला कसं जायचं हे विचारायला आम्हाला तब्बल पंचेचाळीस मिनिटं लागली. काण त्या डेपोमध्ये काम करणाऱ्या फक्त एका बाईला इंग्लिश येत होतं. पहिल्या दिवशी एक कंडक्टर तिला डेपोतून घेऊन आला. (कंडक्टर हा माणूस उपयोगी पडणारा असू शकतो हे कळायला एवढं दूर जावं लागतं.) बरं, त्या बाईचं इंग्रजीचं

ज्ञानही अगदी तुटपुंज होतं. पण तरीही निष्ठेने इंग्लिश शब्दांशी ती लढली, झगडली आणि आम्हाला तिने पत्ता सांगितला. मुख्य म्हणजे परत तीन दिवस हे काम तिने निष्ठेने केलं.

हा असा इंग्रजीवरचा खुन्नस फ्रान्सइतकाच जर्मनीतही दिसतो. युरोपात फ्रेंच ही दुसरी भाषा म्हणून चालू शकते. इंग्रजीला ते सावत्र बहीण मानतात.

यावेळी पॅरिसमध्ये माझ्या एका मित्राने धमाल केली, तो डेंचर विकत घ्यायला गेला. दुकानदाराला नाना तऱ्हेने त्याने डॅचर काय असतं हे समजावून सांगितलं. दुकानदाराच्या डोक्यात काही जाईना. शेवटी तो हताश होऊन म्हणाला, 'अरे, दाताची कवळी पाहिजे रे.' 'आहो, कॉवली कॉवली दाताची कवळी.' म्हणत तो आत गेला आणि खरोखरच दाताची कवळी घेऊन आला. त्या क्षणापासून त्याने एक गोष्ट केली. इंग्रजीत बोलणं सोडलं आणि मराठीत बोलणं सुरू केलं. आणि खोटं नाही सांगत, भाषेचे सर्व बांध धडाधड कोसळले. आमच्या हॉटेलच्या मालकिणीला इंग्रजीचा गंध नव्हता. तिला मी इंग्रजीत एक पत्ता विचारला आणि तिने मला बरोबर उलट्या दिशेला पाठवलं. तिच्याशी तो माझा मित्र मराठीत बोलायचा. अगदी पोराने आईशी बोलावं तसं. पण तिला कळायचं. त्यामुळे तो कधी रस्ता चुकला नाही. माय मराठी आणि फ्रेंच मावशीचं एवढं जवळचं नातं आहे हे मला त्या दिवशी कळलं. पण माय मराठी आणि फ्रेंच मावशीचंच जुळेल असं नाही. माय कानडी किंवा माय कोकणी आणि फ्रेंच मावशीचंही जुळू शकेल. कारण फ्रेंच माणूस बोलताना फक्त जिभेने बोलत नाही. तो डोळ्याने, हाता-पायांनी, जवळपास सर्व शरीरानेच बोलतो. त्यामुळे शब्दांपेक्षा त्याच्या हालचालींचा अर्थबोध लवकर होतो. तात्पर्य काय, जर फ्रेंच भाषा येत नसेल तर पॅरिसमध्ये मातृभाषेत बोलावं, काम सोपं होतं.

पण भाषा न आल्यामुळे आपण फ्रान्समध्ये जगापासून तुटतो. कारण वर्तमानपत्र फ्रेंचमध्ये! एकही इंग्रजी वर्तमानपत्र तिथून निघत नाही. एवढंच काय, फ्रान्समधून 'लिकीप' नावाचं फक्त खेळाला वाहिलेलं फ्रेंच वर्तमानपत्र निघतं. त्यातही 'इंग्रजी' खेळांना जागा नसते. लॉर्डसवर क्रिकेटचा अतीव महत्त्वाचा सामना सुरू असो लिकिपला त्याची पर्वा नसते. तुम्हाला इंग्रजी वर्तमानपत्र वाचायचं असेल तर ते मोठ्या स्टेशनवर नाहीतर विमानतळावर मिळतं. एरवी इंग्रजीला थारा नाही. दुकानाच्या पाटीवर नाही की बसच्या तिकिटावर नाही. टेलिव्हिजनवर बातम्याही फ्रेंचमध्ये. फ्रेंच भाषेची गरज फक्त दोन ठिकाणी लागत नाही. टीव्हीवरचे चित्रपट पाहताना आणि पिगालमधल्या पऱ्यांच्या डोळ्यातलं आव्हान समजण्यासाठी. त्यावेळी त्यांचं शरीर बोलतं आणि

आपलं मन अतिसंवेदक अँटेना असल्याप्रमाणे ते सिग्नल खेचून घेतं.

मात्र एरवी फ्रान्समध्ये फ्रेंचशिवाय फिरणं, उघड्या डोळ्याने खेळलेली आंधळी कोशिंबीर.

■

(१ ऑक्टोबर १९९४)

## □ महागडी चुंबनं

"पॅरिसच्या रात्रीबद्दल बरंच ऐकलंय! तिथे कधी फिरवतोस? तिथे फिरायला जाताना मला बोलवायला विसरू नकोस."

पॅरिस स्टेशनवर पाय ठेवण्यापूर्वीच अनेकांनी माझ्यावर 'क्लेम' लावले. पॅरिसला माझी दुसरी फेरी होती. त्यामुळे तिथला दगड न् दगड, सॉरी मुलगी न् मुलगी माझ्या परिचयाची आहे, अशी काहींची समजूत होती.

पॅरिस म्हणजे पऱ्यांचा देश, पॅरिस म्हणजे रसिकता. पॅरिस म्हणजे रंगेलपणा, पॅरिस म्हणजे धमाल, पॅरिस म्हणजे सेक्सचा स्वर्ग, अशी अनेकांची दृढ कल्पना होती.

पॅरिसचा कॅब्रे म्हणजे कॅब्रेतला अंतिम शब्द. तो पाहिला की 'त्या' क्षेत्रातल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण. रसिकतेच्या पिंडाला कावळा शिवायला मोकळा, ही काहींची समजूत!'

पण पॅरिस सोडताना काही रसिकांच्या इच्छा-आकांक्षांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. खिसे रिकामे झाले, पण स्वर्गातल्या अप्सरा काही दिसल्या नाहीत.

पॅरिसमध्ये स्वर्ग होता. अप्सराही होत्या. पण त्या मुलॅरोज किंवा लिडोत होत्या हे मी मागच्या एका लेखात सांगितलंच आहे. त्या स्वर्गात शिरायचे दर मोठे आणि आत शिरून पाहायचं काय तर तसा सांस्कृतिक शो. त्यामुळे धमाल पाहायला आलेल्यांच्या ते तत्त्वात बसणारं नव्हतं. त्यांना हवं होतं 'लाइव्ह सेक्स'. रस्त्यावरून जाताना त्याच्या प्रचंड जाहिराती त्यांच्या मनात चलबिचल निर्माण करायच्या.

भारतीय माणूस पाश्चिमात्य देशात आला की, संस्कृतीचे बंध तो थोडे मोकळे करतो. अगदीच शर्ट काढून तो फिरत नाही. पण पाश्चिमात्य संस्कृतीची झुळूक त्याला हवी असते. प्रत्यक्ष सेक्सच्या वाटेला जाण्याएवढा तो धीट नसतो. 'हे गोरे काय काय करतात बुवा' हे कीहोलमधून पाहायची त्यांना हौस असते. घरी पोरं झोपल्यावर किंवा स्वत:च्या बेडरूममध्ये त्यांनी 'निळ्या चित्रफिती' चवीने पाहिलेल्या असतात. चारचौघांत ते त्याबद्दल नाकं मुरडतात. भारतीय संस्कृतीचा पान्हाही त्यांना अधूनमधून फुटतो. पण युरोपात आले की, पाश्चिमात्य संस्कृतीची झुळूक त्यांना हवी असते. युरोपात त्या वस्तीत फक्त शौकीन, आंबटशौकीन तरुणच फिरतात असे नाही. सहकुटुंब सहपरिवार एफेल टॉवर किंवा 'ल लुव्र' पाहावं तसं तिथे गोरे किंवा जपानी ॲमस्टरडॅममध्ये दाम स्ट्रीटच्या मागच्या




गल्लीत, हॅमबुर्गच्या रिपबानमध्ये किंवा पॅरिसच्या पिगालमध्येही फिरतात. त्यामुळे भारतीय माणसाला 'विन्डो शॉपिंग' करताना तिथे पाप करतोय असं वाटण्याची शक्यता कमी असते.

तर त्या प्रचंड जाहिराती पाहून आमच्यातले काहीजण आत शिरले आणि फसले. जाहिरातीबरोबर त्यांचे 'सेल्समन' उभे असतात. तेही इंग्रजीवर बलात्कार करीत वाट्टेल ती स्वप्नं येणाऱ्या-जाणाऱ्याला दाखवत असतात. लाइव्ह शो म्हणजे स्टेजवर केलेला संभोग. त्यात मग रावकवी पंथियांची, लेडी राव कवी पंथियांची वगैरेही विकृती दाखवलेली असते. म्हणजे बाहेर अशी मोठ्ठी जाहिरात असते. आतमध्ये भाडोत्री पऱ्या फिरत असतात. त्यांचं काम तुम्हाला मोहात पाडण्याचं. तुम्ही मोहात पडलात की फसलात. कारण त्यांचा मीटर पॅरिसमधल्या टॅक्सीपेक्षा वेगाने पडतो आणि खिसा फाटत जातो. मुळात बाहेर ज्या वारूणीचा ग्लास पाच फ्रँकला मिळतो तो तिथे वीस-पंचवीस फ्रँकला. मदिराक्षीला कंपनी म्हणून घेतलंत की तिचा आणि तिच्या वारुणीचा दर वेगळा. त्यात भाषेचा गोंधळ असतोच. त्यामुळे मोठं बिल तुमच्या पुढ्यात आलं की, ते भरण्यापलीकडे दुसरा पर्याय तुमच्यापुढं नसतो.

बऱ्याच वेळा बाहेरच्या जाहिराती आणि आतला 'खेळ' यांचा मेळ नसतो. निव्वळ बनवाबनवी असते. दोन-चार मुली नग्न नाचत असतात. नाच म्हणजे अंग हलवण्याला आपण नाच म्हणायचं. 'आत गेल्यावर कितीही तास बसा' हा बाहेरच्या सेल्समनचा आग्रह असतो. पण तास-दीड तास बसूनही बऱ्याच वेळा तुम्हाला हवा

असलेला शो सुरू होत नाही. त्यांना त्यात रस नसतो. कारण शोची वाट पाहण्याच्या तुमच्या उत्कंठेवरच ते पैसे कमावत असतात. तुम्ही वाट पाहत तास-दीड तास बसलात की, दोन - चार वारुणीचे ग्लास किंवा मदिरेचे पेग संपवणार. तुम्हाला सोबत करायला आलेल्या गौरांगनेला पेग पाजणार, काही गोष्टी खाणार, यावरच त्यांचा गल्ला भरलेला असतो. 'लाइव्ह शो' होतच नाही असं नाही. तो होतो, पण कधी तरी रात्री, उत्तररात्री. तोपर्यंत तुमच्या पेशन्सची अगदी कठोर परीक्षा घेतलेली असते आणि पाकीट डोळ्यांदेखत मारलेलं असतं.

एक जुना प्रसंग आठवतोय. नऊ-दहा वर्षांपूर्वीचा. सचोटीसाठी प्रसिद्ध असलेल्या ब्रिटिशांच्या लंडनमधला! लॉर्डसवर जुगारात माझ्या मित्राने एकदा पाचशे पौंड कमावले. इंग्लंडमध्ये पाचशे पौंड म्हणजे जॅकपॉट. तो तिथे नुसता फिरायला आलेला. म्हणाला, "खिशात पैसे आहेत, लाइव्ह शो, टॉपलेस बार काय असतं ते तर पाहू या." हात धरून एखादा पाहावीशी वाटणारी दुनिया फिरून आणतेय म्हटल्यावर, न जाण्याचा करंटेपणा करण्याएवढा मी अरसिक नव्हतो. धडधडत्या छातीने सोहोच्या एका छोट्या गल्लीत आम्ही शिरलो. निऑन साइन्स डोळ्यात खुपत होत्या. आपापला माल विकणारे सेल्समन बाहेर दरवाजात उभे होते. बाहेरच्या काही आकर्षक छायाचित्रांना बळी पडून आम्ही एके ठिकाणी शिरलो. तो जिना भुयारात घेऊन जात होता. थोडा काळोख आणि मग एकदम कानावर कानठळ्या बसणारा संगीताचा आवाज पडला. आम्ही तळघरात होतो. कोपऱ्यात बार होता. समोरच्या सहा फूट बाय सहा फुटाच्या चौरसाला ते स्टेज म्हणत होते. रंगीबेरंगी दिव्यांचा झोत त्या चौरसावर पडत होता. आणि दोन मदनिका त्या तथाकथित स्टेजवर डुलत होत्या. त्या डुलण्याला प्रेक्षकांनी नाच म्हणावं ही त्यांची सर्वसाधारण अपेक्षा होती. यौवनाचा भार त्या मदनिकांना जेमतेम पेलतोय असं चित्रं होतं. त्यामुळं असेल, त्यांच्या अंगावर चिंधीभर कपडासुद्धा नव्हता. यौवनाच्या वजनात आणखीन कपड्याचं वजन कुठे पेलणार?

मला माझ्या छातीची धडधड ऐकू येत होती. मी तो तळघर न्याहाळल्यावर लक्षात आलं की, भारतीय बनावटीचे आम्ही दोघेच होतो. भेदरलेलेही आम्ही दोघेच होतो. बाकीचे रोजच्या सरावातले वाटत होतं. टॉपलेस वेट्रेसने ऑर्डर घेतली. धडधडणं वाढलं होतं. पण त्यात टॉपलेस वेट्रेसचा वाटा शून्य होता. वातावरणच आम्हाला घाबरवत होतं आणि कौंटरजवळ उभे असलेले बुलडॉगसारखे दिसणारे दोन निग्रो वातावरण जास्तच भयाण करत होते. रामसेच्या चित्रपटात काही खास शोधून आणलेले चेहरे असतात वातावरणाला भयाण करण्याचं काम त्यांच्याकडे सोपवलेलं असतं. तसे ते मानवी बुलडॉग. मित्राच्या खिशातले पाचशे पौंड हेच आमच्याकडे तिथून सुखरूप बाहेर पडण्यासाठी एकमेव शस्त्र होतं.

इतक्यात एक संगमरवरी शरीराची मुलगी आमच्याकडे आली आणि मित्राच्या मांडीवर बसली. त्या मुली जिनीयस असाव्यात. कुणाचा खिसा गरम आहे हे तिला कसं चटकन कळलं पाहा. तिचं एक ड्रिंक झालं. मग त्याने घाबरत घाबरत चुंबन मागितलं. त्या जगात चुंबन ही मागायची गोष्ट नसते. ते घ्यायचं असतं. त्यासाठी विनंतीच्या पायघड्या कशाला हे माझ्या शिवाजीपार्कीय मित्राला कळू नये? तिने पुढचा पेग मागितला. तिने याचं पाणी जोखलं होतं. मांडीवर बसलेल्या मुलीकडे चुंबनाची विनंती करणारा पुरुषोत्तम तिने पहिल्यांदा पाहिला असावा. हा चुंबन मागायचा आणि ती पेग मागायची. पेगचा रंग कोकाकोल्याचा आहे असं मला आधी वाटलं. नंतर खात्री झाली की तो कोकाकोलाच होता.

मी मित्राला शुद्ध मराठीत म्हटलं, "तू काय आरंभलंयस? पाच पौंडाला एक चुंबन इतका भयानक रेट इथला राजासुद्धा देणार नाही." मी तिला विचारलं, "लाइव्ह शो' कधी सुरू होणार?" ती बेफिकीरपणे म्हणाली, "अजून तास सव्वा तास लागेल. पण त्यापेक्षा आपण लाइव्ह शो केला तर. आणखीन फक्त ऐंशी पौंड लागतील. बाजूला जागा आहे."

त्याक्षणी मित्रालाही आपण फसलेलो आहोत याची जाणीव झाली. चुंबनांचा वर्षाव थांबला. त्याने बिल मागवलं. बिलावर दोनशेचा आकडा पाहिला. आज त्या बिलाची रुपयाची किंमत दहा हजार झाली असती. इतकी महागडी चुंबनं पाहण्याचा योग पहिल्यांदाच आला होता.

आणि आजपर्यंत तरी शेवटचा आहे.

■

(८ ऑक्टोबर १९९५)

## मोनालिसा

"चला म्युझियम पाहायला" म्हटल्यावर पळ काढणारी कितीतरी मंडळी मी पाहिली आहेत. पण त्याचप्रमाणे म्युझियममध्ये तासन् तास रमणारी मंडळीही असतात.


मला स्वत:ला काही ठराविक म्युझियम पाहणं आवडतं. बडोद्याला गेलो आणि वेळ असला तर दोन गोष्टी आवर्जून पाहतो. एक म्हणजे कमाठी बागेतल्या म्युझियममधला देवमाशाचा प्रचंड सांगाडा आणि दुसरं, मोतीबागेतल्या पेंटिंगच्या म्युझियममधील रवी वर्माची चित्रं.

खरं तर चित्रकलेतलं मला फारसं काही कळतं असं नाही. फारसं नाही हेसुद्धा उगाचच म्हटलं. आपलं सरावानं लिहिलं गेलं एवढंच. खरं तर काहीच कळत नाही. आधुनिक चित्रकला तर एखाद्या बाऊन्सरसारखी डोक्यावरून जाते. ही कला चित्र काढणाऱ्याला कळत नाही, मग आपल्याला काय कळणार ! पण चांगलं पेंटिंग अपील होऊ शकतं. लताचं गाणं गोड आहे, हे समजण्यासाठी कान लागतो. शास्त्रीय संगीताचं ज्ञान हवंच असं नाही. रवी वर्माच्या चित्रांचंही तसंच आहे. रसिक डोळे लागतात. पुढच्या गोष्टी आपोआप होतात. ते डोळ्यांतून नकळत मनात जाऊन बसतं.

हैदराबादला गेलो की सालारजंग म्युझियम पाहावासा वाटतो. तिथे काही कलेक्शन्स विशेषत: घड्याळाचं कलेक्शन्स तर अफलातून आहे.

युरोपात शहरा-शहरात म्युझियम्स असतात. किंबहुना म्युझियम नाही असं शहर नसावं. त्यातला प्रत्येक पाहण्यासारखा असतो असं नाही. पण काही म्युझियम्स डोळे दिपवून टाकतात. लंडनच्या नॅचरल हिस्टरी म्युझियममध्ये लहान मुलाला सोडलंत, तर ते सहजासहजी तिथून बाहेर पडणार नाही. आपली अवस्थाही लहान मुलासारखी होते. दिवसभरात सर्व दालनं नीट पाहून होतच नाहीत. आपले पाय दुखतात म्हणून आपण बसायचा प्रयत्न करतो. पण मन थकत नाही. ते सतत हात धरून उठवायचा प्रयत्न करतं. बरं, तिथं 'मुलांनी हात लावू नये' वगैरे मुलांचा हिरमोड करणाऱ्या पाट्या नसतात. उलट मुलांनी खेळातून माहिती मिळवावी म्हणून वेगवेगळी बटणं उपलब्ध करून दिलेली असतात. त्या बटणांशी चाळा केला तरी एखादा टी. व्ही., एखादा कॉम्प्युटर, एखादा प्रोजेक्टर त्यातून चित्रमय माहिती देतो.

युरोपमधला प्रेक्षणीय आणि वलयांकित म्युझियम म्हणजे पॅरिसमधला



'ल लुव्र.' या लुव्रमध्ये चार लाख संग्राह्य वस्तू आहेत. अर्थातच त्या एका रात्रीत जमलेल्या नाहीत. सोळाव्या शतकातल्या पहिल्या फ्रान्सिसपासून या कलात्मक वस्तूंचं जतन सुरू झालंय. लुई (तेरावा) आणि लुई (चौदावा) यांनी त्यात भरपूर भर घातली. (त्यांनी कलेतली हिरेमाणकं जमवताना प्रजेला मात्र उपाशी ठेवलं.) पहिल्या नेपोलियनने चांगला मार्ग शोधला. तो लढाई जिंकला की पराभूत देशाकडून खंडणीच्या रूपात कलेची हिरेमाणकं वसूल करायचा.

हा म्युझियम पाहणाऱ्या सर्वसाधारण माणसाला त्यातल्या सर्वच्या सर्व कलावस्तूंचं आकर्षण नसतं. लोक तिथे रांग लावतात ते 'मोनालिसा' चं पेंटिंग पाहण्यासाठी. जगात त्यापेक्षा लोकप्रिय पेंटिंग नसावं. व्हॅन गॉगचं 'सन फ्लॉवर' लोकप्रिय आहे. पण मोनालिसा ती मोनालिसा. लिओनार्ड द विंची या महामानवाच्या कलेचा तो आविष्कार आहे. ते चित्र चांगलं आहे. ते सर्वश्रेष्ठ का आहे हे मात्र माझ्या आकलनापलीकडचं आहे. शेकडो माणसं ते पेंटिंग रोज पाहतात. पण त्यातल्या श्रेष्ठत्वाचं रहस्य उलगडून दाखवणारा लाखात एक सापडणंही कठीण आहे.

लुव्रमध्ये शिरल्यावर मी सर्वात प्रथम 'मोनालिसा' पाहिली. जवळपास प्रत्येक माणूस तेच करतो. तिचा फार शोधही घ्यावा लागत नाही. जिथे प्रचंड गर्दी दिसते तिथे मोनालिसा आहे हे खुशाल समजावं. 'फोटो काढू नये' असं म्हटलेलं असलं तरी कॅमेऱ्याचे फ्लॅश त्या कड्याकुलपातल्या मोनालिसावर पडत असतात. सुरुवातीला तर माझ्यावर गर्दीतून मान उंचावून मोनालिसाला पाहायची पाळी आली. मग थोडा

वेळ थांबून मी तिचं शांतपणे दर्शन घेतलं. त्याची गरज होती. नाहीतर मग लुव्रमध्ये शिरायचं कशाला !

मी मूर्ख असेन, पण माझा ते चित्र पाहिल्यावर भ्रमनिरास झाला. प्रचंड अपेक्षेने तिथे गेल्याचा तो परिणाम असावा. (माधुरी दीक्षितला प्रत्यक्षात मेकअपशिवाय पाहणाऱ्याचा असाच भ्रमनिरास होतो असं म्हणतात.) पण या चित्रावर हजारो शब्दफुलं वाहिली गेली आहेत. मोनालिसा ही काल्पनिक स्त्री नव्हती. ती इटलीतल्या फ्लॉरेन्समधली. चौदाशे पंच्याण्णव साली तिने फ्रॅन्सेस्को डेल जिओकॉण्डो या सुप्रसिध्द व्यक्तीशी लग्न केलं. फ्लॉरेन्स ही लिओनार्ड द विंचीची कर्मभूमी. पंधराशे तीन ते पंधराशे चारच्या दरम्यान कधी तरी विंचीने हे चित्र काढलंय. विंचीला स्वत:ला हे चित्र अतिशय आवडायचं. बरीच वर्षे हे चित्र त्याच्याकडे होतं. फ्रान्सच्या पहिल्या फ्रॅन्सिसने ते विकत घेतलं. बहुधा लिओनार्डकडूनच. तिचं गूढ हास्य हा चर्चेचा विषय आहे. पण असं म्हणतात की, त्या हास्यात 'गूढ' काहीच नाही. त्या काळात स्त्रीने ओठ किंचित विलग करून हसणं ही संस्कृती होती. स्त्रीचं सौंदर्य त्यामुळे द्विगुणित होतं असं मानलं जायचं. हे चित्र एकोणीसशे अकरा साली लुव्रमधून पळवलं गेलं. त्यानंतर मोनालिसा थेट फ्लॉरेन्स ह्या तिच्या गावी एका हॉटेलात सापडली. पुन्हा तिला ल लुव्रमध्ये आणलं गेलं. त्या दिवसापासून आजपर्यंत ती सौंदर्यप्रेमींना कड्याकुलपातूनच दर्शन देते.

याच ल लुव्रमध्ये मोनालिसाची बहीणही आहे. अर्थातच 'रक्ताची' किंवा 'रंगाची' बहीण ती नाही. तिचा निर्माताही लिओनार्ड द विंची नाही. कॅमिली कोरोहचं ते पेंटिंग आहे. पण तिच्या आणि मोनालिसाच्या चेहऱ्यात आणि पोजमध्ये साम्य आहे. मोनालिसाची ही बहीण तेवढी लाडकी नाही किंवा लोकप्रिय नाही. त्यामुळे कडीकुलूप तिच्या नशिबात नाही. हे पेंटिंगही सुंदर आहे. पण नक्कल कधीच लोकप्रिय होऊ शकत नाही. तिथल्या आर्ट गॅलरीत अनेक सुंदर पेंटिंग्ज आहेत. विशेषत: नेपोलियनच्या राज्याभिषेकाचं पेंटिंग 'डेथ ऑफ सॅण्डेना पालोस', 'रेप ऑफ सबाईन वुमेन' किंवा लिओनार्डोचंच 'द व्हर्जिन ऑन द रॉक्स' पेंटिंग्ज डोळ्यांचं पारणं फेडतात. ह्या व्हर्जिन ऑन द रॉक्समध्ये प्रकाश मागच्या दगडांच्या फटीतून झिरपत लहान मुलं खेळवणाऱ्या व्हर्जिनवर येऊन पडताना दाखवलाय. रंगाच्या आधारे हे दाखवणं कठीण आहे, हे आपल्यासारख्या सामान्य माणसालाही कळू शकतं आणि लिओनार्डोला आपण आपोआप सॅल्यूट ठोकतो.

■

(१५ ऑक्टोबर १९९५)

## □ मागोवा फ्रेंच क्रांतीचा

पॅरिस शहराबद्दल मला सर्वात जास्त आकर्षण वाटलं, फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल वाचल्यावर! सर्व क्रांतीची जननी ही फ्रेंच राज्यक्रांती.

लोक पॅरिसला आले की एक तर आयफेल टॉवरकडे धावतात, नाही तर ' पिगाल 'कडे.

एक पॅरिसची सर्वात सुप्रसिद्ध वास्तू, दुसरी जगातली सर्वात बदनाम वस्ती, पण रंगेल माणसासाठी सर्वात आकर्षक रंगमहाल! (आता तो ॲमस्टरडॅम आणि बँकॉकच्या रंगमहालापुढे फिका पडतोय तो भाग वेगळा.)

पण मला पहिलं धावावसं वाटलं बास्तीलकडे. बास्तीलचा तुरुंग म्हणजे पॅरिसचं अंदमान. १४ जुलै १७८९ रोजी या तुरुंगावर जनतेने हल्ला केला. तुरुंगाची दारं उघडली गेली. फ्रेंच राज्यक्रांतीची ती पहिली ठिणगी होती. त्या ठिणगीने फ्रान्स पेटवलं आणि बघताबघता राजघराणं बेचिराख झालं.

आज हे लिहिताना माझ्या हातावरचे केस उभे राहिले आहेत. कारण डोळ्यांपुढून फ्रेंच क्रांतीची वर्णनं सरकतायत. मी बास्तीलला गेलो तेव्हा असाच पूर्णपणे चार्ज झालेल्या बॅटरीसारखा होतो. बास्तील स्टेशनवर पोहोचेपर्यंत क्रांतीच्या दिवसात मी पोहोचलोसुद्धा होतो. तिथे गेलो आणि फ्युज उडाल्यासारखी अवस्था झाली. तुरुंग जाऊ देत, तुरुंगाचा दगडसुद्धा दिसला नाही. एक सामान्य विभाग होता. मुंबईत आग्रीपाडा किंवा भायखळा आहे, तसं पॅरिसमध्ये बास्तील. नाही म्हणायला एक क्रांतीच्या नावाने ' खांब ' उभा आहे आणि स्टेशनवर क्रांतीची तीन-चार पेंटिंग्ज आहेत. टुरिस्ट ऑफिसमध्ये चौकशी केल्यावर कळलं की, ज्या जागी खांब उभारलाय त्या जागी तो तुरुंग होता. तुरुंगाचा दगड न् दगड कोसळवला गेला. आजूबाजूच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत, त्यासाठी बास्तीलच्या तुरुंगाचे दगड वापरले आहेत.

मी पुन्हा एकदा बास्तीलला फेरफटका मारला. माणसाचं मन किती विचित्र असतं पहा. किती विचित्र भराऱ्या मारतं ! ज्या इमारतीत मला आधी रस नव्हता, ज्या इमारतीचे दगड निव्वळ कुठल्याही दगडासारखे वाटत होते. ते अचानक वेगळे वाटायला लागले. त्यावर निरपराध जनतेचं रक्त दिसायला लागलं. त्या थंड दगडांना वाचा फुटलीय् आणि ते तुरुंगातल्या कैद्यांच्या व्यथा सांगतायत असा भास व्हायला लागला.

तिथून व्हर्सायला गेलो आणि

खरोखरच तिथल्या पॅलेसच्या प्रत्येक दगडावर गरिबांच्या घामाचे आणि रक्ताचे डाग मला स्पष्टपणे दिसले. ते प्रत्येकाला दिसतील असं नाही. प्रत्येकाच्या मनोवृत्तीवर, त्याला कशात रस आहे त्यावर ते अवलंबून आहे. ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावरून फिरताना अनेकांना वाळूत लोळणाऱ्या अर्धनग्न गौरांगना दिसतील. पाण्यात डुंबणारी त्यांची गोंडस मुलं दिसतील. 'ने मजसी ने परत मातृभूमीला' म्हणणारे सावरकर डोळ्यांसमोर येतीलच असं नाही.

डोक्यात असलेल्या फ्रेंच क्रांतीमुळे मला व्हर्सायचा पॅलेसही अस्वस्थ करून गेला. मी तिथल्या वैभवाने भारावून गेलो. पण एका व्यक्तीने केवळ स्वत:च्या सुखासाठी उडवलेली अफाट संपत्ती पाहून शिसारीही आली. तो पॅलेस पाहिल्यावर फ्रान्समध्ये क्रांती का झाली हे सांगावं लागतच नाही.

सामान्य माणसाला पावाचा तुकडा मिळत नव्हता. तो कोंदट खोलीत दिवस काढत होता. तेव्हा राजाचे पाळीव कुत्रे सोन्या-चांदीने सजवलेल्या बेडरूममध्ये आराम करीत होते. या व्हर्सायच्या महालाचं वैभव जाणवतं महालात शिरल्यावर. डोळ्यांना सोन्याची आणि हातापायांना विविध रंगाच्या इटालियन मार्बलच्या गुळगुळीत स्पर्शाची सवय होऊन जाते. जमिनीचा किंवा भिंतीचा इंचभर तुकडासुद्धा सजावटीशिवाय सोडणं हा आपला ऐश्वर्याचा आणि रसिकतेचा अपमान आहे, अशी लुई मंडळींची प्रामाणिक समजूत होती. त्यामुळे ज्या भिंतीवर टेपेस्ट्री नाही तिथे मार्बल आहे आणि मार्बल नसेल तिथे पेंटिंग्ज आहेत. टेपेस्ट्री फक्त रेशमी नाही. सर्वत्र सोन्याची जर आहे. राजा-राणीच्या बेडरूममध्ये राज्य सोन्याच्या जरीचं आहे. राजे-महाराजे पैशात लोळतात असं ऐकलं होतं. लुईचं खानदान सोन्यात लोळायचं.

तो महाल पाहताना पेंटिंग्जची आर्ट गॅलरी पाहतोय असंही वाटतं. कारण भिंतीवर किंवा छतांवर पेंटिंग नाही असं दालन नाही. कुत्र्याच्या बेडरूममध्येही कुत्र्याची पेंटिंग्ज आहेत. वा ! काय रसिकता ! चौदावा लुई चित्रकला आणि शिल्पकलेचा दर्दी होता. एखादं शिल्प किंवा चित्र आवडलं की तो किमतीची पर्वा करायचा नाही. जनतेच्या पोटापेक्षा चित्रं महत्त्वाची हे त्याने कधीच ठरवलं होतं. सरकारी खजिना त्याने शिल्प-चित्रांकरिता सढळ हाताने वापरला. रोममधील अजरामर शिल्पं त्याला मिळणं शक्य नव्हतं. त्यामुळे त्याने आपले सर्वोत्कृष्ट कलाकार रोमला पाठवले आणि त्यांच्याकडून त्याने शिल्पाची पेंटिंग्जची नक्कल करवली.

मी रोममधली काही शिल्पं आणि चित्रं पाहिली आहेत. पण त्या व्हर्सायच्या महालातली शिल्पं-चित्रं तितकीच सुंदर वाटतात. मग ती देवांना जिंकणारी लावण्यवती व्हिनस असो किंवा युद्धावर निघालेला ज्युलियस सिझर असो. कुठल्याही क्षणी चित्रांतून उतरून आपल्याला भेटतील इतकी जिवंत वाटतात.

त्या चित्रांच्या मोहपाशातून मी स्वत:ला सोडवून घेत 'ला प्लास द कॉंकर्ड' चा रस्ता धरला. फ्रेंच क्रांतीच्या अस्पष्ट का होईना, पण असतील तेवढ्या खुणा मला पाहायच्या होत्या. शॉंजेऐलिजेच्या राजमार्गावरून मी ला 'प्लास द कॉंकर्ड'ला पोचलो. तिथं एक टुरिस्ट बस आली होती आणि त्या बसमधल्या गोऱ्यांना एक गाईड सांगत होता, ''मेरी अंतुनवानला इथे फाशी दिलं. तिचं डोकं गिलोटीनने धडावेगळं केलं गेलं. व्हर्सायच्या महालात राहणाऱ्या राणीला केसाला धरून खेचण्यात आलं... ''तो गाईड बोलत होता आणि मी पुन्हा १७८९ सालात पोचलो होतो. राणीचे सोनेरी केस मला दिसत होते. तिचा आक्रोश ऐकू येत होता आणि क्रांतीकारकांच्या चेहऱ्यावरचा आसुरी आनंद दिसत होता. एकेकाळी हीच राणी भुकेल्या जनतेला तुच्छपणे म्हणाली होती, ''काय, पाव खायला मिळत नाही ? मग केक का नाही खात ?''

त्या दिवशी रात्री मी वाईनचा ग्लास फ्रेंच क्रांतीच्या नावाने उंचावला.

■

(२४ सप्टेंबर १९९५)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0028772